In अं- ending neuter nouns, there is only one group and in it the -अं is replaced by -या: SF केळं OF केळ्या - A

dental consonant preceding the अं become palatal before य which disappears after the palatalization: SF लोणचं OF लोणच्या - Similarly the fricative स in the same position becomes श before य in its OF: SF फुरसं 'a kind of snake', OF फुरशा-

The ई- ending neuter nouns, take the suffix आ: SF पाणी, OF पाण्या-

In the ऊ-ending neuter nouns there are four groups (i) replacing the final -ऊ by -आ: SF लिंबू OF लिंबा- (ii) taking the suffix वा SF गळू OF गळवा- (iii) adding वा after the final ऊ SF जू OF जुवा and (iv) adding the suffix O to the final ऊ SF सुकाणू - OF सुकाणू.

गट - ३

धडा बारावा

हे कोण आहेत ?

Unit - III

LESSON 12

Who is he ?

हे राळेगणसिद्धी गाव आहे.	This is Ralegansiddhi village.
हे श्रीयुत अण्णा हजारे आहेत.	This is Mr. Anna Hajare.
श्री. हजारे समाजसेवक आहेत.	Mr. Anna Hajare is a social worker.
ह्या शालिनीताई आहेत.	This is Shalinitai.
शालिनीताई कोण आहेत ?	Who is Shalinitai ?
शालिनीताई सरपंच आहेत.	Shalinitai is a 'Sarpanch'.
ही सभा आहे.	This is a meeting.
सभेत कोण कोण आहेत ?	Who are there in the meeting?
समोर अनेक माणसं आहेत.	There are many people in front.
ते देशमुखसाहेब आहेत.	That is Deshmukhsaheb.
देशमुखसाहेब वकील आहेत.	Deshmukhsaheb is a lawer.
हे चौधरीसाहेब आहेत.	This is Chaudharisaheb.
चौधरीसाहेब कार्यवाह आहेत.	Chaudharisaheb is a Superintendent.
मागे महादू आहे.	There is Mahadu behind.
महादू गवंडी आहे.	Mahadu is a mason.
हा शिवराम आहे.	This is Shivram.
शिवराम सुतार आहे.	Shivram is a carpenter.
शिवरामशेजारी गोविंद आहे.	There is Govind near Shivram.
गोविंद धोबी आहे.	Govind is a washerman.

तो मल्हारी आहे.	That is Malhari.
मल्हारी धनगर आहे.	Malhari is a shepherd.
मल्हारीपुढे परशुराम आहे.	There is Parshuram ahead of Malhari.
परशुराम गुराखी आहे.	Parshuram is cowherd.
इकडे बायका आहेत.	There are women at this side.
ही रुक्मिणी आहे.	This is Rukmini.
रुक्मिणी गवळण आहे.	Rukmini is a milkwoman.
रुक्मिणीशेजारी सीता आहे.	There is Seeta near Rukmini.
सीता कोळीण आहे.	Seeta is a fisherwoman.
त्या विमलाबाई आहेत.	That is Vimalabai.
विमलाबाई ग्रंथपाल आहेत.	Vimalabai is a librarian.
आणि ह्या पवारबाई आहेत.	And this is Pawarbai.
पवारबाई प्राध्यापिका आहेत.	Pawarbai is a lecturer.
इकडे श्रीमती पाटील आहेत.	Here there is Ms. Patil.
श्रीमती पाटील मुख्याध्यापिका आहेत.	Ms. Patil is a headmistress.
दाराजवळ सोपान आहे.	There is Sopan near the door.
सोपान शिपाई आहे.	Sopan is a peon.
बाहेर बाग आहे.	There is a garden outside.
बागेत विश्वनाथ आहे.	There is Vishwanath in the garden.
विश्वनाथ माळी आहे.	Vishwanath is a gardener.
सभेत खूप माणसं आहेत.	There are many people in the meeting.

Drills

I

Repetition drill

1

हा मल्हारी आहे.	मल्हारी धनगर आहे.
तो महादू आहे.	महादू गवंडी आहे.
हा शिवराम आहे.	शिवराम सुतार आहे.
हा गोविंद आहे.	गोविंद धोबी आहे.
हा सोपान आहे.	सोपान शिपाई आहे.
हा परशुराम आहे.	परशुराम गुराखी आहे.
तो विश्वनाथ आहे.	विश्वनाथ माळी आहे.

2

ती रुक्मिणी आहे.	रुक्मिणी गवळण आहे.
ही सीता आहे.	सीता कोळीण आहे.

3

हे श्री. अण्णा हजारे आहेत.	श्री. हजारे समाजसेवक आहेत.
हे देशमुखसाहेब आहेत.	देशमुखसाहेब वकील आहेत.
ते चौधरीसाहेब आहेत.	चौधरीसाहेब कार्यवाह आहेत.

4

त्या विमलाबाई आहेत.	विमलाबाई ग्रंथपाल आहेत.
त्या शालिनीताई आहेत.	शालिनीताई सरपंच आहेत.
ह्या पवारबाई आहेत.	पवारबाई प्राध्यापिका आहेत.
ह्या श्रीमती पाटील आहेत.	श्रीमती पाटील मुख्याध्यापिका आहेत.

II

Question-Answer Drill

1

हा कोण आहे ?	हा सीताराम आहे.
सीताराम कोण आहे ?	सीताराम सुतार आहे.
ही कोण आहे ?	ही चंदा आहे.
चंदा कोण आहे ?	चंदा नर्स आहे.
तो कोण आहे ?	तो लक्ष्मण आहे.
लक्ष्मण कोण आहे ?	लक्ष्मण माळी आहे.
ती कोण आहे ?	ती तारा आहे.
तारा कोण आहे ?	तारा शिक्षिका आहे.

2

हे कोण आहेत ?	हे श्रीयुत काळे आहेत.
श्रीयुत काळे कोण आहेत ?	श्रीयुत काळे शिक्षक आहेत.
ह्या कोण आहेत ?	ह्या श्रीमती देशपांडे आहेत.
श्रीमती देशपांडे कोण आहेत ?	श्रीमती देशपांडे डॉक्टर आहेत.
ते कोण आहेत ?	ते विलासराव आहेत.
विलासराव कोण आहेत ?	विलासराव वकील आहेत.
त्या कोण आहेत ?	त्या नलिनीबाई आहेत.
नलिनीबाई कोण आहेत ?	नलिनीबाई मुख्याध्यापिका आहेत.

3

हे कोण आहेत ?	हे सुभाषराव आहेत.

सुभाषराव कोण आहेत ?	सुभाषराव इंजिनीयर आहेत.
सुभाषराव कुठे आहेत ?	सुभाषराव कारखान्यात आहेत.
ते कोण आहेत ?	ते भास्करराव आहेत.
भास्करराव कोण आहेत ?	भास्करराव डॉक्टर आहेत.
भास्करराव कुठे आहेत ?	भास्करराव दवाखान्यात आहेत.
ह्या कोण आहेत ?	ह्या सुलोचनाबाई आहेत.
सुलोचनाबाई कोण आहेत ?	सुलोचनाबाई शिक्षिका आहेत.
सुलोचनाबाई कुठे आहेत ?	सुलोचनाबाई शाळेत आहेत.
त्या कोण आहेत ?	त्या महालेबाई आहेत.
महालेबाई कोण आहेत ?	महालेबाई ग्रंथपाल आहेत.
महालेबाई कुठे आहेत ?	महालेबाई ग्रंथालयात आहेत.

III

Frame questions to get the answers as shown.

(दिलेली उत्तरे मिळतील असे प्रश्न बनवा.)

हा मोहन आहे.	हा कोण आहे ?
मोहन विद्यार्थी आहे.	मोहन कोण आहे ?
सीताराम सुतार आहे.	सीताराम कोण आहे ?
ही कल्पना आहे.	ही कोण आहे ?
कल्पना शिक्षिका आहे.	कल्पना कोण आहे ?
कल्पना शाळेत आहे.	कल्पना कुठे आहे ?
आनंदराव लेखक आहेत.	आनंदराव कोण आहेत ?
त्या आशाताई आहेत.	त्या कोण आहेत ?
आशाताई बँकेत आहेत.	आशाताई कुठे आहेत ?
ते मधुकरराव आहेत.	ते कोण आहेत ?

मधुकरराव कार्यवाह आहेत.	मधुकरराव कोण आहेत ?
देशपांडेसाहेब कोर्टात आहेत.	देशपांडेसाहेब कुठे आहेत ?

IV

Substitute the underlined noun with the given noun making necessary changes.

(सुजाताऐवजी दिलेले शब्द योग्य ते फेरफार करून वापरा.)

ही सुजाता आहे.	ही सुजाता आहे.
अरुण	माळी
धोबी	विद्यार्थिनी
नीलाताई	डॉक्टर
प्राध्यापक	बेहेरेसाहेब
सुनील	कोळीण
शांताबाई	शंतनुराव
श्रीमती भट	श्रीयुत दामले
गवंडी	दामोदर
रेखा	मंजिरीबाई
लेखक	रामराव

VI

Conversation Drill

शिक्षक : मोहन, हे काय आहे ?

मोहन : ही शाळा आहे ?

शिक्षक : शाळेत कोणकोण आहेत ?

मोहन : शाळेत विद्यार्थी आणि विद्यार्थिनी आहेत.

शिक्षक : ह्या कोण आहेत ?

मोहन : ह्या सानेबाई आहेत.

शिक्षक : आणि तिकडे कोण आहेत ?
मोहन : तिकडे नेनेसर आहेत.
शिक्षक : मुख्याध्यापक कोण आहेत ?
मोहन : मुख्याध्यापक कुलकर्णीसर आहेत.
शिक्षक : मुख्याध्यापक कुठे आहेत ?
मोहन : मुख्याध्यापक कार्यालयात आहेत.
शिक्षक : आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी कुठे आहेत ?
मोहन : विद्यार्थी-विद्यार्थिनी वर्गात आहेत.

स्वाध्याय क्र.१२ **Exercises No.12**

1. Fill in the gaps with profession showing nouns you have learnt.

(रिकाम्या जागा तुम्हाला माहीत असलेल्या धंदावाचक नामांनी भरा.)

हा राम आहे.	राम .... आहे.
ही पुष्पा आहे.	पुष्पा .... आहे.
त्या मालिनीताई आहेत.	मालिनीताई ...... आहेत.
तो किसन आहे.	किसन .... आहे.
ते तावरेसाहेब आहेत.	तावरेसाहेब ...... आहेत.
हा नारायण आहे.	नारायण .... आहे.
ही मंदा आहे.	मंदा .... आहे.
ह्या मुली आहेत.	मुली .... आहेत.
ह्या दळवीबाई आहेत.	दळवीबाई .... आहेत.
ते श्री. पै आहेत.	श्री. पै .... आहेत.

2. **Select a suitable word from Col. B to match with word in Col. A. Use the pair in sentence.**
(कॉलम A आणि B मधून योग्य शब्दांच्या जोड्या निवडा आणि त्यांचा वाक्यात उपयोग करा.)

A	B	A	B
शेतकरी	बाग	क्लार्क	शेत
डॉक्टर	ऑफिस N	कॅशियर	कारखाना
मुख्याध्यापिका	कोर्ट (n)	माळी	शाळा
प्राचार्य	बँक (F/e)	वकील	कॉलेज (n)
इंजिनीयर	दवाखाना	शिक्षिका	कार्यालय

3. **Select the correct noun from the bracket and answer the following questions.**
(कंसात दिलेल्या नामांपैकी योग्य ते नाम निवडून पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.)

हे काय आहे ?	(सुनंदा, सुनील, साडी)
तो कोण आहे ?	(पीन, चेंडू, भालचंद्र)
ही कोण आहे ?	(रेषा, मीना, पेला)
ते काय आहे ?	(विद्यार्थी, नलिनी, हत्ती)
ह्या कोण आहेत ?	(विद्यार्थिनी, पाली, भिंती)
हे कोण आहेत ?	(फोटो, पेले, विद्यार्थी)
त्या कोण आहेत ?	(वह्या, बायका, मूर्ती)
हे काय आहे ?	(मालतीबाई, डोळे, शरद)
ह्या कोण आहेत ?	(श्री. काळे, बादली, मीनाताई)
ते काय आहे ?	(अभय, प्रभाकरपंत,कोकरू)
ते कोण आहेत ?	(नेनेसाहेब, भागवतबाई, खडू)

4. **Transform the following sentences into plural.**
(पुढील वाक्यांची अनेकवचने करा.)

ही विद्यार्थिनी आहे.	तो मुलगा आहे.
हा विद्यार्थी आहे.	ती मुलगी आहे.
हा शिपाई आहे.	ही गवळण आहे.
तो सुतार आहे.	ती शिक्षिका आहे.
हा माळी आहे.	तो डॉक्टर आहे.
हा धोबी आहे.	ती कोळीण आहे.

5. **Frame question to obtain the following answers.**
(पुढील उत्तरे मिळवण्यासाठी विचारले जाणारे प्रश्न लिहा.)

ही मंदाकिनी आहे.	हे श्रीयुत जोशी आहेत.
मंदाकिनी प्रयोगशाळेत आहे.	श्रीयुत जोशी वकील आहेत.
ही फुलं आहेत.	मोहनराव शाळेत आहेत.
प्राची शिक्षिका आहे.	हा पियानो आहे.
मुलगा घरात आहे.	इंदिराबाई मुख्याध्यापिका आहेत.
ही उषा आहे.	ह्या उशा आहेत.
उशा खुर्च्यांवर आहेत.	उषाताई बागेत आहेत.
हा मुलगा आहे.	ते पतंग आहेत.
उषा टायपिस्ट आहे.	सदाशिव क्लार्क आहे.
ह्या कॅशियर आहेत.	ही मुलगी आहे.

6. **Some pairs of nouns are given below. Construct sentenses of your own using them with the various postpositions that you have learnt.**
(पुढे काही नामांच्या जोड्या दिल्या आहेत. त्यांच्या सहाय्याने, तुम्ही शिकलेली शब्दयोगी अव्यये वापरून स्वतःची वाक्ये बनवा.)

Model : **धोबी - कपडे ------ धोब्याजवळ कपडे आहेत.**

माळी - फुलं	गुराखी - बासरी
सुतार - खुर्ची	वकील - फायली
डॉक्टर - मुलगा	ग्रंथपाल - पुस्तक
शिक्षिका - खडू	कोळीण - मासे
विद्यार्थी - वह्या	गवंडी - विटा
शिपाई - घंटा	प्राध्यापिका - पर्स
विद्यार्थिनी - पेन्सिली	गवळण - दूध
मुख्याध्यापिका - फोटो	कार्यवाह - घड्याळ

Vocabulory

कारखाना	(m)	factory	दवाखाना (m)	dispensary
कार्यवाह	(m)	superintendent	धनगर (m)	shepherd
कार्यालय	(n)	office	धोबी (m)	washerman
बाई	(f/pp)	woman, lady	प्राध्यापिका (f)	lady lecturer
कोण/कोणकोण	(int)	who	मुख्याध्यापिका (m)	headmistress
कोळीण	(f) i	fisherwoman	राव (m/pp)	hon. m.
गवंडी	(m)	mason	वकील (m)	lawyer
ग्रंथपाल	(m)	librarian	शिपाई (m)	Peon

गुराखी	(m)	cowherd	सुतार	(m)	carpenter
ताई	(f/pp)	sister, hon pp			

आकडे		Numerals	
एकसष्ट	Sixty-One	सहासष्ट	Sixty-Six
बासष्ट	Sixty-Two	सदुसष्ट	Sixty-Seven
त्रेसष्ट	Sixty-Three	अडुसष्ट	Sixty-Eight
चौसष्ट	Sixty-Four	एकोणसत्तर	Sixty-Nine
पासष्ट	Sixty-Five	सत्तर	Seventy

Grammatical Notes

Unit II and III introduce the question markers **काय** 'what' and **कुठे** 'where' with the help of which we illustrate the Marathi noun system.

In this Unit the question marker **कोण** 'who' is introduced. The interrogative word **कोण** is used to get the indentity of a person. We can also ask information about the profession of a person by using **कोण.**

The pattern of the question is :-

Masculine Singular :-

Q. : हा / तो + कोण + आहे ?	A.: हा / तो (proper name) + आहे.
Q.: Proper name + कोण + आहे ?	A.: Proper name + (profession) + आहे.

Examle :-

Q.: हा / तो कोण आहे ?	'Who is this / that ?'
A.: हा / तो राम आहे.	This / that is Ram.
Q.: राम कोण आहे ?	'Who is Ram ?'

A.: राम शिपाई आहे. 'Ram is a peon.'

Feminine singular :-

Q.: ही / ती + कोण + आहे ? A.: ही / ती + (proper name) + आहे.

A.: Proper name + कोण + आहे ? A.: Proper name + (professional) + आहे.

Example :-

Q.: ही / ती + कोण + आहे ? 'Who is this / that ?'

A.: ही / ती वीणा आहे. 'This / that is Veena.'

Q.: वीणा कोण आहे ? 'What is Veena ?'

A.: वीणा नर्स आहे. 'Veena is a nurse.'

This pattern is used with reference to a younger person or an inferior.

The plural form of this question is the honorific usage of the interrogative कोण 'who'.

The honorific question in plural serves two purposes:

1. **It is used for a person of equal social rank but older in age or for a person of higher social rank, older or younger; i.e. it is used to express not merely one's respect to the age but also to the social rank of a person.**
2. **It is used if the relation between the speaker and the listener is formal or distinct.**

The pattern of this question will be as follows :

Q.: हे / ते कोण आहेत ?	ह्या / त्या कोण आहेत ?
A.: हे / ते काळेसाहेब आहेत.	ह्या / त्या सुशीलाबाई आहेत.
Q.: श्रीयुत काळे कोण आहेत ?	श्रीमती भट कोण आहेत ?
A.: श्रीयुत काळे प्राध्यापक आहेत.	श्रीमती भट प्राध्यापिका आहेत.

There are some more words added to the name or surname, (family name) of a person addressed or referred to, to express

respect. These words are, in case of the men राव, पंत / साहेब and in the case of women, ताई, बाई.

Certain rules are to be observed for getting the oblique forms of the proper nouns. The following table gives these oblique forms.

तक्ता क्रमांक १० Table No. 10

Masculine Proper Nouns			Feminine Proper Nouns	
Endings	SF	OF	SF	OF
- - C	राम	राम ––	कमल	कमल - -
- - a	गोविंदा	गोविंदा ––	मीना	मीना ––
--i	हरी	हरी ––	मालती	मालती ––
--u	खंडू	खंडू ––	वेणू	वेणू ––
--o	केशो	केशो ––	कम्मो	कम्मो ––

Surnames

Ending	SF	OF	
		Informal	Formal
--C	बापट	बापट –– बापटा ––	बापटां ––
-- आ	बाफना	बाफना ––	बाफनां ––
––ई	पत्की	पत्की ––	पत्कीं ––
––ऊ	नातू	नातू ––	नातूं ––
––ए	बेहेरे	बेहेरे –– बेहेऱ्या ––	बेहेऱ्यां –– बेहेरें ––
–– ओ	लोबो	लोबो ––	लोबों ––

Masculine or feminine first names do not undergo any change in the oblique. But family names (surnames), used in the formal style, change optionally.

गट - ४	Unit-IV
धडा तेरावा	**LESSON 13**
किती	How many
शिक्षक : मुलांनो इकडे पहा! हा पंखा आहे आणि तो पंखा आहे. वर्गात दोन पंखे आहेत. आता इकडे पहा. हा एक खडू आहे आणि ते दोन खडू आहेत.	Teacher : Childern, look here. This is one fan and that is one fan. There are two fans in the class. Now look here. This is one chalksticks. and those are two chalksticks.
टेबलावर तीन खडू आहेत.	There are three chalksticks on the table.
भिंतीकडे पहा.	Look at the wall.
सुभाष, भिंतीवर काय आहे ?	Subhash, What is there on the wall ?
सुभाष : भिंतीवर नकाशे आहेत.	Subhash : There are maps on the wall.
शिक्षक : भिंतीवर किती नकाशे आहेत ? पहा! हा एक नकाशा आहे आणि हे तीन नकाशे आहेत भिंतीवर किती नकाशे आहेत?	Techer : How many maps are there on the wall ? see! This is one map and these are three maps. How many maps are there on the wall ?
सुभाष : भिंतीवर चार नकाशे आहेत.	Subhash : There are four maps on the wall.
शिक्षक : अनिल, टेबलावर	Techer : Anil, how many note

किती वह्या आहेत?	books are there on the table?
अनिल : टेबलावर एक वही आहे.	Anil : There is one note books on the table ?
शिक्षक : अजित, वर्गात किती विद्यार्थी आहेत?	Teacher : Ajit, how many students are there in the class ?
अजित : वर्गात पंचवीस विद्यार्थी आहेत.	Ajit : There are twenty five students in the class.
शिक्षक : आता नीट ऐका.	Teacher : Now listen carefully.
वर्गात एक फळा आहे आणि एक टेबल आहे.	There is one blackboard and there is one table in the class.
वर्गात सव्वीस खुर्च्या आहेत.	There are twentysix chairs in the class.
तिकडे दोन दिवे आहेत.	There are two lamps.
आणि हा एक पंखा आहे.	And here is one fan.
भिंतीवर एक नकाशा आहे.	There is one map on the wall.
समोर एक घड्याळ आहे.	There is one clock in front.
वर्गात एक फोटो आहे.	There is one photograph in the class.
वर्गात अठरा वस्तू आहेत.	There are eighteen things in the class.
वर्गात किती वस्तू आहेत ?	How many things are there in the class.
विद्यार्थी : वर्गात अठरा वस्तू आहेत.	Students : There are eighteen things in the class.

I

Response Drills

हे किती हात आहेत ?	हा एक हात आहे.
हे किती हात आहेत ?	हे दोन हात आहेत.
हे किती पेले आहेत ?	हा एक पेला आहे.
हे किती पेले आहेत ?	हे तीन पेले आहेत.
ते किती पक्षी आहेत ?	तो एक पक्षी आहे.
हे किती पक्षी आहेत ?	ते चार पक्षी आहेत.
हे किती खडू आहेत ?	हा एक खडू आहे.
हे किती खडू आहेत ?	हे पाच खडू आहेत.
हे किती फोटो आहेत ?	हा एक फोटो आहे.
हे किती फोटो आहेत ?	हे सहा फोटो आहेत.
ह्या किती माळा आहेत ?	ही एक माळ आहे.
ह्या किती माळा आहेत ?	ह्या सात माळा आहेत.
त्या किती बादल्या आहेत ?	ती एक बादली आहे.
त्या किती बादल्या आहेत ?	त्या चार बादल्या आहेत.
ह्या किती रिक्षा आहेत ?	ही एक रिक्षा आहे.
ह्या किती रिक्षा आहेत ?	ह्या नऊ रिक्षा आहे.
ह्या किती वस्तू आहेत ?	ही एक वस्तू आहे.
ह्या किती वस्तू आहेत ?	ह्या सात वस्तू आहेत.
त्या किती मुली आहेत ?	ती एक मुलगी आहे.
त्या किती मुली आहेत ?	त्या दोन मुली आहेत.
ही किती पुस्तकं आहेत?	हे एक पुस्तक आहे.
ही किती पुस्तकं आहेत?	ही वीस पुस्तकं आहेत.

ही किती केळी आहेत ?	हे एक केळं आहे.
ही किती केळी आहेत ?	ही बारा केळी आहेत.
ही किती लिंबं आहेत ?	हे एक लिंबू आहे.
ही किती लिंबं आहेत ?	ही चोवीस लिंबं आहेत.

II

ते काय आहे ?	ते पक्षी आहेत.
ते किती पक्षी आहेत ?	ते पंधरा पक्षी आहेत.
पक्षी कुठे आहेत ?	पक्षी झाडावर आहेत.
हे काय आहे ?	हे चेंडू आहेत.
हे किती चेंडू आहेत ?	हे तीस चेंडू आहेत.
चेंडू कुठे आहेत ?	चेंडू टेबलावर आहेत.
हे काय आहे ?	हे टॉमेटो आहेत.
हे किती टॉमेटो आहेत ?	हे वीस टॉमेटो आहेत.
टॉमेटो कुठे आहेत ?	टॉमेटो टोपलीत आहेत.
हे काय आहे ?	ही नोट आहे.
ह्या किती नोटा आहेत ?	ही एक नोट आहे.
नोट कुठे आहे ?	नोट नाण्यांखाली आहे.
हे काय आहे ?	ह्या बादल्या आहेत.
ह्या किती बादल्या आहेत ?	ह्या दोन बादल्या आहेत.
बादल्या कुठे आहेत ?	बादल्या नळाजवळ आहेत.

III

Substitution Drill

Substitute तीन फुलं with the following words making neces sary changes in the sentece. Make questions to obtain the

same.

(तीन फुलं या ऐवजी पुढे दिलेले शद्ध वाक्यात आवश्यक ते बदल करून वापरा.ती उत्तरे मिळवण्यासाठी प्रश्न बनवा.)

ही तीन फुलं आहेत.	ही तीन फुलं आहेत.
एक मुलगा	तीस फळं
चौतीस काजू	पंचेचाळीस खिडक्या
दहा केळी	एक पेन्सील
सत्तर पिना	अडोतीस वांगी
एक टेबल	सहा विंचू
आठ डबे	तेवीस झाडं
एक रेडिओ	पासष्ट पेले
चार सायकली	एक स्टूल

Fill in the gaps with an appropriate interrogative word.

(रिकाम्या जागेत योग्य तो प्रश्नवाचक शद्ध भरा)

हे .... आहे ?	हा .... आहे ?
ह्या .... आहेत ?	ह्या .... माळा आहेत ?
ते .... आहेत ?	ही .... आहे ?
ते .... आहे ?	ते .... रुमाल आहेत ?
ती .... वासरं आहेत ?	वह्या .... आहेत ?
हे .... आहेत ?	ते .... दिवे आहेत ?
कागद .... आहेत ?	त्या .... आहेत ?

Conversation Drill

शिक्षक : अरुण, हे काय आहे ?

अरुण : ही कुलपं आहेत.

शिक्षक : ही किती कुलपं आहेत?
अरुण : हे एक कुलूप आहे.
शिक्षक : आता ही किती कुलपं आहेत?
अरुण : ही दहा कुलपं आहेत.
शिक्षक : वासंती, हे किती पेले आहेत ?
वासंती : हे दोन पेले आहेत.
शिक्षक : ह्या किती माळा आहेत?
वासंती : ही एक माळ आहे.
शिक्षक : ज्योती, हे काय आहे ?
ज्योती : हे कागद आहेत.
शिक्षक : हे किती कागद आहेत ?
ज्योती : हे दोन कागद आहेत.
शिक्षक : अरविंद, ही किती पुस्तकं आहेत ?
अरविंद : हे एक पुस्तक आहे.
शिक्षक : आणि ही किती पुस्तकं आहेत ?
अरविंद : ही चार पुस्तकं आहेत.
शिक्षक : पुस्तकं कुठे आहेत ?
अरविंद : पुस्तक टेबलावर आहेत.

स्वाध्याय १३ वा **Excercise No 13**

1. Fill in the gaps with proximate and remote demon strative adjective and verb.
(रिकाम्या जागेत योग्य ती जवळची आणि दूरची दर्शक विशेषणे आणि 'आहे'/ 'आहेत' हे क्रियापद भरा.)
Model : .... किती आंगठ्या .... ? ह्या / त्या किती आंगठ्या आहेत ?

.... किती पाखरं ....?	.... किती वस्तू ....?
.... किती पिशव्या ....?	.... किती चेंडू ....?
.... किती पैसे ....?	..... किती खोकी ....?
.... किती काचा ....?	..... किती खोल्या ....?
.... किती पिल्लं ....?	.... किती दारं ....?

2. **Give the plural forms of the following nouns and then form questions with these forms using introgative किती. (दिलेल्या शब्दांचे अनेकवचन करून त्यांच्या आधारे 'किती'ने होणारी प्रश्नवाचक वाक्ये तयार करा.)**

Model : पेला - PL पेले : हे किती पेले आहेत?

वस्तू	दार	मामा
नाणं	भांडं	पेरू
वासरू	बायको	खिसा
डायरी	मुलगी	फोन

3. **Frame questions to obtain the following answers. (पुढील उत्तरे मिळविण्यासाठी विचारले जाणारे प्रश्न लिहा.)**

ही पंचवीस लिंबं आहेत.	ते घर आहे.
हा एक खिसा आहे.	त्या चिमण्या आहेत.
ही एक पीन आहे.	ते एक अंडं आहे.
ती एक मूर्ती आहे.	ही वांगी आहेत.
तो कागद आहे.	ते सात हत्ती आहेत.
ह्या बारा फायली आहेत.	ती एक मुलगी आहे.
पक्षी झाडावर आहेत.	तो राघव आहे.

4. **Transform the follwing sentences into the plural using the numbers given below in the brackets.**

(कंसात दिलेल्या संख्यांच्या सहाय्याने खालील वाक्ये अनेकवचनात लिहा.)

ही एक पेन्सील आहे. (चोवीस) हे एक कोकरू आहे (पंचवीस)
हा एक दिवा आहे. (दहा) हा एक बादशहा आहे. (दोन)
ही एक खुर्ची आहे. (वीस) हे पान आहे. (पाच)
हा एक विंचू आहे. (बारा) हा एक विद्यार्थी.(पन्नास)
हे एक फूल आहे. (ऐंशी) ही एक मुलगी आहे. (सत्तर)

5. Answer the following questions with the help of the words given in the brackets.

(कंसातल्या शद्बांची मदत् घेऊन खालील प्रश्नांची उत्तरे द्या.)

हे काय आहे ? (पेले) हे काय आहे ? (कागद)
हे किती पेले आहेत ? (सात) हे किती कागद आहेत ?(पाच)
पेले कुठे आहेत? (टेबल) कागद कुठे आहेत? (वही)
पेल्यात काय आहे ? (पाणी) वही कुठे आहे ? (कागद)
हे काय आहे ? (पिना) हे काय आहे ? (वासरू)
ह्या किती पिना आहेत ? (साठ) ही किती वासरं आहेत ? (एक)
पिना कुठे आहेत ? (डबी) वासरू कुठे आहे ? (शेत)
पेन्सील कुठे आहे ? (पिना) शेतात कोण आहे ? (शेतकरी)

6. Give the oblique forms of the nouns underlined in the following sentences.

(पुढील वाक्यांतील अधोरेखित नामांची योग्य ती सामान्यरूपे द्या.)

दोन कपाट + मधे पन्नास साड्या आहेत.
फुलं चार पेला + मधे आहेत.
बांगड्या दोन हात + त आहेत.
वह्या पाच फाईल + वर आहेत.
पंचवीस फोटो + शेजारी घड्याळं आहेत.

आठ नळ + जवळ बादल्या आहेत.

चार रेडिओ + खाली रुमाल आहेत.

पंधरा खाट + वर गाद्या आहेत.

तेहेतीस दार + समोर सायकली आहेत.

दोन डबी + मधे पिना आहेत.

Vocabulary

किती (int)	How many
कंगवा (m)	comb
झाकण (n)	lid
डबा (m)	box - container
डबी (f)	smail continet
दुकान (n)	shop
नळ (m)	tab
बादली (f)	bucket
बांगडी (f)	bangle

आकडे		Numbers	
एक्काहात्तर	seventy -one	शहात्तर	seventy -six
बहात्तर	seventy -two	सत्यात्तर	seventy - seven
त्र्याहात्तर	seventy -three	अठ्ठ्यात्तर	seventy - eight
चौऱ्यात्तर	seventy -four	एकोणऐंशी	seventy - nine
पंच्यात्तर	seventy - five	ऐंशी	eighty

Grammatical Notes

Unit IV introduces the interrogative word किती.

Lesson 13 explains the question with किती : 'how many'

This question gives the information about the number of objects, persons etc.

The following rules should be observed while using this question :

(i) While the interrogative किती is invariable, the other components viz. demosntrative adjective, noun and verb are variable, according to the object about which information is asked.

(ii) The noun etc. in this question are always in the plural. The answer may be in the singular or the plural. Thus.

Masuline :

Question :	हे / ते किती (M.pl.) आहेत.
Answer :	हा / तो एक (M.sg.) आहे.
	हे /ते दोन etc(M.pl.) आहेत.

Feminine :

Question :	ह्या / त्या किती (F.pl.) आहेत ?
Answer :	ही / ती एक (F. sg.) आहे.
	ह्या / त्या दोन etc (F.pl) आहेत.

Neuter :

Question :	ही / ती किती (Neu.pl.) आहेत ?
Answer :	हे / ते एक (Neu. sg.) आहे.
	ही / ती दोन etc. (Neu. pl.) आहेत.

The interrogative word किती is also used to denote quantity. This is explained in Unit IV, Lesson.14.

गट - ४

Unit - IV

धडा चौदावा

LESSON 14

दुकान

Shop

हे दुकान आहे.	This is a shop.
दुकानात खूप पोती आहेत.	There are many sacks in the shop.
पोत्यांमध्ये धान्य आहे.	There is foodgrain in the sacks.
हा तांदूळ आहे.	This is rice.
हा गहू आहे.	This is wheat.
ही ज्वारी आहे.	This is jowar.
आणि हे कडधान्य आहे.	And this is cereal.
हे पोतं पहा.	See this sack.
पोत्यात साखर आहे.	There is sugar in the sack.
तिकडे तराजू आहे.	There is a balance over there.
तराजूत गहू आहे.	There is wheat in the balance.
तिकडे दुकानदार आहे.	Overthere is the shopkeeper.
इकडे गिऱ्हाईक आहे.	Here there is a customer.

2

गिऱ्हाईक : ते काय आहे ?	Customer : What is that ?
दुकानदार : तो तराजू आहे.	Shopkeeper : That is a balance.
गि.: तराजूत किती किलो गहू	Cus.: How much wheat is

आहे ?	there in the balance ?
दु.- तराजूत दहा किलो गहू आहे.	Sh.: There is 10 kgs of wheat in the balance.
गि.- ही किती किलो साखर आहे ?	Cu.- How many kgs of sugar is this ?
दु.- ही वीस किलो साखर आहे.	Sh.- This is 20 kgs of sugar.
ती दहा पोती ज्वारी आहे.	That is 10 sacks of jowar.
ते पाच पोती कडधान्य आहे.	That is 5 sacks of cereal.
दुकानात तेल आहे.	There is oil in the shop.
तेल बरणीत आहे.	The oil is in the jar.
गि.-बरणीत किती तेल आहे ?	Cu.- How much oil is there in the jar ? -
दु.- बरणीत पाच किलो तेल आहे.	Sh.- There is 5 kgs of oil in the jar.
दु.- तिकडे इतर वस्तू आहेत. ती डाळ आहे.	Sh.- Over there are other things. It is dal.
गि. - ती किती किलो डाळ आहे ?	Cu.- How many kgs of dal is there ?
दु.- ती पंचवीस किलो डाळ आहे.	Sh.- That is 25 kgs of dal.
गि.- आणि ते डब्यात काय आहे ?	Cu.- And what is there in the tin ?
दु.- डब्यात तूंप आहे.	Sh.- There is ghee in the tin.
गि. - डब्यात किती तूप आहे ?	Cu. - How much ghee is it in the tin ?

दु. डब्यात सोळा किलो तूप आहे.	Sh.- There is 16 kgs of ghee in the tin.
गि. - ते काय आहे ?	Cu.- What is that ?
दु.- ती कॉफी आहे.	Sh.- That is coffee.
गि.- पुड्यात किती कॉफी आहे ?	Cu.- How much coffee is there in the packet ?
दु.- ह्या पुड्यात १०० ग्रॅम कॉफी आहे.	Sh.- There is 100 grams coffee in this packet.
आणि ह्या पुड्यात पाचशे ग्रॅम कॉफी आहे.	And there is 500 grams coffee in this packet.
हा चहा आहे.	This is tea.
हा एक किलो चहा आहे.	This is one kg of tea.
हा दोन किलो चहा आहे.	This is two kg of tea.

Drills

I

Repetition Drills

हा गवळी आहे.	गवळ्याजवळ दूध आहे.
गवळ्याजवळ किती दूध आहे ?	गवळ्याजवळ चार लिटर दूध आहे.
हे दुकान आहे.	दुकानात लोणी आहे.
दुकानात किती लोणी आहे ?	दुकानात आठ किलो लोणी आहे.

2

हा चहा आहे.	ही कॉफी आहे.
हा किंती कप चहा आहे ?	ही किती कप कॉफी आहे ?
हा दोन कप चहा आहे.	ही तीन कप कॉफी आहे.

हे दूध आहे.

हे किती कप दूध आहे ?

हे चार कप दूध आहे.

3

हा तांदूळ आहे.

तांदूळ कुठे आहे ?

तांदूळ पोत्यात आहे.

पोत्यात किती किलो तांदूळ आहे ?

पोत्यात दहा किलो तांदूळ आहे.

ही डाळ आहे.

डाळ कुठे आहे ?

डाळ डब्यात आहे.

डब्यात किती किलो डाळ आहे?

डब्यात दोन किलो डाळ आहे.

II
Substitution Drill

Substitute the underlined words with the given words making necessary changes in the sentences.
(वाक्यात योग्य ते बदल करून अधोरेखित शब्दाऐवजी दिलेले शब्द वापरा.)

Model : हा अकरा किलो तांदूळ आहे. (तराजू)
हे अकरा तराजू आहेत.

तो पंधरा किलो गहू आहे. (पक्षी)
ही पंचवीस किलो ज्वारी आहे. (बादली)
हे दोन किलो तेल आहे. (लिंबू)
हा चौदा कप चहा आहे. (फळा)
हे पन्नास लिटर दूध आहे. (वासरू)
ही बेचाळीस कप कॉफी आहे. (भांडं)
हे नऊ लिटर पाणी आहे. (नळ)
ही पाच किलो भाजी आहे. (फोटो)
हा एक कप चहा आहे. (मुलगा)

III

Fill in the gaps drill

Select the correct word from the brackets and fill it in the gap.

(कंसातून निवडलेला योग्य शब्द रिकाम्या जागी भरा.)

हा किती कप .... आहे. (पाणी, पैसा, दूध, चहा)

त्या किती .... आहेत. (कॉफी, साड्या, ज्वारी, साखर)

ही किती .... आहे ? (कॉफी, बायको, गाय, दूध)

ते किती .... आहे ? (पेले, लोणी, लिंबू, झाडं)

ती किती .... आहे ? (साखर, पुस्तकं, मुलगी, बायका)

ते किती .... आहेत ? (गहू, पेरू, वस्तू, लिंबू)

ही किती .... आहेत ? (वह्या, वांगी, पेले, तेल)

हे किती .... आहे ? (दही, हत्ती, नदी, मामा)

ते किती .... आहेत ? (दिवे, संत्री, केळी, पिना)

हा किती किलो .... आहे ? (मुलगा, तांदूळ, भाजी, कागद)

IV

Transformation Drill

Give the questions in order to obtain the following answers.

(पुढील उत्तरे मिळवण्यासाठी लागणारे प्रश्न बनवा.)

हे दूध आहे.	हे काय आहे ?
हे चार कप दूध आहे.	हे किती कप दूध आहे ?
हे काय आहे ?	हा तांदूळ आहे.
हा पंधरा किलो तांदूळ आहे.	हा किती किलो तांदूळ आहे?
ही पाच पेले कॉफी आहे.	ही किती कॉफी आहे ?
कॉफी पेल्यात आहे.	कॉफी कुठे आहे ?

हे तेल आहे.	हे काय आहे ?
तेल बरणीत आहे.	तेल कुठे आहे ?
बरणीत तीन किलो तेल आहे?	बरणीत किती किलो तेल आहे.
पातेल्यात एक किलो दही आहे.	पातेल्यात किती किलो दही आहे ?
तो दोन कप चहा आहे.	तो किती कप चहा आहे ?
हा लाडू आहे.	हे काय आहे ?
पोत्यात चाळीस किलो ज्वारी आहे.	पोत्यात किती ज्वारी आहे ?

स्वाध्याय १४ वा **Exercise No. 14**

1) Answer the following questions with the help of the words given in the brackets.

(कंसात दिलेल्या शब्दांच्या सहाय्याने पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.)

हे काय आहे ?	(तराजू)
तराजूत काय आहे ?	(गहू)
हा किती किलो गहू आहे ?	(पाच)
गव्हासमोर काय आहे ?	(ज्वारी)
ती किती पोती आहेत ?	(एक)
ती किती ज्वारी आहे ?	(एक पोतं)
पोत्याशेजारी काय आहे ?	(साखर)
साखर कुठे आहे ?	(डबा)
ती किती किलो साखर आहे ?	(पंधरा)

2) Turn into the plural the following sentences using the numerals given in the brackets.

(पुढील वाक्ये कंसातल्या आकड्यांच्या आधारे अनेकवचनात लिहा.)

हे एक पोतं कडधान्यं आहे. (१०)
तो एक कप चहा आहे. (१२)
ही एक किलो साखर आहे. (१५)
हा एक डबा तांदूळ आहे. (२२)
ही एक पेला कॉफी आहे. (१४)
ते एक पातेलं दही आहे. (२)
ते एक पेला सरबत आहे. (५)
हे एक बादली पाणी आहे. (४)
हे एक डबा तूप आहे. (७)
ती एक चमचा साखर आहे. (६)

3) **Fill in the gaps in the conversation between a customer and a shopkeeper, given below, with appropriate sentences.**

(पुढे दिलेल्या गिऱ्हाईक आणि दुकानदार यांच्यातल्या संवादात रिकाम्या जागा भरा.)

गिऱ्हाईक : तिकडे काय आहे ?
दुकानदार : ....
गिऱ्हाईक : तो किती किलो गहू आहे ?
दुकानदार : ....
गिऱ्हाईक : .... ?
दुकानदार : पोत्यात तीस किलो साखर आहे.
गिऱ्हाईक : आणि इकडे काय आहे ?
दुकानदार : ....
गिऱ्हाईक : बरण्यांमध्ये काय आहे ?

दुकानदार : ....
गिऱ्हाईक : .... ?
दुकानदार : बरण्यांमध्ये चाळीस किलो तेल आहे.
गिऱ्हाईक : कडधान्यं कुठे आहेत ?
दुकानदार : ....
गिऱ्हाईक : ती पोती कुठे आहेत ?
दुकानदार : ....
गिऱ्हाईक : तिकडे पोत्यांशेजारी काय आहे?
दुकानदार : पोत्यांशेजारी डबे आहेत.
गिऱ्हाईक : .... ?
दुकानदार : डब्यांमध्ये काजू आहेत.

4. **Substitute the underlined words with the help of the words that follow making necessary changes in the sentences. Write numbers in letters.**
(वाक्यात योग्य ते बदल करून अधोरेखित शब्दांच्या ऐवजी दिलेले शब्द वापरा. दिलेले आकडे अक्षरी लिहा.)

तो चार कप चहा आहे.	तो चार कप चहा आहे.
२ लिटर दूध	५ बाटल्या सरबत
३ बरण्या तेल	६ पेले कॉफी
१० किलो दही	२५ पोती कडधान्य
६० किलो साखर	६५ डबे गहू
१ बाटली पाणी	१५ किलो लोणी

5) **Construct new sentences with the help of the words given in the brackets.**
(कंसात दिलेल्या शब्दांच्या सहाय्याने नवीन वाक्ये तयार करा.)

Model : हा हात आहे. (नोट, नाणं)
ही नोट आहे. हे नाणं आहे.
ही दहा किलो ज्वारी आहे. (लोणी, तांदूळ)
ह्या सुषमाताई आहेत. (सुहास, सुर्वेसाहेब)
ही वांगी आहेत. (खुर्ची, मणी)
ह्या सहा बांगड्या आहेत. (लिंबं, साबण)
हा बावन कप चहा आहे. (दूध, कॉफी)
हे आठ कागद आहेत. (कुत्रे, खारी)
हे डॉक्टर आहेत. (शिक्षिका, सुतार)
हा चेंडू आहे. (वस्तू, पाखरू)
हे पंचवीस किलो तेल आहे. (बाजरी, डाळ)
हे चार बाटल्या पाणी आहे. (दूध, सरबत)

6. **Construct as many questions as you can with the help of the words given in each column.**

(प्रत्येक कॉलममधील शब्दांची मदत घेऊन तुम्हाला जितके प्रश्न तयार करता येतील तितके करा)

१	२	३	४
हा ही हे (neu sg) ह्या हे (m.pl.) ही (neu.pl.)	काय किती कोण	माळा तांदूळ रुमाल साखर फुलं दूध	आहे आहेत.

7A. **Write the following numbers in figures.**

(पुढील आकडे अंकात लिहा.)

ऐंशी, एक्कावन, बावीस, सदुसष्ट, पंच्यात्तर, एकोणतीस, पस्तीस, पंधरा, बत्तीस

7B. Write the following numbers in letters.

७८, ७४, ६५, ७७, ७९, ६९, ४७, ३७, ५२, ६५

Vocabulary

इतर (adj.)	other	तूप (n)	ghee
कडधान्य (n)	cereal	तेल (n)	oil
कप (m)	cup	दुकानदार (m)	shop-keeper
किलो (adj.)	kilogram	धान्य (n)	foodgrain
कॉफी (f)	coffee	पातेलं (n)	utensil
खूप (adj)	many	पोतं (n)	sack
गहू (m)	wheat	बरणी (f)	jar
गिऱ्हाईक (n)	customer	बाजरी (f)	bajra
ज्वारी (f)	jawar	लिटर (adj)	litre
डाळ (f)i	dal	वाटी (f)	bowl
तराजू (m)	balance	सरबत (n)	sherbat
तांदूळ (m)	rice		

आकडे		Numeral	
एक्क्यांयशी	Eighty-one	शहांयशी	Eighty-six
ब्यांयशी	eighty-two	सत्त्यांयशी	eightyseven
त्र्यांयशी	eighty-three	अठ्ठ्यांयशी	eighty-eight
चौऱ्यांयशी	eighty-four	एकोणनव्वद	eighty-nine
पंच्यांयशी	eighty-five	नव्वद	ninety

Grammatical Notes

Unit IV, Lesson 14 explains the question with the interrogative word किती 'how much'. It is asked to ascertain the quantity or measurement of a thing.

The pattern of this question is as follows :

Masculine

Question : हा / तो किती (Name of the object) आहे ?

Answer : हा / तो (Number) (Term of measurement) (Name of the object) आहे.

Example Q. : हा किती गहू आहे ?

A. : हा दोन किलो गहू आहे.

Feminine

Question : ही / ती किती (Name of the object) आहे ?

Answer: ही / ती (Number) (Term of measurment) (Name of the object) आहे.

Example Q. : ही किती साखर आहे ?

A. : ही पाच किलो साखर आहे.

Neuter

Question : हे / ते किती आहे ?

Answer: हे / ते (Number) (Term of measurement) (Name of the object आहे.

Example Q. : हे किती लोणी आहे ?

A. : हे चार किलो लोणी आहे.

किलो, लिटर, कप, पोती etc. are words of measurement and are used in plural in the question.

Q. हा गहू किती पोती आहे ? 'How many sacks of wheat is

		this ?'
A.	हा गहू दहा पोती आहे.	'This is ten sacks of wheat'
Q.	ही साखर किती पेले आहे ?	'How many cups of sugar is this ?'
A.	ही साखर चार पेले आहे.	'This is four cups of sugar'
Q.	हे दही किती वाट्या आहे ?	'How many bowls of curds is this ?'
A.	हे दही दोन वाट्या आहे.	'This is two bowls of curd.'

गट -४	Unit-IV
धडा पंधरावा	**LESSON 15**
(उजळणी पाठ ३)	(Review Lesson 3)
स्वैपाकघर	**A kitchan**
हे स्वैपाकघर आहे.	This is a kitchan.
स्वैपाकघरात टेबल आहे.	There is a table in the kitchen.
टेबलाभोवती सहा खुर्च्या आहेत.	There are six chairs around the table.
तो ओटा आहे.	That is kitchen platform.
ओट्यावर गॅस आहे.	That is a gas-stove on the kitchen platform.
भिंतीवर फळ्या आहेत.	There are wooden sheets on the wall.
फळ्यांवर भांडी आणि डबे आहेत.	There are utensils and containers on the sheets.
ते किती डबे आहेत ?	How many containers are those?
ते सात डबे आहेत.	Those are seven containers.
डब्यांमध्ये गहू, तांदूळ, ज्वारी डाळ इ. वस्तू आहेत.	There are wheat, rice, jowar, dal and other things in the containers.
घरात वीस किलो गहू आहे.	There is 20 kgs of wheat in the house.
पंधरा किलो ज्वारी आहे.	There is 15 kgs of jowar.
वीस किलो तांदूळ आहे.	There is 20 kgs of rice.
आणि पाच किलो डाळ आहे.	And there is 5 kgs of dal.

तिकडे दोन किलो साखर आहे.	There is 2 kgs of sugar.
आणि एक किलो चहा आहे.	And one kg of tea.
ती दोनशे ग्रॅम कॉफी आहे.	That is 200 grams of coffee.
तिकडे बरणीत पाच किलो तेल आहे.	Over there is 5 kgs of oil in the jar.
ही भांडी आहेत.	These are utensils.
ही सहा ताटं आहेत.	These are six plates.
ह्या बारा वाट्या आहेत.	Those are twelve bowls.
आणि हे बारा पेले आहेत.	And there are twelve glasses.
तिकडे सोळा चमचे आहेत.	Over there are sixteen spoons.
फळीवर आठ पातेली आहेत.	There are 8 utensils on the wooden sheet.
पातेल्यांवर आठ झाकणं आहेत.	There are 8 lids on the utensils.
इकडे दूध आहे.	Here is milk.
ते चार लिटर दूध आहे.	That is 4 litres of milk.
पातेल्यांत सहा वाट्या दही आहे.	There is 6 bowls of curd in the utensil.
डब्यात एक किलो लोणी आहे.	There is one kg of butter in the tin.
आणि तिकडे भाज्या आहेत.	And there are vegetables.
स्वैपाकघरात अरविंद, रोहिणी, राहुल आणि गौरी आहेत.	There are Arvind, Rohini, Rahul and Gauri in the kitchen.
अरविंद प्राध्यापक आहे.	Arvind is a professor.
ती रोहिणी आहे.	That is Rohini.
रोहिणी डॉक्टर आहे.	Rohini is a doctor.

तो राहुल आहे.	That is Rahul.
राहुल विद्यार्थी आहे.	Rahul is a student.
ती गौरी आहे.	That is Gauri.
गौरी विद्यार्थिनी आहे.	Gauri is a student.
तो रमेश आहे.	That is Ramesh.
रमेश नोकर आहे.	Ramesh is a servant.
रमेश नळाजवळ आहे.	Ramesh is near the tap.

चाचणी क्र. ३ **Review test No.3**

1. **Fill in the gaps with the proper oblique form of the nouns given in the bracket followed by a postposition.**
   (कंसात दिलेल्या नामांच्या सामान्यरूपाला योग्य ते शब्दयोगी अव्यय लावून रिकाम्या जागा भरा.)

   गाय .... आहे. (झाड) सुरी .... आहे. (अंडी)
   फायली .... आहेत. (पुस्तकं) कपडे .... आहेत. (कपाट)
   नोटा .... आहेत. (नाणी) किल्ल्या .... आहे.(कुलूप)
   चित्र .... आहे. (घड्याळ) साखर .... आहे. (लिंबू)
   वस्तू .... आहेत. (खोकं) चमचा .... आहे. (लोणी)

2. **Give the straight forms singular and plural of the underlined nouns and use them in sentences.**
   (अधोरेखित नामांची एकवचनी आणि अनेकवचनी सरळरूपे देऊन त्यांचा वाक्यात उपयोग करा.)

   Model : घरापुढे मोटार आहे - हे घर आहे. ही घरं आहेत.

   तळ्याभोवती झाडं आहेत. चित्राशेजारी नकाशा आहे.
   संत्र्याशेजारी लिंबू आहे. दारापुढे चपला आहेत.
   टेबलावर वस्तू आहेत. पाण्यात मासे आहेत.

वांग्याजवळ बटाटे आहेत.
पाकिटात पत्र आहे.
दह्यात चमचा आहे.
भांड्यावर झाकण आहे.

3. **Frame the question to obtain following answers.**

ही माया आहे.
ते गोविंदराव आहेत.
ती केळी आहेत.
त्या सावित्रीबाई आहेत.
विश्वासराव कोर्टात आहेत.
हा हत्ती आहे.
ती वासरं आहेत.
सुधीर शिक्षक आहे.
कपडे कपाटात आहेत.
त्या पाच खुर्च्या आहेत.
हे दहा बादल्या पाणी आहे.
ती एक पिशवी आहे.

4. **Substitute तीन कागद** with the following words making necessary changes in the sentence.

'तीन कागद'ऐवजी पुढे दिलेले शब्द वाक्यात आवश्यक ते बदल करून वापरा.

हे तीन कागद आहेत.
चार विटा
चौदा पेरू
आठ घोडे
एक बाटली
दोन रेडिओ

हे तीन कागद आहेत.
एक खाट
साठ पिना
पंचवीस कार्ली
दोन माळा
पन्नास दिवे

5. **Costruct sentences with the help of the words given in the bracket. Use proper measurements.**

Model - हे दहा पतंग आहेत. (दही) - हे दहा वाट्या दही आहे.

ही पंधरा लिंबं आहेत. (सरबत)
ह्या सोळा बाटल्या आहेत. (कडधान्य)

ही चार पातेली आहेत.	(दूध)
ही पाच पोती आहेत.	(ज्वारी)
ह्या अठ्ठावीस पेन्सिली आहेत.	(गहू)
ती अठरा फुलं आहेत.	(चहा)
ते सत्तावीस नकाशे आहेत.	(तेल)
त्या तीस मुली आहेत.	(पाणी)
ती तीन कपाटं आहेत.	(तूप)
हे सात पंखे आहेत.	(डाळ)

6. **Fill in the gaps with an appropriate interrogative word.**
(रिकाम्या जागेत योग्य तो प्रश्नार्थक शब्द भरा.)

त्या .... आहेत ?	पोत्यात .... ज्वारी आहे ?
तो .... गहू आहे ?	मधुकरराव .... आहेत ?
ही .... आहे ?	ही .... पुस्तकं आहेत ?
ह्या .... रिक्षा आहेत ?	उषाताई .... आहेत ?
ते .... आहेत ?	तो .... आहे ?
रुमाल .... आहेत ?	तो .... आहे ?
तो .... आहे ?	हे .... आहे ?
वह्या .... आहेत ?	साखर .... आहे ?

गट - ५	Unit - V
धडा सोळावा	**LESSON 16**
हे हात आहेत का ?	**Are these hands ?**
शिक्षक : मुलांनो, हे हात आहेत.	Teacher : Students, these are hands.
हे काय आहे ?	What is this ?
विद्यार्थी : हे हात आहेत.	Student : These are hands.
शिक्षक : बरोबर, हे हात आहेत.	Teacher : That's correct. These are hands.
हे पाय नाहीत.	These are not legs.
शिक्षक : हे पाय आहेत का?	Teacher : Are these legs ?
विद्यार्थी : नाही, हे पाय नाहीत.	Student : No, these are not legs.
हे हात आहेत.	These are hands.
शिक्षक : ही जीभ आहे.	Teacher : This is a tongue.
ही जीभ आहे, हा ओठ नाही.	This is a tongue, this is not a lip.
ही जीभ आहे का ?	Is this a tongue ?
विद्यार्थी : हो, ही जीभ आहे.	Student : Yes, this is a tongue.
शिक्षक : ही जीभ आहे न ?	Teacher : This is a tongue isn't it ?
विद्यार्थी : हो, ही जीभ आहे.	Student : Yes, this is a tongue.
शिक्षक : हा ओठ आहे का ?	Teacher : Is this a lip ?
विद्यार्थी : नाही, हा ओठ नाही.	Student : No, this is not a lip.
ही जीभ आहे.	This is a tongue.

शिक्षक : हे नाक आहे.	Teacher : This is a nose.
हा कान नाही.	This is not an ear.
हे नाक आहे का ?	Is this a nose ?
विद्यार्थी : हो, हे नाक आहे.	Students : Yes, this is a nose.
शिक्षक : हा कान आहे का?	Teacher : Is this an ear ?
विद्यार्थी : नाही, हा कान नाही.	Student : No, this is not an ear.
हे नाक आहे.	This is a nose.
शिक्षक : बरोबर, इकडे पहा.	Teacher : That's correct. Look here.
हे हात आहेत.	These are hands.
ही जीभ आहे.	This is a tongue.
हे नाक आहे.	This is a nose.
ही दहा बोटं आहेत.	These are ten fingers.
हे दोन डोळे आहेत.	These are two eyes.
ही पाठ आहे.	This is a back.
आणि हे पोट आहे.	And this is a stomach.
विद्यार्थी : हो, हे पोट आहे.	Student : Yes, this is a stomach.
शिक्षक : इकडे पहा.	Teacher : Look here.
हे खांदे आहेत.	These are shoulders.
ही मान आहे.	This is a neck.
हा गळा आहे.	This is a throat. (out side)
आणि हा घसा आहे.	And this is a throat (in side)
ही मान आहे का ?	Is this a neck ?
विद्यार्थी : नाही. ती मान नाही.	Student : No, that is not a
ते खांदे आहेत.	neck. These are shoulders.

शिक्षक : बरोबर, हे खांदे आहेत.	Teacher : That's correct. These are shoulders.
आता इकडे पहा.	Now, look here.
हा चेहरा आहे.	This is a face.
हे गाल आहेत.	These are cheeks.
हे कपाळ आहे.	This is a forehead.
ही हनुवटी आहे.	This is a chin.
ही हनुवटी आहे नं ?	This is a chin, isn't it ?
विद्यार्थी : हो, ही हनुवटी आहे.	Student : Yes, this is a chin.
शिक्षक : नीट ऐका. हा चेहरा आहे.	Teacher : Listen carefully. This is a face.
हे हात आहेत.	These are hands.
हे पाय आहेत.	These are legs.
हे पोट आहे.	This is a stomach.
ही पाठ आहे.	This is a back.
हे सर्व अवयव आहेत.	All these are body parts.

Drills

I

Repetition Drills

हा हात आहे.	हा हात नाही.
हे हात आहेत.	हे हात नाहीत.
ही जीभ आहे.	ही जीभ नाही.
ह्या जिभा आहेत.	ह्या जिभा नाहीत.
हे बोट आहे.	हे बोट नाही.
ही बोटं आहेत.	ही बोटं नाहीत.

II

Fill in the gaps Drill

Fill the gaps with नाही or नाहीत as the case may be

(रिकाम्या जागी आवश्यक त्याप्रमाणे 'नाही' अथवा 'नाहीत' भरा.)

ह्या मैना	ते शिक्षक ....
ही चित्रं	हे दवाखाने ....
हा माणूस	ती सुजाता ....
ही शेतं	हे श्रीयुत जोशी ....
गोविंद सुतार	शिक्षिका शाळेत ....

III

Affirmative - Negative Drills

Turn the following sentences into the negative.

(खालील वाक्ये नकारार्थी करा.)

हे पडदे आहेत.	हे पडदे नाहीत.
ही साखर आहे.	ही साखर नाही.
ह्या पिशव्या आहेत.	ह्या पिशव्या नाहीत.
हे केळं आहे.	हे केळं नाही.
ही फळं आहेत.	ही फळं नाहीत.

IV

Question-Answer Drills

हे काय आहे ?	हा गाल आहे.
हा कान आहे का ?	नाही, हा कान नाही.
	हा गाल आहे.
पेन कुठे आहे ?	पेन हातात आहे.
पेन खिशात आहे का ?	नाही, पेन खिशात नाही.
	पेन हातात आहे.

वर्गात किती फळे आहेत ?	वर्गात एक फळा आहे.
वर्गात चार फळे आहेत का ?	नाही, वर्गात चार फळे नाहीत. वर्गात एक फळा आहे.
तो किती कप चहा आहे ?	तो तीन कप चहा आहे.
तो सहा कप चहा आहे का ?	नाही, तो सहा कप चहा नाही. तो तीन कप चहा आहे.
तो कोण आहे ?	तो वरुण आहे.
तो देवेन आहे का ?	नाही; तो देवेन नाही. तो वरुण आहे.

2

ही फाईल आहे नं ?	हो, ही फाईल आहे.
प्राचार्य ऑफिसात आहेत नं ?	हो, प्राचार्य ऑफिसात आहेत.
वर्गात दोन पंखे आहेत नं ?	हो, वर्गात दोन पंखे आहेत.
ही एक किलो डाळ आहे नं ?	हो, ही एक किलो डाळ आहे.
ह्या दामलेबाई आहेत नं ?	हो, ह्या दामलेबाई आहेत.

3

हा पेरू नाही नं ?	नाही, हा पेरू नाही.
शिक्षक वर्गात नाहीत नं ?	नाही, शिक्षक वर्गात नाहीत.
हे आठ पेले नाहीत नं ?	नाही, हे आठ पेले नाहीत.
ही दोन कप कॉफी नाही नं ?	नाही, ही दोन कप कॉफी नाही.
ते दुर्गेसाहेब नाहीत नं ?	नाही, ते दुर्गेसाहेब नाहीत.

Conversation Drill

शिक्षक : राम, हे चित्र आहे का ?

राम : हो, ते चित्र आहे.

शिक्षक : ते चित्र आहे का ?

राम : नाही, हे चित्र नाही. हा फोटो आहे.

शिक्षक : शीला, नीलाजवळ आंबा आहे का ?

शीला : नाही, नीलाजवळ आंबा नाही. नीलाजवळ केळं आहे.

शिक्षक : नीला, ते केळं आहे का ?

नीला : हो, हे केळं आहे.

शिक्षक : प्रसाद, तो कोण आहे ?

प्रसाद : हा जगन्नाथ आहे.

शिक्षक : जगन्नाथ डॉक्टर आहे का ?

प्रसाद : नाही, जगन्नाथ डॉक्टर नाही. तो विद्यार्थी आहे.

शिक्षक : पार्वती, ते कोण आहेत ?

पार्वती : ते भटसाहेब आहेत.

शिक्षक : भटसाहेब, कार्यवाह आहेत का ?

पार्वती : हो, भटसाहेब कार्यवाह आहेत.

शिक्षक : मीरा, त्या जोशीबाई आहेत का ?

मीरा : नाही, त्या जोशीबाई नाहीत. त्या सानेबाई आहेत.

स्वाध्याय १६ वा. **Excercise No 16**

1) **Write answers to the following questions with the help of the words given in the bracket.**

(कंसात दिलेल्या शब्दांच्या सहाय्याने पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.)

ModelQ. हा पेला आहे का ? (नाही, घंटा)

A. नाही, हा पेला नाही, ही घंटा आहे.

ह्या बाटल्या आहेत का ?	(हो, बाटल्या)
ते पक्षी आहेत का ?	(नाही, पाखरं)
हे लिंबू आहे का ?	(नाही, काजू)
हा मुलगा आहे नं ?	(नाही, मुलगी)
ती खिडकी आहे का ?	(हो, खिडकी)
ही पंधरा पानं आहेत का ?	(हो, पंधरा)
ही फुलं आहेत का ?	(नाही, माळा)
ते पाच किलो लोणी आहे का ?	(हो, पाच किलो)
ती दहा पोती ज्वारी आहे का ?	(नाही, चार पोती)
हा कान आहे का ?	(हो, कान)

2. **Turn the following sentences into the negative using the remote demonstrative adjectives in place of the proximate demonstrative adjective.**

(जवळच्या दर्शक विशेषणांच्या जागी दूरची दर्शक विशेषणे वापरून पुढील वाक्ये नकारार्थी बनवा.)

Model - हे डोळे आहेत. ते डोळे नाहीत.

ह्या भिंती आहेत.	हा मामा आहे.
ही बांगडी आहे.	ही वासरं आहेत.
हे घड्याळ आहे.	हे पाणी आहे.
ही झाडं आहेत.	ही जागा आहे.
हा रेडिओ आहे.	हे चेंडू आहेत.
ह्या वस्तू आहेत.	ही पुस्तकं आहेत.

3. **Re-write the following question by substituting the underlined word with the words given below making necessary changes,**

(अधोरेखित शब्दाऐवजी दिलेला शब्द घालून योग्य ते बदल करून पुढील प्रश्न लिहा.)

हे पुस्तक आहे का ?	हे पुस्तक आहे का ?
धडा	कमलताई
बांगड्या	कोकरं
खुर्ची	शेत
पेन	जू
पेन्सिली	जमीन
रमेश	विद्यार्थिनी
नलिनी	मुली
दिवे	बायको
श्रीधरपंत	चित्रा

4. **Fill in the correct verb form of आहे or नाही in the blank place.**

('आहे' किंवा 'नाही' ची योग्य रूपे पुढील वाक्यात रिकाम्या जागी भरा.)

हे गाल ....

नाही, हा चष्मा ....

हा सुभाष .... का ?

पेन्सिली कुठे ....

झाडावर पंधरा पक्षी ....

नाही, ही पाखरं ....

ह्या बाटल्या .... का ?

नाही, पुस्तकांखाली वह्या ....

हा वीस पोती गहू ....

हे किती तराजू .... ?

हे काय .... ?

हे कोण .... ?

5. **Put any appropriate noun in the blank place.**

(रिकाम्या जागेत कोणतेही योग्य ते नाम भरा.)

हा गाल आहे.	हा .... नाही.
ते पक्षी आहेत.	ती .... नाहीत.
ती लिंबं आहेत.	ती .... नाहीत.
हे हात आहेत.	ही .... नाहीत.
ही पेन्सिल आहे.	ही .... नाही.
हे पाणी आहे.	ही .... नाही.
हे पेन आहे.	ही .... नाही.
हा नकाशा आहे.	हे .... नाही.
ते घड्याळ आहे.	तो .... नाही.
तो पंखा आहे.	ती .... नाही.

6. **Turn the simple questions into confirmation seeking questions and answer these questions in the affirmative as well as in the negative.**

(पुढील साधे प्रश्न 'न' चा उपयोग करून लिहा आणि त्या प्रश्नांची होकारार्थी आणि नकारार्थी उत्तरे द्या.)

Model - ही खुर्ची आहे का ?

a ही खुर्ची आहे नं ? हो, ही खुर्ची आहे.

b	ही खुर्ची नाही नं ?	नाही, ही खुर्ची नाही.

हा पियानो आहे का ?	ते शिक्षक आहेत का ?
हे बटण आहे का ?	ही पुस्तकं आहेत का ?
ही शाळा आहे का ?	ते पेले आहेत का ?
ते संत्रं आहे का ?	ही साखर आहे का ?
त्या किल्ल्या आहेत का ?	ते दूध आहे का ?

7. **Answer the question first with the help of the word given in the brackets and then turn it into a 'yes-no' question, again answering it in the affirmative as well as the negative.**

('कुठे'ने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे कंसात दिलेल्या शब्दाच्या सहाय्याने देऊन त्याच्या आधारे 'होकार-नकार' प्रश्न तयार करा आणि त्याची होकारार्थी आणि नकारार्थी उत्तरे द्या.)

Model - पुस्तक कुठे आहे ? (टेबलावर)

A. पुस्तक टेबलावर आहे.

Q. पुस्तक टेबलावर आहे का ?

हो, पुस्तक टेबलावर आहे. नाही, पुस्तक टेबलावर नाही.

पेन कुठे आहे ? (हातात)	घड्याळ कुठे आहे ? (भिंतीवर)
वही कुठे आहे ? (पेन्सिलीजवळ)	कागद कुठे आहे ?(फायलीखाली)
बाटल्या कुठे आहेत ?(डब्यामागे)	राम कुठे आहे ? (श्यामशेजारी)
पैसे कुठे आहेत ? (पाकिटात)	किल्ल्या कुठे आहेत ? (टेबलावर)
शर्ट कुठे आहेत ? (कपाटात)	सायकल कुठे आहे?(दुकानासमोर)

8 **Frame appropriate questions to obtain the following answers.**

(पुढील उत्तरे मिळण्यासाठी योग्य ते प्रश्न बनवा.)

Model - हो, ह्या खुर्च्या आहेत. ह्या खुर्च्या आहेत का?

नाही, ही टेबलं नाहीत.	ह्या सुशीलाबाई आहेत.
हे श्रीयुत केळकर आहेत.	हो, ही मूर्ती आहे.
हे खोकं आहे.	फोटोखाली घड्याळ आहे.
ही वासरं आहेत.	हा एक स्टो आहे.
ही मंदा आहे.	नाही, हे पक्षी नाहीत.
ही बारा लिंबं आहेत.	हा चहा आहे.
ही दोन किलो साखर आहे.	हे शर्ट आहेत.

9 **Give the missing numbers.**

(गाळलेले आकडे लिहा.)

पंचेचाळीस	--------	एक्काहत्तर	--------
--------	--------	--------	--------
--------	--------	--------	--------
--------	बासष्ट	--------	--------
--------	--------	--------	--------
--------	--------	--------	नव्वद
बावन	--------	--------	--------
त्रेपन	सहासष्ट	--------	--------
--------	--------	--------	--------
--------	--------	एक्क्यांयशी	--------
--------	--------	--------	--------
सत्तावन	सत्तर	--------	--------

Vocabulary

अवयव (m)	part, body part	डोळा (m)	eye
ओठ (m)	lip	नं. (int)	isn't it ?
कपाळ (n)	forehead	नसणे (v.int)	negative form of to be
का (int)	is it?/ why	नाक (n)	nose
कान (m)	ear	पाठ (f)i	back
खांदा (m)	shoulder	पाय (m)	leg
गळा (m)	throat (outside)	पोट (n)	stomach
गाल (m)	cheek	बोट (n)	finger
घसा (m)	throat (inside)	मान (f)a	neck
चाकू (m)	knife	हनुवटी (f)	chin
चेहरा (m)	face	हात (m)	hand
जीभ (f)a	tongue		

आकडे Numerals

एक्क्याण्णव	ninety-one	शहाण्णव	ninety-six
ब्याण्णव	ninety-two	सत्याण्णव	ninety-seven
त्र्याण्णव	ninety-three	अठ्ठ्याण्णव	ninety-eight
चौऱ्याण्णव	ninety-four	नव्याण्णव	ninety-nine
पंच्याण्णव	ninety-five	शंभर	hundred

Grammatical Notes

Unit-V introduces the interrogative का ? The question is asked to get confiramtion or otherwise in reference to a particular thing. The answer is normally 'yes' or 'no'. The का ? comes at the end of the question after the verb. It may be added

to a simple statement to make it a yes-no question. It is thus a statement transformed into an information seeking yes-no question.

The pattern of the question is as follows :-

Simple Statement + का ?

Masculine	sg. :	हा हात आहे + का ?	(हा हात आहे का ?)
	pl. :	हे हात आहेत + का ?	(हे हात आहेत का ?)
Feminine	sg. :	ही वही आहे + का ?	(ही वही आहे का ?)
	pl. :	ह्या वह्या आहेत + का ?	(ह्या वह्या आहेत का?)
Neuter	sg. :	हे पुस्तक आहे + का ?	(हे पुस्तक आहे का ?)
	pl. :	ही पुस्तकं आहेत + का ?	(ही पुस्तकं आहेत का?)

The answer to these questions may be affirmative or negative, e.g.

Question		Answer
	Affirmative	Negative
Mas. sg. : हा हात आहे का ?	हो, हा हात आहे.	नाही, हा हात नाही. (हा पाय आहे.)
हे हात आहेत का ?	हो, हे हात आहेत.	नाही, हे हात नाहीत. (हे पाय आहेत.)
ही वही आहे का ?	हो, ही वही आहे. हे पुस्तक आहे.	नाही, ही वही नाही.
ह्या वह्या आहेत का ?	हो, ह्या वह्या आहेत.	नाही, ह्या वह्या नाहीत. (ही पुस्तकं आहेत.)
हे पुस्तक आहे का ?	हो, हे पुस्तक आहे.	नाही, हे पुस्तक नाही.
ही पुस्तकं आहेत का ?	हो, ही पुस्तकं आहेत.	नाही, ही पुस्तकं नाहीत. (ह्या वह्या आहेत.)

हो and नाही, are adverbs meaning 'yes' and 'no' respectively. The full conjugation of आहे 'is', नाही 'is not', आहेत 'are', and नाहीत 'are not' is given in Unit-VII.

The question with the interrogative particle नं gives a confirmation-seeking question. Here a person is sure of his information which he puts it before another person to get confirmation. It is equivalent to the Indian English phrase 'isn't it?' The pattern of this question is the same as that with का e.g.

(i) ही मोटार आहे नं ? This is a car, isn't it ?

(ii) ही मोटार नाही नं ? This is not a car, isn't it ?

गट - ६	Unit - VI
धडा सतरावा	**LESSON 17**
हे काम करा.	**Do this work.**
शिक्षक : मोहन ऊठ.	Teacher : Mohan, stand up.
टेबलजवळ ये.	Come near the table.
हा खडू हातात घे.	Take this chalkstick in the hand.
फळ्यावर शब्द लिही.	Write words on the blackboard.
फळा पूस आणि जागेवर जा.	Wipe off the blackboard and go to your place.
आता तू जागेवर बस.	Now you sit on your seat.
ज्योत्स्ना, इकडे ये.	Jyotsna come here.
पुस्तक उघड आणि दुसरा धडा वाच.	Open the book and read the second lesson.
पहिला धडा वाचू नकोस.	Don't read the first lesson.
आता जागेवर बस आणि धडा वहीत लिही.	Now sit on (your) seat and write the lesson in the notebook.
प्रकाश, सुहास तुम्ही उठा.	Prakash, Suhas, you standup.
ते दार उघडा आणि बाहेर जा.	Open that door and go out.
कुसुम, चंदा, इकडे या.	Kusum, Chanda, come here.
त्या खिडक्या बंद करा.	Close those windows.
हे कागद पिशवीत ठेवा.	Put these papers in the bag.
तुम्ही बाहेर पाहू नका.	You, don't look outside.
जोशीसाहेब या, आत या.	Joshisaheb, come in.

मालतीबाई, तुम्ही आत या.	Malatibai, you also come in.
मुलांनो, जोशीसाहेब शिक्षक आहेत.	Children, Joshisaheb is a teacher.
मालतीबाई शिक्षिका आहेत.	Malatibai is a tacher.
मुलांनो, उठा, 'नमस्ते' म्हणा.	Children, stand up, say 'Namaste'.
आता खाली बसा.	Now sit down.
जोशीसाहेब, तुम्ही जरा इकडे या.	Joshisaheb, please come here.
हे पुस्तक घ्या.	Take this book.
जरा पान छप्पन उघडा.	Please open page no. 56
आणि धडा वाचा.	and read the lesson.
धडा फळ्यावर लिहू नका.	Don't write the lesson on the blackboard,
फक्त वाचा.	only read it.
मुलांनो, शांत बसा.	Children, sit quiet.
प्रकाश : मी आत येऊ का ?	Prakash : May I come in ?
शिक्षक : हो, तू आत ये आणि जागेवर बस.	Teacher : Yes, come in and sit on your seat.
जोशीसाहेब धडा जरा सावकाश वाचा.	Joshisaheb, please read the lesson slowly.
मालतीबाई, जरा इकडे या.	Malatibai, please come here.
हे पुस्तक घ्या.	Take this book.
जरा पान त्र्यांयशी उघडा आणि ही कविता शिकवा.	Please open page No. 83 and teach this poem.
कविता वाचू नका. कविता म्हणा.	Don't read the poem. Recite

	the poem.
मुलांनो, तुम्ही कविता ऐका.	Children, you listen to the poem.
गडबड करू नका.	Don't make noise.
इकडे लक्ष द्या.	Pay attention here.
सुनील, गडबड करू नकोस.	Sunil, don't make noise.
जरा धड्याकडे लक्ष दे.	Please give attention to the lesson.
जोशीसाहेब, धडा जरा पुन्हा वाचा.	Joshisaheb, please read the lesson again.
मुलांनो, धडा वहीत लिहा.	Children, write the lesson in the notebook.
मालतीबाई, कविता जरा पुन्हा म्हणा.	Malatibai, please recite the poem again.
मुलांनो, तुम्ही कविता म्हणा.	Children, you also recite the poem.
आता तुम्ही वर्गात बसा आणि अभ्यास करा.	Now, you sit in the class and study.
दंगा करू नका.	Don't make noise.

Drills

I

Repetition Drills

मोहन, ऊठ. सुनील, ऊठ.	मोहन, सुनील उठा. बसू नका.
ज्योत्स्ना, पुस्तक वाच.	ज्योत्स्ना, ज्योती पुस्तक वाचा.
ज्योती, पुस्तक वाच.	हसू नका.

राम, इकडे ये. रोहिणी इकडे ये.	राम, रोहिणी इकडे या.
मुलांनो फळ्याकडे पहा.	बाहेर पाहू नका.
राम आणि सीता तुम्ही इकडे या.	राम आणि सीता, तुम्ही बाहेर जाऊ नका.
गोविंदराव इकडे या.	गोविंदराव तिकडे जाऊ नका.
गोविंदराव आणि कमलाताई तुम्ही इकडे या.	गोविंदराव आणि कमलाताई तुम्ही बाहेर जाऊ नका.

II
Affirmative - Negative Drill

Turn the following sentences into the negative.

नीला, फळा पूस.	नीला, फळा पुसू नकोस.
नीला, फळ्यावर लिही.	नीला, फळ्यावर लिहू नकोस.
सुभाष, सरिता, बाहेर जा.	सुभाष, सरिता, बाहेर जाऊ नका.
मुलांनो, बागेत खेळा.	मुलांनो बागेत खेळू नका.
विजया, इकडे ये.	विजया इकडे येऊ नकोस.
काळेसाहेब, दहावा धडा शिकवा.	काळेसाहेब, दहावा धडा शिकवू नका.
मीनाताई, गाणं म्हणा.	मीनाताई, गाणं म्हणू नका.
फडकेबाई, ती खिडकी बंद करा.	फडकेबाई, ती खिडकी बंद करू नका.
विनायकराव, हा सिनेमा पहा.	विनायकराव, हा सिनेमा पाहू नका.

III
Fill in the gaps Drills

1

Fill in the gaps with the required form of the verb.
(रिकाम्या जागी क्रियापदाचे योग्य रूप भरा.)

मोहन ऊठ.	मोहन, ... नकोस.
प्रकाशराव, बसा.	प्रकाशराव, ... नका.
शर्मिला शद्ध वहीत लिही.	शद्ध .... नकोस.
कमलाताई,पहिला धडा वाचा.	दुसरा .... नका.
सुनीता, खिडकी बंद कर.	खिडकी .... नकोस.
काळेसाहेब, फळ्यावर लिहा.	फळा .... नका.

2

Fill in the gaps with नकोस or नका as the case may be.

नामदेव, फळा पूस.	फळ्यावर लिहू ....
मुलांनो दार उघडा.	दार बंद करू ....
चित्रा, धडा ऐक.	दंगा करू ....
बाबूराव इकडे या.	बाहेर जाऊ ....
विजया, विमल, उठा.	बसू ....

3

Fill in gap with the singular form of the verb.
(रिकाम्या जागी क्रियापदाचे एकवचनी रूप भरा.)

सदाशिव, रोहिणी, पेन्सील पिशवीत ठेवा.	सदाशिव, पेन्सील पिशवीत ....
किसन, जयराम बाहेर जाऊ नका.	किसन ....
मुकुंदराव पत्र लिहा.	मुकुंद पत्र ....
आनंदीबाई कपडे धुवा.	आनंदी कपडे ....
सुचेता, सुनीता इकडे या.	सुनीता इकडे ....

IV

Transformation Drill

Transform the following sentences into the honorific plurl by adding the necessary auffixes to the proper nouns. Add a word of reguest.

(विशेष नामांना योग्य प्रत्यय लावून पुढील वाक्ये आदरार्थी बहुवचनी करा. वाक्यात विनंतीदर्शक शद्ब वापरा.)

विनया, अभ्यास कर.	विनयाताई, जरा अभ्यास करा.
विवेक, रेडिओ ऐक.	विवेकराव, जरा रेडिओ ऐका.
श्रीधर, पत्र लिही.	श्रीधरपंत जरा पत्र लिहा.
जोशी, इकडे ये.	जोशीसाहेब, जरा इकडे या.
सावंत इकडे ये.	सावंतसाहेब जरा इकडे या.
साने, ही पुस्तकं वाच.	सानेसाहेब, जरा ही पुस्तकं वाचा.
अभय बाहेर पाहू नकोस.	अभयराव जरा बाहेर पाहू नका.
अश्विनी, गडबड करू नकोस.	अश्विनीताई, जरा गडबड करू नका.

2

Turn the following sentences into the affirmative.

(पुढील वाक्ये होकारार्थी करा.)

बोकील, दार उघडू नका.	बोकील दार उघडा.
चितळेसाहेब, पुस्तकं खाली ठेवू नका.	चितळेसाहेब, पुस्तकं खाली ठेवा.
कमलाबाई, भांडी पुसू नका.	कमलाबाई, भांडी पुसा.
सुहासराव, गाणं म्हणू नका.	सुहासराव, गाणं म्हणा.
देवधरसाहेब, फायली बघू नका.	देवधरसाहेब, फायली बघा.
तुम्ही तिथे बसू नका.	तुम्ही तिथे बसा.
मीना, काम करू नकोस.	मीना, काम कर.

राम, पुस्तक उघडू नकोस.　　राम, पुस्तक उघड.
गिरिजा, शांत बसू नकोस.　　गिरिजा, शांत बस.
उषा, पहिला धडा वाचू नकोस. उषा, पहिला धडा वाच.

Conversation Drill

शिक्षक : मोहन, हा कोण आहे ?
मोहन : हा रमेश आहे.
शिक्षक : आणि हा कोण आहे ?
मोहन : हे श्रीयुत पेंडसे आहेत.
शिक्षक : ह्या कोण आहेत ?
मोहन : ह्या विजयाबाई आहेत.
शिक्षक : नमस्कार पेंडसेसाहेब, नमस्कार विजयाबाई. या आत या.
रमेश तू पणं आत ये. तुम्ही खुर्चीवर बसा.
मोहन : मी पुस्तक घेऊ का ?
शिक्षक : हो तू पुस्तक घे आणि रमेशकडे दे.मोहन आणि रमेश, तुम्ही जरा पुस्तक वाचा. दंगा करू नका. विजयाबाई, तुम्ही जरा ह्या वह्या पहा. पेंडसेसाहेब, तुम्ही ही पत्रं वाचा. विजयाबाई, वहीत काही लिहू नका. फक्त वह्या पहा. तुम्ही वह्या वर्गात द्या. पेंडसेसाहेब, तुम्ही पत्रं ऑफिसात द्या.रमेश तू पंखा बंद कर. मोहन, तू दिवे बंद कर. आता तुम्ही बाहेर जा. विजयाबाई, पेंडसेसाहेब, तुम्ही ऑफिसात जा. नमस्कार.

स्वाध्याय क्र. १७　　Exercise No. 17

1. **Fill in the gaps with the appropriate verb form**

(क्रियापदांची योग्य ती रूपे रिकाम्या जागी भरा)

मुलांनो दंगा --- नका, अभ्यास ---.

सुशीला, खिडकी उघडू ----.

तुम्ही जरा इकडे ---. विद्यार्थिनींनो, ह्या वस्तू ----.

गीता, रोहिणी, बाहेर--- नका.

मोहन, दार ----कर. धड्याकडे लक्ष ---.

वकीलसाहेब, घड्याळाकडे लक्ष ----.

नलिनीताई, कविता --- नका. कविता जरा --.

श्रीकांत, टेबल ---. खुर्च्या ---नकोस.

ज्योती, काम ---. दंगा करू ----.

कल्याणराव, इकडे ----. तिकडे ----नका.

मालती फळ्यावर ---- नकोस.

सुचित्रा, पुस्तकाकडे ---बाहेर ---नकोस.

2. **Select the correct verb from the brackets and write the sentences in affirmative.**

(कंसातील योग्य क्रियापद निवडून पुढील वाक्ये होकारार्थी लिहा.)

सुहास, पुस्तक (पूस, वाच)

मुलांनो, वह्या टेबलावर (ठेव, बस)

अरविंदराव पेन्सील हातात (ये, घे)

नीना, जागेवर (बंद कर, जा)

सुमित्रा, अभ्यास (कर, उघड)

मोहन आणि शरद कविता (ठेव, म्हण)

रमेश, चित्राकडे (दंगा कर, पहा)

मालतीबाई ते पत्र (ऊठ, वाच)

शीला,लीला, तिथे (जा,पहा)

मुलांनो, वह्या काळेसाहेबांजवळ (म्हण,दे)

3. **Turn the following affirmative sentences into the negative.**

(पुढील वाक्ये नकारार्थी करा.)

विनायक, हा कागद वाच.	मुलांनो, फळ्यावर लिहा.
नीला, खिडकी उघड.	सुलोचना, रेडिओवर फुलं ठेव.
ज्योती घड्याळाकडे पहा.	श्रीकांत, अभ्यास कर.
बाळासाहेब, ऑफिसात जा.	चित्रेसाहेब, जरा आत या.
विद्याताई कविता शिकवा.	कर्वेबाई, ही दोन पत्रं वाचा.

4. **Write the following sentences using the pronoun तुम्ही in place of 'तू' making necessary changes in the sentence.**

('तू' ऐवजी 'तुम्ही' वापरून योग्य बदलांसह पुढील वाक्ये लिहा.)

तू दंगा करू नकोस.	तू कपाट उघड आणि कपाटात पैसे ठेव.
तू नकाशाकडे पहा.	तू वर्गात हसू नकोस.
तू कागदावर धडा लिही.	तू पहिला धडा वाचू नकोस.
तू वर्गात ये आणि खुर्चीवर बस.	तू दुसरा धडा वाच.
तू अभ्यास कर.	तू मीनाला पुस्तक दे.

5. **Turn the negative expressions into the affirmative in the following passage.**

(पुढील उताऱ्यात नकारार्थाऐवजी होकारार्थ वापरा.)

मुलांनो, वर्गात येऊ नका. पुस्तकं उघडू नका. पिशव्या खाली ठेवू नका आणि पुस्तक बाहेर काढू नका. पुस्तकं उघडू नका. पहिला धडा पाहू नका. मंदा, तू पहिला धडा फळ्यावर लिहू नकोस. मुलांनो,

तुम्ही फळ्याकडे बघू नका. तुम्ही धडा वाचू नका आणि वहीत लिहू नका. मुलांनो, आता बाहेर जाऊ नका. आता बाहेर खेळू नका.

6. **Turn the following sentences into request sentences.**

किसन, खुर्ची तिकडे ठेव.	पुराणिकसाहेब, इकडे या.
नलिनी, खिडक्या उघड.	डॉक्टर, औषध द्या.
मोहन, वर्गाबाहेर जा.	किसनराव, खिडकी उघडा.
विनय, फळा पूस.	राधाबाई, गाणी म्हणा.
प्रमिला, हे रुमाल विजयाजवळ दे.	मालतीताई, कविता शिकवा.
आनंद, बाहेर पाहू नकोस.	देशपांडे, दुकानात जा.
ज्योती, तिकडे जाऊ नकोस.	मामा, इकडे या, बसा.
मुलांनो, दंगा करू नका.	शिवाजीराव, त्या वह्या टेबलावर ठेवा.

7. **Join the following sentences with आणि and then turn them into the affirmative.**

(पुढील वाक्यांचे एक वाक्य करून नंतर त्याचे होकारार्थी वाक्य करा.)

Model : राम उठू नकोस. श्याम उठू नकोस.

१. राम आणि श्याम, तुम्ही उठू नका.

२. राम आणि श्याम, तुम्ही उठा.

नलिनी बसू नकोस.	मालिनी, बसू नकोस.
काळेसाहेब, फायली घेऊ नका.	मालतीताई, फायली घेऊ नका.
किसन, फळा पुसू नकोस.	श्रीकांत, फळा पुसू नकोस.
भागवत, आत येऊ नका.	फणसे, आत येऊ नका.
वसुधाताई, मंडईत जाऊ नका.	सुमन मंडईत जाऊ नकोस.
शरद, फळ्याकडे बघू नकोस.	अभय, फळ्याकडे बघू नकोस.

सुर्वेसाहेब, धडा शिकवू नका. पवारबाई, धडा शिकवू नका.
मुलांनो, गाणी म्हणू नका. मुलींनो, गाणी म्हणू नका.
सुनील, दार उघडू नकोस. मारुती, दार उघडू नकोस.
पद्मा, दंगा करू नकोस. प्रवीण, दंगा करू नकोस.

Vocabulary

अभ्यास करणे (phr)	to study	दंगा करणे (phr.)	to make noise
उघडणे (v.tr.)	to open	पहिला (adj.)	first
उठणे (v.intr.)	to get up to stand up	पुसणे (v.tr.)	to wipe off
		फक्त (adj./adv)	only
काम (n)	work	बसणे (v.intr.)	to sit
काम करणे (phr.)	to work	बंद करणे (phr.)	to close
गडबड (f)	noise	म्हणणे (v.tr.)	to recite
गप्प बसणे (phr.)	to keep quiet	येणे (v.intr.)	to come
घेणे (v.tr.)	to take	वाचणे (v.tr.)	to read
जाणे (v.intr.)	to go	विश्रांती घेणे (phr.)	to take rest
ठेवणे (v.tr.)	to put	लक्ष देणे (phr.)	to pay attention
तपासणे (v.tr.)	to check	लिहिणे (v.tr.)	to write
तू (pron.)	you (sg.)	शांत (adv.)	quiet
तुम्ही (pron.)	you (pl.)	शिकवणे (v.tr.)	to teach
दुसरा (adj.)	second	सावकाश (adv.)	slowly

Grammatical Notes

Unit - VI deals with the Imperative in Marathi, Lesson 17 explains Imperative singular and plural forms affirmative as well as negative.

The Imperative expresses a command, but the addition of the particle जरा turns it into a mild form of request, e.g.

किसन, ही खुर्ची उचल. 'Kisan, lift up this chair.' (order)

किसन, जरा ही खुर्ची उचल. 'Kisan, please lift up this chair.' (request)

The Imperative singular form of a verb is the root of that verb which is indicated by the suffix णे in this Course.

The Imperative singular and plural forms are as below:

Imperative

Singular	+ Suffix	= Plural
ऊठ	आ	= उठा
बस	आ	= बसा
जा	आ	= जा
पहा	आ	= पहा
लिही	आ	= लिहा
धू	आ	= धुवा
दे	आ	= द्या
घे	आ	= घ्या
हो	आ	= व्हा

The root लिही drops it's final vowel before adding the आ of plural. We thus get लिह् + आ = लिहा. The roots like दे, घे, धू, हो also undergo modification.

Thus the pattern is :

Root + O = Inperative Singular

Root (or Inperative Singualr) + आ =

Imperative plural.

The verbs पहा 'to see', रहा 'to stay', वहा ' to flow', to offer (flowers), modify their roots before they take the suffix -ऊ in the negative forms : e.g.

पहा ~ पाह

वहा ~ वाह

रहा ~ राह

Imperative Negative

Singular : R + ऊ + नकोस

Example : ऊठ + ऊ + नकोस

उठू नकोस. 'Don't get up'

Plural : R + ऊ + नका

Example : ऊठ + ऊ + नका

उठू नका. 'Don't get up.'

In Marathi तू and तुम्ही are the second persón singular and plural pronouns respectively. तू 'you' is used in informal speech or while addressing a person who is younger or lower in rank than the speaker.

तुम्ही 'you' is its regular plural. But it is also used for a person to whom the speaker wants to show respect because of his age, social rank, office position etc.

There is one more form आपण, but it is only exceptionally used in colloquial speech. तुम्ही will be normally enough as a respect showing expresssion.

Note that in colloquial speech, the order of the neagtive forms may change i.e. instead of 'जाऊ नकोस' or 'जाऊ नका' , one may say 'नको जाऊ', or ' नका जाऊ' respectively. The second person singular marker is placed after the second member which is R + ऊ.

R + ऊ + का ? is used for seeking permission to do a certain thing. e.g. मी वर्गाबाहेर जाऊ का ? 'May I go out of the class?' or मी वर्गात येऊ का ? 'May I come into the class?' etc.

पहिला 'First', दुसरा 'second' are ordinal numbers which are explained under Adjectives (Unit - VIII).

इकडे, इथे, तिकडे, तिथे are adverbs of place. इकडे 'here' तिकडे 'there' show the directions and इथे 'here', तिथे 'there' show location. These will be explained in detail under the adverbs. (Unit-IX)

गट - ७

Unit - VII

धडा अठरावा

LESSON 18

मोहन आणि अनला शाळेत जातात.

Mohan and Anala go to school.

मोहन रोज शाळेत जातो. — Mohan goes to school everyday.

तो रोज लौकर उठतो. — He gets up early everyday.

मग तो तोंड धुतो आणि दूध पितो. — Then (he) washes his mouth and drinks milk.

मग तो अनलाकडे जातो. — Then he goes to Anala.

अनला आणि मोहन थोडा अभ्यास करतात. — Anala and Mohan do some work.

आणि मग शाळेत जातात. — And then (they) go to school.

मोहन शाळेत खूप अभ्यास करतो. — Mohan works a lot at school.

अनलासुद्धा शाळेत अभ्यास करते. — Anala also works at school,

चित्रं काढते आणि गाणी म्हणते. — draws pictures. and sings songs.

मोहन आणि अनला शाळेतून घरी येतात. — Mohan and Anala come home from the school.

मग दोघं बागेत जातात. — Then the two go to the garden.

मग ती दोघं बागेत खूप खेळतात. — Both (of them) play a lot in the garden.

मोहन म्हणतो,'' अनला, तू घसरगुंडीवर बसतेस का ?''	Mohan says,"Anala, do you sit on the sliding board ?"
अनला म्हणते,'' नाही, मी घसरगुंडीवर बसत नाही. मी झोपाळ्यावर बसते.''	Anala says,"No, I don't sit on the sliding board. I sit on the swing."
बागेत भेळवाले, कणसंवाले येतात.	Bhel-sellers and corn sellers come to the garden.
भेळवाला म्हणतो,'' भेळ घ्या भेळ मुलांनो, भेळ घ्या भेळ.''	Bhelseller says," Have bhel children, have bhel."
मोहन आणि अनला म्हणतात, ''आम्ही भेळ खात नाही. आम्ही कणसं खातो.''	Mohan and Anala say," We don't eat bhel. We eat corns."
अनला म्हणते,'' मोहन, तू बागेत पाणी पितोस का ?''	Anala says," Mohan, do you drink water in the garden?"
मोहन म्हणतो,'' नाही, मी बागेत पाणी पीत नाही.'' मी घरी जातो आणि पाणी पितो.''	Mohan says," No, I don't drink water in the garden. I go home and drink water."
तू कुठे पाणी पितेस ?	Where do you drink water ?
अनला म्हणते,'' मी पण घरी जाते आणि पाणी पिते.''	Anala says," I also go home and drink water."
दोघं बागेत कणसं खातात आणि	Both(of them) eat corn in

घरी जातात.	the garden and go home.
मोहन घरी येतो, हातपाय धुतो, जेवतो आणि मग झोपतो.	Mohan comes home, washes his hands and feet, takes (his) meal and then goes to bed.
अनलापण घरी येते, हातपाय धुते, जेवते.	Anala also comes home washes her hands and feet, takes (her) meal and goes to bed.
मोहन आणि अनला रोज शाळेत जातात.	Mohan and Anala go to school everyday.

Drills

I

Repetition Drills

1

मी शिक्षक नाही.	आम्ही शिक्षक नाही.
तू शिक्षक नाहीस.	तुम्ही शिक्षक नाही.
तो शिक्षक नाही.	ते शिक्षक नाहीत.
ती शिक्षिका नाही.	त्या शिक्षिका नाहीत.
ते झाड नाही.	ती झाडं नाहीत.
नारायणराव शिक्षक नाहीत.	मालतीबाई शिक्षिका नाहीत.

2

Group I

मोहन खुर्चीवर बसतो.	मी खुर्चीवर बसतो.
मीना खुर्चीवर बसते.	मी खुर्चीवर बसते.

राम, तू खुर्चीवर बसतोस.	सीता, तू खुर्चीवर बसतेस.
रमेश खुर्चीवर बसतो.	तो खुर्चीवर बसतो.
अश्विनी खुर्चीवर बसते.	ती खुर्चीवर बसते.
मांजर खुर्चीवर बसतं.	ते खुर्चीवर बसतं.

Group II

मोहन आणि मी खुर्चीवर बसतो.	आम्ही खुर्चीवर बसतो.
मीना आणि मी खुर्चीवर बसतो.	आम्ही खुर्चीवर बसतो.
अभय आणि तू खुर्चीवर बसता.	तुम्ही खुर्चीवर बसता.
गोविंदराव, तुम्ही खुर्चीवर बसता.	वीणाताई, तुम्ही खुर्चीवर बसता.
स्मिता आणि तू खुर्चीवर बसता.	तुम्ही खुर्चीवर बसता.
तू आणि मी खुर्चीवर बसतो.	आपण खुर्चीवर बसतो.
आम्ही आणि तुम्ही खुर्चीवर बसतो.	आपण खुर्चीवर बसतो.
माधव आणि अनंत खुर्चीवर बसतात.	ते खुर्चीवर बसतात.
जोशीबाई खुर्चीवर बसतात.	त्या खुर्चीवर बसतात.
स्मिता आणि मीना खुर्चीवर बसतात.	त्या खुर्चीवर बसतात.
मालतीबाई खुर्चीवर बसतात.	त्या खुर्चीवर बसतात.
मांजरं खुर्चीवर बसतात.	ती खुर्चीवर बसतात.

Group III

मी पुस्तक वाचतो.	मी पुस्तक वाचते.
तू पुस्तक वाचतोस.	तू पुस्तक वाचतेस.
तो पुस्तक वाचतो.	ती पुस्तक वाचते.
ते पुस्तक वाचतं.	
आम्ही पुस्तक वाचतो.	तुम्ही पुस्तक वाचता.
आपण पुस्तक वाचतो.	

ते पुस्तक वाचतात.	त्या पुस्तक वाचतात.
ती पुस्तक वाचतात.	

II

Transformation Drill

Turn the following sentences into the negative.

(खालील वाक्ये नकारार्थी करा.)

मी काम करतो.	मी काम करत नाही.
मी कविता म्हणते.	मी कविता म्हणत नाही.
श्याम, तू धडा वाचतोस.	श्याम, तू धडा वाचत नाहीस.
अनला, तू आंबा खातेस.	अनला, तू आंबा खात नाहीस.
अनिरुद्ध गडबड करत नाही.	अनिरुद्ध गडबड करत नाही.
प्रिया वर्गाबाहेर खेळते.	प्रिया वर्गाबाहेर खेळत नाही.
मांजर झाडावर चढतं.	मांजर झाडावर चढत नाही.

3

Fill in the gaps with the affirmative verb form.

(क्रियापदाचे होकारार्थी रूप रिकाम्या जागेत भरा.)

मी बाजारात जात नाही.	मी बाजारात ....
आनंद शाळेत येत नाही.	आनंद शाळेत ....
भारती अभ्यास करत नाही.	भारती अभ्यास ....
पिल्लू आकाशात उडत नाही.	पिल्लू आकाशात ....
आम्ही कविता वाचत नाही.	आम्ही कविता ....
तुम्ही चहा पीत नाही.	तुम्ही चहा ....
आपण काम करत नाही.	आपण काम ....
श्रीधरपंत पत्रं लिहीत नाहीत.	श्रीधरपंत पत्रं ....

Conversation Drill

शिक्षक : रमेश, इकडे ये. फळ्यावर लिही.
मीना, रमेश काय करतो ?

मीना : रमेश, फळ्यावर लिहितो.

शिक्षक : मीना, इकडे ये. फळा पूस.
रमेश, मीना काय करते ?

रमेश : मीना फळा पुसते.

शिक्षक : गीता, तू रोज काय करतेस ?

गीता : मी घरी पुस्तक वाचते.

शिक्षक : अनिल, तू रोज काय करतोस ?

अनिल : मी रोज शाळेत येतो.

शिक्षक : गीता, मोहन, अनिल, तुम्ही शाळेत
काय करता ?

गीता, मोहन, अनिल : आम्ही शाळेत अभ्यास करतो.

शिक्षक : सुनीती, भटसाहेब रोज काय करतात ?

सुनीती : भटसाहेब ऑफिसात काम करतात.

शिक्षक : अशोक, रेखाताई काय करतात ?

अशोक : रेखाताई शाळेत शिकवतात.

स्वाध्याय क्र. १८ **Exercise No. 18**

1. **Answer the following questions.**
(खालील प्रश्नांची उत्तरे द्या.)

मोहन रोज कुठे जातो ?

मोहन शाळेत काय करतो ?

मोहन घरी काय करतो ?

अनला शाळेत काय करते ?

मोहन आणि अनला बागेत काय करतात ?

मोहन झोपाळ्यावर बसतो का ?

अनला घसरगुंडीवर बसते का ?

मोहन बागेत भेळ खातो का ?

मोहन आणि अनला बागेत काय खातात ?

मोहन आणि अनला रोज बागेत जातात का ?

2. Fill in the gaps using appropriate verb forms.

(रिकाम्या जागी योग्य क्रियापद भरा.)

मोहन रोज शाळेत ....

अनला आणि मोहन शाळेत खूप अभ्यास ....

शिक्षक शाळेत ...., विद्यार्थी शाळेत ....

अनला, मीना, सुधा, सुनीती शाळेत गाणी ....

श्रीमती कुलकर्णी खूप पुस्तकं ....

तुम्ही खुर्चीवर ....

नीला पिशवीत कागद ...., मोहन कागदावर........... .

तू फळ्यावर शब्द ...., किसन फळा ....

मोहन बागेत कणसं ...., मी रोज तोंड ....

3. Transform the following imperative sentences into the present-tense.

(खालील आज्ञार्थी वाक्ये वर्तमानकाळात लिहा.)

मधुकर, फळ्यावर लिही.	सरोज, तू शाळेत जा.
तुम्ही पुस्तक खाली ठेवा.	लता आणि उषा जागेवर बसा.
श्रीयुत कुलकर्णी, दार उघडा.	तू दंगा कर.
दीपक, तोंड धू.	प्राची, तू वहीत चित्र ठेव.

तुम्ही वर्गाबाहेर जा. अशोक, तो कागद घे.

4. **Substitute the underlined proper noun with the given pronouns, making necessary changes in the sentences.**
(वाक्यात योग्य ते बदल करून अधोरेखित विशेषनामाऐवजी दिलेली सर्वनामे घाला.)

विजया वर्गात येते.	विजया वर्गात येते.
तू	तुम्ही
मी	ते (m)
ती (--pl)	त्या
आम्ही	आपण
ती (f)	ते (n.sg.)

5. **Transform the following sentences into the negative.**
(खालील वाक्ये नकारार्थी करा.)

तू वर्गात पेरू खातोस. श्रीमती जोशी गाणं म्हणतात.
ऊर्मिला घसरगुंडीवर बसते. विनायक कविता शिकवतो.
गीता कागद घेते. तुम्ही रोज बागेत जाता.
आपण शाळेत दंगा करतो. कमल घरी येते आणि हातपाय धुते.
आम्ही चित्रं पहातो. किसन खुर्च्या पुसतो.

6. **Transform the following sentences into the affirmative.**
(खालील वाक्ये होकारार्थी करा.)

रमेश हातपाय धूत नाही. महेश चित्रं पहात नाही.
सुशीला आणि राजेंद्र वर्गात दंगा करत नाहीत.
त्या घरी जात नाहीत. आपण बागेत भेळ खात नाही.
तुम्ही रोज वर्गात बसत नाही. मांजरं झाडावर चढत नाहीत.
माकड पेरू खात नाही. तू घरी काम करत नाहीस.

राजेश पुस्तक वाचत नाही. मोहन आणि मीना शाळेत येत नाहीत.

Vocabulary

आपण (pron)	you and me	तो (pron.)	he
आम्ही (pron)	we	त्या (pron.)	they (f.pl.)
खाणे (v.tr.)	to eat	थोडा (adj.)	some
खेळणे (v.intr./tr.)	to play	दोघं (adj.)	both
घसरगुंडी (f)	sliding board	धुणे (v.tr.)	to wash
जेवणे (v.intr.)	to take meal	पिणे (v.tr.)	to drink
झोपणे (v.intr.)	to sleep	भेळ (f)	Bhel
झोपाळा (m)	swing	मी (pron.)	I
ती (pron.)	she/they (n.pl.)	रोज (adv.)	everyday
ते (pron.)	it/they (m.pl.)	लौकर (adv.)	soon, early
सिनेमा (m)	movie		

Grammatical Notes

Unit -VII, introduces the Present tense in Marathi.

The Present tense marker त् is directly added to the root of the verb, which is equivalent to the Imperative singular form. The formation of the Present tense is as follows :

Root of the verb + Present Tense Marker + Number, Gender and person Marker.

The number - gender - person marker is not analysable.

Thus we have :

तक्ता क्र. ११ **Table No. 11**

	Singular	Plural
I person	(m) R + त् + ओ (f) R + त् + ऐ	(m/f) R + त् + ओ

II person	(m) R + त् + ओस (f) R + त् + एस	(m/f) R + त् + आ
III person	(m) R + त् + ओ (f) R + त् + ए (n) R + त् + अं	(m/f/n) R + त् + आत

Let us take two verbs by way of example - one consonant - ending (बस -) and the other vowel - ending (जा -).

तक्ता क्र. १२ Table No. 12

बस - ' to sit'

	Singular	Plural
I person	मी (m) बस - तो (f) बस - ते	आम्ही बस - तो
II person	तू (m) बस - तोस (f) बस - तेस	तुम्ही बस - ता
III person	तो (m) बस - तो ती (f) बस - ते ते (n) बस - तं	ते बस - तात त्या बस - तात ती बस - तात

तक्ता क्र. १३ Table No. 13

जा - ' to go'

	Singular	Plural
I person	मी (m) जा - तो (f) जा - ते	आम्ही जा - तो
II person	तू (m) जा - तोस (f) जा - तेस	तुम्ही जा - ता
III person	तो (m) जा - तो ती (f) जा - ते ते (n) जा - तं	ते जा - तात त्या जा - तात ती जा - तात

The negative forms we have -

	Singular	Plural
I person m /f	मी बसत / जात नाही	आम्ही बसत / जात नाही
II person m / f	तू बसत / जात नाहीस	तुम्ही बसत जात नाही
III person m /f / N	तो / ती / ते बसत / जात नाही	ते / त्या / ती बसत/जात नाहीत

This is the Habitual Present Tense. The Habitual Present is used for the following purpose.

1. To express a routine work or a habit e.g.

   मी शाळेत जातो. — I go to school.

   तो रोज सहा वाजता उठतो. — He gets up at 6 o'clock everyday.

2. To Express a universal fact or rule :

   सूर्य पूर्वेला उगवतो. — The sun rises to the east.

   थंडीत तेल गोठतं. — The oil freezes in the cold.

For the sake of convenience the Present Habitual is called Present - 1 in this Course.

Pronouns in Marathi

The following are the pronouns in Marathi.

तक्ता क्र. १४ — Table No. 14

	Singular	Plural	
I person	(m / f)मी 'I'	आम्ही	'We'
II person	(m/f) तू 'You'	तुम्ही	'You'
I + II person		आपण	'We'
III person	(m) तो 'He' (f) ती she (n) ते 'It'	ते त्या ती	'They'

The verb - form for आपण (;you' respectful plural) is the same as for तुम्ही e.g. आपण बस-ता 'you (respectful) sit'.

But आपण is also used as the First-Second person inclusive plural i.e. for the first person and the second person together.

Thus आपण inclusive pronoun may stand for

1)	मी	+	तू	'we'
2)	मी	+	तुम्ही	'we'
3)	आम्ही	+	तू	'we'
4)	आम्ही	+	तुम्ही	'we'

The verb for आपण inclusive is the same as that for आम्ही Thus आपण बसतो. 'we sit'.

तू (sg.) is used for a person younger than the speaker or one with whom the speaker has imformal relation, while तुम्ही (pl.) is used for a person who is older than the speaker or with whom the relation is very formal. Otherwise, it is used as the regular plural form. The same is the case with ते (third person mas. plural) and त्या (third person fem. plural) Both of them are used either as regular plural form or as respectful singular form..

गट - ७ Unit - VII

धडा एकोणिसावा LESSON 19

पाऊस पडतो आहे. Rain is falling.

शाळा चालू आहे.	The school is on.
शिक्षक वर्गात शिकवताहेत.	The teachers are teaching in the classes.
आणि बाहेर खूप पाऊस पडतो आहे	And outside heavy rain is falling ....
आकाशात विजा चमकताहेत.	Lighting is flashing in the sky.
ढग गडगडताहेत.	Clouds are thundering.
आणि पाऊस कोसळतो आहे.	And rain is pouring heavily.
काही मुलं वर्गात येत नाही आहेत.	Some children do not come into the classroom.
ती खुशाल पावसात खेळताहेत.	They are happily playing in the rain.
काही मुलं गाणी म्हणताहेत.	Some children are singing songs.
आणि ती सर्व मुलं पावसात भिजताहेत.	And all those children are getting wet in the rain.
मोहन पावसात भिजतो आहे.	Mohan is getting wet in the rain.
तो म्हणतो आहे,'' अग सरिता मी पावसात भिजतो आहे. तू पण येतेस का? ''	Hey says," he Sarita, I am getting wet in the rain. Do you also join ?"

सरिता म्हणते,'' मी पाण्यात नावा सोडते आहे.''	Sarita says," I am leaving (paper) boats in the water."
काही मुलं छत्र्या उघडताहेत.	Some children are opening the umbrellas.
शिक्षक मुलांवर ओरडताहेत. ''बाहेर जाऊ नका !''	The teachers are crying to the children," Don't go out!"
पण मुलं ऐकत नाही आहेत.	But the children are not paying attention.
ती म्हणताहेत,'' आता गारा पडताहेत आणि आम्ही गारा वेचतो आहोत.''	They say," Now hailstones are falling. And we are picking up the hailstones.
मुली म्हणताहेत,'' मुलांनो, चला आपण गारा वेचू या.''	The girls say," Boys, come let us pick up hailstones.
आम्ही गाणं म्हणतो आहोत.	We are singing a song.
तुम्ही पण गाणं म्हणताहात नं ? म्हणा.	Are you also singing then aren't you? sing.
''ये रे ये रे पावसा	" Come, come oh rain !
तुला देतो पैसा	I give you paisa.
पैसा झाला खोटा	the paisa turned out counterfeit
पाऊस आला मोठा	The rain came down heavily
ये ग ये ग सरी	Come, come, oh shower !
माझं मडकं भरी	Fill my pot
सर आली धावून	The shower came speeding

मडकं गेलं वाहून''	The pot overflowed !"

Drills

1

Repetition Drills

मी खुर्चीवर बसतो आहे.	मी खुर्चीवर बसते आहे.
तू वहीत लिहितो आहेस.	तू वहीत लिहिते आहेस.
तो पुस्तक वाचतो आहे.	ती पुस्तक वाचते आहे.
ते पुस्तक वाचतं आहे.	
आम्ही चित्रं पहातो आहोत.	तुम्ही दार उघडताहात.
ते पंखा लावताहेत.	त्या पंखा लावताहेतन,
आपण वर्गात येतो आहोत.	आपण अभ्यास करतो आहोत.

II

Question-Answer Drill

मी काय करतो आहे ?	तुम्ही खुर्चीवर बसताहात.
आता मी काय करतो आहे ?	आता तुम्ही पुस्तक ठेवताहात.
मी काय करते आहे ?	तू खिडकी उघडते आहेस.
मी काय करते आहे ?	तू खिडकी बंद करते आहेस.
आपण काय करतो आहोत ?	आपण वर्गात मराठी शिकतो आहोत.
आता आपण काय करतो आहोत ?	आता आपण धडा वाचतो आहोत.
रमेश काय करतो आहे ?	रमेश फळ्यावर चित्र काढतो आहे.

रमेश पुस्तक वाचतो आहे का ?	नाही, रमेश पुस्तक वाचत नाही आहे.
रमेश रोज फळ्यावर चित्र काढतो का ?	हो, रमेश रोज फळ्यावर चित्र काढतो.
रमेश रोज किती चित्रं काढतो ?	रमेश रोज एक चित्र काढतो.

2

लीलाताई शाळेत काय शिकवतात?	लीलाताई शाळेत भाषा शिकवतात.
आता लीलाताई शिकवताहेत का ?	हो, आता लीलाताई शिकवताहेत.
आता लीलाताई फळ्यावर लिहिताहेत का ?	नाही, आता लीलाताई फळ्यावर लिहीत नाही आहेत.
आणि विद्यार्थी काय करताहेत ?	विद्यार्थी धडा ऐकताहेत.

III
Substitution Drills

Substitute the underlined noun with the given words.

(अधोरेखित नामाऐवजी दिलेले नाम किंवा सर्वनाम वापरा.)

मुलं पावसात भिजताहेत.	मुलं पावसात भिजताहेत.
मोहन	शीला आणि लीला
नलिनी	
तुम्ही	मुली
त्या	तू (m/f)
काळेसाहेब	राम आणि श्याम
मी (m/f)	
आम्ही	आपण

IV
Transformation Drills
1

Turn into the negative the following sentences.

बाहेर पाऊस पडतो आहे.	बाहेर पाऊस पडत नाही आहे.
मुलं पावसात भिजताहेत.	मुलं पावसात भिजत नाही आहेत.
मी खुर्चीवर बसते आहे.	मी खुर्चीवर बसत नाही आहे.
श्रीकांत फळा पुसतो आहे.	श्रीकांत फळा पुसत नाही आहे.
ज्योती आणि सुमन पावसात भिजताहेत.	ज्योती आणि सुमन पावसात भिजत नाही आहेत.
शिक्षक मुलांवर ओरडताहेत.	शिक्षक मुलांवर ओरडत नाही आहेत.
तुम्ही पुस्तक वाचताहात.	तुम्ही पुस्तक वाचत नाही आहात.
आम्ही गाणी म्हणतो आहोत.	आम्ही गाणी म्हणत नाही आहोत.
आपण वर्गात येतो आहोत.	आपण वर्गात येत नाही आहोत.
तू रेडिओ ऐकते आहेस.	तू रेडिओ ऐकत नाही आहेस.

2

Turn into the affirmative the following sentences.
(पुढील वाक्ये होकारार्थी करा.)

मोहन वर्गात अभ्यास करत नाही आहे.	मोहन वर्गात अभ्यास करतो आहे.
तू गाणी म्हणत नाही आहेस.	तू गाणी म्हणतो / म्हणते आहेस.
ती वर्गात झोपत नाही आहे.	ती वर्गात झोपते आहे.

आम्ही चहा पीत नाही आहोत.	आम्ही चहा पितो आहोत.
तुम्ही मराठी शिकत नाही आहात.	तुम्ही मराठी शिकताहात.
सुशीला गडबड करत नाही आहे.	सुशीला गडबड करते आहे.
विजयाबाई मराठी शिकवत नाही आहेत.	विजयाबाई मराठी शिकवताहेत.
ते पंखा बंद करत नाही आहोत.	ते पंखा बंद करताहेत.
आपण पावसात भिजत नाही आहोत.	आपण पावसात भिजत आहोत.
शिक्षक फळ्यावर लिहीत नाही आहेत.	शिक्षक फळ्यावर लिहिताहेत.

V
Conversation Drill

शिक्षक	:	श्याम, तू काय करतो आहेस ?
श्याम	:	मी वहीत लिहितो आहे.
शिक्षक	:	सुमन, तू काय करते आहेस ?
सुमन	:	मीसुद्धा वहीत लिहिते आहे.
शिक्षक	:	मंगल, श्याम आणि सुमन काय करताहेत ?
मंगल	:	श्याम आणि सुमन वहीत लिहिताहेत.
शिक्षक	:	मुलांनो, तुम्ही काय करताहात.
मुलं	:	आम्ही पुस्तक वाचतो आहोत.
शिक्षक	:	मुलींनो, तुम्ही काय करताहात ?
मुली	:	आम्हीसुद्धा पुस्तक वाचतो आहोत.
शिक्षक	:	शीला, नीला पुस्तक वाचते आहे का ?

शीला	:	नाही, नीला पुस्तक वाचत नाही आहे ?
शिक्षक	:	नीला, तू काय करते आहेस ?
नीला	:	मी चित्र पहाते आहे.
शिक्षक	:	माधुरी, नीला गडबड करते आहे का ?
माधुरी	:	नाही, नीला गडबड करत नाही आहे. ती चित्र पहाते आहे.
शिक्षक	:	रमेश, तू काय करतो आहेस ?
रमेश	:	मी अभ्यास करतो आहे.

स्वाध्याय क्र. १९ **Exercise No. 19**

1. **Transform the following sentences in the Present Continuous.**

(पुढील वाक्ये चालू वर्तमानकाळात लिहा.)

पाऊस पडतो.	त्या रेडिओ ऐकतात.
मुलं गारा वेचतात.	आम्ही सिनेमा पहातो.
अनला फळ्यावर लिहिते.	आपण शाळेत जातो.
प्रकाश आणि सुनीता पुस्तकं वाचतात.	ते वहीत धडे लिहितात.
तुम्ही दूध पिता.	मी अभ्यास करतो.

2. **Write the following sentences in the Present Continous making use of the verbs given in the bracket.**

(कंसातल्या धातूचा उपयोग करून पुढील वाक्ये चालू वर्तमानकाळात लिहा.)

सुनीता मराठी .... (शिक).	तू पेन्सील ...... (उचल).
आम्ही अभ्यास .... (कर).	तुम्ही फळ्यावर.... (लिही).
ते (m.pl.) दार .... (उघड).	प्रमोद गारा .... (वेच).
त्या वही खाली ...... (ठेव).	मुलं पावसात......(भीज).

आपण कविता .....(म्हण). माकडं शेंगा ...... (खा).

3A. Fill in the gaps with the proper form of the verb आहे.

(रिकाम्या जागेत 'आहे' ची योग्य रूपे भरा.)

ती गाणं म्हणते .... आम्ही खिडक्या बंद करतो ... .

तू मराठी शिकवतो .... आपण पंखे लावतो ....

तुम्ही पुस्तक वाचता .... विजया गारा वेचते ....

मी तोंड धुतो .... श्रीयुत माने सिनेमा पहाता ....

त्या भेळ खाता .... वासरं दूध पिता ....

3B. Fill in the gaps with the proper pronoun.

(पुढील वाक्यांत रिकाम्या जागी योग्य ते सर्वनाम भरा.)

...... बागेत खेळतो आहेस. .... फळा पुसतो आहे.

...... कणसं खातो आहोत. ...... खुर्चीवर बसते आहे.

.... धडे वाचते आहे. ...... झाडावर चढतं आहे.

.... काम करतो आहे. .... झोपाळ्यावर बसते आहेस.

..... वहीत लिहितो आहोत. ..... रेडिओ ऐकताहात.

4A. Turn into the negative the following sentences.

(पुढील वाक्ये नकारार्थी करा.)

आम्ही पुस्तकं वाचतो आहोत. विद्यार्थी वर्गात येताहेत.

नीला पाच खडू उचलते आहे. विद्यार्थिनी बाहेर खेळताहेत.

त्या कागद टेबलावर ठेवताहेत. अनंत फुलं वेचतो आहे.

आम्ही हात धुतो आहोत. तू पावसात भिजते आहेस.

माधव धडे लिहितो आहे. आकाशात विजा चमकताहेत.

4B. Turn into the affirmative the following sentences.

(पुढील वाक्ये होकारार्थी करा.)

मी आता खुर्चीवर बसत नाही आहे.

ती बाहेर पावसात भिजत नाही आहे.
शैला घरात काम करत नाही आहे.
मनीष सिनेमा पहात नाही आहे.
डॉक्टर दवाखाना बंद करत नाही आहेत.
तू दूध पीत नाही आहेस.
आपण वर्गात दंगा करत नाही आहोत.
तुम्ही टेबलावर वह्या ठेवत नाही आहात.
ते दार उघडत नाही आहेत.
पिलं आकाशात उडत नाही आहेत.

5. **Rewrite the following paragraph in Present Tense.**
(पुढील उतारा वर्तमानकाळात लिहा.)
लक्ष्मण वर्गात येतो आहे. आधी तो खिडक्या उघडतो आहे. मग तो खोली स्वच्छ करतो आहे. नंतर तो खुर्च्या पुसतो आहे. मग तो टेबल पुसतो आहे. तो टेबलावर खडू ठेवतो आहे. मग तो फळा पुसतो आहे. फळ्यावर तो दिनांक लिहितो आहे. मग तो पंखा लावतो आहे. नंतर तो वर्गाबाहेर येतो आहे आणि घरी जातो आहे.

6. **Complete the following conversation by filling up the gaps.**
(रिकाम्या जागा भरून पुढील संवाद पूर्ण करा.)
मोहन - सरिता, तू आता बागेत काय करते आहेस ?
सरिता - ....
मोहन - तू काय खेळते आहेस ?
सरिता - ....

मोहन - तू झोपाळ्यावरसुद्धा बसते आहेस का ?

सरिता - ....

....

मोहन - नाही. मी झोपाळ्यावर बसत नाही. बागेत तू भेळ खातेस का ?

सरिता - ....

.... ?

मोहन - हो, मीसुद्धा बागेत भेळ खातो.

.... ?

सरिता - आता मी मैत्रिणीकडे जाते आहे.

.... ?

मोहन - मी आता घरी जातो आहे.

5. Write a small conversation between Mohan and Meena using the Present Continouse Tense on the topic 'school'. Make use of the song which you have learnt in the lesson.

('शाळा' या विषयावर मोहन आणि मीना यांच्यात चालू वर्तमानकाळाच्या रचना वापरून संवाद लिहा. धड्यात शिकलेल्या गाण्याचा उपयोग करा.)

Vocabulary

ओरडणे (v.intr.) to cry

भरणे (v.tr) to fill

कोसळणे (pron) to pour heavily to collapse

भिजणे (v.intr) to get wet

खुशाल (adv.) happily

मोठा (adj.) big

खोटा (adj.)	counterfeit, lie	वहाणे (V.intr.) to overflow
गडगडणे (v.intr.) to thunder		वीज (f) a lightening
चमकणे(v.intr.) to flash		वेचणे (v.tr.) to pick up
चालू (adv)	on	शब्द (m) word
छत्री (f)	umbrella	शिकणे (tr.) to learn
ढग (m)	cloud	शेंग (f) a pod
नाव (f)	boat	सर्व (adj.) all
पडणे (v.intr.) to fall		सर (f) i shower
पाऊस (m)	rain	सोडणे (tr.) to leave

Grammatical Notes

Unit -VII, Lesson 19 introduces the Present Continuos. This tense is used when a particular action is actually going on.

The formation of the Present Continuos (also called Present Tense - 2) is as follows :

The forms of Present-1 + The forms pf the verb आहे ' to be'.

Example : मी बसतो + आहे = मी बसतो आहे.

The conjugation of the verb 'to be' is as follows

तक्ता क्र. १५ — Table No. 15

	Singular	Plural
I person	मी आहे	आम्ही आहोत.
II person	तू आहेस.	तुम्ही आहात.
III person	(m) तो आहे.	ते आहेत.
	(f) ती आहे.	त्या आहेत.

	(n) ते आहे.	ती आहेत.

Present Continouse Tense

तक्ता क्र. १६ Table No. 16

बस - ' to sit'

	Singular	Plural
I person	मी (m) बसतो आहे.	आम्ही बसतो आहोत.
	(f) बसते आहे.	
II person	तू (m) बसतो आहेस*	तुम्ही बसताहात.
	(f) बसते आहेस*	
III person	(m) तो बसतो आहे	ती बसताहेत.
	(f) ती बसते आहे.	त्या बसताहेत.
	(n) ते बसतं आहे.	ती बसताहेत.

जा - ' to go'

	Singular	Plural
I person	मी (m) जातो आहे.	आम्ही जातो आहोत.
	(f) जाते आहे.	
II person	तू (m) जातो आहेस.*	तुम्ही जाताहात.
	(f) जाते आहेस.*	
III person	(m) तो जातो आहे.	ते जाताहेत.
	(f) ती जाते आहे.	त्या जाताहेत.
	(f) ते जातं आहे.	ती जाताहेत.

* The Habitual Present Tense form of the 2nd person singular is R + तोस / तेस. The 2nd person (sg.) of the verb आहे also ends in -स, which is the second person singular marker. The -स of the main verb is dropped retaining that of auxiliary verb: The same is the case with 3rd person plural forms. The suffix त which is the plural marker is dropped before adding आहेत which also contains the plural marker.

In fast colloquial speech the form आहे is reduced to य्. Thus e.g. 'मी बसतो आहे' becomes 'मी बसतोय' etc. These forms are as follows. :

बस -

Singular

I person	मी (m)	बसतोय (बसतो आहे).
	मी (f)	बसतेय (बसते आहे).
II person	तू (m)	बसतोयस (बसतो आहेस).
	तू (f)	बसतेयस (बसते आहेस).
III person	तो (m)	बसतोय (बसतो आहे).
	ती (f)	बसतेय (बसते आहे).
	ते (n)	बसतंय (बसतं आहे).

Plural

I person	आम्ही (m/f)	बसतोय (बसतो आहोत).
II person	तुम्ही (m/f)	बसताय (बसता आहात).
III person	ते (m)	बसतायत (बसताहेत).
	त्या (f)	बसतायत (बसताहेत).
	ती (n)	बसतायत (बसताहेत).

Present Tense 2 : Negative

We have seen the formation of the Negative Present in Lesson No 18 - of Unit VII : e.g. मी बसतो (affirmative), मी बसत नाही (negative). The same form of negative may be used for the Present Tense 2. But sometimes, after this negative form, the 'आहे' forms are added in the case of Present Tense 2, e.g.

	Singular	Plural
I person	मी बसत नाही आहे.	आम्ही बसत नाही आहोत.
II person	तू बसत नाही आहेस.	तुम्ही बसत नाही आहात.
III person	तो बसत नाही आहे.	ते बसत नाही आहेत.
	ती बसत नाही आहे.	त्या बसत नाही आहेत.
	ते बसत नाही आहे.	ती बसत नाही आहेत.

गट - ७	Unit - VII
धडा विसावा	LESSON 20
(उजळणी पाठ ४)	(Review Lesson 4)
बाग	**The garden**
ही पहा बाग.	Here is a garden.
आज रविवार.	Today (is) Sunday.
आज बागेत पुष्कळ लोक येताहेत.	Many people are coming to the garden today.
तो पहा एक माणूस.	Look at that man.
तो फुलांकडे पहातो आहे.	He is looking at the flowers.
ती तिकडे मुलं पहा.	See those children over there.
ती मुलं रोज बागेत चेंडू खेळतात.	Those children play ball everyday in the garden.
पण आज ती चेंडू खेळत नाही आहेत.	But today they are not playing ball in the garden.
आज ती पतंग उडवताहेत.	Today they are flying a kite.
आणि बागेबाहेर त्या मुली पहा.	And look at those girls outside the garden.
त्या भेळ खाताहेत का ?	Are they eating bhel ?
हो, त्या भेळ खाताहेत.	Yes, they are eating bhel.
पलीकडे एक मुलगा पहा.	There is a boy over there.
तो कणसं खातो आहे का ?	Is he eating corns ?

नाही, तो कणसं खात नाही आहे,	No, he is not eating corns.
तो शेंगा खातो आहे.	He is eating pods.
बागेबाहेर एक फुगेवाला आहे.	There is a ballon-man outside the garden.
आणि एक खेळणीवाला आहे.	And (there) is a toy-seller.
फुगेवाला फुगे विकतो आहे.	The balloon-seller is selling balloons.
खेळणीवाला खेळणी विकतो आहे.	The toy-seller is selling toys.
आज रविवार	Today (is) sunday.
आम्ही दर रविवारी बागेत जातो.	We go to the garden every Sunday.
आम्ही हिरवळीवर बसतो.	We sit on the lawn.
आम्ही बागेत भेळ खातो.	We eat bhel in the garden.
पण पाणी पीत नाही.	But we don't drink water.
आम्ही बागेत खूप मजा करतो.	We do a lot of fun in the garden.
रविवार मजेत घालवतो.	We spend the Sunday in fun.
आणि घरी परत येतो.	And come back home.

चाचणी क्र. ४ Test No 4

1. **Write the following paragraph first in the present tense and then in the present continouse tense.**

(पुढील उतारा प्रथम वर्तमानकाळात आणि नंतर चालू वर्तमानकाळात लिहा.)

वसंत, ऊठ. तोंड धू आणि दूध पी. मग आंघोळ कर. बाजारात जा. भाजी आण. घरी ये. अभ्यास कर. मग जेव आणि शाळेत जा. शाळेत अभ्यास कर. खूप खेळ. गाणी म्हण, चित्र पहा. संध्याकाळी घरी ये. लाडू खा. टी.व्ही पहा. मग जेव आणि नंतर झोप.

2 Transform the following negative sentences into the present habitual affirmative.

(पुढील नकारार्थी वाक्ये रीति वर्तमानकाळात होकारार्थी करून लिहा.)

मोहन बागेत जात नाही.	तो पतंग उडवत नाही.
आम्ही दूध पीत नाही.	तुम्ही वह्या वाचत नाही.
त्या दुकानात जात नाहीत.	प्रमिला तोंड धूत नाही.
ते फुलांकडे पहात नाहीत.	मी पिशवी घेत नाही.
तू भाजी आणत नाहीस.	मीनाताई लाडू खात नाहीत.

3A Substitute करतो आहे **with the given verb forms making necessary changes in the subject.**

('करतो आहे' ऐवजी त्या क्रियापदाची दिलेली रूपे वापरा आणि ती वापरताना वाक्याच्या कर्त्यामध्ये योग्य तो फेरफार करा.)

तो अभ्यास करतो आहे.

करतो आहोत.

करताहेत.

करताहात.

करते आहे.

करतो आहे.

करतं आहे.

करते आहेस.

करताहेत.

3B Substitute ती with the given words making necessary changes in the sentences.

('ती' ऐवजी दिलेली सर्वनामे वापरून, योग्य ते बदल करून पुढील वाक्ये लिहा.)

ती बाजारात जाते.

तू **(f)**

त्या

आपण

आम्ही

तुम्ही

तो

मी

ते

ती **(n.pl.)**

तू **(m)**

4 Fill in the gaps selecting the correct word from the given list.

(दिलेल्या यादीतून योग्य तो शब्द निवडा आणि तो रिकाम्या जागी भरा.)

List : उडवताहेत, बसत, अभ्यास, आहेस, ते, म्हणतो आहोत, येतेस, तुम्ही, जाते, बंद.

Sentences -

तू हातपाय धुतो ....

आपण गाणी ....

ती बाजारात .... आहे.

किसन खिडकी .... करतो आहे.

.... झाडावर चढतं आहे.

मुलं पतंग ....

शशांक .... करतो आहे.

.... भेळ खाताहात.

तू वर्गात ....

मी टेबलावर .... नाही.

5 **Rewrite the following question by substituting the un derlined word with the words given below, making necessary changes. Answer the question in the affirmative as well as in the negative.**

(अधोरेखित शब्दाऐवजी दिलेले शब्द घालून योग्य ते बदल करून पुढील प्रश्न लिहा. त्या प्रश्नांची होकारार्थी आणि नकारार्थी उत्तरे द्या.)

ही खुर्ची आहे का ?	ही खुर्ची आहे का ?
पियानो	शिक्षक
बटण	पुस्तक
संत्रं	पेले
किल्ल्या	साखर
कडधान्य	गोपाळराव

6 **Turn the following sentences into the request sentences making honorific - plural. Write the sentences into the**

negative.

(पुढील वाक्ये आदरार्थी बहुवचनात विनंती —— करून लिहा. ती वाक्ये नकारार्थी करा.)

मोहन, त्या चित्राकडे पहा.
मालती, तो धडा वाच.
काळे, आत ये, खुर्चीवर बस, चहा घे.
अजय आणि अभय, शाळेत अभ्यास करा.
विजया, ती खिडकी बंद कर.
अरुणा, वर्गात शांत बस.
मिलिंद ते दार उघड.
माने, फळ्यावर शब्द लिही.
रेखा, धड्याकडे लक्ष दे.

7 **Write a description of a garden in 10 lines.**

(दहा ओळीत बागेचे वर्णन करा.)

8 **Write a small conversation between two boys going to school.**

(शाळेत जाणाऱ्या दोन मुलांमध्ये होणारा छोटासा संवाद लिहा.)

गट - ८	Unit - VIII
धडा एकविसावा	**Lesson 21**
उंच, बारीक माणूस	**A Tall, Thin Man**
शिक्षक : मुलांनो, फळ्याकडे पहा.	Teacher : Children, look at the blackboard.
मी फळ्यावर चित्र काढतो आहे.	I am drawing a picture on the blackboard.
हा माणूस आहे आणि ही बाई आहे.	This is a man and this is a woman.
हा माणूस उंच आहे.	This man is tall.
ही बाई ठेंगू आहे.	This woman is short.
हा माणूस ह्या बाईपेक्षा उंच आहे.	This man is taller than this woman.
ही बाई ह्या माणसापेक्षा ठेंगू आहे.	This woman is shorter than this man.
हा माणूस बारीक आहे.	This man is thin.
ही बाई लठ्ठ आहे.	This woman is fat.
हा माणूस कसा आहे ?	How is this man ?
विद्यार्थी : हा माणूस बारीक आहे.	Student : This man is thin.
शिक्षक : हा माणूस कोणापेक्षा बारीक आहे ?	Teacher : This man is thiner than whom ?

विद्यार्थी : हा माणूस त्या बाईपेक्षा बारीक आहे.	Student : This man is thinner than that woman.
शिक्षक : मुलांनो, आता इकडे पहा.	Teacher : Children, now look here.
ह्या दोन रेषा आहेत.	These are two lines.
ही रेषा सरळ आणि लांब आहे.	This line is straight and long.
ही रेषा ह्या रेषेपेक्षा आखूड आहे.	This line is shorter than this line.
प्रतिभा, ही रेषा कशी आहे ?	Pratibha, how is this line ?
प्रतिभा : ही रेषा त्या रेषेपेक्षा आखूड आहे.	Pratibha : This line is shorter than this line.
शिक्षक : इकडे ही दारं पहा.	Teacher : Look at these doors.
हे दार रुंद आहे आणि हे दार	This door is broad and this
अरुंद आहे.	door is narrow.
शशिकांत, ते दार कसं आहे ?	Shashikant, how is this door ?
शशिकांत : ते दार अरुंद आहे.	Shashikant : That door is narrow.
शिक्षक : ही दोन पुस्तकं पहा.	Teacher : Look at these books.
हे पुस्तक जाड आहे.	This book is thick.

हे पुस्तक पातळ आहे.	This book is thin.
आणि ह्या वस्तू पहा.	And see these things.
हे टेबल चौकोनी आहे.	The table is rectangular.
हा फळा चौकोनी आहे.	This blackboard is rectangular.
ही वहीपण चौकोनी आहे.	This notebook is also rectangular.
खुर्चीवर ह्या दोन उशा आहेत.	There are two cushions on the chair.
उशा मऊ आहेत. मीरा, उशा कशा आहेत ?	The cushions are soft, Meera, how are the cushions ?
मीरा : उशा मऊ आहेत.	Meera : The cushions are soft.
शिक्षक : हे पहा.	Teacher : Look here.
हे स्टूल आहे.	This is a stool.
हे स्टूल गोल आहे.	This stool is round.
ते स्टूल जड आहे.	That stool is heavy.
हे स्टूल त्या स्टुलापेक्षा लहान आहे.	This stool is smaller than that stool.
ही घड्याळं आहेत.	These are wristwatches.
हे घड्याळ नवीन आहे.	This watch is new.
हे घड्याळ भारी आहे.	This watch is expensive.
टेबलावर फुलं आहेत.	There are flowers on the

	table.
ती फुलं नाजूक आणि सुंदर आहेत.	Those flowers are delicate and beautiful.
दिलीप, ती फुलं कशी आहेत ?	Dilip, how are those flowers ?
दिलीप : ती फुलं नाजूक आणि सुंदर आहेत.	Dilip : Those flowers are delicate and beautiful.
शिक्षक : लक्ष्मण, वर्गात कोणकोण आहेत ?	Teacher : Laxman, who are there in the class ?
लक्ष्मण : वर्गात दिलीप आहे, मीरा आहे, शशिकांत आहे आणि प्रतिभा आहे.	Laxman : Dilip is in the class. And there is Meera. There is Shashikant and Pratibha is (there).
शिक्षक : दिलीप शशिकांतपेक्षा उंच आहे.	Teacher : Dilip is taller than Shashikant.
दिलीप सर्वात उंच आहे.	Dilip is the tallest of all.
दिलीप वर्गात सर्वात हुशार आहे.	Dilip is the most brilliant (student) in the class.

Drills

I

Repetition Drills

हा माणूस उंच आहे.	हा माणूस बारीक आहे.
ही बाई लठ्ठ आहे.	ही बाई ठेंगू आहे.
हा फळा चौकोनी आहे.	ही वही चौकोनी आहे.

हे स्टूल चौकोनी आहे. हे टेबल चौकोनी आहे.
ह्या उशा मऊ आहेत. ही फुलं नाजूक आहेत.
हा माणूस ह्या बाईपेक्षा उंच आहे. रमेश नीलापेक्षा उंच आहे.
हा माणूस ह्या बाईपेक्षा बारीक आहे. नीला रमेशपेक्षा टेंगू आहे.
ही बाई ह्या माणसापेक्षा लठ्ठ आहे. रमेश सर्वात उंच आहे.

2

ही रेषा लांब आहे. ह्या रेषा लांब आहेत.
ती रेषा सरळ आहे. त्या रेषा सरळ आहेत.
हा फळा रुंद आहे. हे फळे रुंद आहेत.
तो फळा नवीन आहे. ते फळे नवीन आहेत.
हे टेबल गोल आहे. ही टेबलं गोल आहेत.
ते टेबल जड आहे. ती टेबलं जड आहेत.
हा फळा चौकोनी आहे. हे फळे चौकोनी आहेत.
ही उशी चौकोनी आहे. ह्या उशा चौकोनी आहेत.

3

राम श्यामपेक्षा बारीक आहे. राम श्यामपेक्षा उंच आहे.
राम श्यामपेक्षा बारीक आणि उंच आहे.
ही वही त्या वहीपेक्षा जाड आहे. ही वही त्या वहीपेक्षा रुंद आहे.
ही वही त्या वहीपेक्षा जाड आणि रुंद आहे.

हे नाणं त्या नाण्यापेक्षा जड आणि नवीन आहे.
हा फोटो त्या फोटोपेक्षा लहान आहे.
ही रेषा त्या रेषेपेक्षा सरळ आहे.
ह्या इमारती त्या इमारतींपेक्षा उंच आहेत.

II

Question-Answer drill.

हे काय आहे ?	हा रुमाल आहे.
हा रुमाल कसा आहे ?	हा रुमाल लाल आहे.
हे काय आहे ?	हे रुमाल आहेत.
हे रुमाल कसे आहेत ?	हे रुमाल लाल आहेत.
हे काय आहे ?	ही वही आहे.
ही वही कशी आहे ?	ही वही लाल आहे.
हे काय आहे ?	ह्या वह्या आहेत.
ह्या वह्या कशा आहेत ?	ह्या वह्या लाल आहेत.
हे काय आहे ?	हे पुस्तक आहे.
हे पुस्तक कसं आहे ?	हे पुस्तक लाल आहे.
हे काय आहे ?	ही पुस्तकं आहेत.
ही पुस्तकं कशी आहेत ?	ही पुस्तकं लाल आहेत.
हा कोण आहे ?	हा रमेश आहे.
ही कोण आहे ?	ही मालती आहे.
मालती रमेशपेक्षा उंच आहे का ?	नाही, मालती रमेशपेक्षा उंच नाही.

III

Transformation drills.

Give questions to obtain the given answers.

खालील उत्तरे मिळतील असे प्रश्न द्या.

ती रेषा सरळ आहे.	ती रेषा कशी आहे ?
ते पंखे नवीन आहेत.	ते पंखे कसे आहेत ?

ह्या किल्ल्या लांब आहेत.	ह्या किल्ल्या कशा आहेत ?
ही स्टुलं चौकोनी आहेत.	ही स्टुलं कशी आहेत ?
तो माणूस उंच आहे.	तो माणूस कसा आहे ?
ह्या साड्या भारी आहेत.	ह्या साड्या कशा आहेत ?
ही फुलं लाल आहेत.	ही फुले कशी आहेत ?
ह्या रेषा आखूड आहेत.	ह्या रेषा कशा आहेत ?
ही घड्याळं गोल आहेत.	ही घड्याळं कशी आहेत ?

IV

Conversation drill

शिक्षक : प्रतिभा, हे काय आहे ?

प्रतिभा : हे कागद आहेत.

शिक्षक : हे किती कागद आहेत ?

प्रतिभा : हे दोन कागद आहेत.

शिक्षक : सुमती, हे कागद कसे आहेत ?

सुमती : एक कागद चौकोनी आणि एक कागद लांब आहे.

शिक्षक : हा कागद ह्या कागदापेक्षा लांब आहे का ?

सुमती : नाही, हा कागद ह्या कागदापेक्षा लांब नाही.

शिक्षक : दिवाकर, हे काय आहे ?

दिवाकर : ह्या पेन्सिली आहेत.

शिक्षक : ह्या किती पेन्सिली आहेत ?

दिवाकर : ह्या तीन पेन्सीली आहेत.

शिक्षक : माया, ही पेन्सील कशी आहे ?

माया : ही पेन्सील लाल आहे.

शिक्षक : ह्या दोन पेन्सिली कशा आहेत ?
माया : ह्या दोन पेन्सिलीसुद्धा लाल आहेत.
शिक्षक : ह्या दोन पेन्सिली जाड आहेत का ?
माया : ह्या दोन पेन्सिली ह्या पेन्सिलीपेक्षा जाड नाहीत.
शिक्षक : हे काय आहे ?
सुमित : ही घड्याळं आहेत.
शिक्षक : ही किती घड्याळं आहेत ?
सुमीत : ही चार घड्याळं आहेत.
शिक्षक : मोहन, ही चार घड्याळं कुठे आहेत ?
मोहन : ही चार घड्याळं टेबलावर आहेत.
शिक्षक : श्रीकांत, ही दोन घड्याळं कशी आहेत ?
श्रीकांत : ही दोन घड्याळं चौकोनी आहेत.
शिक्षक : आणि ही दोन घड्याळं गोल आहेत का ?
श्रीकांत : हो, ही दोन घड्याळं गोल आहेत.
शिक्षक : मीना, चौकोनी घड्याळं गोल घड्याळांपेक्षा सुंदर आहेत का?
मीना : हो, चौकोनी घड्याळं गोल घड्याळांपेक्षा सुंदर आहेत.

स्वाध्याय क्र. २१ **Exercise No. 21**

1 **Fill in the gaps with appropriate words (adjective or postposition or interrogative)**

(रिकाम्या जागी आवश्यकतेप्रमाणे विशेषण, शब्दयोगी अव्यय किंवा प्रश्नवाचक शब्द भरा.)

१. हा माणूस लठ्ठ आहे. तो माणूस उंच आहे. हा माणूस त्या

माणसापेक्षा .... आहे.

२. ही बाई त्या बाईपेक्षा .... आहे.

३. त्या रेषा सरळ आहेत. ह्या रेषासुद्धा .... आहेत.

४. हे केस आखूड आहेत. ते केस .... आहेत.

५. रमेश नीला .... टेंगू आहे.

६. ह्या उशा .... आहेत.

७. हा कागद .... कागदापेक्षा लांब आहे.

८. .... घड्याळ .... घड्याळापेक्षा जड आहे.

९. त्या किल्ल्या .... आहेत.

१०. हे पंखे .... आहेत का ?

2 **Select the appropriate adjective out of the given list and answer the following questions.**

(पुढे दिलेल्या यादीतून योग्य ते विशेषण निवडून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.)

Adjectives : उंच, टेंगू, सरळ, बारीक, जड, रुंद, गोल, लठ्ठ, मऊ, चौकोनी

Questions : ही उशी कशी आहे ? ते कागद कसे आहेत ?

ह्या मुली कशा आहेत ? ती रेषा कशी आहे ?

तो माणूस कसा आहे ? ते स्टूल कसं आहे ?

ती पुस्तकं कशी आहेत ? तो बंगला कसा आहे ?

सुशीलाबाई कशा आहेत ? हे टेबल कसं आहे ?

3 **A list of nouns is given below. Use each noun in a sen tence with an appropriate adjective.**

(पुढे काही नामांची यादी दिली आहे. त्यातल्या प्रत्येकाबद्दल योग्य ते

विशेषण वापरून वाक्य तयार करा.)

Model : खिडकी - ह्या खिडक्या रुंद आहेत.

List of nouns : मुलगी, पंखे, घड्याळ, कापड, दार, साडी, फळा, इमारत, पिशवी, बांगडी

4 **Match the pairs.**

(जोड्या जुळवा)

A	B
हा मुलगा	चौकोनी आहे.
श्रीयुत भावे	लाल आहेत.
ह्या मुली	रुंद आहेत.
ती रेषा	हुशार आहे.
तो बंगला	बारीक आहे.
ही मुलगी	आखूड आहे.
ही बाई	गोल आहे.
ती टेबलं	ठेंगू आहेत.
हे टोमॅटो	उंच आहेत.
ते स्टूल	लठ्ठ आहे.

5 **Rewrite the sentence with the help of the given adjectives.**

(कंसात दिलेल्या विशेषणाच्या सहाय्याने नवीन वाक्ये बनवा.)

Model : हे रस्ते सरळ आहेत. (स्वच्छ, रुंद)

हे रस्ते स्वच्छ आहेत. हे रस्ते रुंद आहेत.

ह्या मुली हुशार आहेत. (लठ्ठ, बारीक)

ही भिंत उंच आहे. (जाड, सरळ)

ह्या उशा मऊ आहेत. (अरुंद, लांब)
हा माणूस ठेंगू आहे. (हुशार, बारीक)
ही बांगडी गोल आहे. (लहान, सुंदर)
ही फुलं सुंदर आहेत. (नाजूक, गोल)
हे घड्याळ चौकोनी आहे. (रुंद, लांब)
हा कागद लाल आहे. (चौकोनी, जाड)
ह्या वह्या रुंद आहेत. (चौकोनी, जाड)
ही साडी पातळ आहे. (भारी, लाल)

6 **Complete the following conversation with appropriate sentences.**

(रिकाम्या जागी योग्य ती वाक्ये भरून संवाद पूर्ण करा.)

शिक्षक - हे काय आहे ?
मालती -
शिक्षक - पेन कुठे आहे ?
मालती -
शिक्षक - टेबलासमोर कोण आहे ?
मालती -
शिक्षक - शरदजवळ पेन आहे का ?
मालती -
शिक्षक - ते पेन कसं आहे ?
मालती -
शिक्षक - ते लाल पेन सुंदर आहे का ?
मालती -

शिक्षक - आता शरद ते पेन कुठे ठेवतो आहे ?

मालती -

शिक्षक - ती वही कशी आहे ?

मालती -

शिक्षक - लाल वहीवर काय आहे ?

मालती -

शिक्षक - लाल वहीवर लाल पेन छान छान.

7 **Arrange the nouns in the following list in the proper columns according to their genders. Give the plural forms of these nouns.**

(यादीतील नामे कॉलममध्ये योग्य जागी त्यांच्या लिंगानुसार भरा आणि त्यांचे अनेकवचनाचे रूप द्या.)

वर्तुळ, त्रिकोण, उशी, माणूस, बाई, मुलगी, रेषा, फळा, इमारत, कापड, नाणं, किल्ली, पेन्सील, वीट, खार, गार, सर, पाऊस, मडकं, जागा

Vocabulary

कसा (int)	how	भारी (adj)	costly
गोल (adj)	round	मऊ (adj)	soft
चौकोनी (adj)	rectangular	रुंद (adj)	broad
जड (adj)	heavy	लठ्ठ (adj)	fat
जाड (adj)	thick	लहान (adj)	small
ठेंगू (adj)	short	लाल (adj)	red
नवीन (adj)	new	सरळ (adj)	straight
नाजूक (adj)	delicate	सुंदर (adj)	beautiful

हुशार (adj) brilliant

Grammatical Notes

Unit - VIII introduces the adjectives in Marathi.

The adjectives are of two types :

1) Variable Adjectives : [varying according to the number gender of the nouns which they qualify].

2) Invariable Adjectives : [having the same form in all contexts]

Unit - VIII, Lesson 21 gives the invariable adjectives in Marathi.

Invariable adjectives may end in a conconant, in -ई or in -ऊ

Examples :

1. Consonant ending adjectives : लाल 'red',गोल 'round', उंच'tall', सुंदर'beautiful',etc.
2. -i ending adjectives : सुखी 'happy', दुःखी 'unhappy', गुलाबी 'pink' etc.
3. -u ending adjectives : कडू 'bitter', मऊ 'soft', ठेंगू 'short'.

Invariable adjectives do not change according to the number-gender of the noun which they qualify e.g.

तक्ता क्रमांक १७ Table No. 17

1. C - ending adjectives.

	Singular	Plural
Mas.	लाल दिवा 'red lamp'	लाल दिवे 'red lamps'.
Fem.	लाल साडी ('red saree')	लाल साड्या 'red sarees'.
Neu.	लाल पुस्तक 'red book'	लाल पुस्तकं 'red books'

2. i - ending adjectives :

	Singular	Plural
Mas.	गुलाबी खडू 'pink chalk'	गुलाबी खडू 'pink chalk'.
Fem.	गुलाबी पेन्सील 'pink pencil'	गुलाबी पेन्सिली 'pink pencils'.
Neu.	गुलाबी फूल 'pink flower'	गुलाबी फुलं 'pink flowers'

3. u - ending adjectives :

	Singular	Plural
Mas.	कडू भोपळा 'bitter gourd'	कडू भोपळे 'bitter gourds'.
Fem.	कडू काकडी 'bitter cucumber'	कडू काकड्या 'bitter cucumbers'.
Neu.	कडू कार्लं 'bitter kearela'	कडू कार्ली 'bitter karelas'

An invariable adjective remains unchanged before the oblique form of the noun that it qualifies. [Please see Unit - VIII, Lesson 22]

Examples :

[SF]

1. सुंदर मुलगी पुस्तक वाचते आहे.
[The beautiful girl is reading a book.]

[OF]

सुंदर मुली - जवळ पुस्तक आहे.
[Literally : (A) book is with the beautiful girl.]
[The beautiful girl has a book]

[SF]

2. वर्गात गुलाबी खुर्च्या आहेत.

[There are pink chairs in the class-room.]

[OF]

मी गुलाबी खुर्चीवर बसते.

[I sit on the pink chair.]

[SF]

3. पलंगावर मऊ गादी आहे.

[There is a soft mattress on the cot.]

[OF]

मोहन मऊ गादी-वर झोपतो.

[Mohan sleeps on the soft mattress.]

[OF]

Comparative Degree :

Comparison between two things is expressed by adding the postposition पेक्षा 'than' to the oblique form of the noun which in English is preceded by 'than' e.g.

लाल साडी गुलाबी साडी-पेक्षा सुंदर आहे.

'The red saree is more beautiful than the pink one.'

Superlative Degree :

The superlative degree is expressed by putting सर्वात **'of all' before the adjective. e.g.**

हिमालय पर्वत सर्वात उंच आहे.

'The mountain Himalaya is the tallest (mountain) among all'.

गट - ८

Unit - VIII

धडा बाविसावा

LESSON 22

निळा चेंडू

The Blue Ball

सुनील : माधवी, मी बाजारात जातो आहे. तू येतेस का?	Sunil : Madhavi, I am going to the market. Are you coming?
माधवी : हो, मी पण येते.	Madhavi : Yes, I am also coming.
सुनील : चल त्या दुकानात. तिथे खेळणी मिळतात, बघ.	Sunil : Come to that shop. Toys are available there, have a look.
किती मोठं दुकान आहे!	How big the shop is!
ते पहा रंगीत फुगे!	Śee those colourful balloons.
तो फुगा निळा आहे.	That balloong is blue.
तो फुगा गुलाबी आहे.	That balloon is pink.
आणि एक फुगा लाल आहे.	And one balloon is red.
माधवी : मी गुलाबी फुगा घेते.	Madhavi : I (will) purchase (take) a pink balloon.
दुकानदार, तो गुलाबी फुगा द्या.	Shopkeeper, give that pink balloon.
दुकानदार : हा घ्या.	Shopkeeper : Here it is. (please take this)
आणि तिकडे रंगीत बाहुल्या आहेत.	And, on that side, there are colourful dolls.
माधवी : जरा दाखवता का?	Madhavi : (will) you please

	show?
दुकानदार : हो, ही पहा निळी बाहुली.	Shopkeeper : Yes, see this blue doll.
ही इकडे लाल बाहुली आहे.	On this side, this is a red doll.
माधवी : मी निळी बाहुली घेते.	Madhavi : I (will) take the blue doll.
दुकानदार : ही घ्या.	Shopkeeper : Here it is. (Take this)
सुनील : माधवी, इकडे कपाटात बघ.	Sunil : Madhavi, look here in the cupboard.
कपाटात विमानं आहेत.	There are aeroplanes in the cupboard.
एक निळं विमान आहे.	One aeroplane is blue.
एक गुलाबी विमान आहे.	One aeroplane is pink.
माधवी : हो, आणि हे बघा चेंडू.	Madhavi : Yes, and see these balls.
पिवळा चेंडू निळ्या चेंडूपेक्षा मोठा आहे.	The yellow ball is bigger than the blue ball.
सुनील : तिकडे मोटारी आहेत.	Sunil : On that side, there are cars.
केशरी मोटार काळ्या मोटारीपेक्षा मोठी आहे.	The saffron (coloured) car is bigger than the black car.
माधवी : आणि ही पिस्तुलं.	Madhavi : And here are pistols.
हिरवं पिस्तूल लाल पिस्तुलापेक्षा	The green pistol is bigger

मोठं आहे.	than the red pistol.
सुनील : इकडे लाकडी प्राणी आहेत.	Sunil : Here are wooden animals.
हा काळा हत्ती आहे.	This is a black elelphant.
हे दोन ससे पांढरे आहेत.	These two rabbits are white.
आणि हा चॉकलेटी कुत्रा आहे.	And this is chocolate coloured dog.
इकडे एक रंगीबेरंगी पोपट पण आहे.	Here is one colourful parrot also.
माधवी : सुनील, हत्ती छान आहे.	Madhavi : Sunil, elephant is good.
पण जड आहे.	But it is heavy.
ससे हलके आहेत.	The rabbits are light (in weight.)
मी एक ससा घेतो.	I (will) purchase one rabbit.
दुकानदार, सर्व खेळणी छान आहेत.	Shopkeeper, all the toys are good.

Drills

I

Repetition drill

1

हे दुकान मोठं आहे.	हे फुगे रंगीत आहेत.
तो फुगा निळा आहे.	एक फुगा गुलाबी आहे.
ही बाहुली निळी आहे.	ही बाहुली लाल आहे.
एक विमान निळं आहे.	एक विमान गुलाबी आहे.

हा चेंडू पिवळा आहे. हा चेंडू नवीन आहे.

पिवळा चेंडू निळ्या चेंडूपेक्षा मोठा आहे.

हे पिस्तुल हिरवं आहे. हे पिस्तुल लाल आहे.

लाल पिस्तुल हिरव्या पिस्तुलापेक्षा मोठं आहे.

हा हत्ती काळा आहे. हा ससा पांढरा आहे.

पांढरा ससा काळ्या हत्तीपेक्षा छान आहे.

2

हा खडू पांढरा आहे. हे खडू पांढरे आहेत.

ही साडी पांढरी आहे. ह्या साड्या पांढऱ्या आहेत.

हे फूल पांढरं आहे. ही फुलं पांढरी आहेत.

हा पंखा लाल आहे. हे पंखे लाल आहेत.

ही वही लाल आहे. ह्या वह्या लाल आहेत.

हे पुस्तक लाल आहे. ही पुस्तकं लाल आहेत.

3

हा कागद पांढरा आहे. हा कागद निळा आहे.

पांढरा कागद निळ्या कागदापेक्षा मोठा आहे.

निळा कागद पांढऱ्या कागदापेक्षा लहान आहे.

ही वही पांढरी आहे. ही वही निळी आहे.

पांढरी वही निळ्या वहीपेक्षा मोठी आहे.

निळी वही पांढऱ्या वहीपेक्षा लहान आहे.

हे पुस्तक पांढरं आहे. हे पुस्तक निळं आहे.

पांढरं पुस्तक निळ्या पुस्तकापेक्षा मोठं आहे.

निळं पुस्तक पांढऱ्या पुस्तकापेक्षा लहान आहे.

हे कागद पांढरे आहेत. हे कागद निळे आहेत.

पांढरे कागद निळ्या कागदांपेक्षा मोठे आहेत.

निळे कागद पांढऱ्या कागदांपेक्षा लहान आहेत.

ह्या वह्या पांढऱ्या आहेत. ह्या वह्या निळ्या आहेत.

पांढऱ्या वह्या निळ्या वह्यांपेक्षा मोठ्या आहेत.

निळ्या वह्या पांढऱ्या वह्यांपेक्षा लहान आहेत.

ही पुस्तकं पांढरी आहेत. ही पुस्तकं निळी आहेत.

पांढरी पुस्तकं निळ्या पुस्तकांपेक्षा मोठी आहेत.

निळी पुस्तकं पांढऱ्या पुस्तकांपेक्षा लहान आहेत.

II

Question-Answer Drill

1

हे काय आहे?	हे पुस्तक आहे.
हे पुस्तक कसं आहे?	हे पुस्तक निळं आहे.
हे काय आहे?	ही खुर्ची आहे.
ही खुर्ची कशी आहे?	ही खुर्ची निळी आहे.
निळं पुस्तकं कुठे आहे?	निळं पुस्तक हिरव्या खुर्चीवर आहे.

III

Substitution Drill

Substitute the underlined noun with the given nouns

(अधोरेखित नामाऐवजी दिलेली नामे वापरा.)

हा निळा कागद आहे	हा निळा कागद आहे
फूल	पेनं
वह्या	साडी
पेले	मणी
फाईल	पाणी

बटणं	रिक्षा
भिंती	दिवे
पंखे	दारं
पक्षी	घड्याळ

IV
Conversation Drill

शिक्षक : मुलांनो, टेबलाकडे बघा, टेबलावर किती वस्तू आहेत?

विद्यार्थी : टेबलावर पुष्कळ वस्तू आहेत.

शिक्षक : मोहन, तू सांग, टेबलावर काय काय आहे?

मोहन : टेबलावर खडू आहेत, पेन्सिली आहेत, पुस्तकं आहेत.

शिक्षक : बरोबर, आता हे खडू बघा, हा खडू पांढरा आहे. हा खडू निळा आहे.

हा खडू पिवळा आहे. हा खडू हिरवा आहे.
हा खडू गुलाबी आहे. आता ह्या पेन्सिली बघा.
ही पेन्सील पांढरी आहे. ही पेन्सील निळी आहे.
ही पेन्सील पिवळी आहे. ही पेन्सील हिरवी आहे.
ही पेन्सील गुलाबी आहे. आणि आता ही पुस्तकं पहा.
हे पुस्तक पांढरं आहे. हे पुस्तक निळं आहे.
हे पुस्तक पिवळं आहे. हे पुस्तक निळं आहे.
हे पुस्तक पिवळं आहे. हे पुस्तक हिरवं आहे.
हे पुस्तक गुलाबी आहे.

सुरेश : गुरूजी, टेबलावर दोन पेले, चार वह्या आणि तीन

फुलंपण आहेत.

शिक्षक : बरोबर, आता हे पेले, चार वह्या आणि तीन फुलं पहा.

हे पेले पिवळे आहेत. ह्या वह्या पिवळ्या आहेत. ही फुलं पिवळी आहेत.

सरिता, टेबलावर आणखी काही वस्तू आहेत का?

सरिता : हो, टेबलावर कागद, फायली आणि पेनं आहेत.

शिक्षक : बघा, हे कागद गुलाबी आहेत. ह्या फायली गुलाबी आहेत. ही पेनं गुलाबी आहेत. ह्या सर्व वस्तू रंगीबेरंगी आहेत.

विद्यार्थी : त्या सर्व वस्तू छान आहेत.

स्वाध्याय क्र.२२ **Exercises No.22**

IA. Fill in the gaps with appropriate forms of the adjective काळा **and rewrite the same sentence with the adjective** सुंदर.

(रिकाम्या जागी 'काळा' या विशेषणाची योग्य ती रूपे भरा आणि नंतर तीच वाक्ये 'सुंदर' हे विशेषण घालून लिहा.)

हा फळा .... आहे.	हे टेबल .... आहे.
ह्या पेन्सिली .... आहेत.	ही पुस्तकं .... आहेत.
हे शर्ट .... आहेत.	हे पेन .... आहे.
ह्या साड्या .... आहेत.	हे रस्ते .... आहेत.
ही पाकिटं .... आहेत.	हे फोन .... आहेत.

1B. Use the adjective from the given list in the proper blank places in the following sentences.

(पुढे दिलेल्या यादीतील विशेषणे वाक्यातल्या योग्य त्या रिकाम्या जागी भरा.)

List : निळी, लाल, हिरव्या, पांढरा, नाजूक, सुंदर गुलाबी, केशरी, पिवळ्या, पांढरा, छान.

.... झाडावर पक्षी आहेत.

टेबलावर .... फुलं आहेत. ही फुलं .... आहेत.

.... फुलापेक्षा .... फूल .... आहे.

मोहन, ... फूल पिशवीत ठेव.

सुनीता, ... फुलं डोक्यात घाल.

.... गुलाब .... गुलाबापेक्षा .... आहे.

2A. Substitute कागद with the given nouns making necessary changes in the adjective and the verb.

('कागद' ऐवजी दिलेली नामे वापरून, विशेषणे व क्रियापद यांत योग्य तो बदल करून पुढील वाक्ये लिहा.)

हा पिवळा कागद आहे. हा पिवळा कागद आहे.

पडदे	वह्यांमधे चित्रं
उशा	खुर्च्या
बांगड्या	लिंबू
दारं	साडी
फुलं	पंखा
पेल्यांखाली पेन	पिशवी
टेबलावर घंटा	रुमाल
घरासमोर मोटार	फायली

2B. Expand the following sentences with any suitable adjective in the proper form

(योग्य विशेषणांची योग्य रूपे घालून पुढील वाक्यात विस्तार करा.)

i) हा खडू आहे.

हा .... आणि .... खडू आहे.

ह्या .... आणि .... खडूजवळ पेन्सील आहे.

ह्या .... आणि .... खडूजवळ ..... पेन्सील आहे.

हा .... आणि .... खडू ...... पेन्सिलीपेक्षा .... आहे.

ii) नीला पुस्तक वाचते.

नीला .... पुस्तक वाचते.

नीला ...., ... पुस्तक वाचते.

नीलाजवळ पुष्कळ .... आणि .... पुस्तकं आहेत.

ती .... आणि .... पुस्तकं कपाटात आहेत.

त्या .... आणि .... पुस्तकांजवळ ..... वह्या आहेत.

त्या .... आणि .... पुस्तकांपेक्षा ..... वह्या .... आहेत.

ती .... आणि .... पुस्तकं सर्वात .... आहेत.

3. Write the proper form of the adjective given in the bracket.

(कंसात दिलेल्या विशेषणाचे योग्य रूप लिहा.)

मोहन (मोठा) शाळेत जातो.

हा पंखा (हिरवा) आहे.

शीला (मऊ) उशीवर बसते.

शिक्षक (निळा) पुस्तकांवर (काळा) पेन्सिली ठेवतात.

गुलाब साडी (केशरी) साडीपेक्षा चांगली आहे.

हा कागद (तो) कागदापेक्षा लहान आहे.

(पिवळा) फायली (पांढरी) टेबलावर आहेत.

(ते) (उंच) झाडांवर (गुलाबी) फुलं आहेत.

(मोठा) मुलीपेक्षा (लहान) मुलगी (सुंदर) आहे.

(हा) किल्ल्यांपेक्षा (तो) किल्ली (जड) आहे.

4. **Answer the following questions selecting the proper adjective from the bracket.**

(कंसात दिलेल्या विशेषणांपेकी योग्य ते विशेषण निवडून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.)

हा पेला कसा आहे ?	(निळे, हिरव्या, लाल)
हे चेंडू कसे आहेत ?	(पिवळी, हिरवं, मोठे)
हे पाकीट कसं आहे ?	(पांढरे, मोठे, काळं)
ह्या वह्या कशा आहेत ?	(पिवळी, निळी, गुलाबी)
ही काच कशी आहे ?	(जड, काळ्या, पांढरा)
हे पंखे कसे आहेत ?	(चॉकलेटी, पांढरा, हिरवी)
ही लिंबं कशी आहेत ?	(पांढरी, निळी, पिवळी)
हा पक्षी कसा आहे ?	(काळा, पांढऱ्या, हिरवी)
ही विमानं कशी आहेत ?	(केशरी, पिवळे, हिरव्या)
ही बाहुली कशी आहे ?	(सुंदर, मोठ्या, काळ्या)

5. **Read the following passage carefully and then write it in the plural.**

(पुढील उतारा नीट वाचा आणि नंतर तो अनेकवचनात लिहा.)

हे घर आहे. घरासमोर मोठं झाड आहे. मोठ्या झाडावर निळा पक्षी आहे. तो खूप सुंदर दिसतो आहे. त्या सुंदर आणि निळ्या पक्ष्यासमोर एक पिवळं पान आहे. पिवळं पान मऊ आहे. घरामागे शाळा आहे. शाळा लहान आहे. शाळेसमोर एक हातगाडी उभी आहे. हातगाडीवर पिवळं केळं आहे. हातगाडीजवळ एक उंच माणूस पिवळं केळं खातो आहे.

Vocabulory

काळा	(adj)	black	पोपट	(m)	parrot
कुत्रा	(m)	dog	बाहुली	(f)	doll
केशरी	(adj)	saffron coloured	रंगीत	(adj)	colourful
गुलाबी	(adj)	pink coloured	रंगीबेरंगी	(adj)	multi
चॉकलेटी	(adj)	chocolate	लाकडी	(adj)	wooden coloured
छान	(adj)	nice	विमान	(m)	aeroplane
निळा	(adj)	blue	ससा	(m)	rabbit
पांढरा	(adj)	white	साडी	(f)	saree
पिवळा	(adj)	yellow	हलका	(adj)	light (in weight)
पिस्तूल	(n)	pistol	हिरवा	(adj)	green

Grammatical Notes

Unit VIII Lesson 22 introduces the variable adjectives. A variable adjective changes its form according to the gender and number of the noun it qualifies.

The variable adjectives end in -आ before a masculin singular noun, e.g. पांढरा खडू (m) 'white chalkstik'.

Depending on the variation according to the gender and number of the noun qualified, we get six forms of the variable adjective, e.g.

चांगला 'good'

	sg.		pl.	
mas.	चांगला मुलगा	'good boy'	चांगले मुलगे	'good boys'
fem.	चांगली मुलगी	'good girl'	चांगल्या मुली	'good girls'
neu.	चांगलं मूल	'good child'	चांगली मुलं	'good children'

If the noun which comes after the adjective is in the oblique form, the variable adjective also is in the oblique form, which is common to all genders and numbers and is identical with the feminine plural form, e.g. चांगल्या.

Examples :

(SF)

१. **हा हिरवा खडू आहे.**

'This is a green chalkstik.'

(OF)

हिरव्या खडू जवळ पेन्सील आहे.

'There is a pencil near the green chalkstick.'

(SF)

२. **हे पांढरे कागद आहेत.**

'These are white papers'.

(OF)

पांढऱ्या कागदांवर पुस्तक आहे.

'There is a book on the white papers'

(SF)

३. ही पिवळी बांगडी आहे.

'This is a yellow bangle.'

(OF)

पिवळ्या बांगडी-शेजारी आंगठी आहे.

'There is a ring near yellow bangle.'

(SF)

४. ह्या निळ्या साड्या आहेत.

'These are blue sarees'.

(OF)

निळ्या साड्यांवर गुलाबी फुलं आहेत.

'There are pink flowers on the blue sarees'.

(SF)

५. हे काळं मांजर आहे.

'This is a black cat.'

(OF)

काळ्या मांजरासमोर दूध आहे.

'There is milk in front of the black cat'.

(SF)

६. ही जांभळी फुलं आहेत.

'These are violet flowers.'

(OF)

जांभळ्या फुलांवर फुलपाखरं आहेत.

'There are butterflies on the violet flowers'

The same rule applies to the demonstrative adjectives which are variable, e.g.

	Sg.	Pl.
m.	हा/तो	हे/ते
f.	ही/ती	ह्या/त्या
n.	हे/ते	ही/ती
OF :	ह्या/त्या.	

e.g. ह्या मुला-जवळ वह्या आहेत.

'There are notebooks with this boy.'

त्या झाडांवर फुलं आहेत.

'There are flowers on those trees.'

The interrogative adjective कसा meaning 'how, of what kind, type' is variable. The forms of कसा are as follows :

कसा

	Sg.	Pl.
m.	कसा	कसे
	(हा खडू कसा आहे?)	(हे खडू कसे आहेत?)
	'How is this chalkstick?'	'How are these chalksticks?'
f.	कशी	कशा
	(ही साडी कशी आहे?)	(ह्या साड्या कशा आहेत?)
	'How is this saree?'	'How are these sarees?'
n.	कसं	कशी
	(हे फूल कसं आहे?)	(ही फुलं कशी आहेत?)
	'How is this flower?'	'How are these flowers?'

In this Course we have so far used two enclitics : (i) inclusive and (ii) exclusive. सुद्धा which has the synonyms ही, पण and देखील belongs to the first category and means 'also': गाय गवत खाते. घोडासुद्धा गवत खातो. The cow eats grass. The horse also eats grass. The enclitic च belogs to the second category and means 'only': मोहन थंडीतच स्वेटर घालतो. 'Mohan puts on a sweater only in winter'

गट - ८

Unit-VIII

धडा तेविसावा

LESSON 23

फुगेवाला

The Balloon-seller

फुगेवाला : फुगे घ्या फुगे!	Balloon-seller : Balloons! Balloons for sale!
रंगीत रंगीत फुगे!	Colourful Balloons!
छान छान फुगे!	Beautiful balloons!
लहान मोठे फुगे!	Big & small balloons!
फुगे घ्या फुगे!	Balloons ! Balloons for sale!
चिंटू : अग बिंटू, चल चल!	Chintu: come on, Bintu come!
लौकर पळ !	Run Quickly!
तो बघ फुगेवाला! चल लौकर!	See the balloonwala over there, Come quickly!
बिंटू : फुगेवाले, फुगेवाले!	Bintu : Balloonwala, Oh balloonwala!
थांबा, थांबा जरा.	Wait, please wait.
फुगेवाला : चला, चला लौकर	B.S. : come, come quickly.
फुगे घ्या भरभर.	Buy balloons quickly.
छान छान फुगे.	Beautiful balloons.
रंगीत रंगीत फुगे.	Colourful balloons.
चिंटू : (फुगेवाल्याजवळ येतो)	Chintu : (Comes near balloonwala)
फुगेवाले, फुगेवाले.	Balloonwala,Oh Balloonwala!
लाल लाल फुगे आहेत का?	Are there red balloons with you?

फुगेवाला : हो, लाल आहेत, हिरवे आहेत.	B.S. : Yes red (Ones) are (there). Green are there.
निळे आहेत, गुलाबी आहेत,	(There) are blue (ones), there are pink.
हा एक लाल फुगा.	This is a red balloon.
हा दुसरा निळा फुगा.	This second one is a blue balloon.
हा तिसरा गुलाबी फुगा.	This third one is a pink balloon.
हा तिसरा फुगा दुसऱ्या फुग्यापेक्षा मोठा आहे.	This third (balloon) is bigger than the second balloon.
बिंटू : अरे चिंटू, हे दहा फुगे बघ.	Bintu : Hey chintu, look at these ten balloons.
ते एका रांगेत आहेत.	They are in one row.
तो चौथा फुगा बघ.	Look at that fourth balloon.
केशरी फुगा.	Saffron-coloured balloon.
मी तो फुगा घेते.	I buy that balloon.
फुगेवाला : हा घे केशरी फुगा.	B.S. : Take this saffron-coloured balloon.
बाळ, तू कोणता फुगा घेतोस?	Child, which balloon do you take?
चिंटू : मी तो सहावा फुगा घेतो.	Chintu : I take that sixth balloon.
चौथ्या फुग्यापेक्षा सहावा फुगा मोठा आहे.	The sixth balloon is bigger than the fourth balloon.

फुगेवाला : कितवा फुगा देऊ? सहावाच न?	B.S. : Which balloon Should I give? The sixth one?
ठीक ठीक. हा घे मोठा फुगा.	Alright, alright ! Take this big balloon.
बाळांनो, मी आता जातो.	Children, I go now.
फुगे घ्या फुगे!	Balloons, take balloons!
छान छान फुगे!	Beautiful balloons!
रंगीत रंगीत फुगे!	Colourful balloons!

Drills

I

Repetition Drills

पहिला फुगा लाल आहे. दुसरा फुगा निळा आहे.
तिसरा फुगा गुलाबी आहे. चौथा फुगा केशरी आहे.
तिसरा फुगा दुसऱ्या फुग्यापेक्षा मोठा आहे.
पाचवा फुगा पिवळा आहे. सहावा फुगा हिरवा आहे.
सहावा फुगा चौथ्या फुग्यापेक्षा मोठा आहे.
सातवा फुगा चॉकलेटी आहे. आठवा फुगा लाल आहे.
नववा फुगा काळा आहे. दहावा फुगा पांढरा आहे.

2

मोहन, पहिला दिवा लाव. सुशीला, दुसरा बंगला बघ.
अभय, तिसरा कागद घे. नीला, चौथा खण उघड.
मनीष, सातवा चेंडू फेक. गीता, आठवा डबा आण.
अमित, अकरावा फोटो बघ. उषा, बारावा कप धू.
विजय, सतरावा डबा उघड. अजय, अठरावा पेला उचल.

II

Substitution Drill

I

Form ordinal numbers from the cardinal numbers given in the bracket and substitute पहिलं with them.

(कंसातील संख्यावाचक विशेषणापासून क्रमवाचक विशेषण बनवा आणि ते अधोरेखित विशेषणाच्या जागी वापरा.)

मी पहिलं पुस्तक वाचतो.	मी पहिलं पुस्तक वाचतो.
(२)	(१५)
(४)	(१८)
(७)	(२०)
(८)	(२२)
(१०)	(२५)

2

Substitute घड्याळ with the given nouns.

('घड्याळ' ऐवजी दिलेली नामे वापरा.)

तो नववं घड्याळ पहातो.	तो नववं घड्याळ पहातो.
खुर्ची	वर्ग
हत्ती	मुलीकडे
रिक्षा	चित्र
विद्यार्थिनी	झाडाखाली
वासरू	घराकडे
फोटो .	विद्यार्थी

III

Transformation Drill

Transform the cordinal numbers in the sentences into

the singular cordinal numbers.

खालील वाक्ये संख्याविशेषणाऐवजी एकवचनी क्रमवाचक विशेषणे वापरून लिहा.

मी एक पुस्तक आणतो.	मी पहिलं पुस्तकं आणतो.
ती दोन लाडू खाते.	ती दुसरा लाडू खाते.
आम्ही तीन पत्र लिहितो.	आम्ही तिसरं पत्र लिहितो.
तू चार चित्रं पहातेस.	तू चौथं चित्र पहातेस.
आपण पाच धडे शिकतो.	आपण पाचवा धडा शिकतो.
ते सहा कविता म्हणतात.	ते सहावी कविता म्हणतात.
त्या सात घरं बघतात.	त्या सातवं घर बघतात.
तुम्ही आठ पतंग देता.	तुम्हा आठवा पतंग देता.
ती नऊ अंडी घेते.	ती नववं अंडं घेते.
आशा दहा फुलं तोडते.	आशा दहावं फूल तोडते.
तू अकरा पंखे लावतोस.	तू अकरावा पंखा लावतोस.
तो बारा कप धुतो.	तो बारावा कप धुतो.
मुलं तेरा पेरू खातात.	मुलं तेरावा पेरू खातात.
प्राध्यापक सप्रे चौदा धडे शिकवतात.	प्राध्यापक सप्रे चौदावा धडा शिकवतात.
सीताबाई पंधरा स्वेटर देतात.	सीताबाई पंधरावा स्वेटर देतात.
विमल सोळा खोल्या उघडते.	विमल सोळावी खोली उघडते.
नीला वीस फोटो बघते.	नीला विसावा फोटो बघते.

IV
Question-Answer Drill

हे काय आहे?	ह्या फायली आहेत.
ह्या किती फायली आहेत?	ह्या दहा फायली आहेत.

ह्या दहा फायली एका रांगेत आहेत का?	हो, ह्या दहा फायली एका रांगेत आहे.
दहावी फाईल कुठे आहे?	दहावी फाईल नवव्या फाईली जवळ आहे.
दहावी फाईल हिरवी आहे का?	नाही, दहावी फाईल हिरवी नाही.
कितवी फाईल हिरवी आहे?	चौथी फाईल हिरवी आहे.
चौथी फाईल कितव्या फायलीपेक्षा लहान आहे?	चौथी फाईल दुसऱ्या फायलीपेक्षा लहान आहे.

V

Conversation Drill

शिक्षक : मुलांनो, हे चित्र पहा. चित्रात झाडं आहेत. झाडं एका रांगेत आहेत. चित्रा तू सांग. रांगेत किती झाडं आहेत?

चित्रा : रांगेत दहा झाडं आहेत. एक, दोन, तीन, चार, पाच, सहा, सात, आठ, नऊ, दहा.

शिक्षक : आशा, ही झाडं कशी आहेत?

आशा : ही झाडं हिरवी आहेत.

शिक्षक : पहिल्या झाडावर काय आहे?

आशा : पहिल्या झाडावर पक्षी आहेत.

शिक्षक : निशा, पहिलं झाड दुसऱ्या झाडापेक्षा उंच आहे का?

निशा : हो, पहिलं झाड दुसऱ्या झाडापेक्षा उंच आहे.

शिक्षक : शशांक, तू कितव्या झाडाबद्दल सांगतो?

शशांक : मी तिसऱ्या झाडाबद्दल सांगतो. तिसरं झाड खूप मोठ आहे. तिसऱ्या झाडाखाली दोन माणसं उभी आहेत.

त्या झाडाखाली दोन मुलीपण उभ्या आहेत.
झाडाखाली एक गायपण उभी आहे.

शिक्षक : छान. अशोक तू पाचव्या झाडाबद्दल सांग.

अशोक : पाचवं झाड सर्वात उंच आहे. पाचव्या झाडावर फळं आहेत. त्या झाडावर एक मुलगा चढतो आहे. झाडाखाली एक मुलगा उभा आहे.

शिक्षक : आता दहावं झाड बघा. दहावं झाड कसं आहे?

विद्यार्थी : गुरूजी, मी सांगते. दहावं झाड सर्वात मोठं आहे. दहाव्या झाडावर पुष्कळ पक्षी आहेत, फळं आहेत. दहावं झाड फारच सुंदर आहे.

शिक्षक : छान छान, आता पुन्हा ही झाडं नीट पहा. आणि वहीत लिहा ... एक झाड ... पहिलं झाड....

स्वाध्याय २३ वा — Excercise No 23

1. **Form ordinal numbers from the cardinal numbers given in the brackets and use them in the following sentences.**

(कंसात दिलेल्या संख्यावाचक विशेषणापासून 'क्रमवाचक' विशेषणे तयार करा आणि ती वापरून पुढील वाक्ये लिहा.)

राम, (२) पुस्तक कुठे आहे?
(४) खुर्चीवर उशी आहे
ती (२०) मुलगी हुशार आहे.
(१५) मुलाजवळ मोठं पुस्तक आहे.
(३) धड्यापेक्षा (६) धडा लहान आहे.
(२१) झाडावर पक्षी आहेत.
(२४) आणि (२५) विद्यार्थ्यांजवळ वह्या नाहीत.

तुम्ही (१४) गाणं म्हणा.
तो (१) वर्गात शिकतो आहे.
आम्ही (१९) खोलीत रहातो.

2. Fill in the gaps with the proper form of any ordinal number.

(कोणत्याही क्रमवाचक विशेषणाचे योग्य रूप करून ते पुढील वाक्यांतील रिकाम्या जागी भरा.)

पहिला मुलगा .... मुलापेक्षा हुशार आहे.

वर्गात चार कपाटं आहेत. .... कपाट सर्वात उंच आहे.

.... आणि .... झाडावर खूप फळं आहेत.

.... फुलापेक्षा .... फूल सुंदर आहे.

हा .... फोटो पहा आणि तो .... फोटो पहा.

.... फोटो .... फोटोपेक्षा मोठा आहे.

.... पेल्यात पाणी आहे आणि .... पेल्यात दूध आहे.

.... आणि .... रिक्षा उभी आहे.

.... निळं विमान .... गुलाबी विमानापेक्षा छान आहे.

.... आणि .... बंगला सुंदर आहे.

3A. Substitute the verb घे with the given verbs. Make changes in the sentence if necessary.

('घे' ऐवजी दिलेली क्रियापदे वापरा. जरूर पडल्यास वाक्यात आवश्यक ते बदल करा.)

मी पंधरावा कागद घेते
(कागदावर) पत्र लिहिते.
खाली ठेवते.
(कागदावर) वही ठेवते.

वाचते

देते

आणते

3B. **Substitute the underlined words with the given words making necessary changes in the sentences.**

(वाक्यात योग्य ते बदल करून अधोरेखित शब्दांऐवजी दिलेले शब्द लिहा.)

ती पस्तिसावी खुर्ची **पुसते.**

आम्ही	बस -
ते (M.pl)	उचल -
नीता	उभी रहा
तुम्ही	पहा
आपण	उशी ठेव
तू	आण
तो	चप्पल ठेव

4A. **Transform the following sentences using the singular form of the ordinal number of the given cardinal num ber.**

(पुढील वाक्यांतील संख्याविशेषणापासून तयार केलेले क्रमवाचक विशेषण वापरून वाक्य बदलून लिहा.)

मी दोन फुलं घेते.   मी दुसरं फूल घेते.

आम्ही चाळीस धडे वाचतो.

कमलाताई पासष्ट वह्या तपासतात.

मी चार आंबे खातो.

तो एक फळा पुसतो.

श्रीयुत जोशी पाच दिवे लावतात.

त्या चौदा मुली घरी जातात.
डॉक्टर तीन बाटल्या उचलतात.
त्या पंधरा मुली सुंदर आहेत.
ते दहा शिक्षक उंच आहेत.
ही पंचवीस पुस्तकं जड आहेत.

4B. Change the following sentences into the singular using the ordinal number in place of the cardinal number.

(पुढील वाक्ये संख्यावाचक विशेषणाऐवजी क्रमवाचक विशेषण वापरून एकवचनात लिहा.)

Model - पंचवीस फुगे निळे आहेत. पंचविसावा फुगा निळा आहे.

१९ पिशव्या मोठ्या आहेत.
४२ धडे लहान आहेत.
५० बाहुल्या हिरव्या आहेत.
५४ माकडं झाडावर आहेत.
५८ दारं केशरी आहेत.
६२ मुली हुशार आहेत.
६९ झाडं उंच आहेत
७३ फायली टेबलावर आहेत.
७७ विद्यार्थी शाळेत आहेत.
८४ लिंबं पिवळी आहेत.

5. Give he missing ordinal numbers.

गाळलेले क्रमवाचक आकडे द्या.

....
....
....

....	बेचाळिसावा	....
दहावा	....	....
अकरावा	....	....
....	....	....
....	....	....
....	....	....
पंधरावा	....	....
सोळावा	पन्नासावा	....
सतरावा	एक्कावनावा	शहाण्णावावा
....	....	....
....	....	....
....	....	....
एकविसावा	पंचावनावा	शंभरावा

Vocabulary

कितवा	(int.)	of what rank	कोणता	(int.)	which
गोरा	(adj.)	fair	बुटका	(adj.)	short
भरभर	(adv.)	speedily quickly	रांग	(f.)	row
लावणे	(v.tr.)	to switch on	फेकणे	(v.tr.)	to throw

Grammatical Notes

Unit VIII, Lesson - 23 explains the numeral adjectives in Marathi. We have given numbers from 'one' to 'hundred' in the previous lessons. Theses were cardinal numbers. The formation of these cardinal numbers is quite irregular in Marathi. The numbers after 'hundred' upto nine hundred -

ninety - nine are formed by adding the suffix - शे after the number indicating hundred. Thus शंभर becomes एकशे before any number upto 'one hundred ninety - nine' and so on. Thus एकशे एक for 101, दोनशे तीन for 203 etc.

The ordinal umbers are formed irregulary upto 4:

एक	'one'	पहिला	'first'
दोन	'two'	दुसरा	'second'
तीन	'three'	तिसरा	'third'
चार	'four'	चौथा	'fourth'

All the ordinal numbers from 'fifth' onwards are formed regularly by adding the suffix - वा to the base number. The numeral adjective so obtained is variable.

From 'nineteenth' onwards the infix - आ is added between the cardinal umber and -वा Thus 'nineteen-nineteenth' एकोणीस-एकोणिसावा, etc.

Straight and oblique forms of the ordinal adjectives :

SF

	Sg.	Pl.
M.	पहिला विद्यार्थी 'first boy'	पहिले विद्यार्थी 'first students'
F.	पहिली साडी 'first saree'	पहिल्या साड्या 'first sarees'
N.	पहिलं पुस्तक 'first book'	पहिली पुस्तकं 'first books'

पहिल्या मुलाचा, मुलांचा, साडीचा, पुस्तकांचा, etc.

The ordinal adjective normally being one in the order is singular. It is honorific plural in the cases like

पहिले पंतप्रधान	First Primeminister
चौथ्या प्राचार्या	Forth Principal

Notes :

फुगेवाला : **ballon-seller.**

-वाला is a suffix which denotes profession, possession, distinguishing mark etc.

e.g. भाजीवाला : **Vegetable-seller.**

घरवाला : **House-owner.**

चष्मेवाला : **One who wears glasses etc.**

एका : **Form has oblique from एका if the following noun is in the oblique form.**

गट - ८	**Unit-VIII**
धडा चोविसावा	**LESSON 24**
माझं घर	**My house**
हे कोणाचं घर आहे?	Whose house is this ?
हे माझं घर आहे.	This is my house.
माझं घर खूप मोठं आहे.	My house is very big.
ही माझी खोली.	This is my room.
माझ्या खोलीत निळ्या रंगाचा गालिचा आहे.	There is blue carpet in my room.
निळ्या रंगाच्या खुर्च्या आहेत.	There are blue chairs.
आणि निळे पडदे आहेत.	And (there) are blue curtains.
भिंतींचा रंग निळा आहे.	The colour of walls is blue.
एका भिंतीवर दोन सुंदर चित्रं आहेत.	There are two beautiful pictures on the wall.
आणि हे माझ्या पुस्तकांचं कपाट.	And this is the cupboard of my books.
ह्या कपाटाचा रंग हिरवा आहे.	The colour of this cupboard is green.
कपाटात पुष्कळ पुस्तकं आहेत.	There are many books in the cupboard.
माझ्या घरापुढे छोटी बाग आहे.	There is a small garden in front of my house.
बागेत फुलझाडं आहेत.	There are flowering trees in the garden.

फुलझाडांमध्ये पांढरा मोगरा आहे.	There is a white mogra among the flowering trees.
केशरी कोरांटी आहे.	There is saffron-coloured koranti.
पिवळी शेवंती आहे.	(There) is a yellow shevanti.
आणि लाल गुलाब आहे.	And (There) is red rose.
राहुल माझा मित्र आहे.	Rahul is my friend.
त्याचें घर माझ्या घराशेजारीच आहे.	His house is close to my house.
त्याच्या घरापुढे आंब्याचं मोठं झाड आहे.	There is a big mango tree in front of his house.
आमचे मित्र त्या झाडावर चढतात.	Our friends climb that tree.
ते झाडाखाली खेळतात.	They play under the tree.
मी पण त्यांच्याबरोबर खेळतो.	I also play with them.
कधी ते म्हणतात, ''चल, तुझी पुस्तकं दाखव.''	Sometimes they say "come on, show your books."
माझ्या कपाटात गोष्टीची पुस्तकं आहेत.	There are story books in my cupboard.
मी माझी पुस्तकं दाखवतो.	I show my books.
माझी बहीण चित्रं काढते.	My sisters draws pictures.
माझे मित्र तिची चित्रं पहातात.	My friends see her pictures.
मित्र म्हणतात, ''तुझं घर खूप छान आहे.''	The friends say, " your house is very beautiful.
खरंच! माझं घर खूप छान आहे.	Really! My house is very beautiful.

Drills
I
Repetition Drills

हा माझा रुमाल आहे. हे माझे रुमाल आहेत.
ही माझी वही आहे. ह्या माझ्या वह्या आहेत.
हे माझं पुस्तक आहे. ही माझी पुस्तकं आहेत.

ह्या माझ्या पुस्तकांवर माझा रुमाल आणि माझी वही आहे.

हा तुझा कागद आहे. हे तुझे कागद आहेत.
ही तुझी फाईल आहे. ह्या तुझ्या फायली आहेत.
हे तुझं पेन आहे. ही तुझी पेनं आहेत.

ह्या तुझ्या फायलीत तुझे कागद आणि तुझं पेन आहे.

हा त्याचा हात आहे. हे त्याचे हात आहेत.
ही त्याची अंगठी आहे ह्या त्याच्या अंगठ्या आहेत.
हे त्याचं घड्याळ आहे. ही त्याची घड्याळं आहेत.

ह्या त्याच्या हाता खाली त्याची अंगठी आणि त्याचं घड्याळ आहे.

तो तिचा मुलगा आहे. ते तिचे मुलगे आहेत.
ती तिची मुलगी आहे. त्या तिच्या मुली आहेत.
ते तिचं कपाट आहे. ती तिची कपाटं आहेत.

तिच्या कपाटाजवळ तिचा मुलगा आणि तिची मुलगी आहे.

तो मांजराचा पाय आहे. ते मांजराचे पाय आहेत.
ती मांजराची शेपटी आहे.
ते मांजराचं पिल्लू आहे. ती मांजराची पिल्लं आहेत.

मांजराची पिल्लं मांजराच्या पायाजवळ आहेत.

हा आमचा वर्ग आहे. हे आमचे वर्ग आहेत.
ही आमची खुर्ची आहे. ह्या आमच्या खुर्च्या आहेत.

हे आमचं कपाट आहे.	ही आमची कपाटं आहेत.

ह्या आमच्या वर्गात आमच्या खुर्च्या आणि आमची कपाटं आहेत.

तो तुमचा बंगला आहे.	ते तुमचे बंगले आहेत.
ही तुमची बाग आहे.	त्या तुमच्या बागा आहेत.
ते तुमचं झाड आहे.	ती तुमची झाडं आहेत.

तुमच्या बंगल्यासमोर तुमची बाग आणि तुमची झाडं आहेत.

हा आपला मित्र आहे.	हे आपले मित्र आहेत.
ही आपली बहीण आहे.	ह्या आपल्या बहिणी आहेत.
हे आपलं घर आहे.	ही आपली घरं आहेत.

ह्या आपल्या घरात आपला मित्र आणि आपली बहीण आहे.

तो त्यांचा पंखा आहे.	ते त्यांचे पंखे आहेत.
ती त्यांची गाडी आहे.	त्या त्यांच्या गाड्या आहेत.
ते त्यांचं दुकान आहे.	ती त्यांची दुकानं आहेत.

त्यांच्या दुकानात त्यांचे पंखे आणि दुकानापुढे त्यांच्या गाड्या आहेत.

II

Question-Answer Drills

हे काय आहे?	हा रुमाल आहे.
हा रुमाल कोणाचा आहे?	हा रुमाल माझा आहे.
हे काय आहे?	हे पैसे आहेत.
हे पैसे कोणाचे आहेत?	हे पैसे माझे आहेत.
हे काय आहे?	ही वही आहे.
ही वही कोणाची आहे?	ही वही माझी आहे.
हे काय आहे?	ह्या वह्या आहेत.
ह्या वह्या कोणाच्या आहेत?	ह्या वह्या माझ्या आहेत.
हे काय आहे?	हे पुस्तक आहे.

हे पुस्तक कोणाचं आहे?	हे पुस्तक माझं आहे.
हे काय आहे?	ही पुस्तकं आहेत.
ही पुस्तकं कोणाची आहेत?	ही पुस्तकं माझी आहेत.
हा कोण आहे?	हा माधव आहे.
माधव कोणाचा मित्र आहे?	माधव नीलाचा मित्र आहे.
हे कोण आहेत?	हे श्री नाईक आहेत.
श्री. नाईक कोणाचे मित्र आहेत.	श्री. नाईक सुधाकरचे मित्र आहेत.
ही कोण आहे? .	ही वैशाली आहे.
वैशाली कोणाची बहीण आहे?	वैशाली शशांकची बहीण आहे.
ह्या कोण आहेत ?	ह्या कमलाताई आहेत.
कमलाताई कोणाच्या शिक्षिका आहेत ?	कमलाताई आपल्या शिक्षिका आहेत.

III

Fill in the gaps drill

Fill in the gaps with correct possessive form of the pronoun 'ती'

'ती' या सर्वनामाची योग्य स्वामित्वदर्शक रूपे रिकाम्या जागी भरा.

हा .... चष्मा आहे.	.... घराचा रंग निळा आहे.
ही .... फुलं आहेत.	.... घरासमोर बाग आहे.
ही .... साडी आहे.	ही .... मुलगी आहे का?
हे .... कागद आहेत.	.... मुलं शाळेत जातात.
हे .... पुस्तक आहे.	...... मुलगा ...... पेक्षा उंच आहे.
हे .... घर आहे.	....घराशेजारी ... मैत्रिणीचं घर आहे.

.... मैत्रिणी शिक्षिका आहेत.

.... मैत्रिणीच्या कपाटात खूप साड्या आहेत.

IV

Substitution Drills

Substitute आनंद with appropriate forms of the given pronouns.

(दिलेल्या सर्वनामांचे योग्यरूप 'आनंद' ऐवजी वापरा.)

ही आनंदची नवी सायकल आहे.

आम्ही

तू

मी

आपण

तो

ते

तुम्ही

त्या

II

Substitue शर्ट with the given nouns making necessary changes in the sentence.

(वाक्यात योग्य ते बदल करून शर्ट ऐवजी दिलेले शब्द वापरा.)

हा माझा चांगला शर्ट आहे.	हा माझा चांगला शर्ट आहे.
पेन	पुस्तक
खोली	पिशव्या
घड्याळ	फोटो.
कॅलेंडर	पाकीट
खुर्ची	पडदे.

V

Conversation Drill

शिक्षक	:	मुलांनो, हा वर्ग कोणाचा आहे?
विद्यार्थी	:	हा वर्ग आपला आहे.
शिक्षक	:	ह्या वह्या कोणाच्या आहेत?
विद्यार्थी	:	ह्या वह्या आमच्या आहेत.
शिक्षक	:	आणि ही पुस्तकं कोणाची आहेत?
विद्यार्थी	:	ही पुस्तकं आमची आहेत.
शिक्षक	:	प्रकाश, ते पेन तुझं आहे का?
प्रकाश	:	हो, हे पेन माझं आहे.
शिक्षक	:	आणि हा रुमाल कोणाचा आहे?
प्रकाश	:	तो रुमाल तुमचा आहे.
शिक्षक	:	प्रभाकर, तू काय करतो आहेस?
प्रभाकर	:	मी पुस्तक वाचतो आहे.
शिक्षक	:	ते पुस्तक तुझं आहे का?
प्रभाकर	:	नाही, ते पुस्तक माझं नाही. ते पुस्तक सुमनचं आहे.
शिक्षक	:	सुभाष, आपला वर्ग खूप मोठा आहे का?
सुभाष	:	हो, आपला वर्ग खूप मोठा आणि छान आहे.

स्वाध्याय २४ वा **Exercise No. 24**

1a) **Fill in the gaps with possessive forms of 'तू.'**
('तू' या सर्वनामापासून होणाऱ्या स्वामित्वदर्शक विशेषणाची रूपे रिकाम्या जागी भरा.)

.... पुस्तक टेबलावर आहे. हा .... पंखा आहे का?

.... वही कुठे आहे? .... पेल्यात पाणी आहे.

.... हातात रुमाल नाही. हे .... केळं आहे.

.... डोळे सुंदर आहेत. .... साड्या .... कपाटात ठेव.

.... चष्मा .... पर्समध्ये नाही. .... किती घरं आहेत?

1b) Fill in the gaps with the proper forms of the position 'चा'

('चा' या प्रत्ययाची योग्य रूपे योग्य त्या रिकाम्या जागी भरा.)

ही निरंजन ..... खोली आहे. निरंजन .... खोलीत दोन टेबलं आहेत. निरंजन..... खोली..... रंग गुलाबी आहे. खोलीत एक पुस्तकां... कपाट आहे. दोन निळ्या रंगा...... खुर्च्या आहेत. निरंजन...... खोली नलिनी....... खोलीपेक्षा मोठी आहे. निरंजन.... शर्ट अभय..... शर्टापेक्षा सुंदर आहे. निरंजन....... वह्या माधवी....... वह्यांपेक्षा जाड आहेत. निरंजन.... सायकल नवीन आहे. निरंजन......... बुटां..... रंग लाल आहे.

2. Write the proper forms of the possessive adjective of the pronouns given in the bracket.

(कंसातल्या सर्वनामापासून होणाऱ्या स्वामित्वदर्शक विशेषणाची योग्य ती रूपे लिहा.)

(मी) बांगडी सोन्याची आहे. (तो) शाळा खूप मोठी आहे.

(ते) पिल्लू फार सुंदर आहे. (आम्ही) घर नदीजवळ आहे.

(आपण) वर्ग लहान आहे. (तू) घराजवळ (आम्ही) घर आहे.

(ती) पिशवीत (तो) चष्मा आहे. (आम्ही) शाळेबाहेर (ते) सायकली आहेत.

(तुम्ही) हातात (मी) घड्याळ आहे.

(मी) टेबलावर (तू) पेन आहे. (त्या) रंग गोरा आहे.

3. **Rewrite the following sentences using the word रंग**

(खालील वाक्ये 'रंग' शब्दाचा उपयोग करून लिहा.)

Model - हा कागद गुलाबी आहे. ह्या कागदाचा रंग गुलाबी आहे.

तुमची वही लाल आहे.

त्यांचं पाकीट चॉकलेटी आहे.

आपल्या खुर्च्या हिरव्या आहेत.

माझी साडी पांढरी आहे.

तिचा मुलगा गोरा आहे.

तुझं पेन पिवळं आहे.

त्यांच्या मुली काळ्या आहेत.

आमची पुस्तकं गुलाबी आहेत.

त्यांचे शर्ट पांढरे आहेत.

आपले फुगे निळे आहेत.

4A **Substitue the underlined word with the appropriate forms of the given words.**

(अधोरेखित शब्दाऐवजी दिलेल्या शब्दांची योग्य रूपे वापरा.)

माझ्या साडीचा रंग गुलाबी आहे.	माझ्या साडीचा रंग गुलाबी आहे.
ती	तुम्ही
तू	प्राची
आपण	सुधा
आम्ही	केशरताई
त्या	मालतीबाई

4B. **Substitute the underlined word with the given words**

and rewrite the sentence after making necessary changes.

(अधोरेखित शब्दाऐवजी दिलेले शब्द घाला आणि मूळ वाक्यात आवश्यक ते बदल करून वाक्य पुन्हा लिहा.)

हा आमचा पिवळा, सुंदर बंगला आहे.	हा आमचा पिवळा, सुंदर बंगला आहे.
मोटार	मणी
गालिचा	लिंबू
खुर्च्या	रिक्षा
पडदे	साडी
घरासमोर	बाग
कपडे	घड्याळ
दुकान	डबे
बांगड्या	पेन्सिली

5 **Add the following postposition to the proper OF of the given nouns and complete the sentences in your words.**

(दिलेल्या नामांच्या सामान्यरूपांना नंतर येणारी शब्दयोगी अव्यये जोडून, पुढील वाक्ये तुमच्या शब्दात पूर्ण करा.)

Model - माझं, हिरवं पुस्तक + खाली

A - माझ्या हिरव्या पुस्तकाखाली फायली आहेत.

तिची, निळी, पिशवी + त

आपला, मोठा, वर्ग + समोर

त्याचे, घराचे, पडदे + चा

आमच्या, सुंदर, साड्या + वर

तुझी, लहान, मुलं + जवळ

त्याचे, चार, कपाट + त

ती, माझी, मोठी, बहीण + ची खोली

मोहन, घर + समोर, तो मित्र + चं घर

हे, माकड + ची, पाच, पिल्लू + शेजारी

सुमन + चं, पांढरं, मांजर + समोर

6. **Match the pairs.** (जोड्या जुळवा)

A	B
माझ्या पुस्तकात	दोन खुर्च्या आहेत.
आपल्या वर्गात	निळं कापड आहे.
आमच्या शेतात	पंचवीस धडे आहेत.
त्यांच्या मुली	दोन गुलाबी साड्या आहेत.
तिच्या ऑफिसात	दोन बंगले आहेत.
तुझ्या गळ्यात	हुशार मुलं आहेत.
त्याच्या मुलाजवळ	पेरूचं झाड आहे.
तुमच्या शाळेसमोर	चार वह्या आहेत.
मंदारच्या दुकानात	सुंदर आहेत
मीनाच्या मुलीच्या	सोन्याची माळ आहे.

Vocabulary

कोणाचा	(int)	whose	पाकीट	(n)	purse
कोरांटी	(f)	Koranti	फुलझाड	(n)	flowering tree
गालिचा	(m)	carpet	बहीण	(f)	sister

गुलाब	(m)	rose	माझा	(adj)	my
जाड	(adj)	thick	मित्र	(m)	frien
	(adj)	her	मैत्रीण	(f)	friend
	(adj)	your	मोगरा	(m)	mogra (a fragrant flower)
रंग	(m)	colour	शेवंती	(f)	shevanti (kind of flower)

Grammatical Notes

Unit-VIII, Lesson 24 introduces pronominal possessive adjectives in Marathi. These adjectives are formed from the oblique forms of the pronouns and are variable. They vary according to the number and gender of the thing possessed. The following table will show the formation of the possessive adjectives. Only masculine forms are given in the table. The remaing forms are formed on the pattern of the varibale adjectives.

तक्ता क्रमांक १८ **Table No. 18**

Person	Pronoun	Obliques form of the Pronoun	Posses sive suffix	posses sive pronom inal adjective	(Noun)
Singular					
I	मी	मा	+झा	माझा	(रुमाल)
II	तू	तु	+झा	तुझा	(भाऊ)
III	तो	त्या	+चा	त्याचा	(चष्मा)
	ती	ति	+चा	तिचा	(फोटो)
	ते	त्या	+चा	त्याचा	(पाय)

Plural

I	आम्ही	आम	+चा	आमचा	(बंगला)
II	तुम्ही	तुम	+चा	तुमचा	(रेडिओ)
I+II	आपण	आप	+ला	आपला	(फोन)
III	ते	त्यां	+चा	त्यांचा	(वर्ग)
	त्या	त्यां	+चा	त्यांचा	(वर्ग)
	ती	त्यां	+चा	त्यांचा	(वर्ग)

Thus we have three possessive suffixes viz. झा for 1st and 2nd person singular pronouns, -ला for the inclusive pronoun आपण and चा for the remaining and this gives 54 possessive pronominal adjectival forms in Marathi. The possessive suffiex -चा is added to the oblique form of the nouns and proper nouns also, e.g. हाता+चा 'of the hand', रमेश+चा 'of Ramesh'

The interrogarive word कोण 'who, also takes suffix चा कोणाचा 'whose'.

The oblique form of these adjectives is regular, i.e.. it takes या in the place of the final vowel आ, ई etc. e.g.

SF माझं घर 'my house'.

OF माझ्या घरात 'in my house'.

If there are more than one adjectives before a noun in the oblique form, they all assume the oblique form e.g.

SF

माझं,	चांगलं	मोठं	नवं(घर),
'my,	nice,	big,	new(house)'

OF

माझ्या	चांगल्या	मोठ्या	नव्या (घरात).
'(in)my,	nice,	big,	new(house)'

गट -८

Unit-VIII

धडा पंचविसावा

LESSON 25

(उजळणी पाठ ५)

(Review Lesson 5)

अनिरुद्धची आई

Aniruddha's mother

अनिरूद्ध : आई, ए आई, मी खाली जातो आणि नीताबरोबर खेळतो.

Aniruddha : Mother, oh mother! I (am) going down and play (ing) with Neeta.

आई : बरं, नीट खेळा. भांडू नका.

Mother : Alright, play properly. Don't quarrel.

पायात चप्पल घाल आणि जा.

put on (your) chappals and go.

अनि : अग, पण आई माझा लाल चेंडू कुठे आहे?

Ani : But, mother, Where is my red ball?

आई : तुझ्या खेळण्याच्या कपाटात बघ.

Mother : Look into your toy cupboard.

अनि : कोणत्या खणात?

Ani : In which drawer? (compartment?)

आई : पहिल्याच खणात.

Mother : In the very first (drawer)

अनि : आणि माझी पिवळी बॅट?

Ani : And my yellow bat?

आई : अरे, तीपण तुझ्या कपाटात आहे.

Mother : That also is in your cupboard.

अनि. पणं आई, माझ्या नव्या चपलाही इथे नाहीत.

Ani : But mother, my new chappals are not here.

आई : त्या पांढऱ्या शेल्फमधे दुसऱ्या खणात आहेत.	Mother : They are there in the second drawer of the white shelf.
अनि : आई, मी आज माझ्या नव्या चपला घालू का?	Ani : mother, may I put on today my new chappals?
आई : घाल, पण हरवू नकोस.	Mother : Do. but don't lose (them)
अनि : नाही, नाही. आई, आता माझी एक गंमत ऐक.	Ani : Oh no! Mother, now listen to a joke of mine.
आई : कोणती गंमत?	Mother : Which joke ?
अनि : हे बघ, माझा लाल चेंडू, सर्वात सुंदर. माझी पिवळी पिवळी बॅट. सर्वात सुंदर. आणि माझ्या नव्या चपला.	Ani : Look here. My red ball, most beautiful of all ! My yellow yellow bat. Most beautiful of all! And my new chappals.
आई : सर्वात सुंदर!	Mother : Most beautiful of all!
अनि : अगदी बरोबर! आई, तू किती चांगली आहेस. जाऊ मी?	Ani : Prefectly correct! Mother How sweet you are! May I go?
आई : जा आता. खाली खेळ जा.	Mother : Go now. play downstairs.

चाचणी क्र. ५ Test 5

Q.1 Select the proper postposition given below and rewrite the sentences with them, using the proper forms of the

adjectives and nouns.

(पुढे दिलेल्या प्रत्ययांपैकी योग्य तो प्रत्यय योग्य त्या वाक्यासाठी निवडा आणि वाक्यातल्या विशेषणांची आणि नामांची योग्य रूपे तयार करून त्या प्रत्ययांसह पुन्हा ती वाक्ये लिहा.)

प्रत्यय : वर, खाली, मधे, समोर, जवळ, पेक्षा, त, बरोबर, शेजारीं, कडे.

१. मोठा, रुंद, टेबल + चपला आहेत.
२. तो, निळा, नवीन, इमारत + गाडी उभी आहे.
३. ती, काळी, जाड, फाईल + हिरव्या फायली मोठ्या आहेत.
४. तो, चौकोनी, लाल, सुंदर, रेडिओ + फुलं आहेत.
५. पिवळा, पंखे + खूप धूळ आहे.
६. तो, पांढरा, पाकीट + नवी नाणी आहेत.
७. पिवळा, सुंदर, फुगा + केशरी, मोठा फुगा आहे.
८. गोरा, सुभाष + गुलाबी, जाड पुस्तकं आहेत.
९. मोहन छोटा, नीता + खेळतो.
१०. मीना तो, निळा, रंगाचा चित्र + बघते.

Q.2 Transform the following sentences using the ordinal numbers in place of cardinal numbers making necessary changes in the sentences.

(पुढील वाक्यातील संख्यावाचक विशेषणाऐवजी क्रमवाचक विशेषणाची रूपे वाक्यात योग्य ते बदल करून वापरा.)

१. मी एक नंबरच्या खुर्चीवर बसते.
२. तो वीस पुस्तकं वाचतो.
३. पाच रुमालांचा रंग हिरवा आहे.
४. चार खोल्यांमधे पंखे आहेत.

५. दोन खिडक्या मोठ्या आहेत.

६. दहा खुर्च्यांवर उशा आहेत.

७. पंचवीस मुलं अभ्यास करताहेत.

८. तिची तीन मुलं हुशार आहेत.

९. सहा टेबलांवर फोन आहेत.

१०. पस्तीस फायली आण.

Q.3 Fill in the gaps with the proper form of the possessive adjective obtained from the underlined pronouns.

(अधोरेखित सर्वनामांपासून तयार होणाऱ्या स्वामित्वदर्शक विशेषणांची योग्य ती रूपे रिकाम्या जागी भरा.)

१. तो मित्रापेक्षा उंच आहे.

२. मी बहिणीच्या घरी जाते.

३. त्या खुर्चीवर बसू नकोस. रंग ओला आहे.

४. तुम्ही पुस्तकं शाळेत नेता आणि वाचता.

५. आपण वर्गात अभ्यास करतो.

६. ते वर्गात नाहीत. ते घरी आहेत.

७. त्या ऑफिसात काम करतात.

८. तू आणि मित्र बागेत जा.

९. आम्ही गाडी विकतो.

१०. ती बहिणीपेक्षा सुंदर आहे.

Q.4 Frame sentences using the proper forms of the given basic words.

(दिलेल्या शब्दांची योग्य ती रूपे बनवून आणि ती वापरून पूर्ण वाक्ये तयार करा.)

१. हे, तू, सुंदर, हिरवा, पेन+वर, रुमाल, आहे.

२. आम्ही, निळा, मोटार + चा, चार, दार बंद आहे.

३. जोशीसाहेब, दोन, मुलगा + जवळ, जुना, सायकल आहे.

४. मी, मोठा, घर + समोर, खेळणी, दुकान आहे.

५. काळा, उंच, टेबल + वर लाल, फोन आहे.

Q.5 Frame questions to obtain the following answers C

(पुढील उत्तरे मिळवण्यासाठी प्रश्न द्या.)

१. लिंबं गोल आहेत

२. हे पेरू गोड आहेत.

३. त्यांची मुलं गोरी आहेत.

४. हे वर्तुळ गोल आहे.

५. त्यांच्या छत्र्या काळ्या आहेत.

६. तिचा मित्र उंच आहे.

७. आमचा वर्ग सुंदर आहे.

८. ते अंड ताजं आहे.

९. त्याचं पाकीट नवीन आहे.

१०. तिच्या बांगड्या हिरव्या आहेत.

Q.6 Write a small conversation between the balloonseller and young children.

(फुगेवाला आणि लहान मुलं यांच्यातील संवाद थोडक्यात लिहा.)

Q.7. Write a small paragraph on 'My House'

('माझं घर' या विषयावर एक लहान परिच्छेद लिहा.)

Q.8 Give the missing ordinal numbers.

(गाळलेल्या क्रमवाचक संख्या भरा)

पस्तिसावा	अठ्ठेचाळिसावा	एकसष्टावा
....	....	बासष्टावा

....	....	....
....	....	....
....	....	....
....	त्रेपनावा	....
....	चोपनावा	....
....	पंचावनावा	....
....	....	....
....	....	....
....	....	....
शेहेचाळिसावा	....	....
सत्तेचाळिसावा	साठावा	ब्याहात्तरावा

Q.9 Match the pairs (जोड्या जुळवा)

१. माझ्या छोट्या घराचा रंग	छोटी मुलं विकत घेतात.
२. त्याच्या शर्टाची बटणं	माझी पांढरी साडी आहे.
३. आपण पहिल्या खुर्चीवर	चार हिरवे पंखे आहेत.
४. मंदाची पिवळी सायकल	चांगल्या मऊ उशा ठेवतो.
५. रंगीत रंगीत फुगे	त्या पिवळ्या डबीत आहेत.
६. सुहास मित्राच्या वहीत	चार गोल स्टुलं आहेत.
७. आईच्या लाल साडीखाली	तिच्या मैत्रिणी घेतात.
८. आमच्या ऑफिसात	रंगीबेरंगी चित्र काढतो.
९. तिच्या उंच बहिणीचे	गुलाबी आणि निळा आहे.
१०. ह्या लठ्ठ माणसाजवळ	केस खूप लांब आहेत.

गट - ८

Unit - VIII

धडा सव्विसावा

LESSON 26

पोपट हिरवा असतो

The parrot is green

शिक्षक : मुलांनो, पोपट हिरवा असतो.	Teacher : Children, the parrot is green.
पोपटाची चोच लाल असते.	The beak of the parrot is red.
पोपटाचे पंख हिरवे असतात.	The wings of the parrot are green.
पोपट झाडावर असतो.	The parrot is (stays) on the tree.
पोपट पेरू खातो.	The parrot eats peru.
डाळिंबाचे दाणे खातो.	(it) eats pomegranate seeds.
डाळिंबाचे दाणे लाल असतात.	The pomegranate seeds are red.
हा पहा प्रदीपचा पोपट.	Look at this parrot of Pradeep
त्याचं नाव राघू आहे.	Its name is Raghu.
राघू नेहमी पिंजऱ्यात राहातो.	Raghu is always in the cage.
राघू पेरू खातो. हिरवी मिरची पण खातो.	Raghu eats peru. (It) eats green chilli also.
मिरची तिखट असते.	The chillis is hot.
राघूचा रंग हिरवा आहे.	The colour of Raghu is green
त्याची चोच लाल आहे.	Its beak is red.
तो आमचं स्वागत करतो,	It welcomes us (with the
''मिठू मिठू, नमस्ते!''	words) "mithu mithu,

	namaste"
महेश, तू सांग, पोपट कसा	Mahesh, you tell (me), How is the parrot?
असतो?	
महेश : पोपट हिरवा असतो.	Mahesh : The parrot is green.
शिक्षक : राघूचा रंग कसा आहे?	Teacher : How is the colour of Raghu ?
महेश : राघूचा रंग हिरवा आहे.	Mahesh : The colour of Raghu is green.
शिक्षक : वसुधा, मिरची कशी असते?	Teacher : Vasudha, how is green chilli?
वसुधा : मिरची तिखट असते.	Vasudha : The cilli is hot.
शिक्षक : बरोबर, मिरची तिखट	Teacher : (That is correct).
असते आणि लिंबू आंबट असतं	The chilli is hot and lemon is
चिंच आंबट असते.	sour. A tamarind is sour.
कैऱ्या आंबट असतात.	The raw mangoes are sour.
आवळापण आंबट असतो.	An awala is also sour.
मिलिंद, ऊस आंबट असतो का?	Milind, is the sugarcane sour?
मिलिंद : नाही, ऊस गोड असतो.	Milind : No the sugarcane is not sour.
शिक्षक : ऊस गोड असतो.	Teacher : The sugarcane is sweet.
गुळाची चव पण गोड असते.	The taste of jaggery is also sweet.
साखर गोड असते.	Sugar is sweet.

पण कार्ल कडू असतं.	But the karela is bitter.
आशा : गुरूजी, मीठ कसं असतं?	Asha : Sir, how is salt?
शिक्षक : मीठ खारट असतं.	Teacher : Salt is salty. Now
आता इकडे पहा. हे वर्तुळ आहे.	look here. This is a circle.
ह्या वर्तुळाचा आकार गोल आहे.	The shape of this circle is round.
मुलांनो, वर्तुळ कसं असतं?	Students, how is the circle?
विद्यार्थी : वर्तुळ गोल असतं.	Students : The circle is round.
हे वर्तुळ गोल आहे.	This circle is round.
शिक्षक : बरोबर, आता नीट ऐका.	Teacher : (That's)correct. Now listen carefully.
पोपट हिरवा असतो.	The parrot is green.
कावळा काळा असतो.	The crow is black
बगळा पांढरा असतो.	The crane is white.
कोकिळा काळी असते.	The cuckoo is black.
कावळ्याचा आणि कोकिळेचा रंग [illegible]	The colour of the crow and the cuckoo is black.
लिंबू आंबट असतं.	The lemon is sour.
चिंच आंबट असते.	The tamarind is sour.
लिंबाची आणि चिंचेची चव आंबट असते.	The taste of a lemon and a tamarind is sour.
वर्तुळ गोल असतं.	The circle is round.
वर्तुळाचा आकार गोल असतो.	The shape of a circle is round.
चौकानाचा आकार चौकोनी	The shape of a rectangle is

असतो.	rectangular.
लीला, ही कैरी घे.	Leela, take this raw mango.
कैरीची चव बघ.	Taste it.
कैरी कशी आहे?	How is the raw mango?
लीला : कैरी आंबटढाण आहे.	Leela : This raw mango is very sour.

Drills

I

Repetition Drills

साखर गोड असते.	गूळ गोड असतो.
उसाचा रस गोड असतो.	आवळा आंबट असतो.
कैरी आंबट असते.	चिंच आंबट असते.
लिंबू आंबट असतं.	लिंबाचा आकार गोल असतो.
मिरची तिखट असते.	मिरचीची चव तिखट असते.
मीठ खारट असतं.	मिठाचा रंग पांढरा असतो.
कारलं कडू असतं.	कारल्याची चव कडूजहर असते
गवत हिरवं असतं.	गवताचा रंग हिरवा असतो.
पोपट हिरवा असतो.	पोपटाची चोच लाल असते.
कावळा काळा असतो.	कावळ्याची चोच काळी असते.
वर्तुळ गोल असतं.	चौकोन चौकोनी असतो.

II

Response Drills

कोकिळा कशी असते?	कोकिळा काळी असते.
ही कोकिळा कशी आहे?	ही कोकिळा काळी आहे.

ह्या कोकिळेची चोच कशी आहे?	ह्या कोकिळेची चोच काळी आहे.
बगळा कसा असतो?	बगळा पांढरा असतो.
हा बगळा पांढरा आहे का?	हो, हा बगळा पांढरा आहे.
बगळ्याची चोच कशी असते?	बगळ्याची चोच काळी असते.
ह्या बगळ्याची चोच कशी आहे?	ह्या बगळ्याची चोच काळी आहे.
वर्तुळ कसं असतं?	वर्तुळ गोल असतं.
हे वर्तुळ गोल आहे का?	हो, हे वर्तुळ गोल आहे.
लिंबाचा रंग कसा असतो?	लिंबाचा रंग पिवळा असतो.
लिंबाची चव कशी असते?	लिंबाची चव आंबट असते.
लिंबाचा आकार कसा असतो?	लिंबाचा आकार गोल असतो.

III
Question-Answer Drill

हे काय आहे?	हा आवळा आहे.
आवळा कसा असतो?	आवळा आंबट असतो.
हा आवळा आंबट आहे का?	हो, हा आवळा आंबट आहे.
आवळ्याचा आकार कसा असतो?	आवळ्याचा आकार गोल असतो.
हा आवळा गोल आहे का?	हो, हा आवळा गोल आहे.
हे काय आहे?	ही चिंच आहे.
चिंच कशी असते?	चिंच आंबट असते.
ही चिंच आंबट आहे का?	हो, ही चिंच आंबट आहे.
चिंचेचा आकार कसा असतो?	चिंचेचा आकार लांब असतो.

ही चिंच लांब आहे का?	हो, ही चिंच लांब आहे.
हे काय आहे?	हे लिंबू आहे.
लिंबू कसं असतं?	लिंबू आंबट असतं.
हे लिंबू आंबट आहे का?	हो, हे लिंबू आंबट आहे.
लिंबाचा आकार कसा असतो?	लिंबाचा आकार गोल असतो.
हे लिंबू गोल आहे का?	हो, हे लिंबू गोल आहे.
लिंबाचा रंग कसा असतो?	लिंबाचा रंग पिवळा असतो.
हे लिंबू पिवळं आहे का?	हो, हे लिंबू पिवळं आहे.

IV

Singular-Plural Drill

Turn the following sentences into the plural.

(खालील वाक्ये अनेकवचनात लिहा.)

1

पोपट हिरवा असतो.	पोपट हिरवे असतात.
हा पोपट हिरवा आहे.	हे पोपट हिरवे आहेत.
कोकिळा काळी असते.	कोकिळा काळ्या असतात.
ही कोकिळा काळी आहे.	ह्या कोकिळा काळ्या आहेत.
लिंबू आंबट असतं.	लिंबं आंबट असतात.
हे लिंबू आंबट आहे.	ही लिंबं आंबट आहेत.

2

Turn into the singular the following sentences.

(पुढील वाक्ये एकवचनात लिहा.)

कार्ली कडू असतात.	कार्लं कडू असतं.
ही कार्ली कडू आहेत.	हे कार्लं कडू आहे.

मिरच्या तिखट असतात.	मिरची तिखट असते.
ह्या मिरच्या तिखट आहेत.	ही मिरची तिखट आहे.
ऊस गोड असतात.	ऊस गोड असतो.
हे ऊस गोड आहेत.	हा ऊस गोड आहे.

V
Affirmative - Negative Drills
1

Transform the following sentences into the negative with the help of some other adjectives.

(दुसरे एखादे विशेषण वापरून पुढील वाक्ये नकारार्थी करा.)

उसाचा रस गोड असतो.	उसाचा रस आंबट नसतो.
मिरची तिखट असते.	मिरची कडू नसते.
लिंबू आंबट असतं.	लिंबू खारट नसतं.
लाडू गोड असतात.	लाडू तिखट नसतात
चिंचा आंबट असतात.	चिंचा गोड नसतात.
केळी गोड असतात.	केळी खारट नसतात.

VI
Fill in the gaps Drill

Fill in the gaps with the forms of verb आहे or अस as may be necessary.

(जरूर असेल त्याप्रमाणे रिकाम्या जागी 'आहे' किंवा 'अस' याची रूपे भरा.)

मीठ खारट	मिरची तिखट ....
ही बांगडी गोल	हा पेरू गोड ....
हे पोपट हिरवे	आवळा आंबट ....
कावळे काळे	हे डाळिंब गोड ....

हा कावळा काळा .... हे पाणी लाल ....
ह्या इमारती उंच .... चिंचा आंबट ....
ही घरं नवीन .... ही बाई ठेंगू ....

VII

Conversation Drill

शिक्षक : मोहिनी, हे काय आहे?
मोहिनी : हे बागेचं चित्र आहे.
शिक्षक : बरोबर, बागेत काय आहे?
मोहिनी : बागेत खूप फुलझाडं आहेत.
शिक्षक : राजेंद्र, बागेत कोणती फुलझाडं आहेत?
राजेंद्र : बागेत शेवंतीची,मोगऱ्याची, गुलाबाची झाडं आहेत?
शिक्षक : स्वाती, शेवंतीचा रंग कसा असतो?
स्वाती : शेवंतीचा रंग पिवळा आणि पांढरा आसतो.
शिक्षक : ह्या चित्रात पिवळी शेवंती आहे का?
स्वाती : हो. चित्रात पिवळी शेवंती आहे; पण पांढरी शेवंती नाही.
शिक्षक : माधुरी, मोगऱ्याचा रंग पिवळा असतो का?
माधुरी : नाही, मोगऱ्याचा रंग पिवळा नसतो. मोगऱ्याचा रंग पांढरा असतो.
शिक्षक : बरोबर, मोगऱ्याचा रंग पांढरा असतो. गुलाब लाल, पिवळा, गुलाबी असतो. शेवंती पांढरी आणि पिवळी असते.

स्वाध्याय क्र. २६ Excercise No 26

1A Fill in the blanks with proper adjectives.

(रिकाम्या जागा योग्य त्या विशेषणांनी भरा.)

वर्तुळ .... असतं.	मीठ .... असतं
आवळा .... असतो.	साखर .... असते.
कैरी .... असते.	कोकिळेचा रंग .... असतो.
कार्लं .... असतं.	चौकोन .... असतो.
पोपट .... नसतो.	पोपट .... असतो.
मिरची .... असते.	गवत .... असतं.

1B Fill up the gaps with the proper forms of the verb आहे **or** अस.

(आहे आणि अस ची योग्य ती रूपे रिकाम्या जागी भरा.)

ही मिरची लाल	लिंबू आंबट ....
मोहनचा पोपट हिरवा	लिंबाचा रस आंबट ....
उसाचा रस गोड	सरोजची अंगठी गोल ....
हा चहा कडू	माझा रुमाल पांढरा ....
चिंचेची चव आंबट	बगळे पांढरे ....

2. Answer the following questions

(खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.)

कावळ्याचा रंग कसा असतो?

कावळ्याची चोच लाल असते का?

पोपटाची चोच लाल असते का?

गूळ कसा असतो?

कोकिळा कशी असते?

मोगऱ्याचा रंग कसा असतो?

मीठ कसं असतं? मिठाचा रंग कसा असतो?

कार्लं कसं असतं? कार्ल्याचा रंग कसा असतो?

प्रदीपचा पोपट काय खातो? प्रदीपचा पोपट कसा आहे?

साखरेचा रंग कसा असतो? साखरेची चव कशी असते?

3. **Turn the following sentences into the negative.**

(पुढील वाक्ये नकारार्थी करा.)

पोपट निळा असतो.	कार्लं गोड असतं.
साखर कडू असते.	कोकिळा पिवळ्या असतात.
सगळे खडू हिरवे आहेत.	झाडं पांढरी असतात.
दुधाचा रंग काळा असतो.	मिरची खारट असते.
मीठ तिखट असतं.	सर्व इमारती गोल आहेत.

4. **Select the correct adjective from the bracket and complete the following sentences.**

(कंसात दिलेल्या विशेषणांपैकी योग्य ते विशेषण निवडून पुढील वाक्ये पुरी करा.)

लिंबाचा रस (गोड, आंबट, खारट) असतो.

मिरची (तिखट, कडू, गोल) असते.

साखर (पिवळी, हिरवी, पांढरी) असते.

डाळिंबाचे दाणे (निळे, पिवळे, लाल) असतात.

चौकोन (गोल, चौकोनी, आखूड) असतो.

मोगरा (पांढरा, गोड, गोल) असतो.

गुळाची चव (आंबट, खारट, गोड) असते.

वर्तुळाचा आकार (गोल, लांब, चौकोनी) असतो.

बगळ्याची चोच (पिवळी, काळी, पांढरी) असते.

आवळा (गोल, पांढरा, खारट) असतो.

5. **Match the pairs.** जोड्या जुळवा

A	B
पोपट	चौकोनी आहे.
हा लाडू	गोरा आहे.
हा मुलगा	रुंद आहे.
हे वर्तुळ	कडू आहे.
हे टेबल	हिरवा असतो.
ती साडी	लठ्ठ आहे.
तो माणूस	बारीक आहेत.
हा रस्ता	गोल आहे.
हे कार्ले	लाल आहे.
ह्या बायका	गोड आहे.

Vocabulary

असणे v.intr.	to be	डाळिंब n.	pomegranate
आकार m.	shape	तिखट adj.	hot
आवळा m.	awla	दाणा m.	seed
आंबट adj.	sour	पंख m.	wing
ऊस m.	sugracane	पिंजरा m.	cage
कडू adj.	bitter	पोपट m.	parrot
कावळा m	crow	मिरची f.	chilli

कैरी f.	raw mango	मीठ n.	salt
कोकिळा f.	cuckoo	रस m.	juice
खारट adj.	salty	वर्तुळn.	circle
गूळ m.	jaggery	साखर f.e	sugar
गोल adj.	round	स्वागत करणे phr.	to welcome
चव f.i	taste		

Grammatical Notes

Unit-VIII, Lesson 26 shows the difference between the two verbs viz. आहे and अस -, both meaning 'to be' अस 'to be' is used in some particular context only. e.g.

(1) Universal truth, scientific fact :

आकाशात चांदण्या असतात.

'There are stars in the sky'

(2) Distinctive feature of a class or group :

कावळे काळे असतात.

'Crows are black'.

(3) General statement or observation :

जर्मन लोक कष्टाळू असतात.

'Germans are hard-working'.

(4) Habitual :

तो रोज दुपारी घरी असतो.

'He is at home every afternoon'.

The past tense of अस- is used to denote supposition or assumption. It's verbal adjectives form 'असलेला' will be explained later.

आहे 'to be' is used when a statement is particular and

refers to an individual person, object etc. e.g.

(1) हा कावळा काळा आहे.

This crow is black

(2) आज थंड हवा आहे.

The weather is cold today.

(3) ही बाग आता उघडी आहे.

This garden is open now.

(4) ह्या लिंबाचा रस आंबट आहे.

The juice of this lemon is sour.

The negative form of अस is नस- e.g.

पोपट हिरवा असतो. 'A parrot is green'

पोपट काळा नसतो. "A parrot is not black"

गट - ८

Unit - VIII

धडा सत्ताविसावा

LESSON 27

गोष्ट

A Story

मुलांनो, आता एक गोष्ट ऐका.	Children, now listen to a story.
एक गाव असतं.	There is one village.
त्या गावालगत एक मोठा डोंगर असतो.	There is a big hill on the outskirts of that village.
त्या डोंगरावर खूप झाडं असतात.	There are many trees on that hill.
काही झाडांची सावली खूप मोठी असते.	The shadow of some trees is very big.
डोंगरावर निरनिराळी झुडुपंही असतात.	There are various plants also on the hill.
उंच झाडांवर, झुडपांवर रंगीबेरंगी फुलपाखरं, पक्षी असतात.	There are colourful butterflies (and) birds on the tall trees.
डोंगरावर मारुतीचं देऊळ असतं.	There is a Maruti temple on the hill.
देवळाबाहेर एक छान पार असतो.	There is a beautiful platform outside the temple.
रोज सकाळी पुष्कळ लोक डोंगरावर जातात.	Many people go up the hill every morning.
ते मारुतीच्या देवळात जातात.	They go to the Maruti temple.
देवाचं दर्शन घेतात.	(They) take 'darshan' of the God (Maruti).

आणि पारावर विश्रांती घेतात.	And they take rest on the platform.
पावसाळ्यात डोंगर फार छान दिसतो.	The hill looks very beautiful in the rainy season.
पावसाळ्यात सगळा डोंगर हिरवा असतो.	The whole hill is green in the rainy season.
झाडं हिरवी, झुडुपं हिरवी, पानं हिरवी, गवत हिरवं	The trees (are) green, the bushes (are) green, the leaves (are) green, (and) the grass (is) green.
असा असतो तो डोंगर .... हिरवा हिरवा	The whole hill looks deep green. Such is the hill. Very very green.

2

शिक्षक : मुलांनो, ही आणखी एक गोष्ट ऐका.	Teacher : Children, listen to one more story.
एक तळं असतं.	There is a pond.
तळ्यात बदकाची खूप पिल्लं असतात.	There are many ducklings in the pond.
एक पिल्लू फार कुरूप असतं.	One duckling is very ugly.
सगळी पिल्लं त्याच्यापासून दूर असतात. म्हणून ते दुःखी असतं.	All the (other) ducklings keep away from it. Hence it is unhappy.
हळूहळू सगळी पिल्लं मोठी होतात.	Gradually, all the ducklings grow up.

ते कुरूप पिल्लूही मोटं होतं.	This ugly duckling also grows up.
ते एक दिवस आपलं रूप पाण्यात पहातं.	One day, it sees its reflection in the water.
आणि ते म्हणतं,''अरे, मी राजहंस!	And it says, "Heavens ! I am a swan !"
ही इतर आहेत बदकं,	These other ones are ducklings.
मी आहे राजहंस !''	I am a swan !"
आता ते पिल्लू, तो राजहंस दुःखी नसतो.	Now that duckling, that swan is not unhappy.
तो मजेत असतो.	It is happy .....

Drills

I

Repetition Drills

मी बागेत असतो.	मी बागेत असते.
आम्ही बागेत असतो.	आपण बागेत असतो.
तू बागेत असतोस.	तू बागेत असतेस.
तुम्ही बागेत असता.	
तो बागेत असतो.	ते बागेत असतात.
ती बागेत असते.	त्या बागेत असतात.
ते बागेत असतं.	ती बागेत असतात.

II

Fill in the gaps Drill

Fill in the gaps with the forms of verb अस-

(- अस या क्रियापदाची योग्य रूपे रिकाम्या जागी भरा.)

एक डोंगर .... डोंगरावर रंगीबेरंगी फुलपाखरं ....

डोंगरावर एक मारुतीचं देऊळ .... एक गाव ....

गावात दोन शाळा .... एक मुलगी ....

त्या मुलीजवळ दोन माळा ...... घरासमोर एक दवाखाना .....

घरात चार माणसं .... घरात एक कुत्रा ....

III
Substitution Drill

Substitute राजा with the given words.

(राजाऐवजी खाली दिलेले शब्द वापरा.)

एक राजा असतो.	एक राजा असतो.
राणी	माळी
बदक	शाळा
पिल्लू	बादशहा
वासरू	माकड
बाई	हत्ती
शेतकरी	शेत
तळं	मासा
गाय	झुडूप
नदी	जंगल

IV
Conversation Drill

शिक्षक : मुलांनो, बदकाच्या पिल्लाची गोष्ट कशी आहे?

विद्यार्थी : गुरुजी, गोष्ट खूप छान आहे.

शिक्षक : आता तुम्ही एकेका प्रश्नाचं उत्तर द्या. शिरीष,

तू सांग, तळ्यात काय असतं ?

शिरीष	:	तळ्यात बदकाची पिल्लं असतात.
शिक्षक	:	बदकाची सगळी पिल्लं सुंदर असतात का ?
शिरीष	:	नाही, बदकाची सगळी पिल्लं सुंदर नसतात. एक पिल्लू कुरूप असतं.
शिक्षक	:	मोहन, ते पिल्लू दुःखी असतं का ?
मोहन	:	हो, ते पिल्लू फार दुःखी असतं. सगळी पिल्लं त्याच्यापासून दूर जातात.
शिक्षक	:	बरोबर, भारती, तू पुढे सांग.
भारती	:	ती सगळी पिल्लं मोठी होतात. एकदा ते पिल्लू पाण्यात आपलं रूप पहातं.
शिक्षक	:	आणि ते काय म्हणतं, रोहिणी ?
रोहिणी	:	पिल्लू म्हणतं,'' मी राजहंस आहे. इतर सगळी बदकं आहेत. मीच सर्वात सुंदर दिसतो.''

स्वाध्याय क्र. २७ **Exercise No. 27**

1. **Substitute the underlined word with the given words and rewrite the sentences after making necessary changes.**

(अधोरेखित शब्दाच्याऐवजी दिलेले शब्द वापरून, वाक्यात योग्य ते बदल करून वाक्य पुन्हा लिहा.)

डोंगरावर झाडं असतात.	डोंगरावर झाडं असतात.
देऊळ	गुराखी
पाणी	पार
फुलपाखरं	सावली

लोक	पक्षी
कोकिळा	गवत

2. Answer the following questions in one line.

(पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.)

गावाबाहेर काय असतं ?

डोंगरावर खूप झाडं असतात का ?

डोंगरावर फुलपाखरं आणि पक्षी असतात का ?

डोंगरावर आणखी काय काय असतं ?

देऊळ कसं असतं ?

डोंगरावर रोज कोण कोण जातं ?

डोंगरावर लोक काय करतात ?

पावसाळ्यात डोंगर कसा दिसतो ?

लोक कुठे विश्रांती घेतात ?

तुमच्या गावाजवळ डोंगर आहे का ?

3A. Rewrite the following story using the proper forms of [illegible]

('आहे' ऐवजी 'अस'ची रूपे वापरून पुढील गोष्ट लिहा.)

एक राजा आहे. त्याचा मोठा राजवाडा आहे. राजवाड्यात खूप माणसं आहेत. राजवाड्यात मोठी बाग आहे. बागेत मोठं कारंजं आहे. बागेत रंगीबेरंगी फुलझाडं आहेत. राजाची बाग फार सुंदर आहे. त्या बागेत फार गर्दी आहे. लहान मुलं आहेत. मोठी माणसं आहेत. बायका आहेत. तिथे सर्वजण जातात. इकडे तिकडे फिरतात. कारंज्याची मजा पाहतात. राजाची बाग आहे खूप छान !

3B. Rewrite the following story using the proper forms of the verb आहे in place of अस.

(- 'अस' ऐवजी 'आहे' ची रूपे वापरून पुढील गोष्ट लिहा.)

एक गाव असतं. तिथे एक शाळा असते. शाळेत खूप विद्यार्थी असतात. शाळेची इमारत खूप मोठी असते. शाळेसमोर मोठं पटांगण असतं. त्या पटांगणावर खूप मुलं खेळतात. काही मुलं चेंडू खेळतात. काही मुलं झाडावर चढतात. शाळेच्या मागे दुकानं असतात. काही दुकानं पुस्तकांची असतात. काही दुकानं खेळण्यांची असतात. दुकानात दुकानदार असतो. मुलं दुकानात जातात आणि खेळणी विकत घेतात. काही मुलं पुस्तकं घेतात. शाळेजवळ मारुतीचं देऊळ असतं. रविवारी शाळा बंद असते.

5. Narrate the story from the given words using the forms of the verb अस.

(पुढे दिलेल्या शब्दांच्या सहाय्याने 'अस-' धातूचा वापर करून एक गोष्ट लिहा.)

बगळा, कोल्हा (**fox**), लबाड (**cunning**), बगळ्याला जेवण देणे [illegible] (**por-ridge**), पोच (**to reach**), कोल्ह्याला जेवण देणे, घडा (**pot**), घड्यापर्यंत (**upto the pot**).

Vocabulary

कुरूप adj.	ugly	पोचणे v intr.	to reach
कोल्हा m	fox	फुलपाखरू n	butterfly
खीर f. i	porridge	बगळा m	crane
गर्दी f	crowd	राजवाडा m.	palace
गाव n.	village	राजहंस m.	swan

गोष्ट f. i	story	राजा m.	king
घडा m.	pot	राणी f.	queen
झुडूप n	bush	रूप n.	reflection
डोंगर m	hill	लगत p.p.	very close
थाळी f.	plate	लबाड adj.	cunning
दर्शन घेणे phr.	to take 'darshan'	वाडा m.	mansion
दुःखी adj	unhappy	सगळा adj.	whole
दूर adv.	away	सावली f	shadow
देऊळ n	temple	हळूहळू adv	gradually
पार m	platform (under a tree)	हिरवागार adj.	deep green
पावसाळा m	rainy season		

Grammatical Notes

Unit - VIII, Lesson 27 introduces the form of the verb अस - 'to be' which is used for story-telling. This is actually the habitual present tense form and it is used to describe a rule, a permanant thing, a habitual act etc,

Notes :

निरनिराळी झाडं : निराळा 'different' is a variable adjective. When we reduplicate this adjective, it becomes निरनिराळा 'of various kinds'.

Reduplication of the adjectives

Adjectives of colour, taste sometimes strength the basic meaning by the addition of a suffix, e.g.

Adjectives of colours :

लालभडक	'very red
निळाशार	'deep blue
पिवळाधमक	'deep yellow'
तांबडाभडक / लाल भडक	'very red'
काळाकुट्ट	'dark black'
पांढराशुभ्र	'snow white'
पांढराफटक	'pale'
हिरवागार	'pleasant deep green'
पांढरासफेद	'snow white'

Certain suffixes have a diminutive function e.g.

हिरव**ट** (हिरव + अट)	'somewhat green '
पिवळ**ट** (पिवळ + अट)	'somewhat yellow'
पांढर**ट** (पांढर + अट)	'somewhite white'
पांढुर**का** (पांढुर + का)	'somewhat white'
काळ**सर** (काळ + सर)	'somewhat black'
लाल**सर** (लाल + सर)	'somewhat red' etc.

Adjectives of taste (strengthened meaning).

कडू**जहर**	'very bitter',
तिखट**जाळ**	' very hot',
खारट**क्षार**	'very salty'
आंबट**ढाण**	'very sour'
गोड**मिष्ट**	'very sweet'

गट - ८	Unit - VIII
धडा अठ्ठाविसावा	**LESSON 28**
हिरवा हिरवा डोंगर (पुढे चालू)	**The Green Hill (contd)**
त्या हिरव्या डोंगरावर सकाळी लोकांची खूप गर्दी असते.	In the morning there is great rush of people on the green hill.
काही लोक डोंगर चढत असतात.	Some people are climbing the hill.
काही चपळ माणसं डोंगर भरभर उतरत असतात.	Some active persons are coming down the hill quickly.
तरुण मुलं डोंगरावर व्यायाम करत असतात.	Young boys are doing exercise on the hill.
छोटी मुलं इकडेतिकडे पळत असतात.	Small boys are running here and there.
काही मुलं फुलं तोडत असतात.	Some children are plucking flowers.
काही मुलं फुलपाखरं पकडत असतात.	Some children are catching butterflies.
काही लोक पक्षी पहात असतात.	Some people are watching the birds.
डोंगरावर गुरंढोरं चरत असतात.	Cattle are grazing on the hill.
गुराखी गुरांच्या मागे फिरत असतात.	Cowherds are going after the cattle.
काही गुराखी गाणी म्हणत असतात.	Some cowherds are singing

	songs.
पक्षी इकडेतिकडे उडत असतात.	Birds are flying here and there.
आणि फांद्यांवर किलबिल करत असतात.	And they are twittering on the branches.
डोंगरावर बायकासुद्धा जात असतात.	Women also go on the hill.
काही बायका देवळात जात असतात.	Some women go to the temple.
काही बायका गप्पा मारत असतात.	Some women chat.
काही माणसं पेपर वाचत असतात.	Some people read the newpaper.
माकडं झाडांवर उड्या मारत असतात.	Monkeyies are jumping on the trees.
खारी इकडेतिकडे पळत असतात.	Squirrels are running here and there.
कुत्री भुंकत असतात.	Dogs are barkling.
कावळे कावकाव करत असतात.	Crows are crowing.
हिरव्या डोंगरावर सकाळी अशी धावपळ असते.	Such is the hustle and bustle on the green hill in the morning.

Drills

I

Repetition Drills

१ मी सकाळी पेपर वाचत असतो. २ मी सकाळी दूध पीत असते.
५ तू शाळेत अभ्यास करत असतोस. ६ तू शाळेत पुस्तक वाचत

असतेस.

तो वर्गात चित्र काढत असतो.

ते झाडावर चढत असतं.

तुम्ही बाजारात जात असता.

ते पत्र लिहीत असतात.

मुलं दंगा करत असतात.

ती घरी काम करत असते.

आम्ही कपडे धूत असतो.

आपण गाणी ऐकत असतो.

त्या स्वयंपाक करत असतात.

II

Substitution Drill

Substitute ती with the given pronouns or nouns, making necessary changes in the sentence.

(वाक्यात जरुर तो बदल करुन 'तो' ऐवजी पुढे दिलेली सर्वनामे किंवा नामे वापरा.)

ती अभ्यास करत असते.

तो

आम्ही

ते

त्या

तुम्ही

मी

आपण

ती अभ्यास करत असते.

श्रीकांत

श्रीयुत साटे

प्रमिलाबाई

पाटीलसाहेब

लोक

बायका

मुली

III

Fill in the gaps Drill

Fill in the gaps with appropriate verb.

(रिकाम्या जागी योग्य ती क्रियापदे भरा.)

मोहन सकाळी तोंड .... असतो.

आई स्वैपाक .... असते.

मी पत्र .... असतो.

मांजरं झाडावर .... असतात.

वीणा भाजी .... असते.

आम्ही दार .... असतो.

किसन फळा .... असतो.

अमर चित्रं .... असतो.

माकड शेंगा .... असतं.

शिक्षक वर्गात .... असतात.

आपण चहा .... असतो.

मीनाताई शाळेत .... असतात.

तुम्ही मोटार .... असता.

मुलं डोंगर .... असतात.

Conversation Drill

शिक्षक : प्रकाश, तू सकाळी काय करत असतोस?

प्रकाश : मी सकाळी अभ्यास करत असतो.

शिक्षक : दिलीप, तू सकाळी खेळत असतोस का?

दिलीप : नाही, मी सकाळी खेळत नसतो. मी पण सकाळी अभ्यास करत असतो.

शिक्षक : आणि अनीता काय करत असते?

अनीता : मीपण सकाळी अभ्यास करत असते.

शिक्षक : शाबास ! तुम्ही सर्वजण सकाळी अभ्यास करत असता. मी सकाळी शाळेत येत असतो. काही लोक डोंगरावर जात असतात. बायका

		नळावर पाणी भरत असतात. रस्त्यावर गंमत असते.
नलिनी	:	होय गुरुजी, आम्हीसुद्धा शाळेत येत असतो. आणि वाटेत सगळ्या गंमती पहात असतो.
शिक्षक	:	कधी कधी पाऊस पडत असतो. मुलं पावसात खेळत असतात. काही मुलं गाणी म्हणत असतात. मी मजा पहात असतो.

स्वाध्याय क्र. २८ **Exercise No. 28**

1. **Answer the following questions with the help of the lesson.**
(धड्याच्या आधाराने पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.)

तरुण मुलं हिरव्या डोंगरावर काय करत असतात ?
छोटी मुलं डोंगरावर काय करत असतात ?
डोंगरावर बायका जात असतात का ?
डोंगरावर बायका काय करत असतात ?
डोंगरावर खारी काय करत असतात ?
माकडं काय करत असतात ?
डोंगरावर गुराखी खेळत असतो का ?

2A. **Fill in the gaps with the proper forms of the verb अस-**
(अस-ची योग्य रूपे वापरून रिकाम्या जागा भरा.)

मी पुस्तकं वाचत …………
मोहन आणि मोहनचा मित्र डोंगरावर पळत …………
आमचा पोपट 'मिटू मिटू'बोलत ……………
तुम्ही पावसात फिरत ………………

फुगेवाला 'फुगे घ्या' ओरडत ....
शशिकला सुंदर चित्र काढत ....
माझ्या घरात पंखे फिरत ....
मीना सुंदर गाणी म्हणत ....
ते सकाळी अभ्यास करत ....
रोहिणीच्या मैत्रिणी घराबाहेर खेळत ....

2B. Fill in the gaps with proper form of a suitable verb.
(रिकाम्या जागेत योग्य अशा क्रियापदाचे रूप घाला.)

आम्ही रेडिओ .... असतो.
तरुण मुलं डोंगरावर व्यायाम .... असतात.
डोंगरावर गुरं .... असतात.
बायका देवळात गप्पा .... असतात.
पक्षी फांद्यांवर किलबिल .... असतात.
गुराखी गाणं .... असतात.
माकडं झाडावर .... असतात.
आई घरात काम .... असते.
आपण सिनेमा .... असतो.

3. Transform the following sentences into the present habitual.
(पुढील वाक्ये रीति वर्तमानकाळात लिहा.)

अनंता त्याच्या घरी जातो.
स्नेहलता गोष्टी लिहिते.
मुलं पावसात खेळतात.
त्या कागद फाडतात.
आपण खिडक्या बंद करतो.
किरण गाणी गातो.
आम्ही डोंगर उतरतो.
मी फळ्यावर चित्र काढते.
पाखरं फांद्यांवर बसतात.
लक्ष्मण टेबलावर पुस्तकं ठेवतो.

4. Match the pairs.

(जोड्या जुळवा)

A	B
ते वर्गात	पोहत असतात.
पावसाळ्यात डोंगर	पेरू खात असतात.
डोंगरावर गुरंढोरं	व्यायाम करत असतात.
हत्ती जंगलात	उचलत असता.
मासे पाण्यात	काम करत असतात.
अरुण आणि त्याचे मित्र	हिरवेगार असतात.
लोक कारखान्यात	कविता म्हणत असतात.
तुम्ही तुमच्या वह्या	पळत असतात.
झाडांवर पोपट	गप्पा मारत असतात.
डोंगरावर तरुण मुलं	चरत असतात.

5. Read the following paragraph carefully and then re write it in the present habitual wherever necessary.

(पुढील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि आवश्यक तिथे बदल करून रीतिवर्तमानकाळात लिहा.)

एक शेतकरी असतो. त्याचे दोन बैल असतात. ते बैल शेतकऱ्याची खूप कामं करतात. ते शेतकऱ्याची गाडी ओढतात. शेतकऱ्याच्या घरात एक कुत्रा असतो. तो घराचं रक्षण करतो. तो लोकांवर भुंकतो. शेतकऱ्याची एक गाय असते. ती खूप दूध देते.

ती मारत नाही. तिचं वासरू अंगणात उड्या मारतं. शेतकऱ्याच्या मुली अंगणात खेळतात.

शेतकऱ्याची बायको त्याला मदत करते. त्यांचा मुलगा शहरात शिकतो.

6. **Write a story in your own words with the help of the words given using the present habitual with** अस-
(पुढे दिलेल्या शब्दांच्या सहाय्याने 'अस-'चा उपयोग करून रीतिवर्तमानकाळात गोष्ट लिहा.)

ससा	-	**rabbit**
कासव	-	**tortoise**
पळण्याची शर्यत	-	**running race**
हळूहळू	-	**slowly**
वाटेत	-	**on the way**
शर्यत जिंकणे	-	**to win the race**
कासव 'आराम हराम है'	-	**It is a crime to take rest**
गर्व	-	**pride**
खाली होते	-	**come down**

Vocabulary

उतरणे (v.intr.)	to down	तरुण adj./m	young/ young man
कासव (n)	tortoise	तोडणे (v.tr.)	to pluck
किलबिल करणे (phr.)	to twitter	धावपळ (f.)	hustle and bustle
पकडणे (v.tr.)	to catch	पेपर (m)	newspaper
गप्पा मारणे (phr)	to chat	फांदी (f.)	branch
गर्व (m)	pride	भरभर (adv)	quickly
गाणं म्हणणे (phr)	to sing a song	भुंकणे (v.intr.)	to bark
गुरंढोरं (n.pl.)	cattle	वाट (f.) a	way
चढणे (v.intr.)	to climb	व्यायाम करणे (phr.)	to do

			exercise
चपळ (adj)	active	शर्यत (f.)	race
चरणे (v.intr.)	to graze	सकाळ (f.)	morning
चालवणे (v.tr.)	to drive	ससा (m)	rabbit
छोटा (adj.)	small	स्वैपाक करणे (phr)	to cook
जिंकणे (v.tr.)	to win		

Grammatical Notes

Unit -VIII, Lesson 28 explains the expression of continous activities.

The Pattern is :

R + अत / त + form of अस-

e.g.

बस + अत + form of अस-

जा + त + form of अस-

Examples :

लोक डोंगर चढत असतात.

= People (everyday) climb the hill.

ती अकरा वाजता ऑफिसला जात असते.

= She goes to office at 11.00 (daily, regularly)

Marathi has a restricted number of verbs. A number of verbal expressions are formed by adding the forms of कर- or हो - to a main verb or an adjective. The former gives a transitive verb, while the latter is intransitive.

e.g.	काम कर -	'to work'
	अभ्यास कर -	'to study'
	स्वैपाक कर -	'to cook'
	व्यायाम कर -	'to do physical exercise'
	आंघोळ कर -	''to take bath'
	पेरणी कर -	'to sow'

Thus we have in Marathi.

Present Simple = साधा वर्तमानकाळ = मी जातो.

'I go'

Present continous = अपूर्ण वर्तमानकाळ = मी जातो आहे.

'I am going'

Present Habitual = रीतिवर्तमानकाळ = मी जात असतो.

'I go regularly'

The Habitual Present Tense of Marathi is equivalent to the Simple Present of English. e.g. मी जात असतो = मी रोज जातो = I go. It is possible to express the Habitual Present Tense by using the words such as रोज, नेहमी. e.g. मी सकाळी फिरायला जात असतो = मी रोज सकाळी फिरायला जातो. 'I go for a walk in the morning' = 'I go every morning for a walk'.

गट - ८

Unit - VIII

धडा एकोणतिसावा

LESSON 29

गायीला शिंगं असतात

A Cow Has Horns

शिक्षक : मुलांनो, ही चित्रं पहा.	Teacher : Children, look at these pictures.
ह्या चित्रांत एक माणूस आहे.	There is a man in this picture.
आणि ह्या चित्रात निरनिराळे प्राणी आहेत.	And there are different animals in these pictures.
आता ह्या माणसाकडे पहा.	Now look at this man.
ह्या माणसाला दोन डोळे, दोन हात आणि दोन पाय आहेत.	This man has two eyes, two hands and two legs.
ही गाय आहे.	This is a cow.
ह्या गायीलासुद्‌धा दोन डोळे आहेत.	This cow also has two eyes.
पण तिला हात नाहीत.	But she has no hands.
पाय मात्र चार आहेत.	But (she) has four legs.
मुलांनो, गाय पाणी पिते.	Children, the cow drinks water.
माणूसपण पाणी पितो.	The man also drinks water.
गाय गवत खाते.	The cow eats grass.
माणूस गवत खात नाही.	The man does not eat grass.
गायीला शेपटी असते.	The cow has a tail.
प्राण्यांना आणि पक्ष्यांना शेपटी असते.	The animals and birds have tail.
हा हत्ती पहा. ह्या हत्तीला शेपटी	Look at this elephant. Has

आहे का ?	this elephant a tail ?
विद्यार्थी : हो. ह्या हत्तीला शेपटी आहे.	Students : Yes. This elephant has a tail.
शिक्षक : हत्तीची शेपटी कशी आहे ?	Teacher : How is the elephant's tail ?
विद्यार्थी : हत्तीची शेपटी आखूड आहे.	Students : The elephant's tail is short.
शिक्षक : हे पहा. हत्तीला सोंड आहे. हत्तीची सोंड लांब आणि सरळ आहे. हत्तीला दात आहेत. मीरा, हत्तीचे दात कसे आहेत ?	Teacher : Look at this. The elephant's trunk is long and straight. The elephant has teeth. Meera, How are the elephant's teeth ?
मीरा : हत्तीचे दात लांब आणि पांढरे आहेत.	Meera : The elephant's teeth are long and white.
प्रमोद : गुरुजी, मी सांगू ? हत्तीला कान असतात. त्याचे कान खूप मोठे असतात. ह्या हत्तीचे कानपण खूप मोठे आहेत.	Pramod : May I say teacher ? The elephant has ears. The elephant's ears are very big. The ears of this elephant are also big.
शिक्षक : शाबास! आता सिंह पहा.	Teacher : Vety good ! Now look at this lion.
सिंहाला आयाळ असते.	The lion has a mane.
घोड्याला पण आयाळ असते.	The horse has also a mane.
आता पक्षी पहा. हा मोर आहे. मोराला पिसारा असतो.	Now look at the birds. This is a peacock. The peacock

	has feathers.
मीरा : मोराचा पिसारा खूप सुंदर असतो.	Meera : The peacock's feather is very beautiful.
शिक्षक : बरोबर, मोराला तोंड असतं का ?	Teacher : (That's) correct! Has the peacock a mouth ?
विद्यार्थी : नाही, मोराला तोंड नसतं.	Students : No. The peacock has no mouth.
सर्व पक्ष्यांना चोच असते.	All the birds have a beak.
आणि त्यांना पंख असतात.	And they have wings.
शिक्षक : पण माणसाला पंख नसतात.	Teacher : But a man has no wings.
आता माझ्याकडे पहा.	Now look at me.
मला दोन हात आहेत	I have two hands.
माझ्या हातात घड्याळ आहे.	There is a watch on my hand.
माझ्या घड्याळाला तीन काटे आहेत.	My watch has three hands.
ही खुर्ची आहे.	This is a chair.
ह्या खुर्चीला दोन हात आहेत, पाठ आहे आणि चार पाय आहेत.	This chair has two hands, a back and four legs.

Drills

Repetition Drills

1

मला दोन डोळे आहेत.

तुला दोन डोळे आहेत.

आपल्याला दोन डोळे आहेत.

आम्हाला दोन डोळे आहेत.

तुम्हाला दोन डोळे आहेत.

(तो) त्याला दोन डोळे आहेत.	त्यांना दोन डोळे आहेत.
(ती) तिला दोन डोळे आहेत.	त्यांना दोन डोळे आहेत.
(ते) त्याला दोन डोळे आहेत.	त्यांना दोन डोळे आहेत.

2

त्रिकोणाला तीन बाजू असतात.	खुर्चीला पाठ असते.
घड्याळाला दोन काटे असतात.	गायीला शिंगं असतात.
पक्ष्याला पंख असतात.	वासराला शेपटी असते.
रिक्षाला तीन चाकं असतात.	झाडांना फांद्या असतात.
घरांना भिंती असतात.	फुलांना रंग असतात.
कपाटांना दारं असतात.	मोराला पिसारा असतो.

2

Question-Answer Drill

चौकोनाला किती बाजू असतात ?	चौकोनाला चार बाजू असतात.
ह्या चौकोनाला चार बाजू आहेत का?	हो. ह्या चौकोनाला चार बाजू आहेत.
ह्या खोलीला किती खिडक्या आहेत ?	ह्या खोलीला तीन खिडक्या आहेत.
खुर्चीला किती पाय असतात ?	खुर्चीला चार पाय असतात.
ह्या खुर्चीला किती पाय आहेत ?	ह्या खुर्चीला चार पाय आहेत.
रिक्षाला किती चाकं असतात ?	रिक्षाला तीन चाकं असतात.
ह्या कपाटाला किती दारं आहेत ?	ह्या कपाटाला दोन दारं आहेत.

II

Substitution Drill

Substitute मला with the correct form of the given pronoun or proper noun or noun.

('मला'ऐवजी पुढील नामांचे, सर्वनामांचे, विशेष नामांचे योग्य रूप वापरा.)

मला दोन डोळे आहेत.	**मला** दोन डोळे आहेत.
तू	दांडेकरसाहेब
आम्ही	कुलकर्णीबाई
तुम्ही	मोहन
आपण	सरला
तो	हा ससा
ते (n)	हे प्राणी
त्या	हे बदक
ते (m)	ह्या चिमण्या
हा माणूस	त्यांचा भाऊ

Conversation Drill

शिक्षक : मुलांनो, हे चित्र पहा. ह्या चित्रात काय आहे ? नलिनी तू सांग.

नलिनी : ह्या चित्रात दोन हत्ती आहेत. एक हत्ती मोठा आहे आणि एक हत्ती छोटा आहे.

शिक्षक : बरोबर. सुजाता, मोठ्या हत्तीला किती पाय आहेत ?

सुजाता : मोठ्या हत्तीला चार पाय आहेत.

शिक्षक : आणि लहान हत्तीला ?

सुजाता : लहान हत्तीलासुद्धा चार पाय आहेत.

शिक्षक : शरयू, हत्तीला शेपटी असते का ?

शरयू : हो, हत्तीला शेपटी असते.

शिक्षक : हत्तीची शेपटी कशी असते ?

विनया : हत्तीची शेपटी लहान असते.

शिक्षक : हत्तीचे कान कसे असतात ?

विजय : हत्तीचे कान खूप मोठे असतात.

शिक्षक : हत्तीला डोळे असतात का ?

संजय : हो, हत्तीला डोळे असतात. हत्तीचे डोळे खूप छोटे असतात.

शिक्षक : बरोबर. आता हत्तीची माहिती तुमच्या वहीत लिहा.

स्वाध्याय क्र. २९ **Exercise No. 29**

1. Answer the following questions.
(खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.)

त्रिकोणाला किती बाजू असतात ?
चौकोनाला किती बाजू असतात ?
वर्तुळाला बाजू असतात का ?
षट्कोनाला किती बाजू असतात ?
हत्तीला डोळे असतात का ?
ह्या खोलीला किती खिडक्या आहेत ?
टेबलाला किती पाय असतात ?
माणसाला शेपटी असते का ?
तुम्हाला कान आहेत का ?
माणसाला बोटं असतात का ?

2A. Fill in the gaps with the proper form of the verb अस or नस -
(रिकाम्या जागी 'अस'ची किंवा 'नस'ची योग्य रूपे भरा.)

माणसाला शेपटी	पाण्याला रंग ....
वाघाला सोंड	प्राण्यांना पंख ....
माशांना पाय	माकडाला चोच ....
गायीला हात	झाडांना डोळे ....
मांजराला नखं	घराला खिडक्या ....

2B. Fill in the gaps with the proper words and complete the following passage.

(पुढील उताऱ्यात रिकाम्या जागी योग्य ते शब्द घालून उतारा पूर्ण करा)

ही गाय आहे. ह्या गाईला चार .... आहेत. तिला .... नाहीत. तिला एक .... आहे. तिला दोन ...., दोन .... आणि एक .... आहे. ही गाय .... खाते आणि .... पिते. ही गाय .... नाही. ती खूप .... देते.

3A. Substitute 'ह्या खोलीला' with the proper forms of the given words.

('ह्या खोलीला' ऐवजी दिलेल्या शब्दांची योग्य रूपे वापरून पुढील वाक्ये लिहा.)

ह्या खोलीला तीन खिडक्या आहेत.

माझं घर

आमचा वर्ग

त्यांचा बंगला

तिचं स्वैपाकघर

त्यांची मोटार

हा डबा

तुझं ऑफीस

ते पोस्ट

3B. Substitute the underlined words with the given words making necessary changes in the sentences.

(अधोरेखित शब्दांऐवजी दिलेले शब्द घालून वाक्यात योग्य ते बदल करा.)

माणसाला दोन डोळे असतात.

गाय	शेपटी
त्रिकोण	बाजू
वाघ	पाय
प्राणी	कान
पक्षी	पंख
हत्ती	सोंड
मांजर	नाक
बैल	शिंग
माकडं	बोटं
टेबलं	पाय

4. Write as many correct sentences as you can after select ing proper words from each column.

(प्रत्येक रकान्यातले योग्य ते शब्द निवडून जितकी बरोबर वाक्ये तयार करता येतील तितकी करा.)

१	२	३
चौकोनाला	चोच	
माणसाला	खिडक्या	
खोलीला	बाजू	असतात
सिंहाला	शेपटी	असतो

हत्तीला	पंख	असतं
विमानाला	कान	असते
पक्ष्यांना	नखं	
मांजरांना	तोंड	
घरांना	पाय	
गायीला	दार	
	आयाळ	
	शिंगं	

5. **Complete the following paragraph using the appropri ate form of the words given in the bracket.**

(कंसात दिलेल्या शब्दांची योग्य ती रूपे देऊन पुढील उतारा पूर्ण करा.)

(मी) दोन हात आहेत. (मी) (हात) दहा बोटं आहेत. (मी) बोटात अंगठी आहे. (मी) अंगठीचा रंग लाल आहे. अंगठी गोल (अस). (मी) अंगठी गोल आहे. (मी) (हात) बांगड्या आहेत. (मी) बांगड्या (सोनं) आहेत. (सोनं) रंग पिवळा असतो. बांगड्या गोल (अस)

Vocabulary

आयाळ	(p)	mane
काटा	(m)	hand (of a clock) thron
चाक	(n)	wheel
चौकोन	(m)	rectangle
त्रिकोण	(m)	triangle
नसणे	(v.intr.)	negative of to be (habit)
पंजा	(m)	paw
पिसारा	(m)	feather

शिंग	(n)	horn
शेपटी	(f)	tail
षटकोण	(m)	hexagon
सिंह	(m)	lion
स्वैपाकघर	(n)	kitchen
सोंड	(f)	trunk of an elephant

Grammatical Notes

This Lesson gives some Marathi expressions with Indirect subject + आहे. The details will be explained in Unit - VIII, Lesson 29.

Note the dirrerence between S + ला -- आहे and the possessive adjectives माझा, माझी etc. e.g.

1. ह्या माणसाला दोन डोळे आहेत. — **'This man has two eyes.'**

   ह्या माणसाचे डोळे काळे आहेत. — **'The eyes of this man are black.**

2. मला आई आहे. — **'My mother is living'.**

   माझी आई शिक्षिका आहे. — **'My mother is a teacher'.**

The forms of pronouns + the postpositions ला which has the variant ना in Third Person plural are given in the following table.

तक्ता क्रमांक १९ — Table No. 19

Person	Gender	Pronoun singular	+ ला	Pronoun plural	+ ला / ना
I	Mas/Fem	मी	मला	आम्ही	आम्हाला
II	Mas/Fem	तू	तुला	तुम्ही	तुम्हाला

I + II				आपण	आपल्याला
III	Mas.	तो	त्याला	ते	त्यांना
	Fem.	ती	तिला	त्या	त्यांना
	Neu.	ते	त्याला	ती	त्यांना

गट - ८	Unit - VIII
धडा तिसावा	**LESSON 30**
(उजळणी पाठ ६)	(Review Lesson 6)
वर्णन	**Narration**
शिक्षक : मुलांनो, नीट ऐका.	Teacher : Children, listen carefully.
हा एक खेळ आहे.	This is a game.
टेबलाकडे पहा.	Look at the table.
टेबलावर पुठ्ठ्याच्या खूप वस्तू आहेत.	There are many things of cardboard on the table.
तुम्ही सर्वजण टेबलाजवळ या.	Come near the table all of you.
आणि एकेक वस्तू उचला.	And pick up one thing each.
मग तुमच्या जागेवर परत जा.	Then go back to your seats.
आणि आपल्या वस्तूचं वर्णन करा.	And describe the things which you have.
विद्यार्थी : वा वा! हा फार छान खेळ आहे.	St. : That's fine ! This is a very good game.
शिक्षक : चला उठा. टेबलाजवळ या. आणि कोणतीही वस्तू उचला.	Teacher : Come on! Get up. Come near the table. And pick up anything.
(सर्व मुलं टेबलाजवळ जातात; वस्तू उचलतात आणि परत आपल्या जागेवर जातात.	(All the students go to the table; pick up things and go back to their seats.)

शिक्षक : शांत बसा.	Teacher : sit silently.
मोहन, तुझ्याजवळ कोणती वस्तू आहे ?	Mohan, which is the thing with you ?
मोहन : पोपट.	Mohan : A parrot.
शिक्षक : पोपटाचं दोन ओळीत वर्णन कर.	Teacher: Describe the parrot in two lines.
मोहन : पोपट हिरवा असतो. पोपटाची चोच लाल असते.	Mohan : The parrot is green. The beak of the parrot is red.
शिक्षक : शाबास ! अरुण, तुझ्याजवळ काय आहे ?	Teacher : Very good ! Arun, what have you got ?
अरुण : माझ्याजवळ पुठ्ठ्याचं स्टूल आहे.	Arun : I have a stool (made) of cardboard.
शिक्षक : ते स्टूल असं आहे ?	Teacher : How is that stool ?
अरुण : ते स्टूल चौकोनी आहे. आणि त्याला चार पाय आहेत.	Arun : This stool is rectangular. And it has four legs.
शिक्षक : बरोबर. सुषमा, तुझ्याकडे काय आहे ?	Teacher : That's right. Sushma, What have you got?
सुषमा : माझ्याकडे गाय आहे. गाय दूध देते. गाय गवत खाते.	Sushma : I have a cow. The cow gives milk. The cow eats grass.
अमर : माझ्याजवळ बदकाची पिल्लं आहेत.	Amar : I have some duckling
गुरुजी, मी बदकांची गोष्ट सांगतो.	.Sir, I'll tell the story of ducks.

एक तळं असतं.	There is a pond.
तळ्यात बदकाची पिल्लं असतात.	There are ducklings in the pond.
पिल्लं पाण्यात खेळत असतात.	The ducklings play in the water.
पोहत असतात.	(They) swim ......
शिक्षक : पुरे, तू नंतर गोष्ट सांग. आता देवेंद्रजवळ कोणतं चित्र आहे ते पहा.	Teacher : That's enough, you narrate the story afterwords. Now see what picture Devendra has got.
देवेंद्र : माझ्याजवळ एक राजा आहे. तो खूप लठ्ठ आहे. त्याला मोठ्या मिशा आहेत.	Devendra : I have a king. He is very fat. He has a big moustache.
(सगळी मुलं हसतात.)	(All the children laugh)
शिक्षक : अरे, राजा कसा असतो ?	Teacher : Hey, how is the king ?
शैलेश : गुरुजी, मी सांगतो. राजा शूर असतो. राजा श्रीमंत असतो.	Shailesh : Sir, I'll tell (you) A king is brave. A king is rich.
शिक्षक : छान छान ! मुलांनो, असा हा गंमतीचा खेळ आहे. ह्या खेळामुळे आपला शब्दसंग्रह वाढतो. वर्णनाची सवय वाढते. तुम्ही रोज हा खेळ खेळत जा.	Teacher : Tha's very fine ! Children, such is funny game. Our vocabulary increases by this game. The habit of describing (a thing) develops. Play this game everyday.
सर्व विद्यार्थी : हो, गुरुजी.	All students : Yes Sir.

चाचणी क्र. ६ Test No. 6

1. **Transform the following sentences using the verb अस making the necessary changes.**

(पुढील वाक्ये 'अस' धातूचा उपयोग करून लिहा. वाक्यात आवश्यक तो बदल करा.)

१ ह्या मोटारीला चार चाकं आहेत.
२ त्या अमेरिकन मुली गोऱ्या आहेत.
३ ते कावळे काळे आहेत.
४ ह्या माकडांना शेपट्या आहेत.
५ तो माणूस ह्या प्राण्यापेक्षा हुशार आहे.
६ हा ससा कासवापेक्षा चपळ आहे.
७ ह्या पक्ष्यांना पंख आहेत.
८ ह्या जपानी मुलांचे डोळे बारीक आहेत.
९ ह्या घड्याळाला दोन काटे आहेत.
१० ह्या झाडाच्या पानांचा रंग हिरवा आहे.

2 **Pick up words from the given list and use them in the appropriate blank space.**

(दिलेल्या शब्दांची योग्य रूपे करून ती पुढील वाक्यातल्या योग्य त्या रिकाम्या जागी भरा.)

शब्द : माणसं, खोल्या, ही खोली, गाय, पक्षी, घड्याळ, फोन, हा पंखा, त्या मुली, मी.

वाक्ये :

१ .... चोच असते. ६ ...... दोन काटे असतात.
२ .... आई आहे. ७ .... तीन खिडक्या आहेत.

३ .... चार पाय असतात.   ८ .... हात असतात.

४ ...... शेपटी असते.   ९ .... चार बटणं आहेत.

५ .... भाऊ आहेत.   १० .... वायर असते.

3A Frame sentences using the words of taste given below.

(पुढे दिलेल्या विशेषणांचा उपयोग करून वाक्ये बनवा.)

१ खारट   ४ गोड

२ आंबट   ५ तिखट

३ कडू

3B Describe a thing using following words of colour.

(पुढे दिलेले रंग दाखविणारे शब्द बापरून एखाद्या वस्तूचे वर्णन करा.)

१ हिरवा   ६ पांढरा

२ लाल   ७ गुलाबी

३ निळा   ८ केशरी

४ पिवळा   ९ चॉकलेटी

५ काळा   १० जांभळा

4 Narrate your elass in ten sentences.

तुमच्या वर्गाचे वर्णन दहा ओळीत लिहा.

5 Write five sentences each describing the things given below.

(खाली दिलेल्या वस्तूंचे प्रत्येकी पाच ओळीत वर्णन करा.)

१ मोर

२ हत्ती

३ मोटार

४ घर

५ माणूस

गट - ९	Unit - IX
धडा एकतिसावा	**LESSON 31**
ओळख	**Introduction**
अ : तुमचं नाव काय ?	A : What is your name ?
ब : माझं नाव विजया.	B : My name is Vijaya.
अ : तुमचं आडनाव काय ?	A : What is your surname ?
ब : माझं आडनाव चिटणीस.	B : My surname is Chitnis.
अ : तुमचं सगळं नाव काय ?	A : What is your full name ?
ब : माझं सगळं नाव विजया श्रीधर चिटणीस.	B : My full name is Vijaya Shridhar Chitnis.
अ : तुम्ही कुठल्या ?	A : Where are you from ?
ब : मी धुळ्याची.	B : I am from Dhule.
अ : तुमचे आईवडील कुठे असतात ?	A : Where are your parents ?
ब : माझे आईवडील धुळ्याला असतात.	B : My parents are at Dhule.
अ : तुमचे वडील काय करतात?	A : What is your father ?
ब : माझे वडील वकील आहेत.	B : My father is a lawyer.
अ : त्यांचं नाव काय ?	A : What is his name ?
ब : त्यांचं नाव श्रीधर.	B : His name is Shridhar.
अ : तुमच्या आईचं नाव काय ?	A : What is your mother's name ?
म : माझ्या आईचं नाव कमल.	B : My mother's name is Kamal.

अ : तुम्हाला बहीणभाऊ आहेत का ?	A : Do you have sisters and brothers ?
ब : हो. मला बहीणभाऊ आहेत.	B : Yes. I have sisters and brothers.
अ : तुम्हाला किती भाऊ आहेत ?	A : How many brothers have you ?
ब : मला तीन भाऊ आहेत.	B : I have three brothers.
अ : तुमच्या भावांची नावं काय?	A : What are the names of your brothers ?
ब : एकाचं नाव आहे प्रभाकर. दुसऱ्याचं पद्माकर आणि तिसऱ्याचं अरविंद.	B : The name of one (brother) is Prabhakar. (The name) of the second (brother) is Padmakar. And (the name) of the third (is) Arvind.
अ : ते तिघे तुमच्यापेक्षा मोठे आहेत का ?	A : Are the three older than you ?
ब : हो. ते तिघेही माझ्यापेक्षा मोठे आहेत.	B : Yes, All the three are older than me.
अ : ते काय करतात ?	A : What do they do ?
ब : प्रभाकर फॅक्टरीत नोकरी करतो. पद्माकर परदेशात नोकरी करतो. आणि अरविंद इंजिनीयर आहे.	B : Prabhakar works in a factory. Padmakar works in a foreign country. And Arvind is an engineer.
अ : आणि बहिणी ?	A : And sisters ?

ब : मला दोन बहिणी आहेत.	B : I have two sisters.
माझ्या मोठ्या बहिणीचं	The name of my elder
नाव आहे सरोज.	sister is Saroj.
ती बडोद्याला असते.	She lives at Baroda.
ती आणि तिचा नवरा	
तिथे नोकरी	She and her husband are
करतात. सर्वात धाकटी मीना.	serving there. The youngest
ती फलटणला असते. तिला एक	of all (is) Meena. She lives in Phalatan. She has
मुलगी आहे. आणि मी मधली.	a daughter.
आम्ही एकूण सहा भावंडं आहोत.	And I am the middle one. We are six siblings in all.
मी पुण्याला नोकरी करते.	I work in Pune.
अ : तुम्ही कुठे रहाता ?	A : Where do you live ?
ब : मी प्रभात रोडला राहते.	B : I live at Prabaht Road.
अ : तुमचे आईवडील कधी पुण्याला येतात का ?	A : Do your parents come to Pune anytime ?
ब : हो, ते सुट्टीत इकडे येतात.	B : Yes. They come here in the vacation.
अ : आणि तुम्ही कधी धुळ्याला जाता का ?	A : And do you go to Dhule anytime?
ब : हो, मी दर दिवाळीत तिकडे जाते.	B : Yes, I go there every Diwali

Drills

Repetition drill

मला आई आहे.	आम्हाला आई आहे.
तुला आई आहे.	तुम्हाला आई आहे.
त्याला आई आहे.	आपल्याला आई आहे.
तिला आई आहे.	त्यांना आई आहे.
मला वडील आहेत.	आम्हाला वडील आहेत.
तुला वडील आहेत.	तुम्हाला वडील आहेत.
आपल्याला वडील आहेत.	त्याला वडील आहेत.
तिला वडील आहेत.	त्यांना वडील आहेत.
मला आई आहे. माझ्या आईचं नाव कमल आहे.	माझी आई धुळ्याला असते /रहाते.
तुला आई आहे. तुझ्या आईचं नाव लक्ष्मी आहे.	तुझी आई पुण्याला असते /रहाते.
त्याला आई आहे. त्याच्या आईचं नाव मालती आहे.	त्याची आई मुंबईला असते /रहाते.
तिला आई आहे. तिच्या आईचं नाव सुमंगला आहे.	तिची आई म्हैसूरला असते/रहाते.
आम्हाला आई आहे. आमच्या आईचं नाव शांता आहे.	आमची आई जळगावला असते/ रहाते.
तुम्हाला आई आहे. तुमच्या आईचं नाव दुर्गा आहे.	तुमची आई गोव्याला असते/रहाते.
त्यांना आई आहे.	त्यांची आई सांगलीला असते/रहाते.

त्यांच्या आईचं नाव रेखा आहे.

मला दोन भाऊ आहेत.	माझा एक भाऊ शाळेत शिकतो आहे.
माझा दुसरा भाऊ कॉलेजात शिकतो आहे.	
माझा एक भाऊ पुण्याला असतो.	माझा दुसरा भाऊ मुंबईला असतो.
माझ्या एका भावाचं नाव शरद आहे.	माझ्या दुसऱ्या भावाचं नाव रमेश आहे.

सुशीलाला दोन बहिणी आहेत.

सुशीलाची एक बहीण शाळेत शिकते आहे.

सुशीलाची दुसरी बहीण कॉलेजात शिकते आहे.

सुशीलाची एक बहीण पुण्याला असते.

सुशीलाची दुसरी बहीण मुंबईला असते.

सुशीलाच्या एका बहिणीचं नाव कमल आहे.

सुशीलाच्या दुसऱ्या बहिणीचं नाव देवकी आहे.

II

Question-Answer Drill

तुझं नाव काय ?	माझं नाव पंढरीनाथ.
तू कुठून आला आहेस ?	मी म्हैसूरहून आलो आहे.
तुझं नाव काय ?	माझं नाव सुमती.
तू कुठून आली आहेस ?	मी बेळगावहून आले आहे.
तुमचं नाव काय ?	माझं नाव विनायक.
तुम्ही कुठून आला आहात ?	मी मुंबईहून आलो आहे.

तुमचं नाव काय ?	माझं नाव शीला.
त्याचं नाव काय ?	त्याचं नाव व्यंकट.
तो कुठून आला आहे ?	तो आंध्रहून आला आहे.
तिचं नाव काय ?	तिचं नाव ललिता.
ती कुठून आली आहे ?	ती बंगलोरहून आली आहे.
त्यांचं नाव काय ?	त्यांचं नाव पद्माकर.
पद्माकर कुठून आले आहेत ?	पद्माकर भोपाळहून आले आहेत.
त्यांचं नाव काय ?	त्यांचं नाव सरोज.
त्या कुठून आल्या आहेत ?	त्या बडोद्याहून आल्या आहेत.

2

तू कुठला ?	मी म्हैसूरचा.
तू कुठली ?	मी बेळगावची.
तुम्ही कुठले ?	मी मुंबईचा / आम्ही मुंबईचे
तुम्ही कुठल्या ?	मी सोलापूरची
तो कुठला ?	तो आंध्रचा
ती कुठली ?	ती बंगलोरची
ते कुठले ?	ते भोपाळचे
त्या कुठल्या ?	त्या बडोद्याच्या

III

Fill in the blanks Drill

Fill the blanks selecting the correct form from the bracket.

(कंसातून योग्य तो शब्द निवडून रिकाम्या जागी भरा.)

.... आई आहे. (माझी, मला, माझ्या)

.... बहीण मुंबईला असते. (आम्हाला, आमची, आमच्या)

.... भाऊ कुठे असतात ? (तुझे, तुला, तुझा)

.... वडील आहेत का ? (त्याचे, त्याला, त्याचा)

.... वर्ग मोठा आहे. (आपला, आम्ही, आपल्याला)

.... दोन मैत्रिणी आहेत. (तिच्या, तिला, तिची)

.... नाव विजया आहे. (त्यांचं, तिला, त्यांना)

.... तीन बहिणी नाहीत. (मला, माझ्या, मी)

.... दुसऱ्या भावाचं नाव काय ?(त्याच्या, त्याचा, त्याला)

.... भाऊ नोकरी करतो. (तुम्हाला, तुमचे, तुमचा)

......चार भावंडं परदेशात आहेत. (सुभाषला, सुभाषची, सुभाषचे)

.... मुलगा नाही. (मीनाचा, मीनाजवळ, मीनाला)

.... चार मुली आहेत. (सुशीलाच्या, सुशीलाला, सुशीलाची)

.... दोन मुलगे शिकताहेत. (त्यांच्या, त्यांना, त्यांचे)

.... आईवडील धुळ्याला असतात. (रमेशचे, रमेशची,रमेशचा)

IV

Substitution Drill

Substitute the underlined word with the given words, adding the correct postposition to them.

(अधोरेखित शब्दाऐवजी पुढील शब्दांना योग्य तो प्रत्यय लावून वाक्य लिहा.)

मला दोन भाऊ आहेत.	मला दोन भाऊ आहेत.
शरद	जोशीसाहेब
ते (m. pl.)	तुम्ही
आपण	त्या
श्रीमती साठे	पत्नीबाई
तू	तो
आम्ही	ती
माझी मैत्रीण	माधवचे वडील

V

Conversation Drill

अ : नमस्ते, तुमचं नाव काय आहे ?

ब : माझं नाव प्राची मराठे. तुमचं नाव काय ?

अ : माझं नाव व्यंकट नरहरी.

प्राची : तुम्ही कुठून आला आहात ?

व्यंकट : मी आंध्रप्रदेशातून आलो आहे. आणि तुम्ही कुठल्या ?

प्राची : मी पुण्याचीच. तुम्ही इथे काय करता ?

व्यंकट : मी इथे नोकरी करतो.

प्राची : कुठे ?

व्यंकट : मी फॅक्टरीत इंजिनीयर आहे. तुम्ही काय करता?

प्राची : मी सुद्धा पुण्याला नोकरी करते. मी शिक्षिका आहे. तुमचे आईवडील कुठे असतात ?

व्यंकट : मला वडील नाहीत. माझी आई आंध्रला असते. आम्ही चार भावंडं. मी सर्वात मोठा. मला दोन मुलं आहेत. एक मुलगा आणि एक मुलगी.

प्राची : तुमची बायकोसुद्धा नोकरी करते का ?

व्यंकट : नाही. माझी बायको घरीच असते.

प्राची : मला भावंडं नाहीत. मी एकटी आहे. माझे वडील डॉक्टर आहेत. माझ्या वडलांचा दवाखाना शुक्रवार पेठेत आहे. आम्ही शुक्रवार पेठेत रहातो.

व्यंकट : आम्ही वरंगळला रहातो. वरंगळला आमचं मोठं घर आहे. तुम्ही कधी आंध्रप्रदेशात जाता का ?

प्राची : नाही, कधीच नाही.

व्यंकट : मग एकदा आंध्रला जरूर भेट द्या.

प्राची : अच्छा नमस्ते.

व्यंकट : नमस्ते.

स्वाध्याय क्र.३१ **Exercises No.31**

1 Answer the following questions.

(खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.)

तुमचं नाव काय ?
तुम्ही कुठून आलात ?
तुम्ही कुठे रहाता ?
तुम्ही काय करता ?
तुमचे आईवडील कुठे असतात ?
तुम्हाला किती भावंडं आहेत ?
तुमचे वडील काय करतात ?
तुमची आई नोकरी करते का ?
तुमचं घर आहे का ?
तुमच्याजवळ सायकल आहे का ?

2A. Fill in the blanks using appropriate words.

विजया .... रहाते. विजयाच्या .... नाव श्रीधर आहे. विजयाची .... धुळ्याला असते. विजया .... तीन .... आणि दोन .... आहेत. विजया .... धाकट्या .... नाव मीना आहे. विजया .... भाऊ प्रभाकर तिचा .... मोठा भाऊ आहे. विजयाचा .... भाऊ फॅक्टरीत आहे. .... भाऊ परदेशात आहे. .... भाऊ इंजिनीयर आहे. विजयाची .... बहीण .... असते. विजयाची .... नोकरी करत नाही. विजया .... नोकरी

करते. विजया .... पाच .... आहेत.

2B. **Fill in the blanks using the correct interrogative words.**

(रिकाम्या जागेत योग्य ते प्रश्नवाचक शब्द भरा.)

तो .... रहातो ? तुम्ही .... ?

तिला आई आहे .... ? त्यांना .... भावंडं आहेत ?

त्या .... करतात ? ते .... धुळ्याला जातात ?

तो .... मुलगा आहे ? तुझं नाव .... ?

तू .... आली आहेस ?

3 **Complete the following sentences using the proper forms of the words given in the bracket.**

(कंसात दिलेल्या शब्दांची योग्य रूपे वापरून पुढील वाक्ये पूर्ण भरा.)

मी (कॉलेज) नोकरी करतो.

तो (मुंबई) रहातो.

(सुधीर) दोन भाऊ आहेत.

(मी) पाच पेन्सिली आहेत.

(श्री. माटे) वडील नाहीत.

मालती (बडोदं) आली आहे.

(ती) भाऊ (ती) मोठा आहे.

(ते) आई आहे. (ते) आईचं नाव सुहासिनी आहे.

(मी) (भाऊ) एक मुलगा आहे.

(तो) (सर्व) (मोठा) भावाचं नाव राघवेंद्र आहे.

4 **Arrange the following words in a proper sequence to make a sentence.**

(खाली दिलेले शब्द योग्य क्रमाने मांडून वाक्ये बनवा.)

१ मोठे, दोन, माझ्यापेक्षा, आहेत, भाऊ, मला.

२ आहे, नेन्यांची, धाकटी, कुटून, उंच, आली, बहीण, सर्वात?

३ मुंबईला, मित्राचे, इंजिनीयर, तिच्या, आहेत, वडील, फॅक्टरीत.

४ मुलगी, आमच्या शिकते, फलटणच्या, छोटी, बहिणीची, धाकट्या, आहे, शाळेत.

५ नाहीत, शेतं, त्याच्या, कोल्हापूरला, भावांची, मित्राच्या, हिरवीगार, दोन.

६ आडनाव, गोऱ्या, काटे, का, सुनेत्राचं, आहे, तिच्या ?

७ भाऊ, तिचा, आहेत, तिला, तीन, एक, असतो, कॉलेजात, भाऊ.

८ घरी, मित्राच्या, गायी, वडलांच्या, सुंदर, तुमच्या, पांढऱ्या, आहेत, दोन.

९ डोंगरावर, लहान, आहे, आणि, देऊळ, स्वच्छ, मारुतीचं, हिरव्या.

१० इमारत, मोहनच्या, गावाच्या, उंच, आहे, शाळेची, बाहेर.

5 Write a small narration about 'My family'

'माझं कुटुंब' याविषयी थोडक्यात माहिती लिहा.

Vocabulary

Col. 1		Col. 2
आडनाव	(n)	family name, surname
एकटा	(adj)	alone, only (child)
एकूण	(adj)	in all

ओळख	(f)	introduction
कुठला	(int)	where from
कुठून	(int)	where from
दिवाळी	(f)	Diwali (festival)
धाकटा	(adj)	young
नवरा	(m)	husband
नाव	(n)	name
नोकरी	(f)	job, service
परदेश	(m)	foreign country
भावंड	(n)	sibling
मधला	(adj)	middle (one)
वडील	(m)	father
शिकणे	(v.tr.)	to learn
सुट्टी	(f)	vacation

Grammatical Notes

Unit - IX, Lesson 31, is about introducing oneself e.g. -तुमचं नाव काय? 'What is your name ?'

I. Nouns / Pronouns / Proper Nouns + ला + आहे is used in following cases :

1. **Relationship :**

   मला आई आहे. **'I have mother'.**

2. **Part of the whole :**

   खोली-ला दार आहे. **'The room has a door'.**

3. **Part of the body :**

   मला दोन डोळे आहेत. **'I have two eyes'.**

   माणसा-ला दोन डोळे **'Man has two eyes'.**

असतात.

II Relationship, ownership or temporary possession of a thing is expressed in the following way :

Relationship :	माझे वडील	'My father'
Ownership :	माझी मोटार	' My car'
Possession :	माझ्याजवळ/कडे दोन पुस्तकं आहेत.	'I have two books'.

III आई-वडील 'parents' and बहीण-भाऊ 'sister(s) and brother(s) are compound words.

IV Previous Location :

तू कुठून आलास ?(m)
तू कुठून आलीस ?(f) 'Where have you come from ?'
तुम्ही कुठून आलात ?(pl)

Ancestral Home :

तू कुठला ? (m)
तू कुठली ? (f) 'Where are you from ?'
तुम्ही कुठले ? (pl)

The forms of the Past Tense which are used in the above expression are as follows :

ये - 'to come' past base आ -

	Singular	Plural
I Person :	मी आलो. (m) मी आले. (f)	आम्ही आलो.
II person :	तू आलास. (m) तू आलीस. (f)	तुम्ही आला. (त)
III person :	तो आला. (m) ती आली. (f)	ते आले. त्या आल्या.

	ते आलं. (pl)	ती आली.
V.कुठून :	कुठे + ऊन	
	'Where' + 'from'	

ऊन is an adverbial suffix which marks the starting point. Its corresponding postposition is हून which is added to place names : e.g. धुळं 'Dhule' - धुळ्याहून 'from Dhule', मुंबई 'Bombay' - मुंबईहून 'from Bombay', नगर 'Nagar' - नगरहून 'from Nagar'.

The suffix ला is added to कुठे to form a possessive adjective.

		sg.	pl.
SF:	(m)	कुठला	कुठले
	(f)	कुठली	कुठल्या
	(n)	कुठलं	कुठली
OF :			कुठल्या

VI

The following are collective nouns indicating groups of 2,3 etc.

Masculine forms : (two males, three males etc.)

दोघे / दोघे जण / दोन जण	(for two males)
तिघे / तिघे जण / तीन जण	(for three males)
चौघे / चौघे जण / चार जण	(for four males)

From पाच onwards there is no alternative form : e.g. पाच जण, सहा जण, सात जण etc.

Feminine forms : (two females, three femeales etc.)

दोघी / दोघी जणी / दोन जणी	(for two females)
तिघी / तिघी जणी / तीन जणी	(for three females)

चौघी / चौघी जणी / चार जणी (for four females)

From पाच onward there is no alternative form : पाच जणी, सहा जणी, सात जणी etc.

For a mixed male and feminine group the neuter forms are used e.g. दोघं, तिघं, चौघं etc. जण also takes the neuter form जणं. Thus तिघं जणं, पाच जणं etc.

जण is not a suffix : दोघे जण, दोघा जणां-चा 'of the two'.

गट - ९	Unit-IX
धडा बत्तिसावा	**LESSON 32**
घरातली कामं	Works at home

माझा एक मित्र केतकर पथावर रहातो.	A friend of mine lives at Ketkar road.
त्याचं नाव अजय आहे.	His name is Ajay.
तिथून जवळच माझा दुसरा मित्र रहातो.	Another friend of mine stays not far from (near) there.
त्याचं नाव संजय आहे.	His name is Sanjay.
संजयच्या घराजवळून एक बस मंडईला जाते.	A bus goes to Mandai from near Sanjay's house.
संजय त्या बसनी दर रविवारी सकाळी मंडईत जातो.	Sanjay goes to Mandai every Sunday morning by that bus.
आणि तिथली ताजी भाजी आणतो.	And brings fresh vegetables from there.
संजयच्या घराशेजारी धान्याचं दुकान आहे.	There is a foodgrain shop near Sanjay's house.
संजय घराशेजारच्या दुकानातून धान्य विकत घेतो.	Sanjay buys foodgrains from the shop which is near his house.
त्या दुकानातला माल चांगला असतो.	The goods in that shop is good.
संजयच्या घरामागे मोकळी जागा आहे.	There is an empty space behind Sanjay's house.

संजयचे वडील घरामागच्या जागेत फुलझाडं लावतात.	Sanjay's father cultivates flowering plants in the space behind the house.
संजयची बायको बागेतली फुलं फुलदाणीत ठेवते.	Sanjay's wife puts the flowers from the garden in a flowerpot.
संजयची मुलं घराजवळच्या शाळेत जातात.	Sanjay's children go to the school (which) is near the house.
पण संजयचा कारखाना घरापासून दूर आहे.	But Sanjay's factory is away from (his) house.
संजय सकाळी बसनी कारखान्यात जातो.	Sanjay goes to the factory in the morning by bus.
दुपारी तो तिथल्या मेसमध्ये जेवतो.	He takes (his) lunch in the mess (which) in the factory.
संध्याकाळी तो कारखान्यातून परत येतो.	He comes back from the factory in the evening.
कारखान्याशेजारी एक दवाखाना आहे.	There is a dispensary near the factory.
कारखान्यातले लोक तिथून औषधं घेतात.	The people in the factory take medicines from there.
संजयच्या घरातली सगळी माणसं रात्री एकत्र जेवतात.	All the members in Sanjay's house take dinner together.
मुलं शाळेतल्या गंमती सांगतात.	The children tell the funs in the school.

संजय कारखान्यातल्या गोष्टी सांगतो.	Sanjay tells the matters in the factory.
संजयचे वडील पेपरातल्या बातम्या सांगतात.	Sanjay's father tells the news from (in) the newspaper.
संजयची आई सर्वांना तव्यावरच्या गरमागरम चपात्या वाढते.	Sanjay's mother serves the hot chapatis from the pan to all.
रविवारी संजय घरातली कामं करतो.	Sanjay works in the house on Sunday.
तो घरातले दिवे, पंखे पुसतो.	He cleans the fans, lamps in the house.
कपाटामागचा, खाटेखालचा केर काढतो.	He cleans garbage behind the cupboard and cot.
फोटोंवरची, चित्रांवरची धूळ पुसतो.	(He) wipes the dust on the photographs and pictures.
संजयची आई खाटेवरच्या चादरी आणि खिडक्यांवरचे पडदे बदलते.	Sanjay's mother changes the sheets on the cot and the curtains on the windows.
संजयच्या घरात रस्त्यावरची धूळ फार येते.	The dust on the road enters in Sanjay's house.
पण संजय आपलं घर स्वच्छ ठेवतो.	But Sanjay keeps his house clean.

Drills

1

Repetition Drills

मी खुर्चीवर कागद ठेवतो. मी खुर्चीवरून कागद उचलतो.
मी खुर्चीवरचा कागद फायलीत ठेवतो.
तू टेबलाखाली चपला ठेवतेस. तू टेबलाखालून चपला काढतेस.
तू टेबलाखालच्या चपला घालतेस.
तो इकडे येतो. तो इकडून तिकडे जातो.
तो इकडचे खडू तिकडे ठेवतो.
ती इथे उभी रहाते. ती इथून लौकर निघते.
ती इथल्या वस्तू पिशवीत ठेवते..
आम्ही बसमध्ये चढतो. आम्ही बसमधून उतरतो.
आम्ही बसमधल्या सूचना वाचतो.
तुम्ही गावाबाहेर जाता. तुम्ही गावाबाहेरून फोन करता.
तुम्ही गावाबाहेरची शेतं पहाता.
ते दुकानात जातात. ते दुकानातून बाहेर येतात.
ते दुकानातल्या वस्तू विकत घेतात.
तू ही पेन्सील तिथे ठेव. तू पेन्सील तिथून उचल.
तू तिथली पेन्सील घेऊ नकोस.
घरासमोर रस्ता आहे. ही बस घरासमोरून जाते.
घरासमोरचा रस्ता अरुंद आहे.
त्या गाडीमागे धावतात. त्या गाडीमागून पुढे जातात.
त्या गाडीमागच्या रिक्षात बसतात.
दुकानापुढे मोठी रांग आहे. पोलिसांची गाडी दुकानापुढून जाते.
दुकानापुढची रांग मोडते.
तिच्या आईजवळ किल्लया आहेत. ती आईजवळून किल्ल्या घेते.
ती आईजवळच्या किल्लीनी दार उघडते.

रिक्षावाले, मंडईकडे चला. रिक्षावाले,रिक्षा मंडईकडून

मी मंडईकडच्या दुकानात जातो. स्वारगेटला न्या.

II

Question-Answer Drill

हा कोण आहे ?	हा विजय आहे.
विजय कुठे रहातो ?	विजय बागेजवळ रहातो.
विजय कुठल्या शाळेत जातो ?	विजय घराजवळच्या शाळेत जातो.
विजय कुठून शाळेत जातो ?	विजय बागेसमोरून शाळेत जातो.
हा कोण आहे ?	हा संजय आहे.
संजय कुठे काम करतो ?	संजय कारखान्यात काम करतो.
संजय कुठून घरी येतो ?	संजय कारखान्यातून घरी येतो.
कुठले लोक मेसमधे जेवतात ?	कारखान्यातले लोक मेसमधे जेवतात.
संजय कुठल्या मेसमधे जेवतो ?	संजय कारखान्यातल्या मेसमधे जेवतो.
संजयचे बडील कुठे झाडं लावतात ?	संजयचे बडील घरामागच्या जागेत झाडं लावतात.
संजयची बायको कुठली फुलं घेते ?	संजयची बायको बागेतली फुलं घेते.
संजय कुठला केर काढतो ?	संजय कपाटामागचा केर काढतो. तो खाटेखालचा केर काढतो.
ही बस कुठे जाते ?	ही बस स्वारगेटला जाते.
ही बस कुठून जाते ?	ही बस मंडईकडून जाते.
तुम्ही कुठल्या जागेवर बसता ?	मी खिडकीजवळच्या जागेवर बसते.

III

Singular-Plural Drill

Transform the following sentences into the plural.

(खालील वाक्ये अनेकवचनात लिहा.)

इथला आंबा महाग असतो.	इथले आंबे महाग असतात.
इथली बाग सुंदर आहे.	इथल्या बागा सुंदर आहेत.
इथलं देऊळ छान आहे.	इथली देवळं छान आहेत.
मधला खांब उंच आहे.	मधले खांब उंच आहेत.
मधली मुलगी हुशार आहे.	मधल्या मुली हुशार आहेत.
मधलं घर जुनं आहे.	मधली घरं जुनी आहेत.
इकडचा पंखा लाव.	इकडचे पंखे लाव.
इकडची खोली स्वच्छ कर.	इकडच्या खोल्या स्वच्छ कर.
इकडचं स्टूल तिकडे ठेव.	इकडची स्टुलं तिकडे ठेव.
पुढचा रस्ता सरळ आहे.	पुढचे रस्ते सरळ आहेत.
पुढची गाडी निळी आहे.	पुढच्या गाड्या निळ्या आहेत.
पुढचं दुकान मोठं आहे.	पुढची दुकानं मोठी आहेत.
आतला दिवा बंद कर.	आतले दिवे बंद कर.
आतली खुर्ची बाहेर ठेव.	आतल्या खुर्च्या बाहेर ठेव.
आतलं दार उघड.	आतली दारं उघड.

IV

1

Fill in the gaps Drills

Fill in the gaps with the correct form of इथे, इथून or इथला (variable)

(इथे, इथून किंवा इथला या विशेषणाचे किंवा क्रियाविशेषणाचे योग्य रूप वापरून रिकाम्या जागा भरा.)

.... साड्या टिकाऊ असतात. माझं घर .... लांब

आहे. आम्ही रोज .... बसतो. .... पुस्तक कुठे आहे ? माझा .... बंगला खूप सुंदर आहे. .... घरं लाल आहेत. त्याची वही .... ठेव. तुझ्या चपला .... बाहेर ठेव. .... बागेसमोर खूप गाड्या असतात. .... मुलगी रडते आहे. .... दुकान खूप मोठं आहे. .... लोक श्रीमंत आहेत. ही बस .... कुठे जाते ? .... घड्याळं मिळत नाहीत.

2

Fill in the gaps with the correct form of शाळेत, शाळेतून, शाळेतला **(Variable)**

(शाळेत, शाळेतून ही रूपे किंवा शाळेतला या विशेषणाची योग्य रूपे योग्य त्या रिकाम्या जागी भरा.)

आमच्या .... पाचशे विद्यार्थी आहेत.

ह्या .... सर्व विद्यार्थी हुशार आहेत.

मी .... घरी जातो.

.... शिक्षक भाषा शिकवतात.

तो .... वह्या घरी नेतो.

मोहनच्या .... घड्याळ मोठं आहे.

श्रीकांत .... गाणी म्हणतो.

.... शिक्षकांजवळ पेन्सिली आहेत.

रमेश .... सर्वात उंच विद्यार्थी आहे.

तुमच्या .... मीना इकडे येते आहे.

ती .... पेन्सिली आणते.

त्याच्या .... आंब्याची झाडं आहेत.

मधल्या सुट्टीत .... सर्व शिक्षिका चहा पितात.

3

Fill in the gaps with the correct form of the adjective of place derived from the words given in the bracket.

(कंसातल्या शब्दापासून स्थानदर्शक विशेषण बनवून त्याचे योग्य-रूप रिकाम्या जागी भरा.)

अविनाश (पुस्तक) .... धडा वाचतो.

(प्राचार्य) .... खुर्चीवर उपप्राचार्य बसतात.

(झाड) .... सावली थंडगार आहे.

(नदी) .... पूल उंच आणि रुंद आहे.

संध्याकाळी (रस्ता) .... दिवे लागतात.

(नळा) .... बादलीत पाणी आहे.

बंगाली लोक (समुद्र) .... मासे खात नाहीत.

ते (तळं) .... मासे खातात.

ती (पंखा) .... खुर्ची वसुधाची आहे.

गोपाळराव (दार) .... काठी घेतात आणि फिरायला जातात.

पोलीस (मोटार) .... नंबर लिहितो.

लोक बसमधे (मागे) .... दारातून चढतात आणि (पुढे) .... दारातून उतरतात.

श्री. गुप्तांच्या (खोली) .... खोली माझी आहे.

V

Conversation Drill

शिक्षक : मुलांनो, तुम्ही शाळेत येता आणि काय करता ?

विद्यार्थी : गुरुजी, आम्ही शाळेत येतो आणि अभ्यास करतो.

शिक्षक : तुम्ही शाळेतून कुठे जाता ?

विद्यार्थी : आम्ही शाळेतून घरी जातो.

शिक्षक : अशोक, आपल्या शाळेतले विद्यार्थी खूप अभ्यास करतात का ?

अशोक : हो, आपल्या शाळेतले विद्यार्थी खूप अभ्यास करतात.

शिक्षक : नीला, आपल्या शाळेसमोर पटांगण आहे का ?

नीला : हो, आपल्या शाळेसमोर पटांगण आहे.

शिक्षक : आपल्या शाळेसमोरचं पटांगण कसं आहे ?

नीला : आपल्या शाळेसमोरचं पटांगण खूप मोठं आहे आणि खूप स्वच्छ आहे.

शिक्षक : प्राची, आपल्या शाळेसमोरून खूप मोटारी जातात का ?

प्राची : हो, आपल्या शाळेसमोरून खूप मोटारी जातात.

शिक्षक : निर्मला, संध्याकाळी तू काय करतेस ?

निर्मला : मी शाळेतून घरी जाते. घरून मैत्रिणीकडे जाते. मैत्रिणीकडून मंडईत जाते. मंडईतून ताजी भाजी आणते. मंडईतली भाजी ताजी असते.

शिक्षक : वा, वा. छान. मुलांनो, आता तुम्ही पटांगणावर जा आणि खेळा.

स्वाध्याय ३२ वा Excercise No 32

1. **Complete the following conversation filling in the blanks with questions.**

(रिकाम्या जागी योग्य ते प्रश्न भरून पुढील संवाद पूर्ण करा.)

अ .... ?

ब माझं नाव सुषमा.

अ .... ?

ब मी फलटणहून आले आहे.

अ .... ?

ब फलटणची हवा थंड आहे.

अ .... ?

ब हो. खूप दुकानं आहेत.

अ .... ?

ब नाही. फलटणमधली दुकानं मोठी नाहीत.

अ .... ?

ब नाही. तिथले रस्ते रुंद नाहीत.

अ .... ?

ब नाही. घरंसुद्धा सुंदर नाहीत.

अ .... ?

ब भाज्या मात्र ताज्या असतात.

अ .... ?

ब हो, माझं तिथं एक शेत आहे.

अ .... ?

ब हो. मी दर रविवारी फलटणहून पुण्याला येते.

2A. Substitute the underlined word with the correct form of the given words.

(दिलेल्या शब्दांची योग्य रूपे करून ती अधोरेखित शब्दाच्या जागी भरा.)

मी इथली भाजी आणते. मी इथली भाजी आणते.

तिथे	इकडे
मंडई	दुकान
घर	बाग
तिकडे	शाळा

गाव	समोर

2B. **Substitute the underlined word with the given words making necessary changes in the sentence.**

(वाक्यात योग्य ते बदल करून अधोरेखित शब्दाऐवजी दिलेले शब्द घाला.)

तो घरातल्या **वस्तू** विकतो.	तो घरातल्या **वस्तू** विकतो.
पंखा	भांडी
टेबल	खुर्च्या
पुस्तकं	रेडिओ
कपाट	गाय
तांदूळ	पडदे

3A. **Fill in the blanks in the sentences, selecting the correct word from the left hand column.**

(डावीकडचा योग्य तो शब्द निवडून उजवीकडच्या वाक्यांमधल्या योग्य त्या रिकाम्या जागी भरा.)

दुकानात	ह्या .... दोन दारं आहेत.
दुकानातून	ह्या .... रंग हिरवा आहे.
दुकानाच्या	ह्या .... नाव 'वैशाली' आहे.
दुकान	ह्या .... पंखे मोठे आहेत.
दुकानातला	मी ह्या .... साड्या विकत घेते.
दुकानाजवळ	ह्या .... दारं मोठी आहेत.
दुकानाचा	ह्या .... मोठी पाटी आहे.
दुकानाचं	ह्या .... भिंती कशा आहेत?
दुकानासमोरून	ह्या .... मालक कोण आहेत?
दुकानातले	ह्या .... माल स्वस्त असतो.
दुकानाचे	ह्या .... एक शाळा आहे.

दुकानातल्या	ह्या	.... चांगल्या साड्या आहेत.
दुकानाला	ह्या	.... साड्या भारी आहेत.
दुकानाची	ह्या	.... खूप मोटारी जातात.
दुकानावर	हे	.... आहे.

Rearrange the sentences which you have completed in 3A in a proper sequence.
(प्रश्न ३अ मध्ये पूर्ण केलेली वाक्ये योग्य त्या क्रमाने पुन्हा लिहा.)

4 **Adding postpositions simple adverbial and adjectival to the noun पुणं complete the following sentences.**

'पुणं' ह्या नामाला क्रियाविशेषणात्मक, विशेषणात्मक आदि प्रत्यय लावून पुढील वाक्ये पूर्ण करा.

.... हवा थंड असते. .... खूप शाळा आहेत. .... शाळा खूप मोठ्या आहेत. .... रस्ते अरुंद आहेत. मी .... धुळ्याला जाते. आम्ही सर्व साड्या .... घेतो. .... लोक 'सकाळ' वाचतात. ते .... स्वस्त आणि छान भाज्या आणतात. .... मंडई मोठी आहे. .... बायका स्कूटर चालवतात.

5 **Select the correct form from the bracket and complete the following sentences.**

(कंसातला योग्य शब्द निवडून पुढील वाक्ये पूर्ण करा.)

१ मोहन रोज (बसमधून / बसनी / बसहून) शाळेत जातो.
२ तू (इथे / इथून / इथले) आंबे खाऊ नकोस.
३ तो (कुठे / कुठून / कुठला) ?
४ त्या मुली (वर्गात / वर्गाच्या / वर्गाहून) जाताहेत.

५ ती पुस्तकं (खोलीतली/खोलीतल्या/खोलीची) कपाटात ठेव.

६ आम्ही आमच्या चपला (कपाटातून/कपाटात/कपाटाच्या) काढतो.

७ त्याची गाडी (पुलाखालून / पुलात / पुलाची) जाते.

८ मीना (इकडून / इकडे / इकडची) घरी पळते.

९ आमच्या (शाळेतली / शाळेची / शाळेत) इमारत मोठी आहे.

१० ह्या (खाटेवरची / खाटेवरून / खाटेवरच्या) चादर बदल.

Vocabulary

एकत्र	(adv.)	together	धूळ	(f)	dust
औषध	(n)	medicine	पथ	(m)	road
केर	(m)	garbage	बस	(f.)o	bus
गरम	(adj)	hot	बातमी	(f)	news
चपाती	(f)	chapati	मंडई	(f)	veg etable market
चादर	(f)i	bedsheet	माल	(m)	goods
तवा	(m)	pan	मेस	(f)o	mess
ताजा	(adj)	fresh	मोकळा	(adj)	empty
तिथे	(adv)	there	फुलदाणी	(f)	flowerpot
दवाखाना	(m)	dispensary			

Grammatical Notes

Unit - IX, Lesson 32, gives the adverbs of direction or starting point and possessive adjectives made from adverbs.

Some of the adverbs in Marathi are used as postposistions and they are added after the OF of nouns. The adverbs of direction and the adverbial adjectives are obtained by adding

the suffixes ऊन and ला/चा respectively. The adverbial adjectives are variable. These postpositions are added to the OF of nouns.

The following table will give an idea of the forms mentioned above.

Adverbs of location	Adverbs of dircection (starting point)	Adverbial Adjectives (M.Sg. Only)
	+ऊन	+चा/ला
इथे	इथून	इथला
तिथे	तिथून	तिथला
मधे	मधून	मधला
आत	आतून	आतला
इकडे	इकडून	इकडचा
तिकडे	तिकडून	तिकडचा
बाहेर	बाहेरून	बाहेरचा
वर	वरून	वरचा
खाली	खालून	खालचा
मागे	मागून	मागचा
पुढे	पुढून	पुढचा
समोर	समोरून	समोरचा
जवळ	जवळून	जवळचा
कुठे	कुठून	कुठला
-कडे	-कडून	-कडचा
-त	-तून	-तला

Examples :

भाजीवाला समोर आहे.

'The vegetable man is in front'.

भाजीवाला समोरून येतो.

'The vegetable man came from front'.

समोरचा भाजीवाला भाजी विकतो आहे.

'The vegetable man(who is) in front is selling vegetable.

भाजीवाला आमच्या घरा-समोर आहे.

'The vegetable man is in front of our house'.

भाजीवाला आमच्या घरा-समोरून येतो.

'The vegetable man comes from the front of our house'.

भाजीवाल्या-समोरची भाजी ताजी आहे.

'The vegetable (which is) in front of the vegetable man is fresh'.

गट - १०

Unit-X

धडा तेहेतिसावा

LESSON 33

तिघांची आवड

Choice of the three

शिक्षक -	**Teacher -**
मुलांनो ही तीन भावंडं पहा.	Children, look at these three siblings.
रोहिणी, कमल आणि सतीश.	Rohini, Kamal and Sateesh.
रोहिणी रोज दोन कप चहा पिते.	Rohini takes two cups of tea everyday.
रोहिणीला चहा फार आवडतो.	Rohini likes tea very much.
तिला कॉफी आवडत नाही.	She does not like coffee.
सतीश सकाळी कॉफी पितो.	Sateesh takes coffee in the morning.
सतीशला कॉफी फार आवडते.	Sateesh likes coffee very much.
त्याला चहा आवडत नाही.	He does not like tea.
आणि कमल रोज सकाळी दूध पिते.	And Kamal drinks milk everyday morning.
कमलला चहा किंवा कॉफी मुळीच आवडत नाही.	Kamal does not like tea or coffee at all.
तिला फक्त दूध आवडतं.	She likes milk only.
मुलांनो, नीट ऐका.	Children, listen carefully.
रोहिणीला चहा आवडतो.	Rohini likes tea.
सतीशला कॉफी आवडते.	Sateesh likes coffee.

आणि कमलला दूध आवडतं	And Kamal likes milk.
तिघांच्या तीन तऱ्हा.	Three different ways of the three.
त्यामुळे सकाळी त्यांच्या आईची धांदल उडते.	Because of this, their mother is at a loss.
कारण रोहिणी म्हणते,''आई, मला चहा हवा आहे.''	Because Rohini says,"Mother, I want tea."
सतीश म्हणतो,''आई, मला कॉफी हवी आहे.''	Sateesh says,"Mother I want coffee."
आणि कमल म्हणते,''आई, मला दूध हवं आहे.''	And Kamal says, " Mother, I want milk."
आणि तिघंही म्हणतात,''आई, आम्हाला बिस्किटंपण पाहिजेत. आम्हाला दुसरा खाऊ नको.''	And all the three say, "Mother, we want biscuits also. We do not want any other snack."
तिघंही शाळेत डबा नेतात.	All the three take tiffin for the school.
सतीश म्हणतो,''आई, मला डब्यात बटाट्याची भाजी हवी. मला बटाट्याची भाजी खूप आवडते.''	Sateesh says, " Mother, I want potato curry in lunch. I like potato curry very much.
रोहिणी म्हणते, ''मला डब्यात सफरचंद पाहिजे. आणि काकडी पण पाहिजे. फक्त पुऱ्या नकोत.''	Rohini says, " I want an apple in (my) lunch and a cucumber. I Don't want only puries."
आणि कमल म्हणते,"आई, मला	And kamal says, "Mother, I

जिलब्या हव्या आहेत हं.''	want jilbies."
अशा त्यांच्या तऱ्हा.	Thus are their ways.
मग कधी आईला राग येतो.	Then sometimes mother gets annoyed.
ती म्हणते, ''अरे, तुम्हाला समजत नाही का? मला फक्त दोन हात आहेत.''	She says," Hay, don't you understand ? I have only two hands (to work)."
मुलांनो मला फार गंमत वाटते. तुम्ही पण एकदा त्यांच्या घरी जा आणि ही गंमत पहा.	Children this amuses me very much. You also go to their house sometime and see this fun.

Drills

I

Repetition Drills

1

मला चहा आवडतो.	आम्हाला चहा आवडतो.
तुला चहा आवडतो.	तुम्हाला चहा आवडतो.
आपल्याला चहा आवडतो.	
त्याला चहा आवडतो.	त्यांना चहा आवडतो.
तिला चहा आवडतो.	त्याला चहा आवडतो.
मला कॉफी आवडते.	आम्हाला कॉफी आवडते
तुला कॉफी आवडते.	तुम्हाला कॉफी आवडते.
त्याला कॉफी आवडते.	आपल्याला कॉफी आवडते.
तिला कॉफी आवडते.	त्यांना कॉफी आवडते.
मला दूध आवडतं.	आम्हाला दूध आवडतं.

तुला दूध आवडतं.	तुम्हाला दूध आवडतं.
त्याला दूध आवडतं.	आपल्याला दूध आवडतं.
तिला दूध आवडतं.	त्यांना दूध आवडतं.
मला पेढे आवडतात.	आम्हाला पेढे आवडतात.
तुला पेढे आवडतात.	तुम्हाला पेढे आवडतात.
त्याला पेढे आवडतात.	आपल्याला पेढे आवडतात.
तिला पेढे आवडतात.	त्यांना पेढे आवडतात.
मला जिलब्या आवडतात.	आम्हाला जिलब्या आवडतात.
तुला जिलब्या आवडतात.	तुम्हाला जिलब्या आवडतात.
त्याला जिलब्या आवडतात.	आपल्याला जिलब्या आवडतात.
तिला जिलब्या आवडतात.	त्यांना जिलब्या आवडतात.
मला केळी आवडतात.	आम्हाला केळी आवडतात.
तुला केळी आवडतात.	तुम्हाला केळी आवडतात.
त्याला केळी आवडतात.	आपल्याला केळी आवडतात.
तिला केळी आवडतात.	त्यांना केळी आवडतात.

2

मला चहा हवा आहे / पाहिजे.	आम्हाला चहा हवा आहे / पाहिजे.
तुला चहा हवा आहे / पाहिजे.	तुम्हाला चहा हवा आहे / पाहिजे.
आपल्याला चहा हवा आहे / पाहिजे.	
त्याला चहा हवा आहे / पाहिजे.	त्यांना चहा हवा आहे / पाहिजे.
तिला चहा हवा आहे / पाहिजे.	त्यांना चहा हवा आहे / पाहिजे.
मला कॉफी हवी आहे / पाहिजे.	आम्हाला कॉफी हवी आहे / पाहिजे.
तुला कॉफी हवी आहे / पाहिजे.	तुम्हाला कॉफी हवी आहे / पाहिजे.
त्याला कॉफी हवी आहे / पाहिजे.	आपल्याला कॉफी हवी आहे/ पाहिजे.

तिला कॉफी हवी आहे / पाहिजे.	तुम्हाला कॉफी हवी आहे / पाहिजे.
तुला कॉफी हवी आहे / पाहिजे.	त्यांना कॉफी हवी आहे / पाहिजे.
मला दूध हवं आहे / पाहिजे.	आम्हाला दूध हवं आहे / पाहिजे.
तुला दूध हवं आहे / पाहिजे.	तुम्हाला दूध हवं आहे / पाहिजे.
त्याला दूध हवं आहे / पाहिजे.	आपल्याला दूध हवं आहे / पाहिजे.
तिला दूध हवं आहे / पाहिजे.	त्यांना दूध हवं आहे / पाहिजे.
मला कागद हवे आहेत / पाहिजेत.	आम्हाला कागद हवे आहेत/पाहिजेत.
तुला कागद हवे आहेत / पाहिजेत.	तुम्हाला कागद हवे आहेत/ पाहिजेत.
त्याला कागद हवे आहेत /पाहिजेत.	आपल्याला कागद हवे आहेत/ पाहिजेत.
तिला कागद हवे आहेत /पाहिजेत.	त्यांना कागद हवे आहेत / पाहिजेत.
मला वह्या हव्या आहेत / पाहिजेत.	आम्हाला वह्या हव्या आहेत/ पाहिजेत.
तुला वह्या हव्या आहेत / पाहिजेत.	तुम्हाला वह्या हव्या आहेत/ पाहिजेत.
त्याला वह्या हव्या आहेत /पाहिजेत.	आपल्याला वह्या हव्या आहेत/ पाहिजेत.
तिला वह्या हव्या आहेत /पाहिजेत.	त्यांना वह्या हव्या आहेत / पहिजेत.
मला पुस्तकं हवी आहेत /पाहिजेत.	आम्हाला पुस्तकं हवी आहेत / पाहिजेत.
तुला पुस्तकं हवी आहेत /पाहिजेत.	तुम्हाला पुस्तकं हवी आहेत / पाहिजेत.
त्याला पुस्तकं हवी आहेत/पाहिजेत.	आपल्याला पुस्तकं हवी आहेत / पाहिजेत.
तिला पुस्तकं हवी आहेत/पाहिजेत.	त्यांना पुस्तकं हवी आहेत / पाहिजेत.

II

Transformation Drills

Rewrite the sentences using the verb आवड in place of खा.

(पुढील वाक्यांत 'खा'ऐवजी 'आवड' हे क्रियापद वापरा.)

मी आंबा खातो.	मला आंबा आवडतो.
मी आंबा खाते.	मला आंबा आवडतो.
मी आंबे खातो.	मला आंबे आवडतात. .
मी आंबे खाते.	मला आंबे आवडतात.
तू आंबा खातोस.	तुला आंबा आवडतो.
तू आंबा खातेस.	तुला आंबा आवडतो.
तू आंबे खातोस.	तुला आंबे आवडतात.
तू आंबे खातेस.	तुला आंबे आवडतात.
तो आंबा खातो.	त्याला आंबा आवडतो.
तो आंबे खातो.	त्याला आंबे आवडतात.
ती आंबा खाते.	तिला आंबा आवडतो.
ती आंबे खाते.	तिला आंबे आवडतात.
आम्ही आंबा खातो.	आम्हाला आंबा आवडतो.
आम्ही आंबे खातो.	आम्हाला आंबे आवडतात.
तुम्ही आंबा खाता.	तुम्हाला आंबा आवडतो.
तुम्ही आंबे खाता.	तुम्हाला आंबे आवडतात.
आपण आंबा खातो.	आपल्याला आंबा आवडतो.
आपण आंबे खातो.	आपल्याला आंबे आवडतात.
ते आंबा खातात.	त्यांना आंबा आवडतो.
ते आंबे खातात.	त्यांना आंबे आवडतात.
त्या आंबा खातात.	त्यांना आंबा आवडतो.

त्या आंबे खातात.	त्यांना आंबे आवडतात.

2

Replace पाहिजे with हवा आहे.

(हवा इ. ऐवजी पाहिजे वापरा.)

मला आंबा हवा आहे.	मला आंबा पाहिजे.
मला आंबे हवे आहेत.	मला आंबे पाहिजेत.
आम्हाला जिलबी हवी आहे.	आम्हाला जिलबी पाहिजे.
आम्हाला जिलब्या हव्या आहेत.	आम्हाला जिलब्या पाहिजेत.
तुला सफरचंद हवं आहे.	तुला सफरचंद पाहिजे.
तुला सफरचंदं हवी आहेत.	तुला सफरचंदं पाहिजेत.
तुम्हाला लाडू हवा आहे.	तुम्हाला लाडू पाहिजे.
तुम्हाला लाडू हवे आहेत.	तुम्हाला लाडू पाहिजेत.
त्याला काकडी हवी आहे.	त्याला काकडी पाहिजे.
त्याला काकड्या हव्या आहेत.	त्याला काकड्या पाहिजेत.
तिला केळं हवं आहे.	तिला केळं पाहिजे.
तिला केळी हवी आहेत.	तिला केळी पाहिजेत.

III
Substitution Drills

1 **Substitute मला with the proper form of the given noun or pronoun.**

('मला'ऐवजी दिलेल्या नामाचे किंवा सर्वनामाचे रूप वापरून वाक्ये लिहा.)

मला चहा हवा आहे.	मला चहा हवा आहे.
तू / तो / ती / ते	मोहन
लीला	फडकेसाहेब
लिमयेबाई	आम्ही

तुम्ही	त्या
आपण	ती / ते

2 **Substitute चहा with the given nouns making necessary changes in the sentence**

('चहा'ऐवजी दिलेली नामे वाक्यात आवश्यक तो बदल करून वापरा)

सतीशला चहा हवा आहे. सतीशला चहा हवा आहे.

पाणी	शर्ट
दूध	रुमाल
पेढे	कॉफी
जिलबी	फोटो
वह्या	चित्र

IV

Affirmative, Negative Drills

1

मला चहा आवडतो.	मला चहा आवडत नाही.
तुला कॉफी आवडते.	तुला कॉफी आवडत नाही.
त्याला दूध आवडतं.	त्याला दूध आवडत नाही.
तिला नाच येतो.	तिला नाच येत नाही.
आम्हाला धडे समजतात.	आम्हाला धडे समजत नाहीत.
तुम्हाला कविता समजतात.	तुम्हाला कविता समजत नाहीत.
आपल्याला केळी आवडतात.	आपल्याला केळी आवडत नाहीत.
त्यांना फुलं आवडतात.	त्यांना फुलं आवडत नाहीत.

2

मला चहा हवा आहे. / पाहिजे.	मला कॉफी नको.
तुला कॉफी हवी आहे. / पाहिजे.	तुला कॉफी नको.
त्याला दूध हवं आहे. / पाहिजे.	त्याला दूध नको.

तिला खाऊ हवा आहे / पाहिजे.	तिला खाऊ नको.
आम्हाला लाडू हवे आहते. / पाहिजेत.	आम्हाला लाडू नकोत.
तुम्हाला जिलब्या हव्या आहेत./ पाहिजेत.	तुम्हाला जिलब्या नकोत.
आपल्याला बिस्किटं हवी आहेत / पाहिजेत.	आपल्याला बिस्किटं नकोत.
त्यांना पुस्तकं हवी आहेत / पाहिजेत.	त्यांना पुस्तकं नकोत.
तिला पेढे हवे आहेत / पाहिजेत.	तिला पेढे नकोत.
आम्हाला गोळ्या हव्या आहेत / पाहिजेत.	आम्हाला गोळ्या नकोत.
आपल्याला पेन्सिली पाहिजेत.	आपल्याला पेन्सिली नकोत.
त्यांना फळं पाहिजेत.	त्यांना फळं नकोत.

V

Conversation Drills

शिक्षक : संध्या, तू काय करते आहेस?

संध्या : मी पुस्तकातले धडे वाचते आहे.

शिक्षक : तुला पुस्तकातले धडे समजताहेत का ?

संध्या : हो, मला पुस्तकातले धडे समजताहेत.

शिक्षक : सुरेश, तू ही कविता वाच. तुझं पुस्तक कुठे आहे ?

सुरेश : गुरुजी, माझ्याजवळ पुस्तक नाही.

सरिता : तुला माझं पुस्तक पाहिजे का?

सुरेश : नको मी मनीषाचं पुस्तक घेतो.

शिक्षक : सुरेश, तुला ही कविता समजते आहे का?

सुरेश : नाही, मला ही कविता समजत नाही.

शिक्षक : तुला मराठी भाषा येते का?

सुरेश : नाही, मला अजून मराठी भाषा येत नाही. मी सध्या भाषा शिकतो आहे.

शिक्षक : उषा, तुला मराठी भाषा येते का?
उषा : मला मराठी भाषा थोडी थोडी येते.
शिक्षक : तू कुठे रहातेस ? आणि कुठे जेवतेस?
उषा : मी होस्टेलमध्ये रहाते आणि मेसमधे जेवते.
शिक्षक : तुला मेसचं जेवण आवडतं का?
उषा : हो, मला मेसचं जेवण आवडतं.
शिक्षक : गौतम, तुला पुणं आवडतं का?
गौतम : हो, मला पुणं आवडतं. मला इथलं जेवण आवडतं. मला इथली हवा आवडते. मला इथले लोकही आवडतात.

स्वाध्याय ३३ वा — Exercise No. 33

1 **Transform the following sentences with the help of the verbs given in the bracket.**

(कंसात दिलेल्या क्रियापदांच्या सहाय्याने पुढील वाक्ये बदलून लिहा.)

Model : मी मोटार शिकते. (ये) --मला मोटार येते.

तू मराठी भाषा शिकतोस. (आवड)
मांजर दूध पितं. (आवड)
सुमित्रा धडा वाचते. (समज)
ते उसाचा रस पितात. (आवड)
रेखाताई स्वयंपाक करतात. (ये)
तो आंबे खातो. (हवा आहे)
आम्ही साड्या विकत घेतो. (पाहिजे)
मोहन गाणी म्हणतो. (ये)
ती नाच पहाते. (ये)

तुम्ही पुण्यात रहाता. (आवड)

2 **Select the proper verb out of the five verbs given below, use its correct form in the appropriate blank space and complete the following sentences.**

(पुढे दिलेल्या पाच क्रियापदांपैकी योग्य ते क्रियापद निवडा आणि त्याचे योग्य रूप योग्य त्या रिकाम्या जागी भरून वाक्ये पूर्ण करा.)

Verbs : १) आवड २) समज ३) पाहिजे ४) ये ५) वाट

आज दुपारी सर्वांना चहा ---

ह्या आसामच्या मुलाला मराठी भाषा ---

आम्ही गोष्ट ऐकतो. आम्हाला खूप गंमत ----

आपल्याला त्या कविता चांगल्या ----

मला पाणी ---- . तुला सायकल --का ?

माझ्या मोठ्या भावाला केळी खूप ---

विजयला ही भाजी फार ---

तुम्हाला जिलबी --- न ? तिला अंडी खूप ----.

3 **Turn the following sentences into the affirmative.**

(पुढील (नकारार्थी) वाक्ये होकारार्थी करा.)

मला भात नको. मीनाला लाडू आवडत नाहीत.

श्री. सान्यांना लोणी नको. वीणाताईंना कंगवे नकोत.

मुलांना गणितं आवडत नाहीत. त्यांना सायकल येत नाही.

आम्हाला वह्या नकोत. विद्यार्थ्यांना धडे समजत नाहीत.

मोहनला रंगीत पेन्सिली आवडत नाहीत. तुला इथली भाषा समजत नाही.

4. **Substitute 'आम्हाला' with the proper forms of the given words.**

(पुढील वाक्यात 'आम्हाला' ऐवजी दिलेल्या शब्दांची योग्य रुपे भरा.)

आम्हाला पेरू आवडतात.	आम्हाला पेरू आवडतात.
त्याची आई	आमचे शिक्षक
सुनीताचा भाऊ	तिच्या बहिणी
माझा मित्र	आपले पोपट
सुहासचे वडील	तुमचा मुलगा

5. **Replace the form of a verb 'पाहिजे' by the proper forms of the phrase 'हवा आहे' and rewrite the following sentences.**

('पाहिजे' या क्रियापदाऐवजी 'हवा आहे' ची योग्य रूपे देऊन पुढील वाक्ये पुन्हा लिहा.)

मला ही दोन पुस्तकं पाहिजेत.

त्याला माझी वही पाहिजे.

तिला घड्याळ पाहिजे.

त्यांना सुंदर बंगला पाहिजे.

तुला एक कप चहा पाहिजे का?

अनिलला रंगीत फुगे पाहिजेत.

नलिनीला पुष्कळ रंगीत साड्या पाहिजेत.

मोहनला अंडं पाहिजे.

आम्हाला पाणी पाहिजे.

सुहासला खेळणी पाहिजेत.

Vocabulary

आवडणे (v.int.)	to like	धांदल उडणे (phr.)	to be at a loss
एकदा (adv.)	once	पाहिजे (v.int.)	want

काकडी (f)	cucumber	फक्त (adj./adv)	only
कारण (conj.)	because	फार (adv.)	very much
खाऊ (m.)	snack	बटाटा (m.)	potato
गंमत वाटणे (phr.)	to be amused	मुळीच (adv.)	not at all
जिलबी (f.)	jilbe	येणे (v. int)	to know
हवा असणे (phr)	to want	त्यामुळे (conj.)	because of that

समजणे (v. int.) to understand

तऱ्हा (f) ways

Grammatical Notes

Uptill now, the first sentence pattern presented was the SV pattern.

1.	**Subject**	**verb**	
	मी	जातो / जाते	**'I go'**
	तो	बसतो	**' He sits'**

In this, the verb always agrees with the number, gender and person of the subject in the Present Tense. The next pattern is the SOV pattern which is exactly the same except for the insertion of the object between S and V

2.	**Subject**	**Object**	**Verb**
	तो	फळा	पुसतो.

'He cleans the blackboard'.

रोहिणी	केळं	खाते.

' Rohini eats a banana'.

The object as well as the subject in these two types is in the straight form and is called ' direct'. The direct

subject or object is always in the straight form.

Some verbs are, on the contrary, governed by two nouns, both of which may be treated as subjects of it. One of these is in the SF and the other in the OF. The former is called the direct subect and the latter, which takes the posposition 'ला', the indirect subject. Thus, we have :

Indirect Subject	Direct Subject	Verb
मला	चहा	आवडतो.
मोहनला	दूध	आवडतं.
पोपटाला	मिरची	आवडते.
मला	तू	आवडतोस.
मला	तुम्ही	आवडता.

Here also, the verb agrees with number, gender and person of the direct subject.

Some verbs, on the other hand take an indirect subject only. In such cases, the verb is always in the neuter singular. e.g.

Indirect Subject	Verb	
मला	मळमळतं	' I feel sick.'
रोहिणीला	करमतं	' Rohini enjoys.'

हवा and पाहिजे meaning 'want' are used with an indirect subject. The former has an adjectival function and the latter a verbal one. e.g. मला तू हवास. ' I want you (m)' /मला तू पाहिजेस.

Their paradigms are as follows :

हवा

	Singular	plural
M.	हवा	हवे

F.	हवी	हव्या
Neu.	हवं	हवी

पाहिजे

पाहिजे	पाहिजेत.

The negative forms for हवा and पाहिजे are नको (sg) and नकोत (pl) according to the number of the direct subject.

गट - ११	Unit - XI
धडा चौतिसावा	**LESSON 34**
खेळून घरी येताना	**Coming home after playing**
मंगल रोज सकाळी सहा वाजता उठते.	Mangala gets up at six o'clock in the morning everyday.
तोंड धुऊन ती चहा पिते.	She takes tea after washing (her) mouth.
मग ती गरम पाण्यानी आंघोळ करते.	Then she take bath with hot water.
आंघोळ करून ती पुन्हा चहा पिते.	Having taken bath she takes tea again.
दुसरा चहा पिताना ती पाव आणि आम्लेट खाते.	She eats bread and omelet while taking second tea.
ती आठ वाजता शाळेत जाते.	She goes to school daily at eight in the morning.
शाळेत जाताना वाटेत तिला उषा भेटते.	She meets Usha on her way to the school.
उषा मंगलची मैत्रीण आहे.	Usha is a friend of Mangala.
उषा आणि मंगल बरोबर शाळेत जातात.	Usha and Mangala go to school together.
शाळेत जाताना त्या दोघी खूप गप्पा मारतात.	They chitchat a lot while going to school.
शाळेत येऊन त्या वर्गात जातात.	Afer coming to scool they

	go to the classroom.
शाळेत दोघीही एकत्र अभ्यास करतात.	They both work together in the school.
अभ्यास करताना मात्र त्या मुळीच गप्पा मारत नाहीत.	However they do not chit-chat at all while studying.
दुपारी मधल्या सुट्टीत त्या डबा खातात.	They eat lunch (box) in the recess in the afternoon.
दोघी शाळेत येतानाच डबा आणतात.	Both (of them) bring lunch box while coming to the school.
डबा खाऊन त्या थोडावेळ खेळतात.	Having taken lunch, they play a while.
मग पुन्हा वर्गात जातात.	Then (they) go back to the classroom.
शाळा संपवून त्या आपापल्या घरी जातात.	When the scool is over they go to their respective homes.
मंगल घरी जाऊन हातपाय धुते.	Mangala washes (her) hands and feet on coming home.
संध्याकाळी चहा पिताना ती चिवडा किंवा बिस्किटं खाते.	She eats chivda or biscuits when she takes tea in the evening.
चहा पिऊन ती उषाकडे जाते.	After taking tea she goes to Usha.
जाताना ती दोन गजरे घेते.	She takes two garlands as she goes.
एक तिच्यासाठी आणि एक	One for herself and the other

उषासाठी.	for Usha.
दोघी बागेत जाऊन खूप गप्पा मारतात. बागेत दोघी खूप खेळतात.	After going to the garden both chat a lot. They both play a lot in the garden.
खेळून घरी येताना त्या ग्रंथालयात जातात.	They go to the library after playing as they come home.
त्या ग्रंथालयातून पुस्तकं आणतात.	They bring books from the library.
घरी येऊन उषा पुस्तक वाचते.	After coing home Usha reads books.
विनोदी पुस्तक वाचताना ती खूप हसते.	While reading a humorous book she laughs a lot.
मंगल पुस्तक वाचताना रेडिओवरची गाणी ऐकते.	Mangala listens to the songs on radio as she reads the book.
मंगल रात्री आठ वाजता जेवते.	Mangala takes meal at eight o' clock in the night.
जेवताना ती शाळेतल्या गंमती आईला सांगते.	She tells the funs in the school to (her) mother as she takes (her) meal.
जेवून, अभ्यास करून मंगल झोपते.	After taking meal, and com pleting study Manglala goes to bed.

Drills

Repetition Drills

तोंड धुऊन मी चहा पितो.
पत्र लिहून तू पोस्टात जातेस.
बागेत खेळून आपणं घरी येतो.
जेवून ते अभ्यास करतात.
दिवा बंद करून त्या झोपतात.
मी शाळेत जाताना पेरू खातो.
तू काम करताना गाणी म्हणतेस.
तो पूजा करताना मंत्र म्हणतो.
त्या स्वैपाक करताना गप्पा मारतात.
पुस्तक वाचून आम्ही झोपतो.
बागेत जाऊन तुम्ही खेळता.
घरी येऊन तो जेवतो.
अभ्यास करून ती बाहेर जाते.
तळ्यात पोहून मुलं बाहेर येतात.
आम्ही क्रिकेट पहाताना ओरडतो.
तुम्ही चहा पिताना रेडिओ ऐकता.
ती गप्पा मारताना खूप हसते.
मुलं खेळताना गडबड करतात.

II
Contraction Drill

Transform the two sentences into one.

(खाली दिलेल्या दोन वाक्यांचे एक वाक्य करा.)

1

आधी मी तोंड धुतो. मग मी चहा पितो.

तोंड धुऊन मी चहा पितो.

आधी तू प्रश्न वाचतोस. मग तू उत्तर लिहितोस.

प्रश्न वाचून तू उत्तर लिहितोस.

आधी आम्ही बागेत जातो. मग आम्ही खूप खेळतो.

बागेत जाऊन आम्ही खूप खेळतो.

आधी तुम्ही टेबल पुसता. मग तुम्ही टेबलावर पुस्तक ठेवता.

टेबल पुसून तुम्ही टेबलावर पुस्तक ठेवता.

आधी राधा आंघोळ करते. मग राधा फुलं तोडते.

आंघोळ करून राधा फुलं तोडते.

आधी मोहन अभ्यास करतो. मग मोहन जेवतो.

अभ्यास करून मोहन जेवतो.

आधी देसाईसाहेब घरी जातात. मग देसाईसाहेब जेवतात.

घरी जाऊन देसाईसाहेब जेवतात.

आधी जोशीबाई ऑफिसात जातात. मग जोशीबाई काम करतात.

ऑफिसात जाऊन जोशीबाई काम करतात.

2

मी शाळेत जातो. त्यावेळी मी पेरू खातो.

मी शाळेत जाताना पेरू खातो.

आम्ही शाळेत येतो. त्यावेळी आम्ही गप्पा मारतो.

आम्ही शाळेत येताना गप्पा मारतो.

तू पुस्तक वाचतेस. त्यावेळी तू हसतेस.

तू पुस्तक वाचताना हसतेस.

तुम्ही चहा पिता. त्यावेळी तुम्ही वर्तमानपत्र वाचता.

तुम्ही चहा पिताना वर्तमानपत्र वाचता.

तो आंघोळ करतो. त्यावेळी तो गाणी म्हणतो.

तो आंघोळ करताना गाणी म्हणतो.

ती सिनेमा पहाते. त्यावेळी ती रडते.

ती सिनेमा पहाताना रडते.

मुलं मैदानावर खेळतात. त्यावेळी मुलं ओरडतात.

मुलं मैदानावर खेळताना ओरडतात.

III

Split the sentences Drill

खाली दिलेल्या एका वाक्याची दोन वाक्ये करा.

मी शाळेत जाऊन अभ्यास करतो.

आधी मी शाळेत जातो. मग मी अभ्यास करतो.

मी पुस्तक वाचताना हसते.

मी पुस्तक वाचते. त्यावेळी मी हसते.

पुस्तक उचलून आम्ही ते टेबलावर ठेवतो.

आधी आम्ही पुस्तक उचलतो. मग ते टेबलावर ठेवतो.

आम्ही शाळेत येताना गप्पा मारतो.

आम्ही शाळेत येतो. त्यावेळी आम्ही गप्पा मारतो.

रेडिओ ऐकून तू झोपतोस.

आधी तू रेडिओ ऐकतोस. मग तू झोपतोस.

तू सिनेमा पहाताना झोपतोस.

तू सिनेमा पहातेस. त्यावेळी तू झोपतेस.

जेवून तुम्ही विश्रांती घेता.

आधी तुम्ही जेवता. मग तुम्ही विश्रांती घेता.

तुम्ही आंघोळ करताना गाणी म्हणता.

तुम्ही आंघोळ करता. त्यावेळी तुम्ही गाणी म्हणता.

काम करून तो फिरायला जातो.

आधी तो काम करतो. मग तो फिरायला जातो.

ती उन्हात जाताना काळा चष्मा लावते.

ती उन्हात जाते. त्यावेळी ती काळा चष्मा लावते.

मित्राकडे येऊन ते गप्पा मारतात.

आधी ते मित्राकडे येतात. मग ते गप्पा मारतात.

त्या जेवताना पाणी पीत नाहीत.

त्या जेवतात. त्यावेळी त्या पाणी पीत नाहीत.

V

Conversation Drill

शिक्षक : सरोज, रोज सकाळी तू किती वाजता उठतेस?

सरोज : रोज सकाळी मी सहा वाजता उठते.

शिक्षक : मग तू काय करतेस?

सरोज : उठून मी तोंड धुते. तोंड धुऊन चहा पिते.

शिक्षक : मुलांनो रोज तुम्ही किती वाजता शाळेत येता?

विद्यार्थी : रोज आम्ही अकरा वाजता शाळेत येतो.

शिक्षक : शाळेत येताना तुम्ही काय करता?

वासंती : शाळेत येताना मी रस्त्यावरची गंमत पहाते.

मनीष : शाळेत येताना मी मोहनबरोबर खूप गप्पा मारतो.

शिक्षक : आनंद, वर्गात येऊन तू काय करतोस?

आनंद : वर्गात येऊन मी धडे वाचतो.

अजित : शाळेत येताना मी पेरू विकत घेतो.

शिक्षक : अरे, शाळेत अभ्यास करताना तू पेरू खातोस का?

अजित : नाही, अभ्यास करताना मी पेरू खात नाही. मी मधल्या सुट्टीत पेरू खातो.

शिक्षक : अभय, शाळेतून घरी जाऊन तू काय करतोस?

अभय : रोज संध्याकाळी मी बाबांबरोबर डोंगरावर जातो.

मंदार : मी घरी जाऊन गोष्टीचं पुस्तक वाचतो.

शिक्षक : अभ्यास करताना तुम्ही गडबड करता का?

विद्यार्थी : नाही, अभ्यास करताना आम्ही शांत बसतो. अभ्यास करताना आम्ही मुळीच गडबड करत नाही.

शिक्षक : छान छान ! मुलांनो तुम्ही सकाळी उठून तोंड धुता. आंघोळ करून आणि जेवून शाळेत येता. शाळेत

येताना तुम्ही मित्रांबरोबर गप्पा मारता. पण अभ्यास करताना तुम्ही मुळीच गडबड करत नाही.

स्वाध्याय क्र. ३४ **Excercise No. 34**

1. **Complete the sentence using the correct form of the roots in the brackets + ताना**

(कंसातल्या धातूंना 'ताना' प्रत्यय लावून पुढील वाक्ये पूर्ण करा.)

(नाच) ती गाणं म्हणते. (जेव) आम्ही गप्पा मारतो.
अभ्यास (कर) विद्यार्थी शांत बसतात.
रेडिओ (ऐक) अनिल झोपतो. सिनेमा (पहा) मी खूप हसते.
घरून (निघ) त्या पिशव्या घेतात. खिडक्या (उघड) आवाज होतो.
सुहास घड्याळ (लाव) खाली पाडतो. मूल चेंडू (फेक) पडतं.
त्या बसमध्ये (चढ) मागे पहातात आणि खाली पडतात.

2. **Substitute the underlined words with the given phrases.**

A. **(अधोरेखित शब्दांऐवजी दिलेल्या शब्दसमूहांची योग्य ती रूपे देऊन पुढील वाक्ये लिहा.)**

नारायण **पिशवी घेऊन** बाजारात जातो.

नवे कपडे घाल	घड्याळ लाव
दूध पी	दार बंद कर
पैसे घे	लाडू खा
चप्पल घाल	अभ्यास कर
रेडिओ ऐक	सिनेमा पहा

B. **Substitute the words घरी जाताना** with the given phrases and rewrite the following sentences.

घरी जाताना तो भाजी विकत घेतो.

परत ये. रिक्षात बस.

मित्राकडे निघ.	बहिणीकडे ये.
औषध आण.	माझ्याशी बोल.
डॉक्टरकडे जा.	बँकेत जा.
रस्त्यावर फिर.	गावाहून ये.

3. **Fill in the gaps with R + ऊन form of appropriate verbs.**
(रिकाम्या जागी योग्य क्रियापदाचे धातू + ऊन हे रूप भरा)

माझी मैत्रीण माझ्या घरी .... अभ्यास करते.
पावसाच्या गारा .... मुलं त्या गारा खातात.
मीनाचे वडील सकाळी .... आंघोळ .... पूजा करतात.
वर्गात .... मुलं दंगा करतात.
आमचा सगळा अभ्यास लौकर .... आम्ही खूप खेळतो.
सतीश कॉफी .... ऑफिसात जातो.
मी रेडिओ .... घड्याळ लावते.
नीलाताई पिशव्या .... मंडईत जातात.
पेढे .... आणि पाणी .... मी झोपते.
मुलं पावसात .... गाणी म्हणतात.

4. **Split up every sentence into two independent sentences.**
(एका वाक्याची दोन स्वतंत्र वाक्ये करा.)

वर्गात धडे शिकवून गुरुजी घरी जातात.
जेवून मी ऑफिसात जाते. गाणी ऐकून मूल झोपतं.
देवळात जाऊन बायका गप्पा मारतात.
डोंगरावर चढून लोक पक्षी पहातात.
पाव आणि आम्लेट खाऊन पद्माकर आंघोळ करतो.
वह्या आणि पुस्तकं घेऊन विद्यार्थी वर्गात येतात.
टेबलावर छत्री ठेवून तो धडा वाचतो.

लाडू खाऊन अनला टी.व्ही. लावते.

मंडईत जाऊन आम्ही भाज्या आणतो.

5. Transform the following sentences replacing the forms R + ऊन with the form R + ताना.

(धातू + ऊन ऐवजी धातू + ताना बापरून वाक्ये लिहा.)

ऑफिसात जाऊन मी पुस्तक वाचतो.

दुकानात येऊन तो माझ्याशी गप्पा मारतो.

धडा वाचून सुरेश झोपतो. जेवून मुलं दंगा करतात.

आंघोळ करून मीना गाणी म्हणते.

जोशीसाहेब खिडकी उघडून बाहेर पहातात.

आशा उत्तर लिहून पुस्तकातली चित्रं पहाते.

आम्ही सिनेमा पाहून शेंगा खातो. लहान मुलं गोष्टी ऐकून झोपतात.

डोंगरावर चढून लोक पक्षी पहातात.

6. Combine following pairs of sentences - First adding the suffix ऊन and then the suffix ताना to the root.

(पुढील वाक्ये प्रथम धातूला 'ऊन' हा प्रत्यय लावून आणि नंतर 'ताना' हा प्रत्यय लावून जोडा.)

Model : विजया अभ्यास करते. विजया झोपते.

१) विजया अभ्यास करून झोपते.

२) विजया अभ्यास करताना झोपते.

तो माझ्याकडे येतो.	तो फणस खातो.
आम्ही डोंगरावर चढतो.	आम्ही व्यायाम करतो.
ते कविता म्हणतात.	ते हसतात.
शिक्षक फळ्यावर गोष्ट लिहितात.	शिक्षक गोष्ट वाचतात.

ती स्वैपाक करते.	ती भांडी पुसते.
तुम्ही पुस्तक पहाता.	तुम्ही चित्रं काढता.
त्या खूप पळतात.	त्या खूप दमतात.
त्या घंटा वाजवतात.	त्या ओरडतात.
मूल दूध पितं.	मूल कप फोडतं.
राम आत येतो.	राम दंगा करतो.

Vocabulary

आम्लेट (n.)	omelet	पाव (m.)	bread
ऊन / उन्ह (n.)	sun, sunshine	पुन्हा (adv.)	again
एकत्र (adv.)	together	मधली सुट्टी (f.)	recess
गजरा (m.)	garland	रात्र (f.)	night
गरम (adj.)	hot	वाजणे (v.intr.)	strike
चिवडा (m.)	chivda	विनोद (adj.)	humorous
डबा (m.)	tin, tiffin /carrier	सकाळ (f.)	morning
तोंड (n.)	mouth	साठी (pp.)	for

Grammatical Notes

This unit explains the use of the indeclinable obtained by adding the suffix ऊन to the verb root.

e.g. : Root + ऊन

जा + ऊन= जाऊन

कर + ऊन = करून

It precedes the finite verb and serves to denote an action or actions preceding the one expressed by the verb. The successive actions are performed by the same actor.

e.g. - action 1 :	मी उठतो.	'I get up'
action 2 :	मी तोंड धुतो.	'I wash (my) mouth'.

action 3 : मी चहा पितो. 'I drink tea'.

action 1 + action 2 = उठून मी तोंड धुतो.
'(After) getting up , I wash (my) mouth'.

action 1, 2, 3 = उठून, तोंड धुऊन, मी चहा पितो.
'(After) getting up, after washing (my) mouth I drink tea'.

R + ऊन may show manner etc. also. e.g.

तो बसून रहातो. 'He keeps sitting'
तो निघून जातो. 'He goes away'
तो संतापून म्हणतो. ' He says angrily' etc.

This unit also explains the use of the indeclinable obtained by adding the suffix ताना to the root e.g.

R + ताना

आण + ताना = आणताना 'while bringing'

जा + ताना = जाताना 'while going'

When two actions are performed simultaneously by the same person, this pattern is used. e.g.

तो बसमध्ये चढताना पडतो.

'He falls down while entering the bus'.

तो जेवताना पाणी पितो.

' He drinks water while eating'.

ती चहा पिताना गप्पा मारते.

' She chats while drinking tea'.

Note : मुळीच ---- नाही 'not at all'.

गट - ११	Unit - XI
धडा पस्तिसावा	**LESSON 35**
(उजळणी पाठ ७)	(Review Lesson 7)
डोंगरावरची शोभा	**Beauty of the hill**
मोहनच्या घरामागे एक डोंगर आहे.	There is a hill behind Mohan's house.
मोहन सकाळी लौकर उठतो.	Mohan gets up early in the morning.
आणि गॅलरीत उभा राहून डोंगरावरची शोभा बघतो.	And he sees the beauty of the hill while standing in the gallery.
डोंगरावर माणसं फिरताना दिसतात.	People are seen walking on the hill.
आकाशात पाखरं उडताना फार सुंदर दिसतात.	The birds flying in the sky look very beautiful.
मोहनला हे दृश्य फार आवडतं.	Mohan likes this seen very much.
इतक्यात मोहनच्या शाळेची वेळ होते.	Just then, it is time for Mohan's school.
मोहन आंघोळ करून, थोडं खाऊन शाळेत जातो.	He goes to school after taking (his) bath (and) eating some thing.
शाळेतून घरी येऊन, हातपाय धुऊन तो जेवतो.	He takes meal on coming back from the school (and) after

	washing his hands and feet.
मग थोडा अभ्यास करतो.	Then he works a little.
अभ्यास करताना तो मधून मधून शाळेतली गाणी गुणगुणतो.	While studying, he hums, from time to time, the songs (learnt) at the school.
संध्याकाळी मोहन त्याच्या मित्राकडे जातो.	Mohan goes to his friend in the evening.
त्याच्या मित्राला एक भाऊ आणि एक बहीण आहे.	His friend has one brother and a sister.
मित्राचे वडील सर्वांना घेऊन कधीतरी डोंगरावर फिरायला जातात	The friend's father takes all of them to the hill for a walk.
संध्याकाळी पक्षी घरट्याकडे जाताना दिसतात.	The birds are seen returning to (their) nests in the evening.
लोक डोंगरावर चढताना आणि उतरताना दिसतात.	(They) see people climbing up and going down the hill.
डोंगरावरच्या देवळात बायका देवदर्शनाला जाताना दिसतात.	(They) see women going to the temple on the hill for 'darshan'.
डोंगरावर फिरताना सर्वांनाच ताजी, स्वच्छ हवा मिळते.	While walking on the hill all (of them) get fresh, clean air.
त्यांना उत्साह वाटतो.	They feel cheerful.
मोहनच्या मित्राचे वडील परत येताना मोहनला घरी सोडतात.	Mohan's friend's father drops him home while coming back.
मोहन आणि त्याचा मित्र फाटकाजवळ थांबून थोडावेळ	Mohan and his friend chat for a while standing near the

गप्पा मारतात.	gate.
शेवटी त्याची आई त्याला हाका मारते,"अरे मोहन, घरात ये, जेवून अभ्यास कर, बाहेर किती वेळी उभा आहेस ?"	At last his mother calls him, "Mohan, come to the home, eat (your) meal and work, How long have you been standing out ? "
"आई, डोंगरावर हिंडताना खूप मजा येते. आई, तू येत्या रविवारी माझ्याबरोबर डोंगरावर ये."	"Mummy, there is a great fun wondering on the hill. Mummy come with me to the hill next Sunday."
"नाही बाबा, मला डोंगर चढताना त्रास होतो. तू एकटाच बाबांबरोबर जा.	"No child, I have difficulty in climbing the hill. You go alone with your daddy.
लौकर उठून तोंड धू आणि मग जा. घरी येऊन सावकाश आंघोळ कर."	After getting up early, wash your mouth and go. Take (your) bath liesurely after coming home."
"हो आई, मी रविवारची वाट बघतो."	"Yes mummy, I am looking forward to the Sunday."

चाचणी क्र. ३५ — Test No 35

Q.1 Fill in the gaps with the proper forms of the pronoun given in the bracket.

(कंसातल्या सर्वनामाचे योग्य रूप रिकाम्या जागी भरा.)

(मी) .... तीन भाऊ आहेत. (मी) .... सर्वात मोठ्या भावाचं नाव सुधाकर आहे. (तो) .... पुण्यात कारखाना आहे. (मी) .... दुसरा भाऊ निरंजन. तो शाळेत शिकतो. (तो) .... शाळा घरापासून लांब आहे. सर्वात धाकटा रत्नाकर. रत्नाकर आणि मी शाळेत जातो. (आम्ही) .... शाळा पुण्यात सर्वात मोठी शाळा आहे. (आम्ही) .... शाळेत दोन हजार मुलं आहेत. (ते) .... शिक्षकांची संख्या दीडशे आहे.

Q.2 Transform the following sentences using the verb 'आवड' making necessary changes.

(वाक्यात योग्य ते बदल करून वाक्यातील क्रियापदाऐवजी 'आवड'चा उपयोग करा.)

Model : मी धडा वाचते. -----> मला धडा आवडतो.

तो मराठी शिकतो.	आम्ही सिनेमा पहातो.
दीपा लाडू खाते.	तुम्ही चहा पिता.
आपण पुस्तकं विकत घेतो.	ते वह्या वाचतात.
पक्षी आकाशात उडतात.	मांजरं उंदीर पकडतात.
वासरं गवत खातात.	तू कॉफी करतोस.

Q.3 Fill in the gaps with the appropriate forms of the expression 'हवा आहे' and then change the sentences into the negative.

(रिकाम्या जागेत 'हवा आहे' या प्रयोगाची योग्य ती रूपे भरा आणि नंतर तीच वाक्ये नकारार्थी करा.)

आज पाऊस पडतो आहे. मला छत्री ....

माझ्या भावाला रेनकोट ....

रस्त्यावरच्या लोकांना रिक्षा ....

मोहनला गरम चहा ....

त्याच्या बहिणीला गरम दूध ....
मला कामासाठी खूप फायली ....
त्याला भूगोलाची पुस्तकं ....
तिला सुंदर साड्या ....
लक्ष्मणला खूप रंगीत खडू ....
किसनला नवा शर्ट ....

Q.4 Transform the following sentences by using R + ताना in place of R + ऊन.

(पुढील वाक्यात धातू + ऊन ऐवजी धातू + ताना वापरा.)

तो चहा पिऊन गप्पा मारतो. आम्ही बाहेर जाऊन शेंगा खातो.
प्रमिला रिक्षात बसून गजरा घालते.
श्रीयुत कुलकर्णी रेडिओ ऐकून पुस्तक वाचतात.
मी कपडे धुऊन गाणी म्हणते. आनंद सायकल चालवून दमतो.
प्रिया अभ्यास करून झोपते. तुम्ही पत्र लिहून खाली बसता.
त्या वर्गात येऊन हसतात. आपण बातम्या सांगून रडतो.

Q.5 Combine each of the following two sentences into one.
(पुढील दोन वाक्यांचे एक वाक्य करा.)

आधी मी पंखा लावते. मग मी काम करते.
आधी तू खिडकी उघडतेस. मग तू खुर्चीवर बसतेस.
आधी मी फाईल बघते. मग मी पत्र लिहिते.
आधी ते धडे वाचतात. मग ते बाहेर जातात.
आधी मोहन टी.व्ही. पहातो. मग मोहन झोपतो.

Q.6 Select the appropriate verb from the bracket and then transform the sentence using that verb.

(कंसातून योग्य ते क्रियापद निवडून दिलेल्या वाक्यात ते वापरा.)

Model : तुला काम येतं. (वाच, लिही, कर) तू काम करतेस.

मला आंबा आवडतो. (खा, पी, गा)

माझ्या आईला ही भाजी आवडते. (आण, फाड, फेक)

त्यांना हे पंखे आवडतात. (वाच, पूस, लिही)

आम्हाला बारावा धडा समजतो. (उचल, वाच, काढ)

आपल्याला जेवण आवडतं. (कर, बंद कर, उघड)

तुम्हाला डोंगर दिसतो. (चीर, बस, पहा)

तुला कविता आवडतात. (म्हण, जा, घे)

त्याला मराठी भाषा येते. (शीक, पहा, रहा)

तिला नाच येतो. (वीक, उचल, कर)

मांजराला दूध आवडतं. (कर, पी, आण)

Q.7 Fill in the gaps with adverbs / adverbial adjectives of place, adding appropriate suffixes to the noun in the bracket.

(कंसातल्या नामांना योग्य प्रत्यय लावून बनलेल्या क्रियाविशेषणांनी आणि स्थानदर्शक विशेषणांनी रिकाम्या जागा भरा.)

ललिता ह्या (दुकान) .... साड्या विकत घेते.

तरुलता (परदेश) .... फोटो मैत्रिणीला दाखवते.

हमाल (पाठ) .... पोतं खाली ठेवतो.

शारदाबाई तिसऱ्या (मजला) .... फेरीवाल्याला हाक मारतात.

आमच्या (शाळा) .... खूप बस जातात.

मला (गाव) .... शेतं फार आवडतात.

ससा (झाड) .... सावलीत झोपतो.

(नाव) .... दहा माणसं नदीत उड्या मारतात.

रेखा (टेबल) .... चपला घेते आणि पायात घालते.

आई (पिशवी) .... भाज्या काढून धुते.

गट - १२

Unit - XII

धडा छत्तिसावा

LESSON 36

काम करायला लाग.

Begin to work

मुलांनो, आता एक गोष्ट ऐका.	Children, now listen to a story.
एक गाव असतं.	There is one village.
सरोज रोज लवकर उठते.	Saroj gets up early in the morning.
लौकर उठून ती फिरायला जाते.	After getting up early, she goes for a walk.
दीपक पण लवकर उठतो.	Deepak also gets up early.
पण तो फिरायला जात नाही.	But he does not go for a walk.
तो उठून अभ्यास करायला लागतो.	He beings to work after getting up.
दिवस उजाडेपर्यंत तो अभ्यास करतो.	He studies till day breaks.
अभ्यास संपवून तो चहा पितो.	After finishing the studies he takes tea.
मग आंघोळ करायला जातो.	Then he goes to take bath.
दहा वाजता जेवून तो शाळेत जातो.	He goes to school at 10 o'clock after taking his meal.
त्याच्या शाळेत विद्यार्थी भाषा शिकायला येतात.	Students come to his school to learn languages.

ते मराठी, गुजराती किंवा सिंधी भाषा बोलायला, लिहायला आणि वाचायला शिकतात.	They learn Marathi, Gujarati or Sindhi to speak, read and write.
त्याच्या शाळेतले सर्व विद्यार्थी भारतीय आहेत.	All the students in his school are Indian.
पण कधीकधी त्याच्या शाळेत परदेशी विद्यार्थीही भाषा शिकायला येतात.	But sometimes foreign students also come to his school to learn languages.
दीपकच्या शाळेचं ग्रंथालयही छान आहे.	The library of Deepak's school is very good also.
विद्यार्थी ग्रंथालयातली पुस्तकं वाचायला घरी नेतात.	The students take the library books home to read.
संध्याकाळी दीपक शाळेतून घरी येतो.	Deepak comes home from school in the evening.
आणि चहा पिऊन फिरायला जातो.	And goes for a walk after taking tea.
दीपकची आई भाजी आणायला जाते.	Deepak's mother goes to bring vegetables.
आणि त्याची बहीण सरोज मैत्रिणीकडे टी.व्ही. बघायला जाते.	And his sister goes to watch the T.V. at(her) friend's house.
दीपकचे वडील मित्रांकडे गप्पा मारायला जातात.	Deepak's father goes to (his) friends for a chitchat.
थोड्या वेळानी त्याची आई घरी येऊन स्वैपाक करायला लागते.	After Sometime, his mother returns and starts preparing

	food.
दीपकचे वडील कधीकधी मित्रांना जेवायला बोलावतात.	Deepak's father, sometimes, invites (his)friends for dinner.
सरोज आईला मदत करायला लागते.	Saroj begins to help (her) mother.
ती आईकडून स्वैपाक करायला शिकते.	She learns to cook from her mother.
दीपकला जेवणाचं टेबल सजवायला आवडतं.	Deepak likes to decorate the dining table.
तो पाहुण्यांना द्यायला सरबत बनवतो.	He prepares 'sarbat' to offer to the guests.
रात्री सगळे मिळून जेवायला बसतात.	All sit together to take dinner.
नऊ वाजता दीपक जेवून झोपायला जातो.	After taking (his) meal Deepak goes to bed at 9.00 o' clock.

Drills

I

Repetition Drills

मी संध्याकाळी फिरायला जातो.	मी संध्याकाळी फिरायला जाते.
आम्ही संध्याकाळी फिरायला जातो.	आपण संध्याकाळी फिरायला जातो.
तू शाळेत जायला निघतोस.	तू शाळेत जायला निघतेस.
तुम्ही शाळेत जायला निघता.	
तो सिनेमा पहायला जातो.	ते सिनेमा पहायला जातात.

ते टेबलावर चढायला शिकतं.　　ती टेबलावर चढायला शिकतात.
मोहन पुस्तक वाचायला बसतो.　　मीना पुस्तक वाचायला बसते.
मी अभ्यास करायला लागतो.　　मी अभ्यास करायला लागते.
आम्ही अभ्यास करायला लागतो.
तू पत्र लिहायला लागतोस.　　तू पत्र लिहायला लागतेस.
तुम्ही पत्र लिहायला लागता.　　आपण सायकल चालवायला लागतो.
तो पुस्तक वाचायला लागतो.　　ते पुस्तक वाचायला लागतात.
ती स्वैपाक करायला लागते.　　त्या स्वैपाक करायला लागतात.
ते दूध प्यायला लागतं.　　ती दूध प्यायला लागतात.
सरोज माझ्याकडे गप्पा मारायला येते.
तू कमलबरोबर बाजारात जायला निघतोस.
आई काम करायला लागते.　　त्या अभ्यास करायला बसतात.
ते अभ्यास करायला लागतात.　　मुलं रात्री झोपायला जातात.
लोक संध्याकाळी टी.व्ही पहायला बसतात.
आम्ही मराठी सिनेमा पहायला जातो.　　ते फूटबॉल खेळायला लागतात.
तुम्ही छत्री घ्यायला बाजारात जाता.

II

Transformation Drills

1

Transform the following sentences replacing R + ऊन with R + आयला.

(धातू + ऊन ऐवजी धातू + आयला वापरून पुढील वाक्ये लिहा.)

सुहास अभ्यास करून मित्राकडे जातो.	सुहास अभ्यास करायला मित्राकडे जातो.
नीला स्टेशनवर जाऊन रिक्षा आणते.	नीला स्टेशनवर जायला रिक्षा आणते.

आम्ही सायकल आणून दुकानात जातो.	आम्ही सायकल आणायला दुकानात जातो.
तुम्ही टी.व्ही. बघून शाळेत जाता.	तुम्ही टी.व्ही. बघायला शाळेत जाता.
सुमतीबाई कपाटात पैसे ठेवून घरी जातात.	सुमतीबाई कपाटात पैसे ठेवायला घरी जातात.

2

Replace the verb in the Present Tense with R + आयला + लाग.

(वर्तमानकाळातील क्रियापदाऐवजी धातू + आयला + लाग वापरा.)

मुलं गाणी म्हणतात.	मुलं गाणी म्हणायला लागतात.
मांजर डोळे उघडतं.	मांजर डोळे उघडायला लागतं.
तारा मराठी बोलते.	तारा मराठी बोलायला लागते.
मुलं बागेत खेळतात.	मुलं बागेत खेळायला लागतात.
अमर झाडावर चढतो.	अमर झाडावर चढायला लागतो.

III

Fill the gaps with any appropriate verb in आयला form.

(योग्य तो धातू + आयला रूप वापरून रिकाम्या जागा भरा.)

संदीप भाजी .... मंडईत जातो.

श्री. अभ्यंकर डोंगरावर .... जातात.

निर्मला पुस्तकं .... मैत्रिणीकडे जाते.

मी सात वाजता आंघोळ .... जाते.

आम्ही गप्पा .... अनिलकडे जातो.

तो फळा .... डस्टर आणतो.

श्री. दास मराठी .... शिकतात.

मोहन चित्र .... खडू हातात घेतो.

त्या खुर्चीवर .... उशी आणतात.

ते चहा .... घरी जातात.

मांजराची पिलं झाडावर................ शिकतात.

विजयाबाई मोटार .... शिकतात.

विद्यार्थी अभ्यास .... लागतात.

तुम्ही पत्र .... बसता.

आपण टी.व्ही. .... लागतो.

Conversation Drill

शिक्षक : सुरेंद्र, संध्याकाळी तू काय करतोस ?

सुरेंद्र : संध्याकाळी मी फिरायला जातो.

शिक्षक : माणिक , तू काय करतेस ?

माणिक . : मी थोडी विश्रांती घेऊन काम करायला लागते.

शिक्षक : अतुल, वैशाली, तुम्ही इथे काय शिकता ?

अतुल : आम्ही इथे मराठी भाषा बोलायला, लिहायला आणि वाचायला शिकतो.

शिक्षक : वैशाली, तू शाळेतून घरी जाऊन काय करतेस?

वैशाली : मी शाळेतून घरी जाऊन हातपाय धुते, चहा पिते आणि थोड्या वेळानी मैत्रिणीकडे खेळायला जाते.

शिक्षक : दीपक, तुझ्या घरी टी.व्ही. आहे का ?

दीपक : माझ्या घरी टी.व्ही. नाही. माझ्या मित्राच्या घरी आहे.

शिक्षक : तू टी.व्ही पहायला मित्राकडे जातोस का ?

दीपक : हो, मी कधीकधी माझ्या मित्राकडे टी.व्ही. पहायला जातो.

शिक्षक : मनीष, तू कधी ग्रंथालयात जातोस का ?

मनीष : हो, मी रोज सकाळी ग्रंथालयात जातो.

शिक्षक : तू ग्रंथालयात काय करतोस ?

मनीष : मी ग्रंथालयात खूप पुस्तकं वाचतो. अभ्यासाची पुस्तकं वाचून नोट्स काढतो. विनोदी पुस्तकं वाचताना मी खूप हसतो. ग्रंथालयात खूप वेळ बसून मी घरी यायला निघतो.

स्वाध्याय क्र. ३६ **Exercise No. 36**

1. **Transform the following sentences using R + आयला forms in place of R + ऊन form.**

(धातूला ऊन ऐवजी आयला प्रत्यय लावून पुढील वाक्ये लिहा.)

अरविंद चहा पिऊन मीनाकडे येतो.

जयदेव त्याची शाळा पाहून बसनी निघतो.

देवदत्त खूप झोपून घरी जातो.

उमा फळा पुसून तिकडे उभी रहाते.

अनंता कागद फाडून खाली बसतो.

श्रीमती पंड्या मराठी ऐकून शाळेत येते.

आम्ही गोष्टीची पुस्तकं वाचून घरी नेतो.

त्या जेवून घरी जातात.

माकडं पेरू खाऊन झाडावर चढतात.

मुलं चेंडू खेळून मित्राकडे जातात.

2. **Fill in the gaps with proper verb form in आयला.**

(योग्य त्या धातूंची धातू + आयला ची रूपे रिकाम्या जागी भरा.)

मीना आणि सुजाता व्यायाम .... जातात.

दहा वाजता मुलं शाळेत .... लागतात.

पक्षी आकाशात .... लागतात.

मोहन पावसात .... लागतो.
मधल्या सुट्टीत आम्ही चहा .... जातो.
मधुकर सिनेमा पाहून गाणी .... लागतो.
माझे वडील पूजा .... बसतात.
आम्ही पुस्तकं .... ग्रंथालयात जातो.

3. **Combine each pair of sentences into one using the R + आयला form of the underlined verb.**
(अधोरेखित क्रियापदाऐवजी धातू + आयला चे रूप वापरून पुढील वाक्ये जोडा.)

Model: मोहन फळ्यावर लिहितो. मोहन खडू हातात घेतो.
मोहन फळ्यावर लिहायला खडू हातात घेतो.

सुनील पुस्तक वाचतो.	सुनील पुस्तक घरी नेतो.
किरण फोटो काढतो.	किरण माझ्या घरी येतो.
आम्ही चित्र काढतो.	आम्ही पेन्सिल विकत घेतो.
आई स्वैपाक करते.	आई भाजी आणते.
मी टेबल पुसते.	मी फडकं घेते.
मुलं फुगे विकत घेतात.	मुलं बागेत जातात.
लोक व्यायाम करतात.	लोक डोंगरावर जातात.
पोपट पेरू खातात.	पोपट झाडावर बसतात.
तू लिंबू कापतोस.	तू सुरी हातात घेतोस.
ती पावसात भिजते.	ती बाहेर जाते.

4. **Rewrite the following sentences substituting the underlined words with the given words.**
(अधोरेखित शब्दांऐवजी दिलेले शब्द घालून पुढील वाक्ये लिहा.)

तो	भाजी	आणायला बाजारात जातो.
सुनीता	पुस्तकं	

तुम्ही	बांगड्या
आपण	पेढे
नीला	गजरे
आणि अनीता	
मोहन	फुलं
आणि मी	
तू	पेरू
मुलं	केळी
भाटेसाहेब	कागद
स्मिताताई	साड्या
विक्रमभाई	औषध

5. Select the proper word from each column so as to form a correct sentence.

(प्रत्येक कॉलममधला एकेक शब्द निवडून योग्य वाक्ये तयार करा.)

१	२	३	४
मी	कपडे	काढायला	टाकतो.
आम्ही	आंबा	वाचायला	लागतो.
तू	गप्पा	शिवायला	बसतो.
तुम्ही	काम	करायला	येतात.
तो	चित्र	पुसायला	जाता.
ते	फळा	धुवायला	लागते.
ती	चहा	वाजवायला	लागतात.
त्या	पुस्तकं	प्यायला	जातेस.
आपण	पेले	मारायला	बसतात.
मुलं	घंटा	खायला	जातो.

6. Write Your daily routine in about 10 lines.
(तुमचा रोजचा दिनक्रम दहा ओळीत लिहा.)

Grammatical Notes

Unit - XIIV, Lesson 1 explains the use of the pattern R + आय + ला + Verb. This pattern expresses a purpose e.g.

१. बोल + आय + ला + शिक - = बोलायला शिक 'to learn to speak'.

मी मराठी भाषा बोलायला शिकतो. 'I learn to speak Marathi'.

२. फिर + आय + ला + जा = फिरायला जा - 'to go to take a walk'.

दीपक पहाटे फिरायला जातो.

'Deepak goes to take a walk early morning'.

The verb लाग - added to R + आय + ला, means 'to begin to' e.g.

दीपक पुस्तक वाचायला लागतो.

'Deepak begins to read a book'.

मी पत्र लिहायला लागतो. 'I begin to write a letter'.

Note - The postposition पर्यंत, 'till' follows Root + ए (if the root is consonant -ending) or - ई (if the root is vowel-ending) as in the following expressions :

उजाडे-पर्यंत. 'Till day - break'

तो काम संपवेपर्यंत मी थांबतो.

'I wait till he finishes the work'.

मीना येईपर्यंत कार्यक्रम सुरू होत नाही.

'The programme does not begin till Meena comes.'

गट - १२	Unit - XII
धडा सदतिसावा	**LESSON 37**
मला घर सजवायचं आहे	**I want to decorate the House**
स्मिता : कोण? गौरी? ये,आत ये.	Is that you Gauri ? Come, Come in (please).
गौरी : अरे वा! हे तुझं नवं घर का?	Oh ! Is this your new house?
स्मिता : हो. हे माझं नवं घर. कसं आहे ?	Yes. This is my new house. How is it ?
गौरी : छानच आहे ! फर्निचर पण सुंदर आहे.	(It's) indeed very good. Even furniture is good.
स्मिता : हो. पण मला अजून पुष्कळ नवीन वस्तू खरेदी करायच्या आहेत. माझ्याकडे पंखा नाही. मला एक पंखा घ्यायचा आहे.	Yes. But I have still to purchase a number of new things. I have no fan. I have to buy one (fan).
गौरी : पुण्याची हवा थंड असते न ? मग पंखा कशासाठी ?	The weather of Pune is cold, isn't it ? Then why (do you need) a fan ?
स्मिता : इथे मार्च आणि एप्रिलमध्ये फार उन्हाळा असतो आणि उन्हाळ्याच्या सुट्टीत माझ्याकडे खूप पाहुणे येतात. दरवर्षी मी पंखा घ्यायचं ठरवते. पण घेत नाही. यंदा मात्र मला पंखा घ्यायचाच आहे.	Here it is very hot in March and April. And many visitors come to me in summer holidays. I decide to buy a fan every year but (I) don't do it. But this year I definitely want to buy a fan.

गौरी : अस्सं ! आणि तुला टी.व्ही.	I see ! And are you not going
घ्यायचा नाही का ?	to buy a T.V. set ?
स्मिता : घ्यायचा आहे. पण आधी	(I) want to. But first I want
मला माझा रेडिओ विकायचा	to sell my radio. Then I will
आहे. मग टी.व्ही. घ्यायचा आहे.	purchase a T.V. set. Besides,
शिवाय मला नवे पडदे शिवायचे	I have to stich new curtains
आहेत. त्यासाठी थोडं सुंदर कापड	for that I have to buy some
विकत घ्यायचं आहे.	beautiful cloth.
गौरी : तुझ्याकडे रंगीत चादरी आहेत का ?	Have you (got) coloured bedsheets ?
स्मिता : नाही. मला चांगल्या रंगीत	No. I want to buy good,
चादरी पण आणायच्या आहेत. मला	colourful bedsheets also. I
चित्रं फार आवडतात. मला भिंतीवर	like paintings very much. I
लावायला एक सुंदर चित्रपण	also want to buy a beautiful
आणायचं आहे.	painting to put on the wall.
गौरी : तुझ्याकडे खूप पुस्तकंही	You have plenty of books.
आहेत न ?	Haven't you ?
स्मिता : हो. पण ती पुस्तकं	Yes. But there is no place to
ठेवायला या नव्या घरात जागा नाही.	keep those books in this new
मला पुस्तकांसाठी नवीन कपाटं हवी	house. I want new cupboards
आहेत.	for the books.
गौरी : म्हणजे तुला अजून बऱ्याच	That means you have to do a
गोष्टी करायच्या आहेत.	lot of things yet.
स्मिता : हो, मला अजून खूप	Yes, I have to do a lot of

नव्या गोष्टी करायच्या आहेत.	things yet.
गौरी : बरं स्मिता, मी आता जाते.	O.K. Smita, I shall go now.
स्मिता : तुला चहा नको का ? चल स्वैपाक घरात. चहा घे आणि मग जा. मलासुद्धा चहा घ्यायचा आहे.	Don't you want (to take) tea? Come into the kitchen. Take tea and then go. I am also going to take tea.
गौरी : बरं, चल.	O.K. Come on.

Drills

I

Repetition Drills

1

मला धडा वाचायचा आहे.	मला धडे वाचायचे आहेत.
आम्हाला धडा वाचायचा आहे.	आम्हाला धडे वाचायचे आहेत.
मला वही वाचायची आहे.	मला वह्या वाचायच्या आहेत.
आम्हाला वही वाचायची आहे.	आम्हाला वह्या वाचायच्या आहेत.
मला पुस्तक वाचायचं आहे.	मला पुस्तकं वाचायची आहेत.
आम्हाला पुस्तक वाचायचं आहे.	आम्हाला पुस्तकं वाचायची आहेत.
तुला आंबा खायचा आहे.	तुला आंबे खायचे आहेत.
तुम्हाला आंबा खायचा आहे.	तुम्हाला आंबे खायचे आहेत.
तुला गोळी खायची आहे.	तुला गोळ्या खायच्या आहेत.
तुम्हाला गोळी खायची आहे.	तुम्हाला गोळ्या खायच्या आहेत.
तुला केळं खायचं आहे.	तुला केळी खायची आहेत.
तुम्हाला केळं खायचं आहे.	तुम्हाला केळी खायची आहेत.
आपल्याला पंखा आणायचा आहे.	आपल्याला पंखे आणायचे आहेत.
आपल्याला खुर्ची आणायची आहे.	आपल्याला खुर्च्या आणायच्या आहेत.

आपल्याला कपाट आणायचं आहे.	आपल्याला कपाटं आणायची आहेत.
त्याला निबंध लिहायचा आहे.	त्याला निबंध लिहायचे आहेत.
त्याला गोष्ट लिहायची आहे.	त्याला गोष्टी लिहायच्या आहेत.
त्याला पत्र लिहायचं आहे.	त्याला पत्रं लिहायची आहेत.
तिला शर्ट धुवायचा आहे.	तिला शर्ट धुवायचे आहेत.
तिला साडी धुवायची आहे.	तिला साड्या धुवायच्या आहेत.
तिला कापड धुवायचं आहे.	तिला कापडं धुवायची आहेत.
त्यांना पतंग उडवायचा आहे.	त्यांना पतंग उडवायचे आहेत.
त्यांना भाजी विकायची आहे.	त्यांना भाज्या विकायच्या आहेत.
त्यांना फळ तोडायचं आहे.	त्यांना फळं तोडायची आहेत.

2

मला शाळेत जायचं आहे.	आम्हाला शाळेत जायचं आहे.
तुला शाळेत जायचं आहे.	तुम्हाला शाळेत जायचं आहे.
आपल्याला शाळेत जायचं आहे.	त्याला शाळेत जायचं आहे.
तिला शाळेत जायचं आहे.	त्यांना शाळेत जायचं आहे.
माकडाला झाडावर चढायचं आहे.	माकडांना झाडावर चढायचं आहे.
मोहनला झाडावर चढायचं आहे.	गोखलेसाहेबांना झाडावर चढायचं आहे.
मीनाला झाडावर चढायचं आहे.	नीलाताईंना झाडावर चढायचं आहे.
मला पुष्कळ वाचायचं आहे.	आम्हाला पुष्कळ लिहायचं आहे.
तुला शाळेत शिकवायचं आहे.	तुम्हाला खूप पहायचं आहे.
त्यांना पुष्कळ करायचं आहे.	आपल्याला पुष्कळ आणायचं आहे.
नीलाला पुष्कळ सांगायचं आहे.	सुभाषला पुष्कळ बोलायचं आहे.

II
Transformation Drills

1

Transform the following sentences from the Present Continuous into the R + आयचा form.
(खालील वाक्यात चालू वर्तमानकाळाऐवजी धातू + आयचा हे रूप वापरा.)

मी पुस्तकं वाचतो / वाचते आहे.	मला पुस्तकं वाचायची आहेत.
आम्ही लाडू खातो आहोत.	आम्हाला लाडू खायचा आहे / खायचे आहेत.
तू अभ्यास करतो / करते आहेस.	तुला अभ्यास करायचा आहे.
तुम्ही वह्या आणता आहात.	तुम्हाला वह्या आणायच्या आहेत.
आपण कॉफी पितो आहोत.	आपल्याला कॉफी प्यायची आहे.
तो बाजारात जातो आहे.	त्याला बाजारात जायचं आहे.
ते पतंग उडवताहेत.	त्यांना पतंग उडवायचा आहे / उडवायचे आहेत.
ती साड्या धुते आहे.	तिला साड्या धुवायच्या आहेत.
त्या भाजी चिरताहेत.	त्यांना भाजी चिरायची आहे.
ते झाडावर चढतं आहे.	त्याला झाडावर चढायचं आहे.
ती शिकार करताहेत.	त्यांना शिकार करायची आहे.
अनंत पुस्तक वाचतो आहे.	अनंतला पुस्तक वाचायचं आहे.
मधुकर खोली झाडतो आहे.	मधुकरला खोली झाडायची आहे.
मीना स्वयंपाक करते आहे.	मीनाला स्वयंपाक करायचा आहे.
शीला बातम्या ऐकते आहे.	शीलाला बातम्या ऐकायच्या आहेत.
पद्माकर शाळेत जातो आहे.	पद्माकरला शाळेत जायचं आहे.

आशाताई वह्या तपासताहेत.	आशाताईंना वह्या तपासायच्या आहेत.
माझे वडील पुस्तक वाचताहेत.	माझ्या वडलांना पुस्तक वाचायचं आहे.
तिची मैत्रीण साडी घेते आहे.	तिच्या मैत्रिणीला साडी घ्यायची आहे.
त्यांचे शिक्षक कविता शिकवताहेत.	त्यांच्या शिक्षकांना कविता शिकवायची आहे.

Transformation Drills

2

Transform the R + आयचा आहे form sentences into R + आयचं ठरव form.

(पुढील वाक्यात 'धातू + आयचा आहे' ऐवजी 'धातू + आयचं ठरव' वापरा)

तिला मैत्रिणीच्या घरी जायचं आहे.	ती मैत्रिणीच्या घरी जायचं ठरवते.
आम्हाला नवे पंखे घ्यायचे आहेत.	आम्ही नवे पंखे घ्यायचं ठरवतो.
सर्व मुलींना ही कविता म्हणायची आहे.	सर्व मुली ही कविता म्हणायचं ठरवतात.
मला वर्गाची दारं उघडायची आहेत.	मी वर्गाची दारं उघडायचं ठरवतो / ठरवते.
मोहनला आंघोळ करायची आहे.	मोहन आंघोळ करायचं ठरवतो.
त्यांना मुंबईला यायचं आहे.	ते मुंबईला यायचं ठरवतात.

III

Fill in the gaps Drill

Fill in the gaps with proper form of कर --

('कर' या धातूची योग्य ती रूपे रिकाम्या जागी भरा.)

मला अभ्यास .... आहे. तिला आंघोळ .... आहे.
आईला स्वैपाक .... आहे. आम्हाला कामं .... आहेत.
त्यांना लाडू .... आहेत. तुला मातीची चित्रं .... आहेत.
मुलांना गृहपाठ .... आहे. आपल्याला पूजा .... आहे.
आईला लोणचं .... आहे. शुभदाला गजरा .... आहे.

Conversation Drill

शिक्षक : मुलांनो, आज आपल्याला पंधरावा धडा शिकायचा आहे. पुस्तक उघडा आणि पंधरावा धडा काढा. विश्वनाथ, तुझं पुस्तक कुठे आहे ?

विश्वनाथ : गुरुजी, माझ्याजवळ पुस्तक नाही. मला अजून पुस्तक विकत घ्यायचं आहे.

शिक्षक : अरे, लौकर पुस्तक विकत घे. आपल्याला हे सगळं पुस्तक शिकायचं आहे. शोभना, तुझं पुस्तक कुठे आहे ? तुला पुस्तक घ्यायचं नाही का ?

शोभना : घ्यायचं आहे गुरुजी.

शिक्षक : मुलांनो, लौकर पुस्तक विकत घ्या. आज मी धडा शिकवत नाही.
उद्या तुम्ही पुस्तक घेऊन या. आज कविता म्हणा. माधवी, कविता म्हणतेस का ?

माधवी : गुरुजी, मला कविता पाठ करायची आहे.

शोभना : मी कविता म्हणते, गुरुजी !

शिक्षक : म्हण. पण लक्षात ठेवा. आपल्याला मराठी बोलायला, लिहायला आणि वाचायला शिकायचं आहे. तुम्ही खूप अभ्यास करायचं ठरवा. तुम्हाला

अजून खूप शिकायचं आहे. तेव्हा जोरात अभ्यासाला लागा.

स्वाध्याय क्र. ३७ **Exercise No. 37**

1. **Fill in the blanks with the correct form of the verb 'आण' and complete the following sentences.**

(रिकाम्या जागी 'आण' धातूची योग्य ती रूपे भरून पुढील वाक्ये लिहा.)

मला बाजारातून भाजी .... आहे.

श्रीयुत नातूंना मूर्ती .... आहेत.

त्यांना त्यांच्या घरात पंखे .... आहेत.

तुला गजरा .... आहे.

रमाकांतला लिंबू .... आहे.

सुभाषला पतंग .... आहेत.

तिला पाहुण्यांसाठी बिस्किटं .... आहेत.

वासंतीला एक मोठा चेंडू .... आहे.

दीपाला रंगीबेरंगी साड्या .... आहेत.

2. **Select the proper word from each column and frame sentences with proper sequence.**

(प्रत्येक कॉलममधला एकेक शब्द निवडून, वाक्ये लिहा.)

१	२	३	४	५
आम्हाला	हिरवी	पेरू	वाचायची	आहेत
तिला	ही	दूध	खायचे	आहे

त्यांना	ताजे	पुस्तकं	प्यायचं	आहे
तुला	गोड	शाळा	आणायची	आहेत
आपल्याला	मोठा	साडी	घ्यायचा	आहेत
मला	चांगल्या	बंगला	पहायचा	आहे

3. **Change the nouns in bold type into the plural and re write the sentences making necessary changes.**
(जाड ठशातील नामांचे अनेकवचन करा आणि वाक्यात योग्य ते बदल करून वाक्ये पुन्हा लिहा.)

मला नवं **नाणं** बघायचं आहे. वासराला ताजं **गवत** खायचं आहे. तुला हिरवा **शर्ट** शिवायचा आहे. त्याला **हात** स्वच्छ धुवायचा आहे. आपल्याला गरम **चहा** प्यायचा आहे. तिला चांगलं **गाणं** म्हणायचं आहे. त्याला **वही** पिशवीत ठेवायची आहे. मांजराला **चेंडू** पकडायचा आहे. तुम्हाला सुशीलाची **माळ** आणायची आहे. आम्हाला बाजारातून नवीन **पंखा** घ्यायचा आहे.

4A. **Transform the following sentences into the present Continuous.**
(पुढील वाक्ये चालू वर्तमानकाळात लिहा.)

शैलाला वह्या तपासायच्या आहेत. विजयला सिनेमा पहायचा आहे.
मला भाजी चिरायची आहे. आम्हाला मोटार शिकायची आहे.
उषाला कविता म्हणायच्या आहेत. मांजराला दूध प्यायचं आहे.
गीताला चहा करायचा आहे. त्यांना गाणी ऐकायची आहेत.
लक्ष्मणला बाजारात जायचं आहे. किसनला खुर्च्या उचलायच्या आहेत.

4B. **Turn the following sentences using the R + आयचा + आहे**

in place of चं + verb.
(पुढील वाक्यात धातू + आयचा + आहे ची योग्य रूपे चं + क्रियापदाच्या जागी योग्य ते बदल करून वापरा.)

मी सिनेमा पहायचं ठरवतो.	त्या गाणं म्हणायचं ठरवतात.
सावित्री पत्रं लिहायचं ठरवते.	मुलं पतंग उडवायचं ठरवतात.
मुली स्वैपाक करायचं ठरवतात.	आम्ही केळी खायचं ठरवतो.
चंद्रभागा बांगड्या आणायचं ठरवते.	श्री. साने घर विकायचं ठरवतात.
लक्ष्मी मराठी भाषा शिकायचं ठरवते.	तुम्ही धडे वाचायचं ठरवता.

5. **Substitute the underlined words with the given words making necessary changes in the sentences.**
(जाड ठशांतील शब्दांऐवजी दिलेले शब्द वापरून योग्य त्या बदलांसह पुढील वाक्य लिहा.)

मला मुंबईला जायचं आहे.	मला मुंबईला जायचं आहे.
फळा पूस.	केळी विक.
वह्या उचल.	लाडू खा.
पेले धू.	स्वैपाक कर.
कविता म्हण.	आंघोळ कर.
लिंबं आण.	अभ्यास कर.

Vocabulary

अरे वा ! (excl.)	What a surprise	पाठ करणे (phr.)	To memorise
उन्हाळा (m)	summer	पाहुणा (m)	guest
खरेदी करणे (phr)	to purchase	फर्निचर (n)	furniture
चल ! (excl.)	come on !	बरं (excl.)	O.K.
चादर (f) i	bedsheet	यंदा (adv.)	this year

ठरवणे (v.tr.)	to decide	लक्षात ठेवणे(phr)	to remember
थंड (adj.)	cold	विकत घेणे (phr)	to purchase
दरवर्षी (adv.)	every year	शिवणे (v.tr.)	to stich
नवीन (adj.)	new	शिवाय (pp/cong)	besides
नवा (adj)	new	स्वैपाकघर (n)	kitchen

Grammatical Notes

Unit - XV, Lesson 2 explains the use of the pattern R + आय + चा + form of आहे, which expresses a desire to do something or to attend to some unfinished or necessary work. Thus, we have,

आण + आय + चा + आहे = आणायचा आहे.

खा + आय + चा + आहे = खायचा आहे.

e.g. मला अभ्यास करायचा आहे.

'I have to study.'

मला आंबे खायचे आहेत.

'I want to eat mangoes.'

In a transitive verb, the adjectival form आयचा agrees with the direct object as above. But in other cases it assumes the neuter singular form e.g.

मांजराला उंदीर पकडायचा आहे.

'The cat wants to catch the mouse'.

मला मुंबईला जायचं आहे.

'I want / have to go to Bombay.'

The adjectival forms of both transitive and intransitive verbs are neuter when 'ठरव' is used and the verb 'ठरव' agrees with the direct subject. Thus we get :

मोहनला लौकर उठायचं आहे.	मोहनला पूजा करायची आहे.
'Mohan wants to get up early'.	'Mohan wants to do puja.'
मोहन लौकर उठायचं ठरवतो.	मोहन पूजा करायचं ठरवतो.
'Mohan decides to get up early.'	'Mohan decides to do puja'.

गट - १३	Unit - XIII
धडा अडतिसावा	**LESSON 38**
मी मंडईत जाईन	**I will go to 'mandai'**
आज हवा चांगली आहे.	Today the weather is good.
आज मी मंडईत जाईन.	I'll go to mandai today.
माझी मोठी बहीण माझ्याबरोबर येईल.	My elder sister is going with me to mandai.
माझी धाकटी बहीण मंडईत येणार नाही.	My younger sister is not coming (with me) to mandai.
ती तिच्या मैत्रिणीकडे जाईल.	She'll go to her friend.
आम्हाला मंडईत बटाटे, टमाटे, काकडी आणि थोडी मिरची कोथिंबीर घ्यायची आहे.	In mandai we want to purchase potatoes, tomatoes, cucumber (and) some chillies (and) coriander leaves.
आधी आम्ही एका भाजीवालीकडे जाऊ.	First we'll go to a vegetable-seller (f).
तिला भाज्यांचे भाव विचारू.	We'll ask her the rates of vegetables.
ती आम्हाला भाव सांगेल.	She'll tell us the rates.
आम्ही तिला भाव कमी करायला सांगू.	We will ask her to reduce the rates.
पण ती आमचं ऐकणार नाही.	But she will not agree with us.
मग आम्ही दुसऱ्या भाजीवाल्याकडे जाऊ, तोही आम्हाला भाव	Then we'll go to another vegetable -seller (m), He also

सांगेल.	will tell us the rates.
आम्ही आणखी दोन तीन भाजीवाल्यांना भाव विचारू.	We'll ask two (or) three more vegetable - men about the rates of vegetables.
नंतर चांगल्या, ताज्या ताज्या भाज्या पाहून आम्ही त्या खरेदी करू.	Then we'll make (our) purchase selecting good, fresh vegetables.
आणि मग भाज्या आणि फळं घेऊन घरी परत येऊ.	And then come home bringing the vegetables and fruits.
आमचे वडील म्हणतील " भाज्या आणायला इतका वेळ?"	Father will say, " Do you require so much time to purchase vegetables?"
आई आम्हाला विचारेल, "अग, भाज्या ताज्या आहेत न?"	Mother will ask us, " These vegetable are fresh, are they?"
आम्ही म्हणू, "आई, बघ कशा ताज्या भाज्या आहेत! एकदम ताज्या!	We will say," Mother, see, how fresh these vegetables are ! Absolutely fresh!
आम्ही वाईट माल आणणार नाही.	We won't bring bad things.
तुम्ही भाज्या बघाल आणि खूष व्हाल.	When you see the vegetables (and) you'll be pleased!"
सगळे हसतील.	All will laugh.
मग आई छान स्वयंपाक करेल.	Then mother will prepare good food.
आम्ही सगळे भरपूर जेवू.	We all will eat a lot.
आणि गप्पा मारत बसू.	And sit down talking.

Drills

I

Repetition Drills

मी मंडईत जाईन. आम्ही मंडईत जाऊ.
तू मंडईत जाशील. तुम्ही मंडईत जाल.
आपण मंडईत जाऊ.
तो मंडईत जाईल. ते मंडईत जातील.
ती मंडईत जाईल. त्या मंडईत जातील.
मी डॉक्टर होईन. आम्ही डॉक्टर होऊ.
तू डॉक्टर होशील. तुम्ही डॉक्टर व्हाल.
आपण डॉक्टर होऊ.
तो डॉक्टर होईल. ते डॉक्टर होतील.
ती डॉक्टर होईल. त्या डॉक्टर होतील.
मी अभ्यास करीन. आम्ही अभ्यास करू.
तू अभ्यास करशील. तुम्ही अभ्यास कराल.
आपण अभ्यास करू.
तो अभ्यास करेल. ते अभ्यास करतील.
ती अभ्यास करेल. त्या अभ्यास करतील.

II

Transfarmation Drills

1

Use Future 1 in place of the Present Tense.

(वर्तमानकाळाऐवजी भविष्यकाळ १ वापरा.)

मी मुंबईला जातो. --> मी मुंबईला जाईन.
मी मुंबईला जाते. मी मुंबईला जाईन.
मी मुंबईला जातो. आम्ही मुंबईला जाऊ.

तू वर्गात येतोस.	तू वर्गात येशील.
तू वर्गात येतेस.	तू वर्गात येशील.
तुम्ही वर्गात येता.	तुम्ही वर्गात याल.
आपण वर्गात येतो.	आपण वर्गात येऊ.
तो अभ्यास करतो.	तो अभ्यास करेल.
ते अभ्यास करतात.	ते अभ्यास करतील.
ती सिनेमा पहाते.	ती सिनेमा पाहील.
त्या सिनेमा पहातात.	त्या सिनेमा पहातील.
ते झाडावर चढतं.	ते झाडावर चढेल.
ती झाडावर चढतात.	ती झाडावर चढतील.

2

In Place of Future I use the Present Tense.

(भविष्यकाळ १ च्या जागी वर्तमानकाळ वापरा.)

ती शिक्षिका होईल.	ती शिक्षिका होते.
त्या शिक्षिका होतील.	त्या शिक्षिका होतात.
ते चिमणी खाईल.	ते चिमणी खातं.
ती चिमण्या खातील.	ती चिमण्या खातात.

III
Fill in the Gaps Drill

Fill the gaps with appropriate verbs in Future - 1.

(योग्य त्या क्रियापदांची भविष्यकाळ १ ची रूपे रिकाम्या जागेत भरा.)

आम्ही उद्या संध्याकाळी तुझ्या घरी ....

ते आमच्या घरी गप्पा .... मी त्या खुर्चीवर ....

तू आंघोळ .... आणि मग फिरायला ....

नीला मुंबईला .... आणि साडी ....

मुलं बागेत .... आणि भेळ ....

तुम्ही मला तुमचं पुस्तक .... सरिता वहीवर चित्र ....

मांजर दूध .... मोहन सगळे कागद ....

माकडं झाडावर .... आणि फळं ....

मी फळा .... तो फळ्यावर ....

IV
Affirmative-Negative Drills

Turn the following sentences into the negative.

(पुढील वाक्ये नकारार्थी करा.)

मी पुस्तक वाचीन.	मी पुस्तक वाचणार नाही.
आम्ही पुस्तक वाचू.	आम्ही पुस्तक वाचणार नाही.
तू पुस्तक वाचशील.	तू पुस्तक वाचणार नाहीस.
तुम्ही पुस्तक वाचाल.	तुम्ही पुस्तक वाचणार नाही.
आपण पुस्तक वाचू.	आपण पुस्तक वाचणार नाही.
तो पुस्तक वाचेल.	तो पुस्तक वाचणार नाही.
ते पुस्तक वाचतील.	ते पुस्तक वाचणार नाहीत.
ती पुस्तक वाचेल.	ती पुस्तक वाचणार नाही.
त्या पुस्तक वाचतील.	त्या पुस्तक वाचणार नाहीत.

Turn into the affirmative the following sentences.

(पुढील वाक्ये नकारार्थी करा.)

मी उद्या शाळेत येणार नाही.	मी उद्या शाळेत येईन.
आम्ही उद्या शाळेत येणार नाही.	आम्ही उद्या शाळेत येऊ.
तू उद्या शाळेत येणार नाहीस.	तू उद्या शाळेत येशील.
तुम्ही उद्या शाळेत येणार नाही.	तुम्ही उद्या शाळेत याल.
आपण उद्या शाळेत येणार नाही.	आपण उद्या शाळेत येऊ.
तो उद्या शाळेत येणार नाही.	तो उद्या शाळेत येईल.

तो उद्या शाळेत येणार नाही. तो उद्या शाळेत येईल.
ते उद्या शाळेत येणार नाहीत. ते उद्या शाळेत येतील.
ती उद्या शाळेत येणार नाही. ती उद्या शाळेत येईल.
त्या उद्या शाळेत येणार नाहीत. त्या उद्या शाळेत येतील.

V
Question-Answer Drill

Answer the questions in the negative first and then with R + आयचा + आहे forms -

(पुढील प्रश्नांची आधी नकारार्थी उत्तरे द्या. आणि मग धातू + आयचा वापरून योग्य होकारार्थी वाक्य लिहा.)

तू हे पुस्तक वाचशील का ? नाही, मी हे पुस्तक वाचणार नाही.
मला दुसरं पुस्तक वाचायचं आहे.

तो आज अभ्यास करेल का ? नाही, तो आज अभ्यास करणार नाही.
त्याला आज मुंबईला जायचं आहे.

ती आज फिरायला येईल का ? नाही, ती आज फिरायला येणार नाही.
तिला आज स्वैपाक करायचा आहे.

तुम्ही कविता शिकवाल का ? नाही, मी कविता शिकवणार नाही.
मला धडे संपवायचे आहेत.

अनंतराव आता झोपतील का ? नाही, अनंतराव आता झोपणार नाहीत.
अनंतरावांना रेडिओ ऐकायचा आहे.

विजयाबाई पेपर वाचतील का ? नाही, विजयाबाई पेपर वाचणार नाहीत.
विजयाबाईंना फायली बघायच्या आहेत.

VI
Conversation Drills

शिक्षक : सुनंदा, तू गाणं शिकशील का ?
सुनंदा : हो, मी गाणं शिकीन. मला गाणं आवडतं.

शिक्षक : सुरेश, तू डॉक्टर होशील का ?

सुरेश : हो, मला डॉक्टर व्हायचं आहे. माझे वडील डॉक्टर आहेत. मीसुद्धा डॉक्टर होईन.

शिक्षक : मुलांनो, सुट्टीत तुम्ही प्रवास कराल का ?

नीलिमा : मी सुट्टीत प्रवास करणार नाही.

रेखा : मी सुट्टीत खूप पुस्तकं वाचीन. माझ्या घराशेजारी वाचनालय आहे. तिथे नाव घालीन. मग मला खूप पुस्तकं वाचायला मिळतील.

गौतम : मी सुट्टीत पोहायला शिकीन.

माधव : मी आणि माझी बहीण आम्ही दोघं मुंबई पहायला जाऊ. आम्ही आमच्या मामांकडे पंधरा दिवस राहू. आणि मुंबई पाहून परत येऊ.

मनोहर : आमच्या घरापुढे छोटी बाग आहे. सुट्टीत मी बागेत काम करीन. मला बागकाम आवडतं.

शिक्षक : शाबास ! मुलांनो, सुट्टीत खूप काम करा. मजा करा. प्रवास करा. सुट्टी संपवून तुम्ही परत शाळेत याल. आपण नवीन विषय शिकू. खूपखूप अभ्यास करू. मग तुम्ही पुढच्या वर्गात जाल.

स्वाध्याय क्र. ३८ **Exercise No. 38**

1. **Fill in the gaps with the appropriate forms of verbs in future - 1.**

   (रिकाम्या जागी योग्य त्या क्रियापदाची भविष्यकाळ - १ ची रूपे लिहा.)

   तू आणि मी मिळून उद्या सकाळी मंडईत ....

   आम्ही येत्या सोमवारी अभ्यास ....

तू आज संध्याकाळी माझ्या घरी .... का ?

मी रविवारी टी.व्ही. वर सिनेमा ....

तो शुक्रवारी शाळेत .... परीक्षा ....

श्री. केतकर फिरायला .... आणि मग घरी ....

मुलं डोंगरावर पक्षी ....

आम्ही सर्वजण कविता ....

मीना दिवाळीत नव्या साड्या ....

तो आंघोळ .... आणि मग देवळात ....

2A. Substitute the underlined word with the given word and rewrite the sentence after making necessary changes.

(जाड ठशातील शब्दांऐवजी दिलेले शब्द वापरून, योग्य ते बदल करून वाक्य पुन्हा लिहा.)

मी आज संध्याकाळी मित्राला पत्र लिहीन.

राम	विजया
तू	आम्ही
ते (pl.)	ती
तुम्ही	तो
आपण	डॉक्टर
त्या	क्लार्क

B. तुम्ही दुपारी काम कराल.

भाजी आण.

सिनेमा पहा.

बरा हो.

शाळेत ये.

पत्र लिही.

तुम्ही दुपारी काम कराल.

पुस्तकं दे.

कविता वाच.

मुंबईला जा.

धडा शिकव.

पतंग उडव.

3. **Turn into the affirmative the following sentences.**

(पुढील वाक्ये होकारार्थी करा.)

आशा मंडईत जाणार नाही.

तू पत्र लिहिणार नाहीस.

आम्ही सिनेमा पहाणार नाही.

आपण घरी येणार नाही.

मी लाडू खाणार नाही.

तो पूजा करणार नाही.

तुम्ही डॉक्टर होणार नाही.

गीता काम करणार नाही.

4. **Transform the following sentences substituting R + आयचा + आहे for the verbs in future 1, making necessary changes.**

(पुढील वाक्यात क्रियापदांच्या जागी धातू + आयचा + आहे ह्या रूपाचा वापर करून, आवश्यक ते बदल करून वाक्य पुन्हा लिहा.)

सरिता पावसात खेळेल.

मी अभ्यास करीन.

राम खुर्ची उचलेल.

ते आंबे खातील.

आपण सिनेमा पाहू.

तुम्ही पत्रं लिहाल.

सिंधुताई बांगड्या आणतील.

तो पाकीट आणेल.

गीता गोष्टी सांगेल.

त्या शाळेत येतील.

आम्ही रात्री झोपू.

तू शिक्षक होशील.

5. **Rewrite the following passage in Future 1.**

(पुढील उतारा भविष्यकाळ १ मधे लिहा.)

आनंद रोज सकाळी शाळेत जातो. तिथे तो वर्गात खूप अभ्यास करतो. आनंद खूप हुशार आहे. तो गुरुजींच्या सर्व प्रश्नांची बरोबर उत्तरं देतो. त्याला गणितं सोडवायला आवडतं. तो गणितात नेहमी पहिला येतो. आनंद वर्गात निरनिराळ्या कविता म्हणतो. तो मुलांना गोष्टी पण सांगतो. खेळाच्या तासाला आनंद निरनिराळे खेळ खेळतो.

तो पळण्याच्या शर्यतीत भाग घेतो. उंच उड्या मारतो. व्यायाम करतो.

संध्याकाळी आनंद शाळेतून घरी येतो. घरी येऊन तो दूध पितो. मग मित्रांबरोबर फिरायला जातो. नंतर घरी येऊन हातपाय धुतो आणि जेवतो. जेवून तो थोडा अभ्यास करतो. सबंध दिवस अभ्यास करून आणि खेळून आनंद खूप दमतो. आणि लौकरच झोपतो.

सर्वांना आनंद खूप आवडतो.

6. Complete the following conversation by filling the blank place.

(रिकाम्या जागा भरून पुढील संवाद पूर्ण करा.)

आई : सुरेखा, तू मंडईत जाशील का ?

सुरेखा :...

आई : मंडईतून तू कोणत्या भाज्या आणशील ?

सुरेखा :...

आई : बटाटे आणू नकोस. घरात पुष्कळ आहेत.

सुरेखा :...

आई : आज मी बटाट्याची भाजी करीन.

सुरेखा : हो. मला बटाट्याची भाजी खूप आवडेल.

सुरेखा :...

आई : दोन तीन भाज्या आणि मिरची कोथिंबीर आण.

आई : येताना मैत्रिणीकडे जाऊ नकोस.

सुरेखा :...

आई : अच्छा. आता लौकर नीघ. आणि लौकर परत ये.

Vocabulary

अगं (f)	vocative particle	भाजीवाली (f)	vegetable seller
इतका (adv.)	so much	भाव (m)	rate

एकदम (adv.)	absolutely	मंडई (f)	vegetable market
कोथिंबीर (f)	i 2 coriander leaves	माल (m)	goods
खरेदी करणे (phr)	to purchase	वाईट (adj)	bad
खूष होणे (phr)	to be pleased	विचारणे (v.tr.)	to ask
ताजा (adj)	fresh	वेळ (m) /f	time
भरपूर (adj)	plenty	हवा (f)	weather
भाजीवाला (m)	vegetable seller	होणे (v.intr.)	to become

Grammatical Notes

Unit - XVI Lesson 1 introduces the future Tense in Marathi. There are two types of future : (1) Indefinite or Simple Future and (2) Definite Future.

Lesson 1 introduces the Indefinite Future.

The Indefinite Future is used to express a future action in general.

The following is the conjugation for Indefinite Future :

तक्ता क्र. २० **Table No. 20**

बस 'to sit'

		singular	Plural
1st person		मी बसीन (बस + ईन)	आम्ही बसू (बस + ऊ)
2nd person		तू बसशील (बस + शील)	तुम्ही बसाल (बस + आल)
1st + 2nd person			आपण बसू
3rd person	(m)	तो	ते
	(f)	ती बसेल	त्या बसतील
	(neu)	ते (बस+एल)	ती (बस+तील)

तक्ता क्र. २० (अ) Table No. 20 (A)

जा - 'to go'

	Singular	Plural
1st person	मी जाईन	आम्ही जाऊ
	(जा + ईन)	(जा + ऊ)
2nd person	तू जाशील	तुम्ही जाल
	(जा + शील)	(जा + ल)
1st and		आपण जाऊ
2nd person		(जा + ऊ)
3rd person	(m) तो	ते
	(f) ती जाईल	त्या जातील
	(neu) ते (जा + ईल)	ती (जा + तील)

Note that in 3rd person singular forms, the consonant-ending verbs take the suffix - एल while the vowel-ending verbs take ईल.

The verb लिही - 'to write' becomes लिहाल - in 2nd person plural form.

The negative of the Future - 1 is formed by adding the suffix - णार to the roots, followed by the forms of the negative verb 'नाही' e.g. 'मी जा + णार नाही' 'I won't go. The full conjugation is as follows :

जा - 'to go'

Singular	Plural
मी जाणार नाही.	आम्ही जाणार नाही.
तू जाणार नाहीस.	तुम्ही जाणार नाही.
तो जाणार नाही.	ते जाणार नाहीत.
ती जाणार नाही.	त्या जाणार नाहीत.
ते जाणार नाही.	ती जाणार नाहीत.

गट - १३	Unit - XIII
धडा एकोणचाळिसावा	**LESSON 39**
बटाटे कसे दिले?	**How do you sell potatoes ?**

अ : ही पुण्याची मंडई. तुम्हाला भाज्या घ्यायच्या आहेत न ?	This is vegetable market of Pune. You want to purchase vegetables, Don't you ?
ब : हो. मला भाज्या घ्यायच्या आहेत.	Yes. I want to purchase vegetables.
अ : तुम्हाला कोणकोणत्या भाज्या पाहिजेत ?	What vegetables do you want ?
ब : मला बटाटे, टमाटे, काकडी आणि थोडी मिरची कोथिंबीर पाहिजे.	I want potatoes, tomatoes, cucumber and a little bit of chilli and coriander leaves.
अ : मला फक्त पालक आणि मेथी घ्यायची आहे. चला, आपण त्या समोरच्या भाजीवाल्याकडे जाऊ.	I want to purchase 'palak' and methi only. Come on, We'll go to that vegetable-man opposite.
ब : चला.	Come on.
अ : काय, भाजीवाले, बटाटे कसे दिले ?	I say, bhajiwale, how do you sell potatoes ?
भाजीवाला : बारा रुपये किलो, साहेब.	Twelve rupees per kilo,saheb.
अ : फार महाग आहेत.	(They) are very expensive.
भाजीवाला : नाही साहेब, कुठेही	No saheb, ask for the price

भाव विचारून पहा.	any where.
अ : बरं आहे. द्या दोन किलो.	All right. Give (us) two kilos.
भाजीवाला : आणखी काय देऊ?	What else shall (I) give ?
अ : काकडी चांगली आहे का ?	Is the cucumber good ?
भाजीवाला : हो साहेब, फक्त दोन रुपये पाव. किती देऊ ?	Yes, saheb. Only two rupees per quarter (kilo). How much shall I give?
अ : पाव किलो पुरे. तुमच्याजवळ टमाटे दिसत नाहीत ?	A quarter kilo is enough. You don't seem to have tomatoes ?
भाजीवाला : नाही साहेब, पण पलीकडे माझ्या बहिणीच्या दुकानात आहेत.	No, sahab. but (they) are over there in my sister's shop.
अ : चला, आपण तिकडे जाऊ.	Come on. We will go there.
ब : काय ग, टमाटे कसे दिले ?	I say, how do you sell tomatoes ?
भाजीवाली : दहा रुपये किलो, साहेब.	Ten rupees per kilo, saheb.
ब : बापरे ! दहा रुपये किलो !	Heavens ! Ten rupees per kilo !
भाजीवाली : माल बघा साहेब. आम्ही शिळा माल ठेवत नाही.	See the goods, saheb. We don't keep stale goods.
ब : ठीक आहे. दे पाव किलो.	All right. Give a quarter kilo.

भाजीवाली : फक्त पाव किलो ? बोहनीचा टाईम आहे. अर्धा किलो तरी घ्या साहेब.	Only a quarter kilo? You are my first customer. Take at least half of kilo, saheb.
ब : आठ रुपये किलो देशील का? मग घेईन अर्धा किलो.	Will you give at 8 rupees per kilo? Then I'll take half a kilo.
भाजीवाली : दहा रुपयांपेक्षा एक पैसा कमी नाही साहेब. परवडत नाही. एकदम ताजा माल आहे.	Not a single paisa less than ten rupees saheb.I can't afford. (it). It is absolutely fresh.
ब : बरं बाई, घाल अर्धा किलो आणि दोन रुपयांची मिरची कोथिंबीर पण दे.	O.K. Give half a kilo. And also give chillies and coriander leaves worth two ruppees.
भाजीवाली : ही घ्या साहेब. आलं, लिंबू देऊ का ?	Here it is, saheb, Shall I give green ginger, lemon ?
अ : नको, किती पैसे झाले ?	No. How much is the bill ?
भाजीवाली : सात रुपये साहेब.	Seven rupees, saheb.
ब : चला, तिकडे पालेभाज्या आहेत. काय हो, मेथी कशी दिली?	Come on ! There are leafy vegetables over there. I say, how do you sell methi ?
भाजीवाली : चार रुपये जुडी, साहेब. एकदम कवळी आहे. पालक तीन रुपये जुडी. कांदापात	Four rupees per bundles, saheb It is very tender. Palak is three rupees per bundle.

अडीच रुपये.	Spring onion is only two rupees 50 paise per bundle.
ब : मेथीच्या दोन जुड्या आणि एक पालकाची द्या.	Give (me) two bundle of methi and one bundle of palak.
भाजीवाली : साहेब अकरा रुपये झाले. वरचा एक रुपया सुटा द्या.	It is eleven rupees in all. Give me one rupee change.
ब : हं, हे घ्या. चला.	Here it is, Come on !

Drills

I

Question-Answer Drills

फणस (**jack fruit**) कसा दिला ?	तीस रुपयाला एक.
बटाटे कसे दिले ?	बारा रुपये किलो.
मिरची कशी दिली ?	चार रुपये पाव.
शेंगा कशा दिल्या ?	आठ रुपये किलो.
केळी कशी दिली ?	बारा रुपये डझन.
आंबे कसे डझन ?	पन्नास रुपये.
बटाटे कसे किलो ?	बारा रुपये.
कोबी (**cabage**) कसा किलो ?	आठ रुपये.
शेंगा कशा किलो ?	सोळा रुपये.
दूध कसं लिटर ?	सतरा रुपये.
वांगी कशी किलो ?	दहा रुपये.
ह्या नकाशाची किंमत काय ?	ऐंशी रुपये.
ह्या माळेची किंमत काय ?	पाच हजार रुपये.

ह्या साडीची किंमत काय ?	चारशे रुपये.
ह्या टेबलाची किंमत काय ?	सातशे रुपये.
ह्या कपाटाची किंमत काय ?	दोन हजार रुपये.
ह्या पंख्याची किंमत काय ?	चौदाशे रुपये.
ह्या खुर्च्यांची किंमत काय ?	प्रत्येकी पाचशे रुपये.

II
Substitution Drills
1

Substitute बटाटे with the following nouns making necessary changes in the questions.

(प्रश्नात योग्य ते फेरफार करून 'बटाटे'ऐवजी पुढील नामे वापरा.)

काय भाजीवाले बटाटे कसे दिले ? काय भाजीवाले बटाटे कसे दिले ?

काकडी	कांदे
वांगी	शेंगा
कोबी	पालक
भोपळा	मेथी
लिंबं	मिरची

2

Put the proper form of the following nouns in place of 'साडीची'.

('साडीची' ऐवजी पुढील नामांची योग्य रूपे वापरा.)

ह्या साडीची किंमत काय ? ह्या साडीची किंमत काय ?

घड्याळ	घर
कोट	कुलपं
आंगठी	पडदे
मोटार	गाय

पेन	पिशव्या

III

Fill in the blanks with the proper words.

(रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.)

ह्या सायकलची .... काय?	कांदे .... दिले ?
काकड्या .... आहेत का ?	वांगी .... दिली ?
मिरच्या कशा .... ?	मला थोडी मिरची .... पाहिजे.
ते आंबे कसे ...., ?	दूध .... लिटर ?.
तुमच्याजवळ टमाटे .... नाहीत.	भाव कमी करायला .... नाही.
आम्ही .... माल ठेवत नाही.	.... टाइम आहे.

IV

Conversation Drills

केळीवाला : केळी घ्या केळी.

शरद : बाबा, आपण केळी घेऊ या का ?

बाबा : घेऊ या. आधी आपण केळीवाल्याला भाव विचारू.

शरद : चला. (केळीवाल्याजवळ येतात.)

बाबा : कशी दिली केळी ?

केळीवाला : पंधरा रुपये डझन.

शरद : काय! पंधरा रुपये डझन ?

केळीवाला : साहेब. सध्या केळ्यांचा सीझन नाही. आणि ही केळी बघा कशी पिवळीधमक आहेत.

बाबा : तरीसुद्धा पंधरा रुपये डझन म्हणजे फार

		वाटतात.
शरद	:	बाबा ! मला केळी नकोच. आपण दुसरी फळं पाहू या.
बाबा	:	केळीवाले, बारा रुपये डझन देणार का ?
केळीवाला	:	चौदा रुपये देतो.
बाबा	:	मग नको शरद, चल, आपण दुसरीकडे पाहू.
शरद	:	चला.
केळीवाला	:	तुम्हाला किती डझन घ्यायची आहेत ?
बाबा	:	अर्धा डझन.
केळीवाला	:	फक्त अर्धा डझन ? मग नाही परवडणार. निदान एक डझन तरी घ्या.
बाबा	:	कोण खाणार एवढी केळी ? घरी आम्ही इनमिन तीन माणसं.
केळीवाला	:	बरं चला. ही घ्या सहा केळी. बोहनीचा टाईम आहे.
शरद	:	ह्या घडातील नको. तो पहा - तिकडे छान घड आहे. त्यातली सहा द्या.
केळीवाला	:	काय साहेब ? सहाच केळी घेणार आणि ही नको ती नको .... असं कसं चालेल ?
बाबा	:	बरं दे तुला द्यायची ती. उगीच कटकट नको. हे घे पैसे.
		(केळी घेऊन शरद आणि बाबा जातात.)

स्वाध्याय क्र. ३९ Exercise No. 39

1. **Select a vegetable from the following list and put it in the appropriate blank space.**

(पुढे दिलेल्या भाज्यांपैकी योग्य ती भाजी निवडून योग्य त्या रिकाम्या जागी भरा.)

वांगी	कांदे	मिरची	फ्लॉवर	भेंडी
भोपळा	काकड्या	पालक	आलं	कार्ली

मला दोन किलो .... घ्यायचे आहेत.

शालिनीला एक मोठा .... घ्यायचा आहे.

मालतीला अर्धा किलो .... घ्यायची आहे.

तुला शंभर ग्रॅम .... घ्यायचं आहे.

रामला एक किलो .... घ्यायची आहेत.

आम्हाला पाव किलो .... घ्यायची आहे.

मनीषला दोन जुड्या .... घ्यायचा आहे.

आईला ताजा, स्वच्छ .... घ्यायचा आहे.

मलकानीला दीड किलो .... घ्यायची आहेत.

त्यांना ताज्या ताज्या .... घ्यायच्या आहेत.

2 **Substitute the word in bold type with the given words, making necessary changes in the sentences.**

(जाड टशांतील शब्दांऐवजी दिलेले शब्द घालून, योग्य ते बदल करून पुढील वाक्य लिहा.)

I मंडईत ताज्या **भाज्या** मिळतात. मंडईत ताज्या **भाज्या** मिळतात.

फळं	काकडी
टमाटे	आलं
कोथिंबीर	कणसं
फ्लॉवर	लिंबं
फणस	मिरच्या

II	केळी कशी दिली ?	केळी कशी दिली ?
	भोपळा	भेंडी
	आंबे	कार्ली
	शेंगा	आलं
	संत्री	मोसंबी
	कांदे	पेरू

3. **Turn into the negative the following sentences using the words given in the brackets.**

(कंसात दिलेल्या शब्दांच्या सहाय्याने पुढील वाक्ये नकारार्थी करा.)

मंडईत ताज्या भाज्या मिळतात.	(शिळ्या)
आज वांगी स्वस्त आहेत.	(महाग)
आम्ही चांगला माल विकतो.	(वाईट)
तो रोज सकाळी भाजी आणतो.	(फळं)
आमच्या घरी लाल गुलाब आहे.	(हिरवा)
विनायक सायकल चालवतो.	(मोटार)
शैलाताईंना लिंबं घ्यायची आहेत.	(मिरची)
ह्या पंख्याची किंमत तेराशे रुपये आहे.	(तीनशे)
माझ्या मुलाला द्राक्षं आवडतात.	(केळी)

4 **Answer the following questions.**

(पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.)

तुमच्याजवळ सायकल आहे का ?

तुमच्या सायकलीची किंमत काय ?

तुमच्या घड्याळाची किंमत काय ?

पुण्यात एकूण किती भाजी मंडया आहेत ?

तुमच्या प्रांतात भाज्या पुण्यापेक्षा स्वस्त मिळतात का ?
तुम्हाला कोणती भाजी सर्वात जास्त आवडते ?
मासे विकतो तो कोण ? मासे पकडतो तो कोण ?
पावसाळ्यात कोणती फळं मिळतात ? तुम्हाला कोणती फळं आवडतात ?
कार्ली कशी असतात? द्राक्षं कशी असतात? आंबे कसे असतात?
तुम्ही भाजीवाल्याला शेंगांचा आणि बटाट्यांचा भाव कसा विचाराल ?
तुमच्या मंडईत कोणत्या पालेभाज्या मिळतात ?

5 **Write a small conversation between a vegetable woman and a customer.**
(भाजीवाली आणि गिऱ्हाईक ह्यांच्यातला एक छोटा संवाद लिहा.)

6 **Write a small essay on the 'Phule Market - of Pune'. with the help of the following points.**
(खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे 'पुण्याची फुले मंडई' ह्या विषयावर एक छोटासा निबंध लिहा.)
पुण्याची मंडई ------ मंडईचं नाव ----- मोठी ------- निरनिराळ्या भाज्या ----- सकाळपासून गर्दी ----- ताजा माल -------- भाजीवाल्यांचा आवाज ------ ''ताजा माल, स्वस्त माल'' ------ भाजीवाले आणि गिऱ्हाईक --- भाव ठरवणे ----- फळांचा भाग ------ निरनिराळी फळं ----- रात्री दिवे ------ रात्रीसुद्धा गर्दी ------ खूप मजा.

Vocabulary

आणखी (adj)	what else	पालक (m)	spinach
आलं (n)	green ginger	पालेभाजी (f)	leafy vegetable

कटकट (f) i	bother	पाव (adj)	quarter
किंमत (f) i	price	पुरे (adv)	enough
कोबी (m)	cabbage	बापरे (interj.)	my goodness
घड (m)	bunch	बोहनी (f)	first sale
घालणे (v.tr.)	to put	भोपळा (m)	gourd
जुडी (f)	bundle	महाग (adj)	expensive
नक्षीदार (adj)	ornamental	मेथी (f)	green vegetable
निदान (adv)	at least	शिळा (adj)	stale
परवडणे (v.intr.)	to afford	स्वस्त (adj)	cheap
पलीकडे (adv)	over there	हापूस (adj)	alphanso

Grammatical Notes

Lesson No 39, gives expressions for asking prices, rates etc. Note that Indefinite future 1st Person Plural + या = 'Let us -----' e.g. आपण बसनी जाऊ या. 'Let us go by bus'.

Notes :

1. **केव्हा 'when' is an interrogative of time e.g. केव्हा निघू या? when shall (we) start ? केव्हा may also mean 'at what time' or 'on which day'.**
2. **कोणकोणता : Reduplication of कोणता 'which'. When the answer expected is a list of a variety of items, the interrogative कोणता is reduplicated thus e.g.**

   Q. कोणकोणत्या भाज्या ?
   'Which different vegetables?'

   A. बटाटे, कांदे, टमाटे, काकडी इत्यादी
   'Potatoes, onions, tomatoes, cucumber etc.'

   Q. तुम्ही कोणकोणती वर्तमानपत्रं वाचता ?
   'What are the (various) newspapers you read?'

   A. मी मराठी, हिंदी, इंग्रजी वर्तमानपत्रं वाचतो.
   'I read Marathi, Hindi, English newspapers'

3. कसे (दिले) plural of the interrogative adjective कसा ' how, used with दे etc. expresses the rate of selling e.g.

Singular :	(m)	भोपळा कसा दिला ?
	(f)	काकडी कशी दिली ?
	(neu)	कलिंगड कसं दिलं ?
Plural :	(m)	बटाटे कसे दिले ?
	(f)	शेंगा कशा दिल्या ?
	(neu)	कार्ली कशी दिली ?

There are some other expressions for asking the price of an article e.g. the expression ------- ची किंमत काय ? is used for asking the price of an individual item e.g.

ह्या साडीची किंमत काय ? = ही साडी कशी दिली ?
ही साडी कितीची ? = ही साडी केवढ्याला दिली ?
'What is the price of this saree?'
ह्या मोटारीची किंमत काय ? = ह्या मोटारीला काय किंमत पडली ? = ही मोटार केवढ्याला पडली ?
'What is the price of (did you pay for) this car?'

4. महाग	'expensive'	महागाई	'dearness'
स्वस्त	'cheap'	स्वस्ताई	'cheapness'

5. कुठेही 'anywhere'
e.g. तू कुठेही जा. 'You go anywhere '.

6. R + ऊन + पहा is used to confirm a particular thing.

e.g.	कुठेही भाव विचारून पहा.	'Ask the rate anywhere (and then confirm it).
	पेढे खाऊन पहा.	'Eat pedhas (and see if they are good or bad.)
	सायकल वापरून पहा.	'Use the bicycle to see (how it is).'

7. द्या दोन किलो = दोन किलो द्या 'Give two kilos'.

8. तुमच्याजवळ टमाटे दिसत नाहीत.
Lit. = 'Tomatoes don't seem to be with you'.

= 'I don't see any tomatoes with you'.

9. काय ग is a vocative interrogative phrase addressed to a female or females, काय रे to a male or males, कांय हो respectfully to a male or a female, or males or females e.g.

काय रे मुला !	काय हो रामभाऊ !
काय ग मुली !	काय हो सद्गृहस्थ !
काय रे मुलांनो !	काय हो सीताबाई !

गट - १३	Unit - XIII
धडा चाळिसावा	**LESSON 40**
(उजळणी पाठ ८)	(Review Lesson 8)
खरेदी	**Shopping**
श्याम : रविवारी मी बहुतेक खरेदीला जाईन.	On Sunday, probably, I will go for shopping.
नीलिमा : कुठे ?	Where ?
श्याम : लक्ष्मी रोडला.	To Laxmi Road.
नीलिमा : तुला तिकडे काय काय घ्यायचं आहे ?	What do you want to purchase over there ?
श्याम : मला एक मच्छरदाणी घ्यायची आहे. आमच्या भागात फार डास आहेत. रात्रभर झोप येत नाही. शिवाय मला दोन पांढऱ्या आणि दोन रंगीत चादरी घ्यायच्या आहेत.	I want to buy a mosquitonet. Because, on our side, there are plenty of mosquitoes. One cannot sleep the whole night. Besides I want to buy two white and two coloured bed sheets.
नीलिमा : त्या कशासाठी ?	Why (the bed-sheets) ?
श्याम : मे महिन्यात आमच्याकडे पाहुणे येतील.	Some guests will come in the month of May.
नीलिमा : तू 'सुहास मिल'च्या चादरी घे. त्या टिकायला छान असतात.	You buy the bed-sheets from 'Suhas Mill'. They last well.
श्याम : तू रविवारी माझ्याबरोबर	Will you come with me on

येशील का ?	Sunday ?
नीलिमा : बघीन. आता मला कँपात जायचं आहे.	I'll see. Now I want to go to Camp.
श्याम : कशासाठी ? खरेदीसाठीच का ?	Why ? Just for shopping ?
नीलिमा : हो. पुढच्या महिन्यात सुलभाचं लग्न आहे. तिच्यासाठी मला एक साडी घ्यायची आहे.	Yes. Sulbha is getting married next month. I want to purchase a saree for her.
श्याम : कोणत्या दुकानातून साडी घेशील ?	From which shop will you buy a saree ?
नीलिमा : 'लँडमार्क स्टोअर' किंवा 'स्वदेशी'.	'Land Mark' store or 'Swadeshi'.
श्याम : माझी आई साड्या घ्यायला लक्ष्मीरोडवर जाते. तिथे	My mother goes to Laxmi Road for buying sarees. There
साड्यांची पुष्कळ दुकानं आहेत. 'वैशाली', 'आझाद', 'कीर्ती', 'हिंद साडी सेंटर', 'फॅशन' वगैरे.	are many saree shops. Such as 'Vaishali', 'Azad', 'Kirti','Hind Saree Centre', 'Fashion' etc.
नीलिमा : अरे वा! तुला माझ्यापेक्षा जास्त माहिती आहे.	I say, you know more (about the saree shops) than me.
श्याम : तू कँपमध्ये कशी जाशील?	How will you go to the Camp?
नीलिमा : जाताना बसनी जाईन. आणि येताना रिक्षानी येईन.	I'll take a bus while going. I'll come by rickshaw while returning.

श्याम : बरोबर. येताना साड्यांचं ओझं ठेवायला रिक्षा करायला हवी.	That's correct. While coming (back) you have to hire a rickshaw in order to keep the load of (your) sarees.
नीलिमा : अरे, मला इतक्या साड्या घ्यायच्या नाहीत. परत येताना उशीर होईल म्हणून मी रिक्षा करीन. बरं आहे. येते मी.	I don't want to buy many sarees. I will be hiring a rickshaw because it'll be late when I come back. O.K. Good bye !
श्याम : अच्छा. पुन्हा भेटू.	Accha ! We'll meet again !

चाचणी क्र. ८ — **Test No. 8**

स्वाध्याय क्र. ४० — **Exereise No. 40**

1. **Turn the following sentences into Future - 1.**
   (पुढील वाक्ये भविष्यकाळ १ मधे लिहा.)
   आम्हाला मराठी सिनेमा पहायला जायचं आहे.
   त्यांना गावाला जायचं आहे. त्याला चहा प्यायचा आहे.
   तुला जिलब्या खायच्या आहेत. तिला गजरा घालायचा आहे.
   प्राचीला माझ्या घरी यायचं आहे. सदानंदला मोटार पुसायची आहे.
   मला खूप साड्या घ्यायच्या आहेत. तुम्हाला गाणी ऐकायची आहेत.
   शिक्षकांना पेपर तपासायचे आहेत.

2. **Transform the following sentences with the correct form of 'आयला + हवा' want.**
   (आयला + हवा वापरून पुढील वाक्ये लिहा.)
   Model: ती औषध घेते. ----> तिला औषध घ्यायला हवं.
   मीना चहा करते. चंद्रकांत नवे शर्ट आणतो.
   अविनाश नोकरी करतो. आम्ही सायकल चालवतो.

त्या शाळेत नाच करतात. आपण पाणी पितो.
जॉन मराठी पुस्तकं वाचतो. मुलं पुऱ्या खातात.
तुम्ही बसनी ऑफिसात जाता. शशी डोंगर चढतो.

3. **Turn the following sentences into the negative.**
(पुढील वाक्ये नकारार्थी करा.)

सुभाष प्रवासाला जाईल.	मोहन मोठेपणी मोटार चालवायला शिकेल.
आपण खूप दंगा करायला हवा.	आम्ही आज संध्याकाळी सिनेमा पाहू.
नीलिमाला पंखे घ्यायचे आहेत.	आम्ही तळ्यात मासे पकडू.
मला दोन रेनकोट घ्यायचे आहेत.	अशोक छान गाणी म्हणतो आहे.

तो आंधी लाडू खाईल आणि मग पाणी पिईल.
त्या शाळेच्या कार्यक्रमात नाच करतील.

4. **Substitute the underlined word with the given words, making changes in the sentence if necessary.**
(अधोरेखित शब्दांऐवजी दिलेले शब्द घालून, योग्य ते बदल करून पुढील वाक्ये लिहा.)

श्यामला चादरी घ्यायच्या आहेत. श्यामला चादरी घ्यायच्या आहेत.

मच्छरदाणी	फोटो
दिवे	टेबल
पिशव्या	तिकिटं
स्कूटर	औषध
कपाट	चष्मा

मी नाटकात राणी होईन	मी नाटकात राणी होईन
तुम्ही	आपण
सुनंदा	तू
त्या	प्रतिभा
ती	सरिता
आम्ही	शीलाताई

ती पेरू **खायला** लागते.	ती पेरू **खायला** लागते.
उचल	ठेव
आण	तोड
ने	रंगव
फेक	दाखव
पहा	घे.

5. **Match the pairs. (जोड्या जुळवा.)**

A		B
नीता	स्वैपाक	करता आहात.
आम्ही	अभ्यास	करेल.
तुम्ही	नाच	करायला हवी.
श्रीधरपंत	काम	करशील.
तो खूप	अभ्यास	करायचं ठरवतो.
तू	दंगा	करायची आहे.
आपण	भरपूर चहा	करायला लागते.
तिला	खरेदी	करतो.
त्याला	नोकरी	करत असतो.
कमल	प्रवास	करायला जातील.

6. **Write a short conversation between a shopkeeper and a**

customer on any one of the following subject.

(कोणत्याही एका विषयावर दुकानदार आणि गिऱ्हाईक यांचे संभाषण लिहा.)

भांड्याच्या दुकानात	मिठाईच्या दुकानात
किराणा दुकानात	स्टेशनरीच्या दुकानात.

7. Write a small essay on 'माझी खरेदी' using the future tense and R + आयचा form.

(भविष्यकाळ आणि धातू + आयचा ही रचना वापरून 'माझी खरेदी' या विषयावर छोटा निबंध लिहा.)

गट - १३	Unit - XIII
धडा एक्केचाळिसावा	**LESSON 41**
मी मुंबईला जाणार आहे	**I am going to Mumbai**
उद्या सकाळी डेक्कन क्वीननी मी मुंबईला जाणार आहे.	I am going to Mumbai tomorrow morning by the Deccan Queen.
डेक्कन„ीन पुण्याहून सात पंचवीसला सुटते.	The Deccan Queen leaves Pune at 7.25
आणि छत्रपती शिवाजी टर्मिनसला साडेदहा वाजता पोचते.	And reached C.S.T. at 10.30.
मी पहिल्या वर्गानी प्रवास करणार आहे.	I am travelling by first class.
माझा एक मित्र माझ्याबरोबर मुंबईला येणार आहे.	A friend of mine is coming to Mumbai with me.
तो पहिल्या वर्गानी प्रवास करणार नाही.	He will not be travelling by first class.
तो मला पुणे स्टेशनवर भेटेल.	He'll meet me on the Pune railway station.
आम्ही दोन दिवस मुंबईला रहाणार आहोत.	We are going to stay in Mumbai for two days.
मला मुंबईला रहायला मुळीच आवडत नाही.	I don't like at all to stay in Mumbai.
तिथला गोंगाट मला आवडत नाही.	I don't like the noise of that place.
पण मी माझ्या कामासाठी मुंबईला जातो.	But I go to Mumbai for my work.

माझे अनेक मित्र मुंबईत रहातात.	Many of my friends stay in Mumbai.
त्यांना मी भेटू शकतो.	I can meet them.
आणि माझा वेळ मजेत जातो.	And I pass my time happily.
मुंबईत मी माझ्या मित्राकडे उतरणार आहे.	I am going to stay at my friend's place in Mumbai.
त्याची मोटार आहे.	He has a car.
त्यामुळे मला सगळीकडे जाता येतं.	So I am able to go every where.
माझा मित्र शाकाहारी आहे.	My friend is a vegetarian.
त्याच्याकडे मी सकाळी जेवीन.	I'll eat with him in the morning.
माझा दुसरा मित्र मांसाहारी आहे.	Another friend of mine is non - vegetarian.
त्याच्याकडे मी संध्याकाळी जेवीन.	I'll eat with him in the evening.
परवा संध्याकाळी डेक्कन क्वीननी मी पुण्याला परत येणार आहे.	I am returning to Pune by the Deccan Queen the day after tomorrow evening.

Drills

I

Repetition drill

1

मी मुंबईला जाणार आहे.	मी पुस्तक वाचणार आहे.
आम्ही मुंबईला जाणार आहोत.	आम्ही पुस्तक वाचणार आहोत.
तू मुंबईला जाणार आहेस.	तू पुस्तक वाचणार आहेस.
तुम्ही मुंबईला जाणार आहात.	तुम्ही पुस्तक वाचणार आहात.

आपण मुंबईला जाणार आहोत.	आपण पुस्तक वाचणार आहोत.
तो मुंबईला जाणार आहे.	तो पुस्तक वाचणार आहे.
ते मुंबईला जाणार आहेत.	ते पुस्तक वाचणार आहेत.
ती मुंबईला जाणार आहे.	ती पुस्तक वाचणार आहे.
त्या मुंबईला जाणार आहेत.	त्या पुस्तक वाचणार आहेत

II

Affirmative-Negative Drill

1

मी मुंबईला जाणार आहे.	मी मुंबईला जाणार नाही.
आम्ही सिनेमा पहाणार आहोत.	आम्ही सिनेमा पहाणार नाही.
तू अभ्यास करणार आहेस.	तू अभ्यास करणार नाहीस.
तुम्ही पत्र लिहिणार आहात.	तुम्ही पत्र लिहिणार नाही.
आपण गाणी म्हणणार आहोत.	आपण गाणी म्हणणार नाही.
तो धडा वाचणार आहे.	तो धडा वाचणार नाही.
ते शाळेत येणार आहेत.	ते शाळेत येणार नाहीत.
ती गाणं म्हणणार आहे.	ती गाणं म्हणणार नाही.
त्या भाजी आणणार आहेत.	त्या भाजी आणणार नाहीत.
माकड झाडावर चढणार आहे.	माकड झाडावर चढणार नाही.
मांजरं मासे खाणार आहेत.	मांजरं मासे खाणार नाहीत.

2

आपण खुर्चीवर बसणार नाही.	आपण खुर्चीवर बसणार आहोत.
तो चित्र काढणार नाही.	तो चित्र काढणार आहे.
ते पतंग उडवणार नाहीत.	ते पतंग उडवणार आहेत.
ती स्वैपाक करणार नाही.	ती स्वैपाक करणार आहे.
त्या पाणी भरणार नाहीत.	त्या पाणी भरणार आहेत.

पिलू आकाशात उडणार नाही. पिलू आकाशात उडणार आहे.
वासरं गवत खाणार नाहीत. वासरं गवत खाणार आहेत.

III
Transformation Drills
1

Transform the following sentences into Future-1
(पुढील वाक्यांचे भविष्यकाळ - १ मध्ये रूपांतर करा.)

मी उद्या मुंबईला जाणार आहे. मी उद्या मुंबईला जाईन.
आम्ही उद्या मुंबईला जाणार आहोत. आम्ही उद्या मुंबईला जाऊ.
तू नाटक पहाणार आहेस. तू नाटक पहाशील.
तुम्ही नाटक पहाणार आहात. तुम्ही नाटक पहाल.
तो मंडईतून भाज्या आणणार आहे. तो मंडईतून भाज्या आणेल.
ते बातम्या ऐकणार आहेत. ते बातम्या ऐकतील.
ती सफरचंद खाणार आहे. ती सफरचंद खाईल.
त्या स्वेटर विणणार आहेत. त्या स्वेटर विणतील.

2

Transform the following setences into Future - 2
(पुढील वाक्यांचे भविष्यकाळ २ मध्ये रूपांतर करा.)

मी कपडे धुतो आहे. मी कपडे धुणार आहे.
मी कपडे धुते आहे. मी कपडे धुणार आहे.
आम्ही कपडे धुतो आहोत. आम्ही कपडे धुणार आहोत.
तू कपडे घालतो आहेस. तू कपडे घालणार आहेस.
तू कपडे घालते आहेस. तू कपडे घालणार आहेस.
तुम्ही कपडे घालताहात. तुम्ही कपडे घालणार आहात.
तो बाजारात जातो आहे. तो बाजारात जाणार आहे.

ते धडे वाचताहेत. ते धडे वाचणार आहेत.

ती कविता शिकवते आहे. ती कविता शिकवणार आहे.

त्या स्वैपाक करताहेत. त्या स्वैपाक करणार आहेत.

माकड शेंगा खातं आहे. माकड शेंगा खाणार आहे.

आपण सिनेमा पहातो आहोत. आपण सिनेमा पहाणार आहोत.

3

Transform the following Future -2 sentences into Present - 1 with R+ता + ये form.

(भविष्यकाळ -२ च्या ऐवजी धातू + ता+ ये वापरून वाक्ये वर्तमानकाळ १मधे करा.)

मी सायकल चालवणार आहे. मला सायकल चालवता येते.

मी गाणं म्हणणार आहे. मला गाणं म्हणता येतं.

आम्ही झाडावर चढणार आहोत. आम्हाला झाडावर चढता येतं.

तू मराठी बोलणार आहेस. तुला मराठी बोलता येतं.

तू स्वैपाक करणार आहेस. तुला स्वैपाक करता येतो.

ते चित्र काढणार आहेत. त्यांना चित्र काढता येतं.

ती कपडे शिवणार आहे. तिला कपडे शिवता येतात.

त्या स्वेटर विणणार आहेत. त्यांना स्वेटर विणता येतो.

मुलं आंघोळ करणार आहेत. मुलांना आंघोळ करता येते.

4

Transform the sentences with R+ता +ये -----into R +ऊ + शक ---

(धातू + ता + ये असलेली वाक्ये धातू + ऊ + शक वापरून लिहा.)

मला सायकल चालवता येते.-> मी सायकल चालवू शकतो./ शकते.

आम्हाला मराठी बोलता येतं. आम्ही मराठी बोलू शकतो.

तुला स्वैपाक करता येतो. तू स्वैपाक करू शकतोस./ शकतेस

तुम्हाला निबंध लिहिता येतात. तुम्ही निबंध लिहू शकता.

आपल्याला पतंग उडवता येतात. आपण पतंग उडवू शकतो.

त्याला झाडावर चढता येतं. तो झाडावर चढू शकतो.

त्यांना अभिनय करता येतो. त्या अभिनय करू शकतात.

त्यांना भाषण करता येतं. ते भाषण करू शकतात.

त्यांना झाडावर चढता येतं. ते झाडावर चढू शकतात.

IV

Conversation Drills

शिक्षक : सुमती, उद्या संध्याकाळी तू काय करणार आहेस ?

सुमती : उद्या संध्याकाळी मी लीलाबरोबर बागेत जाणार आहे.

शिक्षक : तू आणि लीला बागेत काय करणार आहात ?

सुमती : आम्ही हिरवळीवर बसू आणि गप्पा मारू.

लीला : आम्ही घसरगुंडीवर खेळणार आहोत.

सुमती : परत येतानाँ आम्ही फुगे विकत घेणार आहोत.

शिक्षक : बागेत तुम्ही भेळ खाणार आहात न ?

सुमती : हो. बागेत आम्ही भेळ खाणार आहोत.

लीला : आम्ही बागेतलं पाणी मात्र पिणार नाही.

शिक्षक : बरोबर. बागेत तुम्ही कशा जाणार आहात ?

लीला : आम्ही बागेत बसनी जाऊ.

शिक्षक : सुमतीजवळ सायकल आहे न ? सुमती, तुला सायकल चालवता येते न ?

सुमती : हो, मी सायकल चालवू शकते. पण लीलाला सायकल चालवता येत नाही. आम्ही बागेत बसनीच जाणार आहोत.

स्वाध्याय क्र.४१ Exercises No. 41

1 **Fill in the gaps using appropriate verb form.**
(योग्य ती क्रियापदाची रूपे घालून पुढील रिकाम्या जागा भरा.)

रमेश उद्या सिनेमा पहाणार ....
आपण पुस्तकं वाचणार ....
तुम्ही चित्रं पहाताना हसणार ....
तू टेबल पुसणार ....
आम्ही मराठी .... आहोत.
त्या स्वैपाक करणार ....
मांजरं बागेत .... आहेत.
नारायणराव रेडिओ ऐकणार ....
चित्राताई गोष्टी .... आहेत.
नयना गाणं .... आहे.

2. **Substitute the words in bold type with the given words making necessary changes.**
(जाड ठशातील शब्दाऐवजी दिलेले शब्द घालून योग्य ते बदल करून पुढील वाक्य लिहा.)

१. **राम** पुस्तकं वाचणार नाही. **राम** पुस्तकं वाचणार नाही.
तुम्ही सुनीता आणि मी

तू विनायकराव
प्रमिला विनयाताई
दिवाकर मुलं
आपण निरंजन

२.आम्ही **अभ्यास करणार** आहोत. आम्ही **अभ्यास करणार** आहोत.
दूध पी. पत्रं लिही.
शिक्षक हो. शाळेत ये.
लाडू खा. धुळ्याला जा.
वस्तू ने. फुलं तोड.

३.ते व्यायाम करणार **आहेत**. ते व्यायाम करणार **आहेत**.
आहेस. आहात.
आहोत. आहे.

४.शीला **कपडे** शिवणार आहे. शीला **कपडे** शिवणार आहे.
शर्ट टोपी
रुमाल कोट
ब्लाऊज

3. Turn the following sentences into Future -1

(खालील वाक्ये भविष्यकाळ-१ मधे लिहा.)

प्रकाश दोन आंबे खाणार आहे. मंदाकिनी कविता लिहिणार आहे.

आम्ही मराठी सिनेमा पहाणार आहोत. आपण खूप गप्पा मारणार आहोत.

मी वर्गात दहावा धडा शिकणार आहे. ते खूप खेळणी आणणार आहेत.

कल्पनाताई उद्या गावाला जाणार तू मित्राकडे रहाणार आहेस.

आहेत.

तुम्ही माझ्या घरी जेवायला येणार सुरेश मोटारीत बसणार आहे. आहात.

4. **Change the following sentences using R + ता + ये in. place of R + ऊ + शक.**

(पुढील वाक्यात धातू + ऊ + शक ऐवजी धातू + ता + ये प्रयोग करा.)

साधना गाणी छान म्हणू शकते.
मी मोटार चालवू शकतो.
सिद्धार्थ शिकार करू शकतो.
तुम्ही हे काम करू शकता.
तू मुंबईत सगळ्यांना भेटू शकतेस.
मूल भात खाऊ शकतं.
विद्याताई मराठी कविता शिकवू शकतात.
त्या उत्तम पोहू शकतात.
आपण मासे पकडू शकतो.
मोहन झोपाळ्यावर बसू शकतो.

5. **Answer the following questions.**

(खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.)

तुम्ही दिवाळीच्या सुट्टीत कुठे जाणार आहात ?

तुम्ही उद्या सबंध दिवस काय करणार आहात ?

तुम्ही मुंबईचा-प्रवास करणार आहात का ? कसा करणार आहात ?

तुम्ही सुट्टीत काय करणार आहात ? तुम्ही मंडईत जाणार आहात का ?

तुम्ही मंडईतून कोणकोणत्या भाज्या आणि फळं आणणार

आहात ?

6. **Write a story in Future -2 using the following points (पुढे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे भविष्यकाळ २ चा उपयोग करून एक छोटी गोष्ट करा.)**

कुमार नावाचा मुलगा ------ लौकर उठतो. ----- फिरायला जातो ------ पक्षी पहातो. ------ फुलपाखरं पकडतो. ----- नदीत पोहतो ----- खूप खेळतो ------ मित्र भेटतात ------ गप्पा ----- खूप भटकतो ------ दमतो ----- घरी परत.

7. **Write a small essay on माझा प्रवास in about 15 lines using the future Tense. ('माझा प्रवास' या विषयावर भविष्यकाळाचा उपयोग करून सुमारे १५ ओळींचा निबंध लिहा.)**

Vocabulary

अनेक (adj)	many	भाषण (n)	talk, lecture
उतरणे (v.intr.)	to stay	भेटणे (v.tr.)	to meet
	to get down	मजा (f)	fun
गोंगाट (m)	noise	मांसाहारी (adj)	non-vegetarian
निबंध (m)	essay	शकणे (v.intr.)	can
प्रवास (m)	travel	शाकाहारी (adj)	vegetarian
पाणी भर (phr)	to store water	सुटणे (v.intr.)	to leave

Grammatical Notes

Unit - XIII, Lesson 41 introduces the second type of Future, called the 'Definite Future'.

This tense refers to a future action which has been arranged or decided upon e.g. मी उद्या मुंबईला जाणार आहे. 'Tomorrow I am going to Bombay'.

The definite Future is expressed by inserting the form R + णार. between the subject and the forms of the verb आहे. Thus we get :

बस 'to sit'

Singular	Plural
मी बसणार आहे.	आम्ही बसणार आहोत.
तू बसणार आहेस.	तुम्ही बसणार आहात.
तो बसणार आहे.	ते बसणार आहेत.
ती बसणार आहे.	त्या बसणार आहेत.
ते बसणार आहे.	ती बसणार आहेत.

The negative forms of the Definite Future are given in Lesson 38 of this Unit.

Notes : 1 डेक्कन क्वीननी 'by the Deccan Queen'.

A means of transport takes the postposition - नी 'by' when between a subject and a verb of motion.

In Marathi, names of the vehicles are mostly feminine.

Masculine	Feminine	Neuter
टांगा	बस	विमान
खटारा	रिक्षा	जहाज
ट्रक	मोटार	चांद्रयान
	सायकल	
	बैलगाडी	
	आगगाडी	
	स्कूटर	
	बोट	
	लूना	
	टॅक्सी	

४४५

आरामगाडी

नाव

होडी

बग्गी

एस.टी.

पी.एम.टी.

2. पुण्याहून 'from Poona'. -हून 'from' is a postposition which marks the point of departure.

3. मी मित्रांना भेटू शकतो. 'I can meet friends'.

R + ऊ + शक - 'can, be able' + verb.

Examples : मी मराठी बोलू शकतो. 'I can speak marathi.'

ते समुद्रात पोहू शकतात. 'They can swim in the sea.'

नाग झाडावर चढू शकतो. 'A cobra can climb a tree'.

4. मला सगळीकडे जाता येतं. 'I am able to go everywhere.;

R + ता + ये - 'to be able + verb.'

Examples : मला गाता येतं. 'I am able to sing.'

मला मराठी बोलता येतं. 'I am able to speak Marathi'.

माझ्या आईला सुंदर स्वैपाक करता येतो.

Literally : 'My mother is able to do nice cooking.' 'My mother is a good cook.'

5. शाकाहारी 'vegetarian'. मांसाहारी 'non-vegetarian'.

These are adjectives formed from nouns, by adding the suffix - ई.

शाकाहार + ई = शाकाहारी

मांसाहार + ई = मांसाहारी

गट - १४ / Unit - XIV

धडा बेचाळिसावा / LESSON 42

मांजर आत आलं / The cat came in

ते पहा मांजर.	See that cat.
त्याचा रंग आहे पांढरा शुभ्र.	Its colour is very white.
आज सकाळी ते माझ्या खोलीत शिरलं.	This morning it came into my room.
सरळ पलंगाकडे गेलं.	Straight way it went towards the cot.
आणि तिथे बसलं.	And sat there.
मी त्यावेळी बागेत होते.	I was in the garden at that time.
मी खोलीत आले आणि माझं लक्ष पलंगाकडे गेलं.	I came into my room and my attention went towards the cot.
मी हसले आणि मांजराला म्हणाले, ''बोकोबा, तुम्ही कुठून आलात?''	I smiled and said," Mister cat, Where are you come from?"
ते माझ्याशी काहीतरी बोललं आणि मग आरामात झोपलं.	It said something to me and it went to sleep in comfort.
थोड्या वेळानी मांजर उठलं.	After some time, the cat got up.
इतक्यात बाहेर एक मोठा कुत्रा आला.	Just then, a big dog came outside.
त्याबरोबर ते फार घाबरलं.	(As soon as it saw the dog) it

ते म्हणालं, "गुर ऽऽ गुर !"	It made a gurgling sound.
मग ते भराभर दूध पिऊन अंग चाटत बसलं.	Then it drank the milk speedily and sat licking (its) body.
त्याचं पोट भरलं म्हणून ते फारच खूष झालं.	Its belly was full, so it became very happy.
थोड्या वेळानी ते पलंगावर गेलं. आणि तिथेच गाढ झोपलं.	After some time it went to the cot and was fast asleep there.

Drills

1

Repetition Drills

मी खुर्चीवर बसलो.	मी खुर्चीवर बसले.
आम्ही खुर्चीवर बसलो.	आपण खुर्चीवर बसलो.
तू खुर्चीवर बसलास.	तू खुर्चीवर बसलीस.
तुम्ही खुर्चीवर बसलात.	
तो खुर्चीवर बसला.	ते खुर्चीवर बसले.
ती खुर्चीवर बसली.	त्या खुर्चीवर बसल्या.
ते खुर्चीवर बसलं.	ती खुर्चीवर बसली.
मी रात्री लौकर झोपलो.	मी सकाळी लौकर उठलो.
मी रात्री लौकर झोपले.	मी सकाळी लौकर उठले.
आम्ही रात्री लौकर झोपलो.	आम्ही सकाळी लौकर उठलो.
तू रात्री लौकर झोपलास.	तू सकाळी लौकर उठलास.
तू रात्री लौकर झोपलीस.	तू सकाळी लौकर उठलीस.
तुम्ही रात्री लौकर झोपलात.	तुम्ही सकाळी लौकर उठलात.
आपण रात्री लौकर झोपलो.	आपण सकाळी लौकर उठलो.

	was terrified.
त्याची शेपटी फुगली.	Its tail swelled.
आणि ते गुरगुरायला लागलं.	And it began to growl.
मांजराचा आवाज ऐकून कुत्रा एकदम खोलीत शिरला.	Hearing the cat's sound the dog immediately entered the room.
मांजर जोरात पळालं आणि पुस्तकांच्या कपाटावर चढलं.	The cat ran fast, and climbed on the book case.
कुत्रा भुंकायला लागला.	The dog began to bark.
मांजर खूप वेळ कपाटावरच बसून राहिलं.	It kept sitting on the cupboard for a long time.
शेवटी कुत्रा कंटाळला आणि बाहेर पळाला.	At last the dog was tired and it ran out.
कुत्रा बाहेर गेला.	The dog went out.
मांजराची भीती गेली.	The cat's fear was over.
मग ते हळूच कपाटावरून खाली उतरलं.	Then it gently got down from the cupboard.
आणि मला पाहून ओरडलं, ''म्याव म्याव !''	And on seeing me it mewed.
मी स्वैपाकघरात गेले.	I went into the kitchen.
ते माझ्यामागे आलं आणि टेबलावर चढलं.	It followed me and climbed on the table.
मी त्याच्याशी थोडावेळ बोलले आणि म्हणाले,''काय हो, दूध पाहिजे का ?''	I talked with it for a while and said, "I say, Sir do you want (some) milk ?"

तो रात्री लौकर झोपला.	तो सकाळी लौकर उठला.
ते रात्री लौकर झोपले.	ते सकाळी लौकर उठले.
ती रात्री लौकर झोपली.	ती सकाळी लौकर उठली.
त्या रात्री लौकर झोपल्या.	त्या सकाळी लौकर उठल्या.
ते रात्री लौकर झोपलं.	ते सकाळी लौकर उठलं.
ती रात्री लौकर झोपली.	ती सकाळी लौकर उठली.

II
Substitution Drills

१.	**आपण** झाडावर चढलो.	**आपण** झाडावर चढलो.
	मंदा	सुलोचनाबाई
	आम्ही	विनायकराव
	तू (m)	मी (f)
	तुम्ही	तो
	त्या	माकडं
	ती (f.sg.)	मांजरं
	मीना	गीता
	सरलाताई	श्री. आपटे
२.	**त्या** काम करताना पडल्या.	**त्या** काम करताना पडल्या.
	आम्ही	बाळासाहेब
	तिचा भाऊ	शिपाई
	आपण	मी
	सरिता	संदीप
	तुम्ही	कुसुम
	भाजीवाली	तू
	आई	माझी बहीण
	मुली	बाबा

III

Fill in the Gaps Drill

Fill in the gaps with the forms of ऊठ

('ऊठ'चे योग्य रूप घालून रिकाम्या जागा भरा.)

मी काल लौकर	अजित गाणं म्हणून ....
तो सकाळी सहा वाजता	श्री. डोंगरे पत्र लिहून ....
तुम्ही किती वाजता ....? .	मीनाताई खुर्चीवरून ....
आपण आज उशिरा	तू बारा वाजता ....
आम्ही पहाटे	ती पुस्तक वाचून ....
मोहन रात्री	त्या काम संपवून ....
मांजर दूध प्यायला	सुशीला आता ....

IV

Transformation Drills

Turn the Present Habitual into the Past.

1

(रीतिवर्तमानकाळाऐवजी भूतकाळ वापरा.)

मी धुळ्याला जातो.	मी धुळ्याला गेलो.
मी धुळ्याला जाते.	मी धुळ्याला गेले.
आम्ही धुळ्याला जातो.	आम्ही धुळ्याला गेलो.
तू धुळ्याला जातोस.	तू धुळ्याला गेलास.
तू धुळ्याला जातेस.	तू धुळ्याला गेलीस.
तुम्ही धुळ्याला जाता.	तुम्ही धुळ्याला गेलात.
आपण धुळ्याला जातो.	आपण धुळ्याला गेलो.
तो धुळ्याला जातो.	तो धुळ्याला गेला.
ते धुळ्याला जातात.	ते धुळ्याला गेले.
ती धुळ्याला जाते.	ती धुळ्याला गेली.

त्या धुळ्याला जातात.	त्या धुळ्याला गेल्या.
ते धुळ्याला जातं.	ते धुळ्याला गेलं.
ती धुळ्याला जातात.	ती धुळ्याला गेली.
मी शाळेत येतो.	मी शाळेत आलो.
मी शाळेत येते.	मी शाळेत आले.
आम्ही शाळेत येतो.	आम्ही शाळेत आलो.
तू शाळेत येतोस.	तू शाळेत आलास.
तू शाळेत येतेस.	तू शाळेत आलीस.
तुम्ही शाळेत येता.	तुम्ही शाळेत आलात.
तो शाळेत येतो.	तो शाळेत आला.
ते शाळेत येतात.	ते शाळेत आले.
ती शाळेत येतात.	ती शाळेत आली.
त्या शाळेत येतात.	त्या शाळेत आल्या.
ते शाळेत येतं.	ते शाळेत आलं.
ती शाळेत येतात.	ती शाळेत आली.

2

मी विद्यार्थी आहे.	मी विद्यार्थी होतो.
मी विद्यार्थी आहे.	मी विद्यार्थी होते.
आम्ही विद्यार्थी आहोत.	आम्ही विद्यार्थी होतो.
तू विद्यार्थी आहेस.	तू विद्यार्थी होतास.
तू विद्यार्थिनी आहेस.	तू विद्यार्थिनी होतीस.
तुम्ही विद्यार्थी आहात.	तुम्ही विद्यार्थी होता.
आपण विद्यार्थी आहोत.	आपण विद्यार्थी होतो.
तो विद्यार्थी आहे.	तो विद्यार्थी होता.
ती विद्यार्थी आहे.	ती विद्यार्थी होती.

ते विद्यार्थी आहेत.	ते विद्यार्थी होते.
त्या विद्यार्थी आहेत.	त्या विद्यार्थी होत्या.

3

मी डॉक्टर होतो.	मी डॉक्टर झालो.
मी डॉक्टर होते.	मी डॉक्टर झाले.
आम्ही डॉक्टर होतो.	आम्ही डॉक्टर झालो.
तू डॉक्टर होतास.	तू डॉक्टर झालास.
तू डॉक्टर होतेस.	तू डॉक्टर झालीस.
तुम्ही डॉक्टर होता.	तुम्ही डॉक्टर झालात.
तो डॉक्टर होतो.	तो डॉक्टर झाला.
ते डॉक्टर होतात.	ते डॉक्टर झाले.
ती डॉक्टर होते.	ती डॉक्टर झाली.
त्या डॉक्टर होतात.	त्या डॉक्टर झाल्या.

V

Conversation Drill

शिक्षक : अरुण, काल कोणता वार होता ?

अरुण : काल रविवार होता.

शिक्षक : काल तू किती वाजता झोपलास ?

अरुण : काल मी दहा वाजता झोपलो.

शिक्षक : नीता, तू किती वाजता उठलीस ?

नीता : मी सकाळी सात वाजता उठले आणि दात घासून, तोंड धुऊन बाबांबरोबर फिरायला गेले.

शिक्षक : तुम्ही कुठे फिरायला गेलात ?

नीता : आम्ही डोंगरावर फिरायला गेलो. तिथे आम्ही डोंगर चढलो. इकडेतिकडे खूप भटकलो.

शिक्षक : सुभाष, काल तू कुठे होतास ?

सुभाष : काल मी घरीच होतो. काल आमच्याकडे पाहुणे आले. पाहुण्यांबरोबर मी जेवलो. दुपारी आम्ही पत्ते खेळलो आणि रात्री सिनेमा पहायला गेलो.

स्वाध्याय क्र. ४२ **Excercise No. 42**

1. Fill in the gaps with the proper Past Tense forms of the verbs given in the brackets.

(कंसात दिलेल्या धातूंचे योग्य ते भूतकाळातले रूप घालून रिकाम्या जागा भरा.)

तू धुळ्याला (जा) .... आणि माझ्या आईकडे दोन दिवस (रहा) .... मांजर झाडावर (चढ) .... आणि झाडावरच (झोप) .... आम्ही शाळेतून घरी यायला (निघ) .... काल खूप जोरात पाऊस (पड) .... आणि सर्व रस्त्यावर पाणी (हो) .... माझा मित्र माझ्याकडे (ये) .... तुम्ही मुंबईला (आहे) .... का ? ती शर्यतीमध्ये जोरात (धाव) .... आणि पहिली (ये) .... चार कुत्रे मांजराच्या मागे (पळ) .... त्या सकाळी लौकर (उठ) .... आणि फिरायला (जा) .... मी तिच्या घरी जाऊन खूप (जेव) ....

2a. Substitute आला with the proper forms of the given verbs.

(‘आला’ऐवजी दिलेल्या धातूंची योग्य रूपे लिहा.)

मोहन शाळेत **आला.**	मोहन शाळेत **आला.**
जा	बस
पळ	झोप
निघ	हस

पोच	रड
आहे	पड

2b. **Substitute ती with the given pronouns or nouns making necessary changes in the sentences.**

('ती'ऐवजी खालील सर्वनामे किंवा नामे वापरून योग्य ते बदल करून खालील वाक्य लिहा.)

ती मुंबईला होती.	ती मुंबईला होती.
आम्ही	तुम्ही
ते	मी
त्या	तो
तू	विनायक
आपण	शारदा

3. **The subjects are given under section A and the verb forms are given under section B. Select the proper pair of subject and verb and construct your own sentences.**

(विभाग 'अ' मधे कर्त्यांची आणि विभाग 'ब'मधे क्रियापदांची यादी दिली आहे. प्रत्येक कर्त्याबरोबर क्रियापदाचे योग्य ते रूप ठेवून वाक्ये तयार करा.)

Sentence : सुहास पडला.

सुहास चेंडू खेळताना पडला.

Section A	Section B
हिरा	झाले.
प्रभाकर	होतो.
वैशालीताई	हसली.
मी आणि माझा मित्र	आल्या.

केळकरसाहेब	पळाला.
प्रकाश आणि विकास	गेलास.
शीला आणि रेखा	चढले.
तू आणि तुझी मैत्रीण	उतरलो.
तू	पडल्या.
आपण	चाललात.

4. **Transform the following sentences into the past Tense.**

(पुढील वाक्ये भूतकाळात लिहा.)

प्रदीप मुंबईला जाणार आहे.	माधवराव संध्याकाळी फिरायला जातात.
कुत्रा मांजराच्या मागे लागतो.	श्री. भाटिया अहमदाबादला रहातात.
माझे आईवडील धुळ्याला आहेत.	नीला आज माझ्याकडे येईल.
सीता बागेत धावेल.	वर्गातला पंखा गरगर फिरतो.
मोहन आणि राजू जिना उतरतात.	तू खुर्चीवरून पडशील.

5. **Putting 'rabbit' in place of 'cat' in the lesson, rewrite it fully making necessary changes.**

(‘मांजर’ऐवजी ‘ससा’ हे नाम वापरून योग्य त्या फेरफारांसह ‘मांजर आत आलं’ हा सगळा धडा पुन्हा लिहा.)

Vocabulary

आराम (m)	comfort	पलंग (m)	cot
इतक्यात	(adv)	just then	फुगणे

(v.intr.) to swell,

			to fluff
काहीतरी(n)	something	बोकोबा (voc)	Mr. cat
कंटाळणे (v.intr.)	to be fedup	भरभर (adv)	speedily, quickly
गाढ (adv)	soundly	भुंकणे (v.intr.)	to bark
गुरगुरणे (v.intr.)	to growl	म्यावम्याव (n)	mewsing
चाटणे (v.tr.)	to lick	लक्ष (n)	attention
जोरात (adv)	fast	शेवटी (adv)	at last
त्याबरोबर (adv)	immediately	सरळ (adv)	straight way
दमणे (v.intr.)	to be tired		

Grammatical Notes

General Remarks :

Unit - XVII introduces the Past Tense.

Marathi verbs may be divided into three classes.

1. **conjugational**
2. **Non-Conjugational**
3. **Neutral**

How is Past Tense formed ?

1. **Base + tense marker ल + person, gender, number, suffix**
2. **Base + tense marker ल + gender, number suffix**
3. **Base + tense marker ल + neuter singular suffix**

What is a base ?

A base is the form of the root before the tense marker ल. In most cases the base form is identical with the root form. In about twenty cases only there is partial or complete modification in the root form.

Unit - XIV Lesson 42 explains the category of verbs, called Conjugational verbs having a direct subject only.

Conjugational verbs are those which agree with the direct subject in person, number and gender.

Below is an example of a regular Conjugational verb of the type DS + V :

तक्ता क्रमांक २१ **Table No.21**

RB - - 'to sit' Table No. 21

	Singular	Plural
1st person	(m) मी बसलो.	आम्ही बसलो.
	(बस + ल + ओ)	(बस + ल + ओ)
	(f) मी बसले.	
	(बस + ल + ए)	
2nd person	(m) तू बसलास.	तुम्ही बसलात.
	(बस + ल + आस)	(बस + ल + आत)
	तू बसलीस.	
	(बस + ल + ईस)	
3rd person	(m) तो बसला.	ते बसले.
	(बस + ल + आ)	(बस + ल + ए)
	ती बसली.	त्या बसल्या.
	(बस + ल + ई)	(बस + ल + या)
	ते बसलं.	ती बसली.
	(बस + ल + अं)	(बस + ल +ई)

तक्ता क्रमांक २२ R हो - - B झा - - 'to become' Table No. 22

	Singular	Plural
1st person	(m) मी बारीक झालो.	आम्ही बारीक झालो.
	(झा + ल + ओ)	(झा + ल + ओ)
	(f) मी बारीक झाले.	
	(झा + ल + ए)	
2nd person	(m) तू बारीक झालास	तुम्ही बारीक झालात.

	(झा + ल + आस)	(झा + ल + आत)
	(f) तू बारीक झालीस.	
	(झा + ल + ईस)	
3rd person	(m) तो बारीक झाला.	ते बारीक झाले.
	(झा + ल + आ)	(झा + ल + ए)
	ती बारीक झाली.	त्या बारीक झाल्या.
	(झा + ल + ई)	(झा + ल + या)
	ते बारीक झालं.	ती बारीक झाली.
	(झा + ल + अं)	(झा + ल + ई)

आहे 'to be' has the Past Tense base हो - and it takes the tense marker त्. The Present Tense of the verb हो - 'to become' and Past Tense of the verb आहे 'to be' should be distinguished in their use. They are given here for the convenience of the learners :

Present Tense

हो - **'to become'**

		Sg.	Pl.
1st p	**(m)**	मी खूप होतो.	आम्ही खूप होतो.
	(f)	मी खूप होते.	
2nd p	**(m)**	तू खूप होतोस.	
	(f)	तू खूप होतेस.	तुम्ही खूप होता.
3rd p	**(m)**	तो खूप होतो.	ते खूप होतात.
	(f)	ती खूप होते.	त्या खूप होतात.
	(neu)	ते खूप होतं.	ती खूप होतात.

तक्ता क्र. २३ Table No.23

Past Tense

R आहे B हो - 'to be'

		Sg.	Pl.
1st p	(m)	मी घरी होतो.	
	(f)	मी घरी होते.	आम्ही घरी होतो.
2nd p	(m)	तू घरी होतास.	
	(f)	तू घरी होतीस.	तुम्ही घरी होतात.
3rd p	(m)	तो घरी होता.	ते घरी होते.
	(f)	ती घरी होती.	त्या घरी होत्या.
	(neu)	ते घरी होतं.	ती घरी होती.

गट - १४	Unit - XIV
धडा त्रेचाळिसावा	**LESSON 43**
मला देऊळ आवडलं	**I liked the temple**
मी काल लौकर उठलो आणि फिरायला गेलो.	Yesterday, I got up early and went for a walk.
चालत चालत मी पर्वती टेकडीपर्यंत गेलो.	As I walked I reached the Parvati hill.
थोडावेळ थांबून मी टेकडी चढायला लागलो.	After waiting for some time, I began to go up the hill.
हळूहळू मी टेकडीवरच्या देवळापर्यंत पोचलो.	Gradually I reached the temple (which is) on the hill.
ते शंकराचं देऊळ होतं.	It was a Shiva temple.
मला ते देऊळ खूप आवडलं.	I liked that temple very much.
तिथे मला एक वाडा दिसला.	There I saw one mansion.
तो वाडा पेशव्यांचा होता.	That mansion belonged to the Peshwas.
मग मी पेशव्यांच्या वाड्यापर्यंत गेलो.	Then I went to the Peshwas mansion.
तो वाडाही मला आवडला.	I liked that mansion also.
पर्वती टेकडीवर विष्णूचं पण देऊळ आहे.	There is a Vishnu temple also on the Parvati hill.
मला तिथून संपूर्ण पुणे शहर दिसलं.	I could see the whole Pune from there.
मला खूप आनंद झाला.	I was very happy.
पण टेकडीवरून खाली पहाताना मला थोडी भीती वाटली.	But as I looked down from the hill, I was a little afraid.

मी तिथे फार वेळ थांबलो नाही.	I did not stop there for a long time.
परत येताना मला माझा एक मित्र भेटला.	On my way back I met a friend of mine.
त्या मित्राकडून मला दुसऱ्या मित्रांच्या बातम्या समजल्या.	I came to know about my other friends from the friend I met.
मला खूप उशीर झाला.	I was very late.
येताना मला ऊन लागलं.	While coming back I felt hot.
मग मी स्टॉपवर थांबलो.	Then I stopped on a (bus) stop.
मला बस मिळाली आणि मी घरी आलो.	I got the bus and I reached home.
मला उशीर झाला म्हणून माझ्या आईला राग आला.	As I was late, my mother was annoyed.
मी म्हणालो,'' आई तू पर्वतीवरचं देऊळ जरूर बघायला जा. तुला ते आवडेल. मला ते देऊळ खूप आवडलं.''	I said," Mother, you do go to see the temple (which is) on the hill. You will like it. I liked the temple very much."

Drills

I

Repetition Drills

मला चहा आवडला.	मला कॉफी आवडली.
मला दूध आवडलं.	मला पेढे आवडले.
मला टेकड्या आवडल्या.	मला देवळं आवडली.
तुला धडा समजला.	तुला कविता समजली.

तुला उत्तर समजलं.
तुला प्रश्न समजले.
तुला बातम्या समजल्या.
तुला नावं समजली.
त्याला आनंद झाला.
त्याला उशीर झाला.
त्याला घाई झाली.
त्याला दुःख झालं.
आम्हाला मित्र भेटला.
आम्हाला मैत्रीण भेटली.
आम्हाला माणसं भेटली.
आम्हाला डॉक्टर भेटले.
तुम्हाला पंखा मिळाला.
तुम्हाला वही मिळाली.
तुम्हाला घड्याळ मिळालं.
आपल्याला पुस्तकं मिळाली.
त्यांना पैसे मिळाले.
त्यांना साड्या मिळाल्या.
सुमतीला तिचा भाऊ भेटला.
मांजराला भरपूर दूध मिळालं.

2

मी धावत धावत बसमधे चढलो.
मी हसत हसत वर्गात आले.
आम्ही गप्पा मारत मारत झोपलो.
तू खात खात घरात शिरलास.
तुम्ही पळत पळत बागेत गेला.
ती रडत रडत बाहेर गेली.
तो थांबत थांबत चालला.
ते गंमत पहात पहात घरी गेले.
ती चालत चालत दुकानात गेली.
ते खेळत खेळत झोपलं.
मुलं नाचत नाचत घरी गेली.
मुली उड्या मारत मारत वर्गात गेल्या.

II

Affimative-Negative Drills

1

Turn into the negative the following sentences.
(पुढील वाक्ये नकारार्थी करा.)

मी डोंगरावर थांबलो.–> मी डोंगरावर थांबलो नाही.
मी डोंगरावर थांबले. मी डोंगरावर थांबले नाही.

आम्ही डोंगरावर थांबलो.	आम्ही डोंगरावर थांबलो नाही.
तू वर्गात आलास.	तू वर्गात आला नाहीस.
तू वर्गात आलीस.	तू वर्गात आली नाहीस.
तुम्ही वर्गात आलात.	तुम्ही वर्गात आला नाहीत.
तो खुर्चीवर बसला.	तो खुर्चीवर बसला नाही.
ते बागेत गेले.	ते बागेत गेले नाहीत.
ती वसतिगृहात राहिली.	ती वसतिगृहात राहिली नाही.
त्या देवळात पोचल्या.	त्या देवळात पोचल्या नाहीत.
ते घरात पळालं.	ते घरात पळालं नाही.
ती उशिरा उठली.	ती उशिरा उठली नाहीत.

2

मला हा शर्ट आवडला.	मला हा शर्ट आवडला नाही.
आम्हाला तो बंगला आवडला.	आम्हाला तो बंगला आवडला नाही.
तुला पेले आवडले.	तुला पेले आवडले नाहीत.
त्याला कविता आवडली.	त्याला कविता आवडली नाही.
तिला साड्या आवडल्या.	तिला साड्या आवडल्या नाहीत.
त्यांना घर आवडलं.	त्यांना घर आवडलं नाही.
त्यांना पुस्तकं आवडली.	त्यांना पुस्तकं आवडली नाहीत.
आपल्याला विद्यार्थी आवडले.	आपल्याला विद्यार्थी आवडले नाहीत.

2

Change the negative into affirmative.

(नकारार्थी वाक्यं होकारार्थी करा.)

मी झाडावर चढलो नाही. -> मी झाडावर चढलो.

मी लौकर उठलो नाही.	मी लौकर उठलो.
आम्ही शाळेत गेलो नाही.	आम्ही शाळेत गेलो.
तू नदीत पोहला नाहीस.	तू नदीत पोहलास.
तू घरी उशिरा पोचली नाहीस.	तू घरी उशिरा पोचलीस.
तुम्ही बाकावर बसला नाहीत.	तुम्ही बाकावर बसलात.
तो राजा झाला नाही.	तो राजा झाला.
ते घरात शिरले नाहीत.	ते घरात शिरले.
ती पलंगावर झोपली नाही.	ती पलंगावर झोपली.
त्या वर्गात आल्या नाहीत.	त्या वर्गात आल्या.
ते जोरात पळालं नाही.	ते जोरात पळालं.
ती मुंबईला राहिली नाही.	ती मुंबईला राहिली.

III
Substitution Drills

Replace the noun in bold type with the following nouns.

(जाड टशातील नामाऐवजी खालील नामे वापरा.)

1. मालतीला **चांदण्या** दिसल्या. मालतीला **चांदण्या** दिसल्या.

घरं	पतंग
आकाश	दागिने
भाज्या	देऊळ
मंडई	डोंगर
दुकानं	टेकड्या

2. मीनाला **रुमाल** सापडला. मीनाला **रुमाल** सापडला.

वही	चष्मा
पेन्सील	पैसे
पेन	घड्याळ
चपला	खेळणी

किल्ली कपडे

3. **Replace the underlined noun with the following pronouns.**

(अधोरेखित नामाऐवजी पुढील सर्वनामे वापरा.)

विजयला लाडू आवडला. **विजयला** लाडू आवडला.

तो आपण

तू आम्ही

ती मी

तुम्ही ती (n.pl.)

ते (m.pl.) ते (n.sg.)

IV

Conversation Drill

शिक्षक : मोहन, काल तू शाळेत किती वाजता आलास?

मोहन : काल मी शाळेत सकाळी थोडा लौकर आलो.

शिक्षक : तू खेळायला लौकर आलास का ?

मोहन : हो, काल मी शाळेत लौकर येऊन खूप खेळलो.

शिक्षक : तुझ्याबरोबर खेळायला कोण कोण होतं ?

मोहन : माझ्याबरोबर खेळायला किरण होता, दीपक होता आणि अनला होती.

शिक्षक : तुम्ही काय काय खेळलात ?

मोहन : किरणला घसरगुंडी आवडली. तो खूपदा घसरगुंडीवरून खाली घसरला. अनलाला झोपाळा आवडला. ती झोपाळ्यावर बसली. शेवटी आम्ही खूप दमलो आणि हातपाय धुऊन

वर्गात गेलो. कालची वर्गातली कविता मला फार आवडली. अनलाला मात्र ती कविता समजली नाही. किरणला तर कविता पाठ म्हणता आली. संध्याकाळी आम्ही घरी गेलो.

शिक्षक : छान छान. आता घरी जा आणि खूप अभ्यास करा.

स्वाध्याय क्र. ४३ **Exercise No. 43**

1 **Turn into the Past Tense the following sentences.**
(पुढील वाक्ये भूतकाळात लिहा.)

मला तुझी साडी फार आवडेल.

त्याला रस्त्यावर एक कुत्रा दिसेल.

रोहिणीला परीक्षेच्या बातम्या समजतील.

त्यांना खूप गाणी येतात.

सुजाताला उंच डोंगर पाहून आनंद होईल.

तुला पळताना टेबल लागेल.

मोहनला सर्कस बघताना मजा वाटते.

तुम्हाला शाळेत तुमचे मित्र भेटतात.

आम्हाला मंडईत ताज्या भाज्या मिळतील.

आपल्याला ऑफिसात जायला उशीर होईल.

2 **Turn into the negative the following sentences.**
(पुढील वाक्ये नकारार्थी करा.)

लोक डोंगर चढले.

आम्ही गावाला गेलो.

मांजराला दूध मिळालं.

त्या बागेत बसल्या.

मला सिनेमा आवडला.

कुत्रा जोरात भुंकला.

ते रात्री लौकर झोपले. तू रस्त्यावर पळालीस.
मला माझी मैत्रीण दिसली. त्यांना पैसे सापडले.
तुम्ही खुर्चीवरून उठलात. लीलाला ताप आला.
माधवला आनंद झाला. मुलींना कंटाळा आला.

3 **Substitute the correct form of the given pronouns and nouns for the words in bold type making necessary changes. Then change the sentence into the plural.**
(सर्वनामांची व नामांची योग्य ती रूपे करून जाड टशातील शब्दांच्या जागी घाला आणि आवश्यक ते बदल करून पुढील वाक्ये लिहा. नंतर ती वाक्ये अनेकवचनात लिहा.)

Model : **मला पेरू** आवडला.

आम्ही कविता -> आम्हाला कविता आवडली.

अ.व. आम्हाला कविता आवडल्या.

तुला **टेबल** आवडलं
ती पेन्सील
आपण घर
तुम्ही बाग
ते (pl.) वासरू
तो चहा
मांजर लोणी
शिक्षक विद्यार्थी
माझा मित्र जागा
सुहास हत्ती
गाय चारा

4 **Complete the following conversation by filling the**

blanks with appropriate sentences.

(रिकाम्या जागी योग्य ती वाक्ये घालून पुढील संवाद पूर्ण करा.)

अ : काल आम्हाला 'वैशाली' हॉटेलात छान कॉफी मिळाली.

ब : ....

अ : हो. मला ती कॉफी आवडली. नंतर मला माझा मित्र भेटला.

ब : ....

अ : मला माझा मित्र पुस्तकाच्या दुकानात भेटला.

ब : ....

अ : माझ्या मित्राचं नांव अमोल.

ब : ....

अ : मला माझे दुसरे मित्र भेटले नाहीत.

ब : ....

अ : नाही. आम्ही पुस्तकांच्या दुकानात गेलो नाही.

ब : ....

अ : आम्ही दोघेच फिरायला गेलो.

ब : ....

अ : आधी आम्ही सारसबागेत गेलो. तिथून आम्ही पर्वती टेकडीवर गेलो. मग आम्ही पेशवेबागेत हिंडलो.

ब : ....

अ : हो, आम्ही खूप भटकलो.

ब : ....

अ : हो, आम्हाला घरी जायला खूप उशीर झाला.

ब : ....

अ : आम्ही रात्री नऊ वाजता घरी आलो.

Vocabulary

आनंद होणे (phr) to become happy

उशीर होणे (phr) to be late

ऊन (n) sun-light

काळजी (f) worry

गणित (n) mathematical problem

घाई (f) haste,hurry

जरूर (adv) difinately

ताप (m) fever

थंडी (f) cold

बातमी (f) news

भीती (f) fear

वाडा (m) mansion

संपूर्ण (adj) whole

Grammatical Notes

Unit - XIV, Lesson 43 explains the category of conjugational verbs having an indirect and a direct subject. It also explains the Past Tense negative forms.

(Sentence Pattern :)

	IS	DS	V.
1.		(m.sg.)	
	मला	चहा	आवडला.
	तुला	चहा	आवडला.
	त्याला	चहा	आवडला.
	तिला	चहा	आवडला.
	त्याला (neu)	चहा	आवडला.
	आम्हाला	चहा	आवडला.
	तुम्हाला	चहा	आवडला.

	आपल्याला	चहा	आवडला.
	त्यांना (m/f/neu)	चहा	आवडला.
2.	IS	DS (f.pl.)	V.
	मला	वह्या	मिळाल्या.
	तुला	वह्या	मिळाल्या.
	त्याला	वह्या	मिळाल्या.
	तिला	वह्या	मिळाल्या.
	त्याला	वह्या	मिळाल्या.
	आम्हाला	वह्या	मिळाल्या.
	तुम्हाला	वह्या	मिळाल्या.
	आपल्याला	वह्या	मिळाल्या.
	त्यांना	वह्या	मिळाल्या.
	तुला	मी	आवडलो.
	तुला	मी	आवडले.
	त्याला	तू	आवडलास.
	त्याला	तू	आवडलीस.
	तिला	तो	आवडला.
	त्याला	ती	आवडली.
	मला	ते	आवडलं.
	त्यांना	आम्ही	आवडलो.
	आम्हाला	तुम्ही	आवडलात.
	आपल्याला	ते	आवडलं.
	तुम्हाला	त्या	आवडल्या.
	त्यांना	ती	आवडली.

Past Tense Negative :

The negative is obtained by adding the forms of नाही after the past tense form e.g.

मी आलो.	'I came'.
मी आलो नाही.	'I did not come'.
तू आलीस.	'You came'.
तू आली नाहीस.	'You did not come'.

The second person markers 'स' singular and 'त' plural of the main verb are dropped when the form of नाही are added.

गट - १४ | Unit - XIV

धडा चव्वेचाळिसावा
LESSON 44

मला गोव्यात करमलं
I enjoyed myself in Goa.

श्री. गुप्ते : नमस्कार, मुकुंदराव तुम्ही इकडे कुठे? तुम्ही गोव्याला होतात न?	Namaste Mukundrao! How come you are here? You were in Goa, weren't you?
मुकुंदराव : हो. पण माझी गोव्याहून बदली झाली.	Yes. But I was transferred from Goa.
श्री. गुप्ते : असं? कधी? कुठे?	Is it so? When? Where?
मुकुंदराव : सांगतो, सांगतो. माझी गेल्या महिन्यात गोव्याहून मुंबईला बदली झाली.	(Wait, wait !) I'll tell (you) I was transferred from Goa only last month.
श्री. गुप्ते : असं का?गोवं मुंबईपेक्षा छान होतं, नाही का?	Is that so? Goa was better then Mumbai, wasn't it?
मुकुंदराव : हो न. मला गोवं फार आवडलं.	Certainly I was fond of Goa very much.
श्री. गुप्ते : गोव्यात तुम्हाला करमलं का?	Did you enjoy yourself in Goa?
मुकुंदराव : हो. गोव्यात मी मजेत होतो. तिथे दोन वर्ष माझा वेळ छान गेला. उजाडलं तरी सगळीकडे शांत. माझं घर समुद्र किनाऱ्यावर होतं.	Yes, I was very happy in Goa.I spent nicely my two years period there. Even after day break (it was) peaceful every where.My house was on the sea shore.

सांजावलं की समुद्राचं दृश्य फार सुंदर दिसत होतं. काय पाहू आणि काय नको असं वाटलं. आता ते आठवतं आणि मला वाईट वाटतं.	In the evening, the scene of the sea was very beautiful. I did not know what to see and what not to see! (I) remember it now and I feel unhappy.
श्री. गुप्ते : गोव्यात मुंबईपेक्षा धावपळ कमी होती न?	There was less hustle and bustle in Goa than in Mumbai, wasn't it?
मुकुंदराव : हो, गोव्यात धावपळ अगदीच कमी.मला तिथलं सर्व काही आवडलं. पण हवा मात्र आवडली नाही. मला गोव्यात फार उकडलं.	Yes, In Goa the hustle and bustle is very limited. I liked everthing over there.But I didn't like the weather. I felt very much warm in Goa.
श्री. गुप्ते : पण तुम्हाला गोव्यात ताजे मासे मिळाले न?	But you got fresh fish in Goa, didn't you?
मुकुंदराव : प्रथम मला मासे खाताना मळमळलं. पण नंतर मला मासे आवडायला लागले.	I felt sick while eating the fish first time. But later I started liking the fish.
श्री. गुप्ते : गोव्यात तुमचे फार मित्र नव्हते न?	You had not many friends in Goa, hadn't you?
मुकुंदराव : तेही खरंच. गोव्यात माझे फार मित्र नव्हते. गोवं शांत ठिकाण होतं. पण गोव्या मला करमलं. आता मुंबईत मित्र खूप आहेत	That is true. I had not many friends in Goa. Goa was a quiet place. But I enjoyed Goa. Now there are many

आणि मुंबईत धावपळही असते.	friends in Mumbai. And there is also hustle and bustle in Mumbai.
मुंबईत राहून माझा वेळ भरभर जाईल.	My time will pass speedily while I'm in Mumbai.
पण आता माझी बदली पुण्याला व्हायला पाहिजे.	But I should get transfer to pune now.
श्री. गुप्ते : मला वाटतं, तुमची लौकरच मुंबईहून पुण्याला बदली होईल.	I think, you will be transferred very soon in Pune.
मुंकुंदराव : वा वा गुप्तेसाहेब ! तुमच्या तोंडात साखर पडो. माझी पुण्याला बदली झाल्यावर तुम्ही माझ्या घरी नक्की यायला पाहिजे.	That's very kind of you Mr. Gupte. Many thanks to you for your kind wishes. You must come to me in Pune after I am transferred.
श्री.गुप्ते : जरूर जरूर. आधी मुंबईत तुम्ही माझ्या घरी कधी येता? येत्या रविवारी या. मी तुमची वाट पाहीन. चालेल?	Oh surely. But when are you coming to my place in Mumbai? I'll wait for you next Sunday. Is that all right?
मुकुंदराव : बरं. येईन. नमस्कार.	O.K. I'll come. Namaste.
श्री. गुप्ते : बरंय. नमस्कार.	O.K. Namaste.

Drills

I

Repetition Drills

मला गोव्यात करमलं. तुला पुण्यात करमलं.

त्याला घरात करमलं. तिला तिथे करमलं.
आम्हाला धुळ्याला करमलं. तुम्हाला शाळेत करमलं.
त्यांना मुंबईत करमलं. आपल्याला ऑफिसात करमलं.
मला दूध पिऊन मळमळलं. तुला मासे खाताना मळमळलं.
त्याला औषध घेताना मळमळलं. तिला बसमधे मळमळलं.
आम्हाला प्रवास करताना मळमळलं. तुम्हाला बोटीत मळमळलं.
त्यांना पोहताना मळमळलं. आपल्याला रक्त बघून मळमळलं.
मला आठवलं. (मला पत्ता आठवला.)
(मला कविता आठवली.) (मला घर आठवलं.)

II
Contraction Drills

Transform the two sentences into one.

(खाली दिलेल्या दोन वाक्यांचे एक वाक्य करा.)

तुला आवडलं. (तुला आंबे आवडले.)
(तुला कैऱ्या आवडल्या.) (तुला लिंबं आवडली.)
त्याला समजलं. (त्याला प्रश्न समजला.)
(त्याला गोष्ट समजली.) (त्याला नाटक समजलं.)
तिला दिसलं. (तिला डोंगर दिसले.)
(तिला साड्या दिसल्या) (तिला झाडं दिसली.)
आम्हाला मिळालं. (आम्हाला पंखा मिळाला.)
(आम्हाला खुर्ची मिळाली.) (आम्हाला टेबल मिळालं.)
तुम्हाला कळलं. (तुम्हाला रस्ते कळले.)
(तुम्हाला बातम्या कळल्या.) (तुम्हाला उत्तरं कळली.)
त्यांना वाटलं. (त्यांना आनंद वाटला.)
(त्यांना भीती वाटली.) (त्यांना दुःख वाटलं.)

आपल्याला लागलं. (आपल्याला दगड लागला.)

(आपल्याला खुर्ची लागली.) (आपल्याला टेबल लागलं.)

III

Transformation Drills

Transform the sentences into the Past Tense first and then replace the original verb with करम.

(आधी वाक्य भूतकाळात बदला आणि नंतर मूळ क्रियापदाच्या जागी 'करम' हे क्रियापद वापरा.)

मी पुण्यात रहातो.	मी पुण्यात राहिलो.	मला पुण्यात करमलं.
मी पुण्यात रहाते.	मी पुण्यात राहिले.	मला पुण्यात करमलं.
आम्ही पुण्यात रहातो.	आम्ही पुण्यात राहिलो.	आम्हाला पुण्यात करमलं.
तू शाळेत जातोस.	तू शाळेत गेलास.	तुला शाळेत करमलं.
तू शाळेत जातेस.	तू शाळेत गेलीस.	तुला शाळेत करमलं
तुम्ही शाळेत जाता.	तुम्ही शाळेत गेलात.	तुम्हाला शाळेत करमलं.
तो ऑफिसात येतो.	तो ऑफिसात आला.	त्याला ऑफिसात करमलं.
ते ऑफिसात येतात.	ते ऑफिसात आले.	त्यांना ऑफिसात करमलं.
ती गोव्यात आहे.	ती गोव्यात होती.	तिला गोव्यात करमलं.
त्या गोव्यात आहेत.	त्या गोव्यात होत्या.	त्यांना गोव्यात करमलं.

IV

Affirmative - Negative Drills

Turn the affirmative sentences into the negative.

(खालील होकारार्थी वाक्ये नकारार्थी करा.)

मी गोव्याला होतो. ------->	मी गोव्याला नव्हतो.
मी गोव्याला होते.	मी गोव्याला नव्हते.
आम्ही गोव्याला होतो.	आम्ही गोव्याला नव्हतो.

तू पुण्याला होतास.	तू पुण्याला नव्हतास.
तू पुण्याला होतीस.	तू पुण्याला नव्हतीस.
तुम्ही पुण्याला होतात.	तुम्ही पुण्याला नव्हतात.
तो दिल्लीत होता.	तो दिल्लीत नव्हता.
जोशीसाहेब दिल्लीत होते.	जोशीसाहेब दिल्लीत नव्हते.
ती कलकत्त्याला होती.	ती कलकत्त्याला नव्हती.
सुलभाताई कलकत्त्याला होत्या.	सुलभाताई कलकत्त्याला नव्हत्या.
मांजर दाराजवळ होतं.	मांजर दाराजवळ नव्हतं.
माणसं घरात होती.	माणसं घरात नव्हती.

V
Conversation Drill

शिक्षक : मंगला, काल तुझ्याकडे कोण आलं?

मंगला : काल माझ्याकडे माझा भाऊ आला. तो आणि मी मंडईत फिरायला गेलो.

शिक्षक : मंडईत तुम्हाला काय मिळालं?

मंगला : तिथे आम्हाला पुष्कळ ताज्या भाज्या मिळाल्या. शिवाय खूप फळं पण मिळाली.

शिक्षक : अरे वा! तुम्हाला तिथे आणखी काय दिसलं?

मंगला : आम्हाला एका जागी शेंगांचा मोठा ढीग दिसला. मला शेंगा फार आवडतात. आम्हाला शेंगा मिळाल्या आणि मला फार आनंद झाला.

शिक्षक : फार छान. नंतर काय झालं?

मंगल : नंतर आम्ही फ्लॉवरच्या ढिगाजवळ आलो. फ्लॉवरवाला म्हणाला, ''घ्या घ्या फ्लॉवर घ्या. स्वस्त आणि मस्त फ्लॉवर. दहा रुपये किलो फक्त.

शिक्षक : दहा रुपये किलो ! फारच स्वस्त होता.

मंगला : हो न ! काय घेऊ आणि काय नको असं मला वाटलं.

शिक्षक : खूप मजा आली न?

मंगला : हो. खूप मजा आली. पण उशीर झाला म्हणून आम्ही घरी आलो.

स्वाध्याय क्र. ४४ **Excercise No. 44**

1. **Select the proper verb from those given in the bracket and fill in the gaps using their Past Tense form.**
(कंसात दिलेल्या धातूंपैकी योग्य तो धातू निवडून रिकाम्या जागी त्याचे योग्य ते भूतकाळाचे रूप लिहा.)
आवड, दिस, कळ, करम, उजाड, नीघ, मळमळ, ऊठ, उकड, सापड, आठव, समज.
श्रीयुत गोऱ्यांना सर्व बातम्या ---. मला मंडईत शेंगांचा ढीग --.सुमतीला घरात --- नाही. पण बागेत ---. आम्हाला आमचा वर्ग फार ---. त्याला मेसचा चहा पिऊन ---. सुनीताला सिनेमातली हिंदी भाषा ---. --- आणि आम्ही ---. मुलं सहलीला जायला ---. आईला मोहनच्या सर्व वस्तू ---. त्या बंद खोलीत सर्वांना खूप ---. विद्यार्थ्यांना एकदम --- 'उद्या सुट्टी'.

2. **Turn the following sentences into the affirmative.**
(पुढील नकारार्थी वाक्यांची होकारार्थी वाक्ये करा.)

प्रसाद धुळ्याला राहिला नाही. मांजरं बागेत नव्हती.
मंडईत चांगल्या भाज्या नव्हत्या. मला बातमी कळली नाही.
माधव आणि पद्माकर बागेत नव्हते. मी काल शाळेत गेले नाही.
श्रीमती फाटक घरी नव्हत्या. त्याला गणित समजलं नाही.

तुम्हाला बसमधे मळमळलं नाही. आम्हाला वसतिगृहात करमलं नाही.

3A. Substitute the underlined word गेल्यावर with similar forms of the given verbs.

(अधोरेखित शद्ब 'गेल्यावर' च्या जागी दिलेल्या क्रियापदांची तशीच रूपे भरा.)

तो शाळेत गेल्यावर मी घरी आले. तो शाळेत गेल्यावर मी घरी आले.

बस	ये
थांब	खेळ
पोच	शिर
नीघ	पळ

3B. Rewrite the following sentence by subtituting the underlined word with the given words making necessary changes.

(अधोरेखित शद्बांएवजी दिलेले शद्ब घालून योग्य ते बदल करून वाक्ये लिहा.)

मला गोवं फार आवडलं. मला गोवं फार आवडलं.

पाऊस	भाज्या
मंडई	फोटो
मासे	जेवण
चहा	साडी
रुमाल	घड्याळ
पुस्तकं	बांगड्या

4. Construct sentences with the help of the proper forms of the words given in the brackets.

(कंसातल्या शद्बांची योग्य रूपे वापरून वाक्ये बनवा.)

(दिलीप) (काल) (मी) (ये) (आणि) (चेंडू) (खेळ).

(भारती) (धडा) (समज) (पण) (ती) (तो) (आवड) (नाही). (मी) (तीन) (भाऊ) (आहे) (मीना) (नाटक) (राणी) (हो). (माझा) (आई) (मागचा) (वर्ष) (बडोदं) (जा). (ती) (चहा) (आवड). (आपण) (कॉफी) (आवड). (खूप) (दूध) (तो) (मळमळ). (दू) (मी) (एक) (भाऊ) (अमेरिका) (आहे). (तू) (गेला) (दोन) (दिवस) (आजारी) (आहे).

5. **Complete the following conversation by filling up the blank spaces.**

(रिकाम्या जागी योग्य ती वाक्ये भरून संवाद पूर्ण करा.)

अ : अरे मोहन, तू मुंबईहून कधी परत आलास?

मोहन : ------------------------.

अ : कालच आलास का? मुंबईत तुला खूप मजा करायला मिळाली न?

मोहन : ----------------------------.

अ : ----------------------------.

मोहन : हो. आम्ही रोज समुद्रावर फिरायला गेलो.

अ : ----------------------------.

मोहन : नाही, आम्ही बोटीत बसलो नाही.

अ : मुंबईत पाऊस होता का?

मोहन : --------------------.

अ : ------------------------.

मोहन : मुंबईची हवा फारच छान होती.

अ : ----------------------?

मोहन : मुंबईत मला छान करमलं.

अ : ----------------------.

मोहन	: आमचा वेळ अगदी मजेत गेला.
अ	: ------------------------------.
मोहन	: आम्ही मुंबईत पंधरा दिवस राहिलो.
अ	: ------------------------------.
मोहन	: हो. आम्ही मुंबईहून डेक्कन,, निनी परत आलो.

Vocabulary

असं (excl) is it so?
उकडणे (v.intr) to feel warm
उजाडणे (v.intr) day break
करमणे (v.intr) to enjoy
किनारा (m) (sea) shore
जरूर (adv)surely
ढीग (m) heap
नक्की (adv)definitely
बदली (f) transfer
मस्त (adj) nice
मळमळणे (v.intr) to feel sick
वाईट वाटणे (adj) tofeel sorry
शांत (adj) quiet
सांजावणे (v.intr) It was about to sunset.

Grammatical Notes

Unit XIV Lesson 44 introduces one more sentence type which has an indirect subject and in which the verb is neutral.

Present Tense

मला करमतं.	'I enjoy'.
त्याला मळमळतं.	'He feels sick'.
आम्हाला जाणवतं	'We bacame aware.' etc.

The Past Tense is regular.

मला करमलं.	'I enjoyed'.

त्याला मळमळलं.	'He felt sick'.
आम्हाला जाणवलं	'We became aware'.

Some verbs in Marathi do not take any subject or object. They are called impersonal verbs and have the neutral form, e. g.

Present Tense		Past Tense	
पहाटतं	' It dawns '	पहाटलं	' It dawned '
फटफटतं	' It becomes grey '	फटफटलं	' It became grey '
उजाडतं.	' The day breaks '	उजाडलं	' The day broke '

Notes :

(i) तुमच्या तोंडात साखर पडो : This formula is used for expressing thanks for the good wishes or good news conveyed to us by others. Literally, it means, " May sugar to fall into your mouth ".

For expressing a wish for giving blessing the following form is used :

Singular : R + ओ , मिळ + ओ = मिळो.

Example : तुम्हाला चांगली नोकरी मिळो.

' May you get a good job!.'

Plural : R + ओत = मिळोत.

Example : तुम्हाला चांगले पैसे मिळोत.

' May you get plenty of money.'

(ii) काय घेऊ आणि काय नको ....

This expression is used when a person is unable to arrive at a decision.

The following is the pattern used for this expression :

काय R + ऊ आणि काय नको

Example : खा + ऊ - काय खाऊ आणि काय नको. (असं मला झालं.)

(I didn't know)' what I should eat and what should not.'

It can be used with the interrogative words also.

कुठे जाऊ आणि कुठे नको.

' Where I should go and where I should not 'go'.

गट १४	**Unit - XIV**
धडा पंचेचाळिसावा	LESSON 45
(उजळणी पाठ ९)	(Review Lesson 9)
सिनेमा	**The movie**
काल रविवार होता.	Yesterday was Sunday.
आम्हाला सुट्टी होती.	We had holiday.
मला घरी करमलं नाही.	I was bored at home.
म्हणून मी एक मराठी सिनेमा पहायला गेले.	So I went to witness a Marathi movie.
सिनेमाचं नाव होतं, 'कामापुरता मामा'.	The name of the movie was, "Kamapurta Mama."
माझ्याबरोबर माझी एक मैत्रीणही होती.	A friend of mine also was with me.
आम्हाला निघायला उशीर झाला.	We were late in starting.
म्हणून आम्ही रिक्षानी विजय टॉकीजला गेलो.	So we went to the Vijay Talkies by a rickshaw.
सिनेमाला खूप गर्दी होती.	There was a big crowd at the picture.
आम्ही दोघी तिकिटांच्या रांगेत उभ्या राहिलो.	We both stood in the queue of tickets.
तिकिटं काढून आम्ही आमच्या जागेवर जाऊन बसलो.	After purchasing tickets we sat on our seats.
सहा वाजता सिनेमा सुरू झाला.	The movie started at 6.00 p.m.
सुरुवातीला खूप जाहिराती होत्या.	There were many

	advertisments in the beginning.
साबणाची जाहिरात, अॅस्प्रोची जाहिरात, व्हिक्सची जाहिरात.	There were the advertisement of soap, the advertisement of an Aspro, the advertisement of Vicks.
आणखी इतर अनेक जाहिराती होत्या.	And many other advertisements were there.
आम्हाला जाहिराती पहाताना खूप. हसू आलं.	While witnessing the advertisements, we burst into laughter.
मग वार्ताचित्र होतं.	Then there was a news reel.
वार्ताचित्रानंतर मुख्य चित्रपट सुरू झाला.	After the news reel, the main picture began.
साडेसातला पहिला भाग संपला.	The first part (of the movie) was over at 7.30pm.
मध्यंतरात माझी मैत्रीण बाहेर गेली.	My friend went out in the intermission.
आणि शेंगा घेऊन परत आली.	And came back bringing pods.
सिनेमाचा दुसरा भाग सुरू झाला.	The second part of the movie began.
आम्ही शेंगा खात खात सिनेमा पहात होतो.	We were seeing the picture while eating pods.
सिनेमा फार विनोदी होता.	The movie was very humorous.
आम्ही खूप हसलो.	We laughed a lot.

आम्हाला सिनेमातली गाणीही फार आवडली.	We liked the songs of the movie also.
रात्री नऊला सिनेमा संपला.	The movie was over at 9 pm.
आम्ही थिएटरबाहेर आलो.	We came out of the theatre.
आणि एकमेकींचा निरोप घेऊन आपापल्या घरी गेलो.	And after saying good - bye to each other (we) went back to our respective homes.

चाचणी क्र. ९ **Test No. 9**

1. Substitute the underlined words with the given words making necesssary changes in the sentences.
(अधोरेखित शब्दांच्याऐवजी दिलेले शद्ब घालून, योग्य तो फेरफार करून वाक्ये पुन्हा लिहा.)

१. आम्ही सिनेमाला गेलो.	आम्ही सिनेमाला गेलो.
तुम्ही	तो
तू	आपण
त्या	मी
ते	अजित
ती	कमलताई
२. सिनेमा खूप छान होता.	सिनेमा खूप छान होता.
नाटक	माणसं
बाग	शर्ट
घरं	कापड
बंगले	आंगठी
इमारती	चपला
३. मला देऊळ आवडलं.	मला देऊळ आवडलं.

झाडं	साडी
आंबे	बांगड्या
चिंचा	तळं
मांजर	धडा
कुत्रा	गोष्ट

2. Transform the following sentences into the past Tense.
(पुढील वाक्ये भूतकाळात लिहा.)

मांजर पलंगाकडे जाईल. रामराव मंत्री होतात.
श्रीपाद हुषार आहे. त्यांना देवळं फार आवडतात.
आम्ही हळूहळू डोंगर चढू. आम्ही सिनेमा पहाताना खूप हसू.
वार्ताचित्रानंतर मुख्य चित्रपट सुरू होतो.
कुत्रा मांजराची वाट पाहून कंटाळेल आणि बाहेर पळेल.
मोहन झोपाळ्यावर बसेल आणि त्याला मळमळेल.
शांता घरी येते आणि तिच्या खोलीत जाऊन झोपते.
आम्हाला नाटक पाहून खूप आनंद झाला.
काचेचे कप फुटतात आणि त्याचे तुकडे होतात.
उजाडेल आणि आपण उठू, काम करायला लागू.
वीज जाते, पंखा बंद पडतो आणि आम्हाला वर्गात उकडतं.
विमलाबाईंना आळस येईल आणि त्या दुपारी झोपतील.

3. Transform the following Future Tense Negative sen tences into the Past Negative.
(पुढील भविष्यकाळाची नकारार्थी वाक्ये भूतकाळ नकारार्थी करा.)

मी तुझ्या घरी फार वेळ थांबणार नाही. तिला प्रश्नाचं उत्तर आठवणार नाही.

कुत्रा मांजराच्या मागे पळणार नाही. त्यांना साप दिसणार नाही.

पक्षी घरट्याकडे येणार नाहीत. तिला आमचं घर सापडणार नाही.

ते आज खोलीत झोपणार नाहीत. त्याला पुण्याला करमणार नाही.

आम्ही डोंगरावर चढून देवळात जाणार नाही.

तुम्हाला कुत्र्याची भीती वाटणार नाही.

4. Transform the following Present Tense sentences into the Past Tense negative.

(पुढील वर्तमानकाळातली वाक्ये भूतकाळ नकारार्थी करा.)

पक्षी आकाशात उडतो. मांजर बागेत पळतं.

कुत्रा भुंकतो. मी नाटकात राणी होते.

आम्ही श्रीमंत आहोत. त्या मुंबईला जातात.

मुलं शाळेत येतात. त्याला कारखान्यात काम मिळालं.

मी घरी जायला निघतो. सिनेमा सहा वाजता सुरू होतो.

5. Select the proper verb from those given in the bracket and fill the gaps with its proper Past Tense form, thus completing the following sentences.

(कंसात दिलेल्या क्रियापदांमधून योग्य ते क्रियापद निवडून त्याचे योग्य ते भूतकाळाचे रूप रिकाम्या जागेत भरा आणि पुढील वाक्ये पूर्ण करा.)

(आहे, नीघ, उड, पळ, रहा, हो, ये, जा, पड, थांब)

काल टेबलावरच्या सर्व बशा खाली ---. आम्ही सर्वजण सिनेमाला ---.

मी शाळेतून --- आणि मित्राकडे पोचतो. तू काल कुठून---.

सगळे पक्षी झाडावरून ---. त्या दोन दिवस मुंबईत ---.

ती राणी --- मी राजा---. मोहन शशी पेक्षा जोरात ---.

आमचं मांजर अंगणात ----. आणि तिथेच ---.

गेल्या महिन्यात आमच्याकडे खूप पाहुणे --.

6. Select the proper words from each column and make a full sentence out of these words.

(पुढील कॉलममधले योग्य शद्ब निवडून स्वतंत्र वाक्ये तयार करा.)

१	२	३
मांजरं	तहान	खेळली.
ती	पुलावर	कोसळली.
आम्ही	डोंगरावर	चढलं.
मला	गावाला	बसलो.
आईला	वसंत	थांबली.
मुलं	खुर्च्यांवर	गेली.
तुम्ही	रस्त्यावर	धावल्या.
रिक्षा	बागेत	लागली.
आगगाडी	झाडावर	भेटला.
इमारत	जोरात	चाललात.

गट १४	Unit -XIV
धडा शेहेचाळिसावा	LESSON 46
मोहननी गणपती बसवला	**Mohan celebrated Ganesh (festival)**
शुक्रवारी गणेशचतुर्थी होती.	On Friday , it was Ganesh Chaturthi.
त्या दिवशी मोहन सकाळी लवकर उठला.	On that day, Mohan got up early.
आणि आंघोळ करून बाजारात गेला.	And having taken bath, he went to the market.
बाजारात गणपतीच्या मूर्तींची पुष्कळ दुकानं होती.	There were many shops of the idols of Ganesh in the market.
बहुतेक मूर्ती सुंदर आणि आकर्षक होत्या.	Most of the idols were beautiful and attractive.
मोहननी एक छोटीशी मूर्ती विकत घेतली.	Mohan purchased a small idol.
नंतर तो फुलांच्या दुकानात गेला.	Then he went to flower shop.
तिथे त्यानी एक हार विकत घेतला.	There he purchased a garland.
मिठाईच्या दुकानात जाऊन त्यानी थोडे पेढे विकत घेतले.	Then going to the sweetmeat shop, he bought some pedhas.
आणि तो घरी आला.	And then he came home.
मोहननी मूर्ती घरात आणली.	Mohan brought the idol home.
सर्वांना मूर्ती खूप आवडली.	All liked the idol very much.

मोहनच्या बाबांनी एका कोपऱ्यात रंगीत स्टूल मांडलं.	Mohan's father arranged a coloured stool in a corner.
त्यांनी रंगीत कागदांच एक मखर तयार केलं.	He made a makhar of coloured papers.
स्टुलावर रंगीत शाल पसरली.	(He) spread a coloured shawl on the table.
स्टुलाभोवती छान सजावट केली.	(He) made beautiful decoration around the stool.
मखराभोवती कागदाचे रंगीबेरंगी फुगे लावले.	(He) hung coloured paper bolloons round the makhar.
कागदाच्या रंगीत माळा लावल्या.	(He) hung coloured paper garlands.
मोहनच्या आईनी सुंदर रांगोळी काढली.	Mohan's mother drew a beautiful rangoli figures.
सजावट पूर्ण झाल्यावर मोहनच्या बाबांनी गणपतीची मूर्ती स्टुलावर ठेवली.	After the decoration was over Mohan's father put the idol of Ganesh on the stool.
मग मोहननी समई लावली.	Then Mohan lighted the oil lamp.
निरांजनं लावली.	(He) lighted the ghee -lamps.
कापूर , धूप पेटवला.	(He) burnt camphor, frankincense.
आणि गणपतीची पूजा केली.	And performed puja of Ganesh.
नंतर सर्वांनी मिळून आरती	Then all together recited the

म्हटली.

arati (prayar song).

मोहनच्या आईनी नैवेद्यासाठी मोदक केले.

Mohan's mother prepared modaks as an offering (to Ganesh)

सातव्या दिवशी मोहननी गणपतीचं विसर्जन केलं.

On the seventh day, Monan immersed the Ganesh image (in the river)

गणपतीला निरोप देताना सर्वजण ओरडले, ''गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लौकर या.''

While bidding farewell to Ganesh all shouted, "Ganapatibappa Moraya ! Come again early next year."

Drills

1

Repetition Drills

मी हार विकत घेतला.	मी हार विकत घेतले.
आम्ही हार विकत घेतला.	आम्ही हार विकत घेतले.
तू हार विकत घेतलास.	तू हार विकत घेतलेस.
तुम्ही हार विकत घेतला.	तुम्ही हार विकत घेतले.
आपण हार विकत घेतला.	आपण हार विकत घेतले.
त्यानी हार विकत घेतला.	मोहननी हार विकत घेतले.
तिनी हार विकत घेतला.	मीनानी हार विकत घेतले.
त्यांनी हार विकत घेतला.	त्यांनी हार विकत घेतले.
मी वही विकत घेतली.	मी वह्या विकत घेतल्या.

आम्ही वही विकत घेतली.	आम्ही वह्या विकत घेतल्या.
तू वही विकत घेतलीस.	तू वह्या विकत घेतल्यास.
तुम्ही वही विकत घेतली.	तुम्ही वह्या विकत घेतल्या.
आपण वही विकत घेतली.	आपण वह्या विकत घेतल्या.
त्यानी वही विकत घेतली.	त्यानी वह्या विकत घेतल्या.
मोहननी वही विकत घेतली.	मोहननी वह्या विकत घेतल्या.
गोपाळरावांनी वही विकत घेतली.	गोपाळरावांनी वह्या विकत घेतल्या.
त्यांनी वही विकत घेतली.	त्यांनी वह्या विकत घेतल्या.
तिनी वही विकत घेतली.	तिनी वह्या विकत घेतल्या.
मीनानी वही विकत घेतली.	मीनानी वह्या विकत घेतल्या.
मुलींनी वही विकत घेतली.	मुलींनी वह्या विकत घेतल्या.
त्यांनी वही विकत घेतली.	त्यांनी वह्या विकत घेतल्या.
मी पुस्तक विकत घेतलं.	मी पुस्तकं विकत घेतली.
आम्ही पुस्तक विकत घेतलं.	आम्ही पुस्तकं विकत घेतली.
तू पुस्तकं विकत घेतलंस.	तू पुस्तकं विकत घेतलीस.
तुम्ही पुस्तक विकत घेतलं.	तुम्ही पुस्तकं विकत घेतली.
आपण पुस्तक विकत घेतलं.	आपण पुस्तकं विकत घेतली.
त्यानी पुस्तक विकत घेतलं.	त्यानी पुस्तकं विकत घेतली.
मोहननी पुस्तक विकत घेतलं.	मोहननी पुस्तकं विकत घेतली.
मुलांनी /त्यांनी पुस्तक विकत घेतलं.	त्यांनी पुस्तकं विकत घेतली.
तिनी पुस्तक विकत घेतलं.	तिनी पुस्तकं विकत घेतली.
मीनानी पुस्तक विकत घेतलं.	मीनानी पुस्तकं विकत घेतली.
मुलींनी /त्यांनी पुस्तक विकत घेतलं.	त्यांनी पुस्तकं विकत घेतली.

II

Substitution Drill

Substitute the underlined words with the given words.

(अधोरेखित शब्दांऐवजी दिलेले शब्द वापरा)

मोहनने **हार** विकत घेतला.

मूर्ती ----->	मोहनने मूर्ती विकत घेतली.
फुगे	मोहनने फुगे विकत घेतले.
स्टूल	मोहनने स्टूल विकत घेतलं.
समया	मोहनने समया विकत घेतल्या.
कागद	मोहनने कागद विकत घेतले.
निरंजन	मोहनने निरंजन विकत घेतलं.
कापूर	मोहनने कापूर विकत घेतला.
धूप	मोहनने धूप विकत घेतला.
उदबत्त्या	मोहनने उदबत्त्या विकत घेतल्या.
फुलं	मोहनने फुलं विकत घेतली.

मी गणपतीची पूजा केली.

आम्ही	आम्ही गणपतीची पूजा केली.
तू	तू गणपतीची पूजा केलीस.
तुम्ही	तुम्ही गणपतीची पूजा केली.
आपण	आपण गणपतीची पूजा केली.
तो	त्यानी गणपतीची पूजा केली.
मधुकर	मधुकरनी गणपतीची पूजा केली.
ते	त्यांनी गणपतीची पूजा केली.
जोशीसाहेब	जोशीसाहेबांनी गणपतीची पूजा केली.

ती	तिनी गणपतीची पूजा केली.
मुलं	मुलांनी गणपतीची पूजा केली.

III

Transformation Drill

मी आंबा खाते	मी आंबा खाल्ला.
मी भाजी चिरते.	मी भाजी चिरली.
मी फूल आणते.	मी फूल आणलं.
मी आंबे खाते.	मी आंबे खाल्ले.
मी भाज्या चिरते.	मी भाज्या चिरल्या.
मी फुल आणते.	मी फुल आणली.
तू वह्या घेतेस.	तू वह्या घेतल्यास.
तू पुस्तकं घरी नेतेस.	तू पुस्तकं घरी नेलीस.
तुम्ही पत्ता लिहिता.	तुम्ही पत्ता लिहिला.
तुम्ही गोष्ट लिहिता.	तुम्ही गोष्ट लिहिली.
तुम्ही पत्र लिहिता.	तुम्ही पत्र लिहिलं.
तुम्ही पत्ते लिहिता.	तुम्ही पत्ते लिहिले.
तुम्ही गोष्टी लिहिता.	तुम्ही गोष्टी लिहिल्या.
तुम्ही पत्रं लिहिता.	तुम्ही पत्रं लिहिली.
आपण सिनेमा पहातो.	आपण सिनेमा पाहिला.
आपण कपडे धुतो.	आपण कपडे धुतले.
आपण आंगठी विकतो.	आपण आंगठी विकली.
आपण वह्या मागतो.	आपण वह्या मागितल्या.
आपण घड्याळ घालतो.	आपण घड्याळ घातलं.
आपण भांडी धुतो.	आपण भांडी धुतली.

तो मासे खातो.	त्यानी मासे खाल्ले.
सुहास धडा वाचतो.	सुहासनी धडा वाचला.
हेमंत चित्र काढतो.	हेमंतनी चित्र काढलं.
ते मासे खातात.	त्यांनी मासे खाल्ले.
शिक्षक वह्या तपासतात.	शिक्षकांनी वह्या तपासल्या.
ती अभ्यास करते.	तिनी अभ्यास केला.
विजया अभ्यास करते.	विजयानी अभ्यास केला.
लीलाताई पंखा लावतात.	लीलाताईंनी पंखा लावला.
वीणाताई दिवे बंद करतात.	वीणाताईंनी दिवे बंद केले.
ते पेला फोडतं.	त्यानी पेला फोडला.
ते चपाती खातं.	त्यानी चपाती खाल्ली.
ते दूध मागतं.	त्यानी दूध मागितलं.
ते पेले फोडतं.	त्यानी पेले फोडले.
ते चपात्या खातं.	त्यानी चपात्या खाल्ल्या.
ते बिस्किटं मागतं.	त्यानी बिस्किटं मागितली.
ती अभ्यास करतात.	त्यांनी अभ्यास केला.
मुलं दंगा करतात.	मुलांनी दंगा केला.
वासरू चारा खातं.	वासरानी चारा खाल्ला.
कोकरं गवत खातात.	कोकरांनी गवत खाल्लं.

IV
Conversation Drill

शिक्षक : मुलांनो, तुम्ही गणपती उत्सव पाहिला का?

विद्यार्थी : हो, आम्ही गणपती उत्सव पाहिला.

एक विद्यार्थी : गुरुजी, मला गणपतीचा उत्सव फार आवडतो.

शिक्षक : अरे वा, तुमच्या घरी गणपती आणतात का?

विद्यार्थी : नाही गुरुजी, पण माझ्या मामाच्या घरी मोठा गणेशउत्सव असतो. यंदा मी दोन दिवस आधीच मामाकडे गेलो. आम्ही गणपतीची खूप मोठी मूर्ती आणली.

शिक्षक : गणपतीची सजावट कोणी केली?

विद्यार्थी : माझ्या मोठ्या भावानी छान सजावट केली.

शिक्षक : तुमचा गणपती पहायला लोक आले का?

विद्यार्थी : हो, मामाकडचा गणपती पहायला खूप लोक आले. त्यांनी सर्वांनी आरती म्हटली. मी प्रसाद खाल्ला. मला मामाकडे खूप मजा पहायला मिळाली.

स्वाध्याय क्र. ४६ **Exercise No. 46**

1. Transform the following sentences as directed.
(कंसातल्या सूचनांप्रमाणे वाक्ये बदलून लिहा.)
आनंदराव चष्मा लावतात. (भूतकाळ), आपण फिरायला जाऊ. (भूतकाळ), आईनी छान स्वैपाक केला. (वर्तमानकाळ), तुम्ही कागद फाडला. (भूतकाळ), झाडांना रंगीत फुलं येतील. (भूतकाळ), मुलांनी केळी खाल्ली.(भविष्यकाळ), मोहनने धूप पेटवला. (भविष्यकाळ), देशपांडे कविता वाचताहेत.(भूतकाळ), आम्ही पतंग उडवले.(चालू वर्तमानकाळ) रात्र झाली. चंद्र दिसला.(चालू वर्तमानकाळ).

2. Turn the following sentences into the Past Tense negative. (पुढील वाक्ये भूतकाळ नकारार्थी करा.)

मीना आंबा खात नाही. सरोज शाळेत येत नाही.
उषा स्वैपाक करत नाही. शरदला चहा आवडत नाही.
अभयला झोपाळ्या वर मळमळत नाही. विद्यार्थी अभ्यास करत नाहीत.

तू भाज्या चिरत नाहीस.	आम्ही रेडिओ ऐकत नाही.
सुमनताई गाणी म्हणत नाहीत.	मी सिनेमा पहात नाही.
श्री. देसाई सायकल चालवत नाहीत.	शिपाई खिडकी उघडत नाही.
किसन खोल्या झाडत नाही.	शिक्षक फळे पुसत नाहीत.

3A. Substitute the word हार with the words given below and rewrite the sentence.

('हार' ऐवजी दिलेले शब्द वापरून वाक्य पुन्हा लिहा.)

मोहननी बाजारातून **हार** आणला.	मोहननी बाजारातून **हार** आणला.
आंबे	औषध
पेन्सिली	कुलपं
कागद	पेले
वही	पिना
पाकिटं	पुस्तकं
लोणी	भाज्या
फुलं	पेनं

3B. Substitute the words मी and कविता with the given words and rewrite the sentences after making necessary changes.

(जाड टशातील शब्दांऐवजी दिलेले शब्द घालून, वाक्यात योग्य ते बदल करून वाक्य पुन्हा लिहा.]

मी	**कविता** ऐकल्या.	**मी**	**कविता** ऐकल्या.
तू	गाणी	ते	घंटा
तो	रेडिओ	त्या	संवाद

आम्ही	भाषण	तुम्ही	नाटक
ती	गोष्ट	विद्यार्थी	धडे
आपण	आवाज	लोक	बातमी

4A. select the appropriate word from those given in the bracket, fill it in the proper blank place and complete the following sentences.

[कंसात दिलेल्या शब्दांपैकी योग्य तो शब्द निवडून योग्य त्या रिकाम्या जागी भरून पुढील वाक्ये पूर्ण करा.]

[घेतल्या, पूजा केली, आणला, पाहिलं, वाचली, शोधले, समजल्या, उडवलास, फोडलीस, नेले]

त्यांनी माझी सकाळी पत्रं ---. आम्ही काल रात्री एक नाटक---.
तू शाळेत पतंग ----. त्यांनी खूप सुंदर मूर्ती विकत ----.
मोहननी गणपती घरी ----. आईनी सकाळी देवांची -----
तू काचेची सर्व भांडी ---. विलासनी दुकानातून शर्ट ----
मी माझे रुमाल सकाळीकडे ---. आम्हाला ह्या बातम्या ----.

4B. Use the following verb forms in your own sentences.

[खालील क्रियापदांचा तुमच्या स्वतःच्या वाक्यांमधे उपयोग करा.]

म्हटल्या, आला, उघडलं, बघितलं, खाल्ल्या, केलंस, गेलात, करमलं, ताप आला, झाली.

5. Rewrite the following paragraph using the Past Tense.

[पुढील उतारा भूतकाळात लिहा.]

सुरेश चित्रकार आहे . तो खूप सुंदर चित्रं काढतो . लोक त्याच्या चित्रांचं प्रदर्शन पहातात ; आणि त्याची स्तुती करतात. लोक त्याची चित्रं विकत घेतात. त्याच्या चित्रांना बक्षिसंपण मिळतात. मी सुरेशचं एक चित्र घेणार आहे. मी ते घरी आणीन आणि भिंतीवर लावीन. माझे मित्र ते चित्र

पहातील. त्यांना ते चित्र नक्कीच आवडेल.

6. Complete the following conversation filling up the blanks. [रिकाम्या जागी वाक्ये भरून पुढील संवाद पूर्ण करा.]

मोहन : आई, मी गणपतीची किती सुंदर मूर्ती आणली आहे! लौकर बघ.

आई : ----------------------.

मोहन : आई, पूजेची सर्व तयारी झाली का ?

आई : ---------------------- .

मोहन : अरे वा ! मोदकपण केलेस का ?

आई : ----------------------.

मोहन : अग, काल रास्ता पेठेतले गणपती पाहिले. आज लक्ष्मीरोडला जाऊ.

आई : ------------------------------.

मोहन : रास्ता पेठेतला एक गणपती फारच सुंदर होता. तू पाहून ये.

आई : --.

मोहन : तुझ्या मैत्रिणीबरोबर जा. तुम्हाला सर्वांना तो गणपती फारच आवडेल.

आई : ----------------------------------.

7. Write a small essay on 'Ganesh Festival in Pune' using the Past Tense.

['पुण्यातील गणपती उत्सव' या विषयावर भूतकाळाचा वापर करून एक छोटा निबंध लिहा.]

Vocabulary

आरती (f) a prayer song	बहुतेक (adj) most
उत्सव (m) festiva 1	मखर (n)decorated frame

कापूर (m) camphor
कोपरा (m)corner
गणेशचतुर्थी (f)the Ganesh festival day
तयार करणे (phr)to make, prepare
धूप (m) frankincense
निरंजन (n) ghee - lamp
नैवेद्य (m) offering
पसरणे (v.tr) to spread
पेटवणे (v.tr) to burn
फोडणे (v.tr) to break
मांडणे (v.tr)to arrange
मिठाई (f)sweet meet
मोदक (m)sweet dish of rise and coconut
रांगोळी (f)figures drawn with stone powder
लावणे (v.tr) to hang, to apply
विसर्जन (n) immersion
शाल (f)i shawl
सजावट (f) decoration
समई (f) oil - lamp

Grammatical Notes

Unit - XIV, Lesson 46 explains the sentence pattern DS + DO+V. In this pattern, the learner should note that the verb is non - conjugational in the past and agrees in gender and number with the direct object. The postposition नी is added to the direct subject. In the 1st and 2nd person, singular and plural, instead zero is added to the base forms of नी the suffix.

		Present Tense DS+DO+V	Past Tense DS+DO+V
1st p. sg.	(m)	मी पुस्तक वाचतो. 'I read a book.'	मी पुस्तक वाचलं. 'I read a book.'
	(f)	मी पुस्तक वाचते. 'I read a book.'	मी पुस्तक वाचलं 'I read a book.'

1st p.pl (m/f)	आम्ही पुस्तक वाचतो.	आम्ही पुस्तक वाचलं.
	'We read a book.'	'We read a book.'
2nd p. sg. (m)	तू पुस्तक वाचतोस.	तू पुस्तक वाचलंस.
	'You read a book.'	'You read a book.'
(f)	तू पुस्तक वाचतेस.	तू पुस्तक वाचलंस.
	'You read a book'.	'You read a book.'
2nd p.pl . (m/f)	तुम्ही पुस्तक वाचता.	तुम्ही पुस्तक वाचलं.
	'You read a book.'	'You read a book.'
1st + 2nd p.pl.	आपण पुस्तक वाचतो.	आपण पुस्तक वाचलं.
	' We read a book.'	'We read a book.'
3rd p.sg. (m)	तो पुस्तक वाचतो.	त्यानी पुस्तक वाचलं.
	'He reads a book.'	'He read a book.'
(f)	ती पुस्तक वाचते.	तिनी पुस्तक वाचलं.
	'She reads a book.'	' She read a book.'
(neu)	ते पुस्तक वाचतं.	त्यानी पुस्तक वाचलं.
	'It reads a book.'	' It read a book.'
3rd p.pl. (m /f /neu)	ते / त्या / ती पुस्तक वाचतात.	त्यांनी पुस्तक वाचलं.
	'They read a book.'	' They read a book.'

धडा सत्तेचाळिसावा LESSON 47

आईनी मला साडी दिली. Mother gave me a saree.

विद्या : हॅलो! कोण बोलतंय?	Hallo ! Who is speaking?
मनीषा : अग , मी मनीषा. तू माझा आवाज ओळखला नाहीस का?	Its me , Manisha . Didn't you recognise my voice ?
विद्या : आता ओळखला. तू पुण्याला कधी आलीस?	(I do) recognise now. When did you come to Pune?
मनीषा : मला पुण्याला येऊन दोन-तीन दिवस झाले. मी तुला निरोपसुद्धा पाठवला.	It's two (or) three days since I arrived in Pune.I sent you a message too.
विद्या : मला तुझा निरोप अजिबात मिळाला नाही. बरं ! आता पुण्यात तुझा मुक्काम किती दिवस आहे?	I didn't get your message at all. That's all right. Now , how many days you are going to stay in Pune ?
मनीषा : एक महिना . तू मला लौकर भेटायला ये. पत्रात मी तुला एक गंमत सांगितली न ? ती तुला आठवते आहे का?	One month. Come to see me soon. I told you an interesting story.in (my) letter. Do you remember it ?

विद्या	: कोणती गंमत ? तुमच्या सहलीबद्दलची ?	Which story ? About your trip?
मनीषा	: हो, हो. तीच. त्या सहलीच्या आणखी गंमती मी तुला सांगणार आहे.	Yes, o yes . The same (one) I am going to tell you some more stories about that trip .
विद्या	: मग मात्र लौकर आलंच पाहिजे.	Then , of course , I must go (to you) soon .
मनीषा	: अग विद्या , मला नोकरी मिळाली , तुला माहीत आहे का ?	O Viddya , I got a job , do you know it ?
विद्या	: हो . मला रेखानी ती बातमी सांगितली. अभिनंदन ! मग पहिल्या पगारातून काय खरेदी केलीस ?	Yes . Rekha told me that news. Congratulations ! Then what shopping did you do from (your) first salary ?
मनीषा	: मी आईला एक साडी घेतली . बाबांना स्वेटर घेतला . आणि मोहनला एक खेळणं दिलं.	I purchased a saree for (my) mother . I (also) purchased a sweater for (my) father . And I gave a toy for Mohan .
विद्या	: माझ्या वाढदिवसाला आईनी मला साडी दिली. आणि भावानी नवीन घड्याळ दिलं . घड्याळ फारच सुंदर आहे.	On my birthday , my mother gave me a saree . And my brother has given me a new (wrist) watch . The watch is very beautiful .

मनीषा :	असं ? मग तुझं घड्याळ बघायला आलंच पाहिजे. मी आज संध्याकाळी तुझ्याकडे येते. संध्याकाळी कुठेही जाऊ नकोस. माझी वाट पहा.	Is it ? Then (I) must come to see your watch . This very evening I' ll come to you . Don't go anywhere in the evening . Wait for me .
विद्या :	मी तुझी नक्की वाट पहाते. तू मात्र लौकर ये. ठेवू आता फोन ?	I' ll definately wait for you. But you come early. Shall I disconnect ?
मनीषा :	ठेव ठेव. अच्छा संध्याकाळी भेटूच.	Yes , do . Accha ! We'll meet in the evening .

Drills

1

Repetition Drills

मी मोहनला आंबा दिला.	मी मोहनला पेढे दिले.
मी मोहनला काकडी दिली.	मी मोहनला गोळ्या दिल्या.
मी मोहनला संत्रं दिलं.	मी मोहनला अंडी दिली.
आम्ही सुजाताला पंखा दिला.	आम्ही सुजाताला कपडे दिले.
आम्ही सुजाताला साडी दिली.	आम्ही सुजाताला बांगड्या दिल्या.
आम्ही सुजाताला घर दिलं.	आम्ही सुजाताला भांडी दिली.
तू मित्राला शर्ट दिलास.	तू मित्राला पैसे दिलेस.
तू मित्राला पेन्सील दिलीस.	तू मित्राला पिशव्या दिल्यास.
तू मित्राला तिकीट दिलंस.	तू मित्राला पुस्तकं दिलीस.
तुम्ही मला खडू दिलात.	तुम्ही मला कागद दिलेत.
तुम्ही मला वही दिलीत.	तुम्ही मला किल्ल्या दिल्यात.

तुम्ही मला पुस्तक दिलंत.	तुम्ही मला घड्याळं दिलीत.
त्यानी मुलांना खाऊ दिला.	त्यानी मुलांना पेले दिले.
त्यानी मुलांना माळ दिली.	त्यानी मुलांना टाचण्या दिल्या.
त्यानी मुलांना कॅलेंडर दिलं.	त्यानी मुलांना चित्रं दिली.
तिनी आम्हाला चहा दिला.	तिनी आम्हाला काजू दिले.
तिनी आम्हाला कॉफी दिली.	तिनी आम्हाला उशा दिल्या. .
तिनी आम्हाला दूध दिलं.	तिनी आम्हाला बिस्किटं दिली.
त्यांनी तुम्हाला बंगला दिला.	त्यांनी तुम्हाला नकाशे दिले.
त्यांनी तुम्हाला जागा दिली.	त्यांनी तुम्हाला खोल्या दिल्या.
त्यांनी तुम्हाला कपाट दिलं.	त्यांनी तुम्हाला टेबलं दिली.

II

Transformation Drills

Turn the present Tense sentences into the Past Tense .

(वर्तमानकाळातली वाक्ये भूतकाळात करा .)

मी माझ्या मित्राला खाऊ देते. --->	मी माझ्या मित्राला खाऊ दिला.
आम्ही अशोकला पत्र लिहितो.	आम्ही अशोकला पत्र लिहिलं.
तू अनीताला साडी देतोस.	तू अनीताला साडी दिलीस.
तू आम्हाला गोष्ट सांगतेस.	तू आम्हाला गोष्ट सांगितलीस.
तुम्ही मुलांना गाणी शिकवता.	तुम्ही मुलांना गाणी शिकवलीत.
आपण विद्यार्थ्यांना बक्षिसं देतो.	आपण विद्यार्थ्यांना बक्षिसं दिली.
तो मित्राला सिनेमा दाखवतो.	त्यानी मित्राला सिनेमा दाखवला.
डॉक्टर रोग्यांना औषधं पाठवतात.	डॉक्टरांनी रोग्याला औषधं पाठवली.
ती बाळाला कपडे घालते.	तिनी बाळाला कपडे घातले.
प्राध्यापिका आम्हाला प्रश्न सांगतात.	प्राध्यापिकांनी आम्हाला प्रश्न सांगितले.

ते दाराला कुलूप लावतात. त्यांनी दाराला कुलूप लावलं.

III
Question - Answer Drills

मनीषानी कोणाला निरोप पाठवला?->मनीषानी मला निरोप पाठवला.

मनीषानी कोणाला चिट्ठी पाठवली? मनीषानी मला चिट्ठी पाठवली.

मनीषानी कोणाला पत्र पाठवलं? मनीषानी मला पत्र पाठवलं.

विद्यानी कोणाला फोन केला? विद्यानी तुला फोन केला.

विद्यानी कोणाला तार केली? विद्यानी तुला तार केली.

विद्यानी कोणाला पार्सल केलं? विद्यानी तुला पार्सल केलं.

आईनी कोणाला भात वाढला? आईनी त्याला भात वाढला.

आईनी कोणाला पोळी वाढली? आईनी त्याला पोळी वाढली.

आईनी कोणाला लोणी वाढलं? आईनी त्याला लोणी वाढलं.

दुकानदारानी कोणाला हार विकला? दुकानदारानी तिला हार विकला.

दुकानदारानी कोणाला साडी विकली? दुकानदारानी तिला साडी विकली.

दुकानदारानी कोणाला तेल विकलं? दुकानदारानी तिला तेल विकलं.

तुम्ही कोणाला इतिहास शिकवला? तुम्ही आम्हाला इतिहास शिकवला.

तुम्ही कोणाला कविता शिकवली? तुम्ही आम्हाला कविता शिकवली.

तुम्ही कोणाला मराठी शिकवलं? तुम्ही आम्हाला मराठी शिकवलं.

मी कोणाला सिनेमा दाखवला? मी तुम्हाला सिनेमा दाखवला.

मी कोणाला सर्कस दाखवली? मी तुम्हाला सर्कस दाखवली.

मी कोणाला नाटक दाखवलं? मी तुम्हाला नाटक दाखवलं.

आम्ही कोणाला प्रश्न सांगितले? आम्ही त्यांना प्रश्न सांगितले.

आम्ही कोणाला गोष्टी सांगितल्या? आम्ही त्यांना गोष्टी सांगितल्या.

आम्ही कोणाला उत्तरं सांगितली? आम्ही त्यांना उत्तरं सांगितली.

IV

Conversation Drills

शिक्षक : मंदार, तू काय वाचतो आहेस?

मंदार : मी गोष्टीचं पुस्तक वाचतो आहे.

शिक्षक : तुला हे पुस्तक कोणी दिलं?

मंदार : मला हे पुस्तक माझ्या मित्रानी दिलं. माझ्या वाढदिवसाला त्यानी ते मला दिलं.

शिक्षक : आज अपर्णा वर्गात दिसत नाही.

तृप्ती : आपर्णा आज आली नाही. तिनी मला सकाळी निरोप पाठवला. तिला बरं वाटत नाही.

शिक्षक : बरं ! आता कवितेचं पुस्तक उघडा. काल मी तुम्हाला कोणती कविता शिकवली ?

विद्यार्थी : तुम्ही आम्हाला 'चाफा' कविता शिकवली नंतर तुम्ही आम्हाला प्रश्नही विचारले.

आनंद : मी त्या प्रश्नांची उत्तरं लिहून तुम्हाला दाखवली.

शिक्षक : हो, हो. तुझी उत्तरं चांगली आहेत. ठीक आहे. आज आपण 'फुलपाखरू' कविता शिकूया. इकडे नीट लक्ष द्या.

स्वाध्याय क्र. ४७ **Exercise No. 47**

1. **Fill in the gaps with any suitable indirect object.**
(रिकाम्या जागी योग्य ते अप्रत्यक्ष कर्म भरा.)

ज्योतीनी ------ पत्र पाठवलं. तुम्ही ------ गोष्टी सांगितल्या.

मी ------ कुलूप लावलं. त्यांनी ------ पैसे दिले.

तू ----- शर्ट घेतलेस. आईनी ------ कपडे घातले.

आम्ही ------ खाऊ दिला. त्यांनी ------ फोन केला.

तिनी ------ घर विकलं. सरलानी ------ जेवणं वाढलं.

मित्रांनी ------ सिनेमा दाखवला. कुलकर्ण्यांनी ------ पेढे वाटले.

शिक्षकांनी ------ इतिहास शिकवला. मी ------ चहा पाजला.

2. Arrange the words of the following sentences in proper order.

(खाली दिलेल्या वाक्यांमधील शब्दांचा योग्य क्रम लावा.)

मी माझ्या पत्रं माझी दाखवली मित्राला.

दिला मीनाच्या खाऊ सगळ्या आईनी मुलींना सरोजच्या.

मुलांना मराठीच्या त्यानी कविता वर्गातल्या चांगली शिकवली एक.

कपडे बाबांनी सर्कस घातले आणि नवीन त्याला अनिलला दाखवली.

महत्त्वाचा करून मला एक सांगितला फोन निरोप पद्मिनीनी.

सरिताला पावडर घालून विद्यानी आंघोळ लावली.

भाज्या हॉस्टेलमधल्या वाढल्या सर्व गरम मुलांना बाईनी.

करून माझ्या कुलूप बंद दाराला मी लावलं दार.

आम्ही दोन मित्राला केले फोन आज.

पाठवला विणून आईनी स्वेटर भावाला परदेशात माझ्या.

3A. Rewrite the following sentences substituting the word फोटो with the given words after making neces sary changes .

[अधोरेखित शब्दांऐवजी दिलेले शब्द वापरून , आवश्यक ते बदल करून पुढील वाक्य पुन्हा लिहा.]

मंदारनी प्राचीला फोटो पाठवला . मंदारनी प्राचीला फोटो पाठवला .

फुलं	तिकिटं
साड्या	गणपती
भाजी	आंगठी
पुस्तक	डबा
चष्मे	मासे

3B. **Substitute the indirect object मला with the proper forms of given pronouns and the word नाटक with the given words , making necessary changes in the sentence.**

[**मला** ऐवजी दिलेल्या सर्वनामांची योग्य ती रूपे आणि **नाटक** ऐवजी दिलेली नामे घालून योग्य त्या फेरफारांसह पुढील वाक्य लिहा.] माझ्या मित्रानी **मला नाटक** दाखवलं . माझ्या मित्रानी **मला नाटक** दाखवलं .

तू सिनेमा	तो बंगला
आम्ही सर्कस	ती (f) फोटो
आपण दुकानं	त्या डोंगर
ते (m) मोटार	ते (n) पक्षी
तुम्ही फर्निचर	ती चित्रं

4. **Transform the following sentences into the Past Tense.** [पुढील भविष्याकाळातील वाक्ये भूतकाळात लिहा.]

ती मला फोन करेल.	आम्ही त्यांना पु-या वाढू.
ते आपल्याला पुस्तकं देतील.	उषाताई मुलांना गोष्ट सांगतील .
देवकी पोलिसाला पत्ता विचारेल.	कुसुम मैत्रिणीला तार करेल.
विकास आम्हाला खाऊ आणेल.	तो तुम्हाला मराठी शिकवेल.
तू चित्राला निरोप पाठवशील.	तुम्ही तिला साडी आणाल .

5. **Use the following phrases in the Past Tense in your own sentences .**

[भूतकाळाचा वापर करून पुढील वाक्प्रचारांचा तुमच्या स्वतःच्या वाक्यात उपयोग करा .]

फोन कर	आंघोळ घाल	दूध पाज
निरोप पाठव	चित्र दाखव	भात भरव
गोष्टी सांग	कपडे घाल	प्रश्न विचार

6. **Add the direct objects given in the brackets to the sentence and then rewrite the sentence using the Past Tense.**

[कंसात दिलेली प्रत्यक्ष कर्मे वाक्यात घाला आणि नंतर त्या वाक्याचे भूतकाळात रूपांतर करा.]

तो मित्राला देतो. [पैसे ,शर्ट] मी दाराला लावते. [कुलूप , रंग]

आपण लोकांना सांगतो. [बातम्या , कार्यक्रम]

आई मुलाला वाढते.[भात , चपाती]

सुशीला बाळाला घालते. [आंघोळ,कपडे]

तुम्ही मला पाठवता.[खाऊ, औषधं]

ती भावाला दाखवते.[चित्रं, सिनेमा]

आम्ही त्यांना आणतो. [भाज्या , फळं]

निर्मला आम्हाला शिकवते. [नाच , गाणी]

मधुकर भाटेसाहेबांना विचारतो. [प्रश्न , पत्ता]

Vocabulary

अच्छा (excl) bye , bye

अजिबात (adv) at all

अभिनंदन (excl) congratulation

पगार (m) salary

पाठवणे (v.tr) to send

फोन ठेवणे (phr) to disconnect (a phone)

आठवणे (v.tr) to remember
आवाज (m) voice
ओळखणे (v.tr) to recognise
नक्की (adv) definately
निरोप (m) message
नोकरी (f) job
मुक्काम (m) stay
वाट पहाणे (phr) to wait for
सहल (f) trip
हॅलो (excl) hello
स्वेटर (m) sweater

Grammatical Notes

Unit - XIV Lesson 47 explains the construction DS + IO + DO + V . The direct object normally precedes the indirect object , the verb is non - conjugational , and the postposi tion - नी is added to the 3rd person subject , e.g.

Present Tense	Past Tense
मी मुलाला आंबा देतो.	मी मुलाला आंबा दिला.
'I (m) give a mango to a child.'	'I (m) gave a mango to a child.'
मी मुलाला आंबा देते .	मी मुलाला आंबा दिला.
'I (f) give a mango to a child.'	'I (f) gave a mango to a child.'
आम्ही मुलाला आंबा देतो.	आम्ही मुलाला आंबा दिला.
'We give a mango to a child.'	'We gave a mango to a child.'
तू मुलाला आंबा देतोस.	तू मुलाला आंबा दिलास.
'You (m) give a mango to a child.'	'You (m) gave a mango to a child.'
तू मुलाला आंबा देतेस.	तू मुलाला आंबा दिलास.
'You (f) give a mango	'you (f) gave a mango

to a child.'	to a child.'
तुम्ही मुलाला आंबा देता.	तुम्ही मुलाला आंबा दिलात.
'You (Pl) give a mango to a child.'	'You (Pl) gave a mango to a child.'
आपण मुलाला आंबा देतो.	आपण मुलाला आंबा दिला.
'We (incl) give a mango to a child.'	'We (incl) gave a mango to a child.'
तो मुलाला आंबा देतो.	त्यानी मुलाला आंबा दिला.
'He gives a mango to a child.'	'He gave a mango to a child.'
ती मुलाला आंबा देते.	तिनी मुलाला आंबा दिला.
'She gives a mango to a child.'	'She gave a mango to a child.'
ते / त्या / ती मुलाला आंबा देतात.	त्यांनी मुलाला आंबा दिला.
'They give a mango to a child.'	'They gave a mango to a child.'

Note : It is possible to drop out the direct subject in the sentence, in certain contexts.In such cases the non-conjugational construction becomes the neutral construction e.g.

Present Tense	:	मी त्याला देते.	'I give him.'
Past Tense	:	मी त्याला दिलं.	'I gave him.'
Present Tense	:	तो मला विचारतो.	'He asks me.'
Past Tense	:	त्यानी मला विचारलं.	'He asked me.'

गट - १४	Unit - XIV
धडा अठ्ठेचाळिसावा	**LESSON 48**
मित्रांनी आम्हाला बोलवलं.	**Our friend invited us.**
काल संध्याकाळी संदीप खूप उशिरा घरी आला.	Yesterday evening Sandeep came at home very late.
त्याच्या आईनी त्याची खूप वाट पाहिली.	His mother waited for him for a long time.
त्याचे बाबा त्याला शोधायला बाहेर पडणार होते.	His father was about to go out to look for him.
इतक्यात संदीप धावत धावत घरात शिरला.	Just at that time, Sandeep entered the house running.
बाबांनी त्याला विचारलं, ''अरे संदीप, तू इतका वेळ कुठे होतास?''	The father asked him,"I say Sandeep , where were you so long.
आम्ही तुझी वाट पहातो आहोत. तुला जास्त उशीर झाला. मग आम्हाला काळजी वाटायला लागली.'' संदीप म्हणाला,	We are waiting for you. You were late. Then we started worrying about you." Sandeep said,
''माझ्या एका मित्रानी आज आम्हाला घरी बोलवलं. आम्ही त्याच्याकडे गेलो. तिथून जवळच एक बाग होती.	"Today, a friend of mine called call us to his place. We went to him. Very close from there, there was a garden.
आम्ही मित्राच्या घरून त्या बागेत गेलो.	From my friend's house we went to the garden.

बागेत आम्ही घसरगुंडीवर खेळलो.	We played on the sliding board in the garden.
तिथे दुसऱ्या एका मुलानी आमच्या मित्राला ढकललं.	There, some other boy pushed our friend.
आमचा मित्र खाली पडला. त्याला खूप लागलं.	Our friend fell dowm. He was badly hurt.
आम्ही त्याला बागेसमोरच्या एका दवाखान्यात नेलं	We took him to a dispensary in front of the garden.
तिथे डॉक्टरांनी त्याला तपासलं.	There, the doctor examined him.
आणि त्याला एक इंजेक्शन दिलं.	And gave him an injection.
त्याच्या जखमेवर पट्टी बांधली.	He dressed his wound.
मग आम्ही सर्वांनी त्याला घरी पोचवलं.	Then all of us took him home.
नंतर आम्ही त्या दुसऱ्या मुलाला खूप शोधलं.	Then we looked for that other boy for a long time.
आम्ही त्याला मारणार होतो.	We were going to beat him.
पण तो आम्हाला सापडला नाही.	But we couldn't find him.
शेवटी आम्ही घरी आलो.	At last we came home.
संदीपची आई संदीपला म्हणाली,	Sandeep's mother said to
''संदीप, इतर मुलांबरोबर अशी मस्ती करत जाऊ नकोस.	Sandeep, " don't do such mischief with other boys.
शाळा सुटल्यावर सरळ घरी येत जा.	Come straightly home after the school is over.
आम्हाला तुझी किती काळजी वाटते.	We are worried about you.

संदीप आईला म्हणाला,

Sandeep said to his mother,"You are right a

''खरंच आई, माझं चुकलं.

mother, I made a mistake.

आता मी घरी यायला कधीच उशीर करणार नाही.''

I will never come home late here after."

आई म्हणाली,

The mother said,

''बरं आता चल. हातपाय धू आणि जेवायला बस.

" O.K. Come now. Wash (your) hands and feet and sit down to your meal.

आज तुझ्या आवडीचा स्वैपाक आहे.''

Today the food is to your liking."

संदीप म्हणाला, ''अरे वा ! मलाही खूप भूक लागली.

Sandeep said, "My ! I am also very hungry.

चला बाबा, आपण जेवू.''

Come, father, we will eat."

Drills

1

Repetition Drill

मुलानी मित्राला ढकललं.

मोहननी मला ढकललं.

मोहननी आम्हाला ढकललं.

मोहननी तुला ढकललं.

मोहननी तुम्हाला ढकललं.

मोहननी आपल्याला ढकललं.

मोहननी त्याला ढकललं.

मोहननी तिला ढकललं.

मोहननी त्यांना ढकललं.

मी सुनंदाला मारलं.

आम्ही सुनंदाला मारलं.

तू मुलाला मारलंस.

तू मुलांना मारलंस.

तुम्ही मित्रांना मारलं. | त्यांनी कुत्र्याला मारलं.
तिनी कुत्र्यांना मारलं. | त्यांनी कुत्र्यांना मारलं.
बाईंनी विद्यार्थ्याला बोलवलं. | बाईंनी विद्यार्थ्यांना बोलवलं.
साहेबांनी शिपायाला बोलवलं. | साहेबांनी शिपायांना बोलवलं.
आम्ही डॉक्टरला बोलवलं. | आम्ही डॉक्टरांना बोलवलं.
तू मैत्रिणीला बोलवलंस. | तुम्ही मुलींना बोलवलं.
डॉक्टरांनी रोग्याला तपासलं. | डॉक्टरांनी आशाला तपासलं.
डॉक्टरांनी मला तपासलं. | डॉक्टरांनी त्यांना तपासलं.
डॉक्टरांनी आपल्याला तपासलं. | डॉक्टरांनी त्यांना तपासलं.

२

आशानी पक्षी पाहिला. | आशानी मला पाहिलं.
आशानी दिवे पाहिले. | आशानी आम्हाला पाहिलं.
लतानी खोली पाहिली. | लतानी तुला पाहिलं.
लतानी खुर्च्या पाहिल्या. | लतानी तुम्हाला पाहिलं.
सुधाकरनी पुस्तक पाहिलं. | सुधाकरनी तिला पाहिलं.
सुधाकरनी फुलं पाहिली. | सुधाकरनी त्यांना पाहिलं.
डॉक्टरांनी घसा तपासला. | डॉक्टरांनी त्याला तपासलं.
डॉक्टरांनी डोळे तपासले. | डॉक्टरांनी त्यांना तपासलं.
शिक्षकांनी वह्या तपासल्या. | शिक्षकांनी शिपायाला बोलवलं.
आम्ही चेंडू ढकलला. | आम्ही सुहासला ढकललं.
आम्ही गाडी ढकलली. | आम्ही तिला ढकललं.
आम्ही टेबल ढकललं. | आम्ही मुलांना ढकललं.

II
Transformation Drill
1

(Turn the Present Tense sentences into the Past.)

(वर्तमानकाळातली वाक्ये भूतकाळात करा.)

मी मोहनला बोलवतो.-->	मी मोहनला बोलवलं.
मी आशाला तपासते.	मी आशाला तपासलं.
आम्ही मित्रांना ढकलतो.	आम्ही मित्रांना ढकललं
मी मोहनला बोलवतो.	मी मोहनला बोलवलं.
तू मुलींना ढकलतोस.	तू मुलींना ढकललंस.
तू मुलींना मारतोस.	तू मुलींना मारलंस.
तुम्ही मित्रांना शोधता.	तुम्ही मित्रांना शोधलं.
आपण गौरीला खुर्चीवर बसवतो.	आपण गौरीला खुर्चीवर बसवलं.
तो मला पहातो.	त्यानी मला पाहिलं.
ती आईला स्टेशनवर पोचवते.	तिनी आईला स्टेशनवर पोचवलं.

2

Turn the Future Tense sentences into the Future Past.

[भविष्यकाळ ऐवजी (भूत - भविष्यकाळ) वापरा.]

मी मुंबईला जाणार आहे.	मी मुंबईला जाणार होतो / होते.
तू मुंबईला जाणार आहेस.	तू मुंबईला जाणार होतास / होतीस.
तो मुंबईला जाणार आहे.	तो मुंबईला जाणार होता.
ती मुंबईला जाणार आहे.	ती मुंबईला जाणार होती.
आम्ही मुंबईला जाणार आहोत.	आम्ही मुंबईला जाणार होतो.
तुम्ही मुंबईला जाणार आहात.	तुम्ही मुंबईला जाणार होतात.
आपण मुंबईला जाणार आहोत.	आपण मुंबईला जाणार होतो.
ते मुंबईला जाणार आहेत.	ते मुंबईला जाणार होते.
त्या मुंबईला जाणार आहेत.	त्या मुंबईला जाणार होत्या.

मुलं मुंबईला जाणार आहेत. मुलं मुंबईला जाणार होती.

III
Conversation Drill

दिवाकर : सर, काल मी तुम्हाला पाहिलं.

शिक्षक : खरंच? कुठे?

दिवाकर : मंडईत. काल आईनी मला मंडईत पाठवलं.

शिक्षक : अरे वा! मग तू काय काय घेतलंस?

दिवाकर : काही विशेष नाही. एकदोन भाज्या घेतल्या. आणि काही फळं खरेदी केली.

शिक्षक : अरे काल मी खूप भाज्या खरेदी केल्या. माझ्याबरोबर माझा एक मित्रपण होता. आम्ही दोघांनी खरेदी केली. मग आम्ही माझ्या घरी गेलो. चहा घेतला. नंतर मी त्याला त्याच्या घरी पोचवलं. मित्रानी आपल्या मुलाला बाहेर बोलवलं. आणि त्याची माझ्याशी ओळख करून दिली. मी मित्राला म्हटलं, ''मला आता घरी गेलं पाहिजे. आपण पुन्हा भेटू.'' मी घरी आलो. माझ्या मुलांना समोर बसवलं आणि सगळ्या भाज्या त्यांना दाखवल्या. भाज्या पाहून माझी मुलं खूष झाली.

दिवाकर : माझी आईपण भाज्या पाहून खूष झाली. तिनी सुंदर स्वैपाक केला. आम्ही सर्वजण भरपूर जेवलो. आणि जेवून रेडिओ ऐकत बसलो.

स्वाध्याय क्र. ४८ **Exercise No. 48**

1. Write sentences using the Past Tense of the given verbs. [दिलेल्या शब्दांच्या सहाय्याने भूतकाळात वाक्ये लिहा.]

मीना आई स्टेशन पोचव ---. प्रकाश रोगी नीट तपास -----.

ते विलास झोपाळा ढकल ---. पोलीस चोर पकड ------.
मालक नोकर बोलव ----. मी प्रिया सर्कस दाखव ने ----.
बाई मुलं खाली बसव ---. माझा मित्र मी बागेत शोध ---.
जोशीसाहेब आई दवाखाना आण -. त्या आम्ही शाळा बघ ---.

2. Transform the following sentences into Present Tense1.

[पुढील वाक्ये वर्तमानकाळ - १ मध्ये करा.]

मला सकाळी चहा पिऊन मळमळलं. त्यांना बिस्किटं फार आवडली.
तू हिची सर्व पुस्तकं वाचलीस. प्रियानी मोहनला छान पत्र लिहिलं.
त्यांनी पेढे खाल्ले आणि चहा घेतला. चिमणीनी पिल्लांना उडताना पाहिलं.
डॉक्टर सुभाषनी माझ्या आईला चांगली औषधं दिली.
उजाडलं आणि आम्ही सर्वजण उठलो.
आनंदनी कमलला झोपाळ्यावरून ढकललं.
संदीपला बाबांनी विचारलं, ''तू कुठे होतास?''

3. Rewrite the following sentences as directed.

[कंसातल्या सूचनांप्रमाणे पुढील वाक्ये बदलून लिहा.]

तो शाळेत जातो. [Past Tense + पाहिजे]
सुहासिनी स्वेटर विणते. [Past Tense]
शालिनी सिनेमा पहाणार आहे. [Past negative]
प्रदीप शाळेतून घरी येतो. [Past Tense]
आईनी आम्हाला जेवण वाढलं. [Present Tense]
तुमच्या मित्रांनी तुम्हाला घरी पोचवलं. [Future - 1]
तो मला बोलवेल. [Past Tense]
माझी आई गोष्टी छान सांगते. [Past Tense]
भिडेसाहेबांनी आम्हाला गंमती सांगितल्या. [Present Habitual]

दीपक डॉक्टर झाला. [Future -2]

4. Write the sentences in the Past Tense using the direct and indirect objects given in the bracket.

(कंसातील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर्मे वापरून पुढील वाक्ये भूतकाळात लिहा.)

Model : मुलं शाळेत (फुलपाखरं / मित्र) पकडतात.

मुलांनी शाळेत फुलपाखरं पकडली. मुलांनी शाळेत मित्रांना पकडलं.

डॉक्टर तपासतात. (डोळे / मिलिंद) शिरीष ढकलतो. (खुर्ची / अरविंद)

तू घरी नेतेस. (मैत्रिणी / पुस्तकं) आपण स्टेशनवर शोधतो. (शरद / बॅगा)

अनुजा दुकानात पहाते. (तारा / स्टीलची भांडी) शारदाबाई मारतात. (झुरळं / ललिता)

गोविंदराव घरी पोचवतात. (अरुणा / दुकानातलं सामान) सुनंदा परदेशात पाठवते. (तयार कपडे / तिचा मुलगा)

मुलं मामाबरोबर बघतात. (त्याचे कपडे / सर्कस) आनंद रस्त्यावरून उचलतो. (सायकल / संदीप)

5. A list of verbs is given below. Write as many different types of sentences as possible using these verbs in the simple Past Tense i.e. with gender, without gender, with number etc.

(पुढे काही क्रियापदांची यादी दिली आहे, त्यातल्या प्रत्येक क्रियापदापासून जितकी वाक्ये साध्या भूतकाळात लिहिता येतील तितकी लिहा; प्रत्येक लिंगात, लिंगाशिवाय, प्रत्येकवचनात इत्यादी.)

उजाड	मळमळ	आठव
विचार	ऐक	उकड

Vocabulary

काळजी वाटणे (Phr) to be warried
चुकणे (v.intr)to make a mistake
जखम (f) a wound
ढकलणे (v.tr.)to push
तपासणे (v.tr.)to examine
पट्टी (f)dressing
पोचवणे (v.tr.)to reach
बाहेर पडणे (phr)to go out
भूक लागणे (phr)to be hungry
मस्ती करणे (Phr)to do mischief
मारणे (v.tr.)to beat
लागणे (v.intr)to be hurt
शोधणे (v.tr.)to search

Grammatical Notes

Unit - XIV, Lesson 48 explains the sentence pattern DS+IO+V. It has a neutral construction in the Past Tense with the postposition - नी added to the subject e.g.

Present Tense	**Past Tense**
मी तुला बोलवतो.	मी तुला बोलावलं.
'I (m) call you.'	'I (m) called you.'
मी तुला बोलावते.	मी तुला बोलवलं.
'I (f) call you.'	'I (f) called you.'
आम्ही तुला बोलवतो.	आम्ही तुला बोलवलं.
'We call you.'	'We called you.'
तू मला बोलवतोस.	तू मला बोलवलंस.
'You (m) call me.'	' You (m) called me.'
तू मला बोलवतेस.	तू मला बोलवलंस.
'You (f) call me.'	'You (f) called me.'
तुम्ही मला बोलवता.	तुम्ही मला बोलवलंत.
'You (pl) call me.'	'You (pl) called me.'
आपण तिला बोलवतो.	आपण तिला बोलवलं.
'We (incl) call her.'	'We (incl) called her.'

तो मला बोलवतो. — त्यानी मला बोलवलं.
'He calls me.' — 'He called me.'
ती मला बोलते. — तिनी मला बोलवलं.
'She calls me.' — 'She called me.'
ते मला बोलवतं. — त्यांनी मला बोलवलं
'It calls me.' — 'It called me.'
ते /त्या /ती मला बोलवतात. — त्यांनी मला बोलवलं.
"They call me.' — 'They called me.'

Note : It may be noted that some Marathi verbs behave in two different ways depending on the kind of object they take in the sentence. If the object is human, then the construction will be neutral, the object being indirect, e.g.

Present Tense : तो मोहनला ढकलतो. 'He pushes Mohan.'

Past Tense : त्यानी मोहनला ढकललं. 'He pushed Mohan.'

But if the object is non -human the same verb will be non - conjugational, the object being direct. e.g.

Present Tense : तो खुर्ची ढकलतो. 'He pushes a chair.'

Past Tense : त्यानी खुर्ची ढकलली. 'He pushed a chair.'

गट - १४	Unit - XIV
धडा एकोणपन्नासावा	**LESSON 49**
श्री. गुप्ता मराठी शिकले.	**Mr. Gupta learnt Marathi**
किशन चंद्र गुप्ता हे मध्यप्रदेशात एका शाळेत शिक्षक होते.	Mr. Kishan Chandra Gupta was a teacher in a school in Madhya Pradesh.
एकदा त्यांनी वर्तमानपत्रात एक जाहिरात वाचली.	Once he read an advertise-ment in a newspaper.
'पुण्याच्या भाषाकेंद्रात माध्यमिक शिक्षकांसाठी मराठी भाषा शिकण्याची सोय.	'Facility for Secondary School Teachers to learn Marathi.'
गुप्तांना मराठी भाषेबद्दल माहिती होती.	Mr. Gupta knew about the Marathi language.
त्यांनी मराठी शिकायचं ठरवलं.	He decided to learn Marathi.
आणि पुण्याच्या केंद्राकडे एक अर्ज केला.	And (he) sent an application to the Pune Centre.
गुप्तांची मराठी भाषा शिकण्यासाठी निवड झाली.	Mr. Gupta was selected for learning Marathi.
आणि ते पुण्याला आले.	And he came to Pune.
पुण्याला दहा महिने राहून ते उत्तम मराठी भाषा शिकले.	He learnt very good Marathi in his stay of 10 months in Pune.
नंतर ते आपल्या गावाला परत जायला निघाले.	Then he started to go back to his town.
जाताना ते आपल्या शिक्षकांना भेटले आणि म्हणाले,	While leaving, he met his teacher and said,

''सर, परत गेल्यानंतर मी मराठी भाषा विसरायला लागलो तर काय करू?''	''Sir, what should I do if I begin to forget Marathi.''
शिक्षक गुप्तांना म्हणाले, ''अहो, तुम्ही मराठी वाचनाची सवय ठेवा.''	The teacher told Mr. Gupt a, ''Keep up the habit of reading Marathi.''
म्हणजे तुम्ही ती भाषा विसरणार नाही.	So that you won't forget that language.
गुप्ता म्हणाले, ''ठीक आहे, सर. मी प्रयत्न करीन.''	Mr. Gupta said, ''All right sir. I'll try.''
परत जाण्यापूर्वी सर्व शिक्षकांनी निरोप समारंभ केला.	Before going back, all the teachers arranged a farewel function.
आपल्या भाषणात गुप्ता म्हणाले, ''मित्रहो, मी भाषा शिकायला	Mr. Gupta said in his speech, "Friends, when I left (my town) to learn a language,
निघालो तेव्हा माझे काही सहकारी मला हसले.	some of my colleagues laughed at me.
मी वर्षभर दूर जाणार म्हणून माझे कुटुंबीयही मला रागवले.	As I was going to be away for an year, my family members were annoyed with me.
आरंभी पुण्यातली गर्दी पाहून मी खूप घाबरलो होतो.	In the beginning, I was scared to see the rush in Pune.
पण हळूहळू मी मित्रांमधे मिसळलो.	But gradually, I mixed with the friends.

आणि अगदी आनंदाने भाषा शिकलो.	And I learnt the language very
आज मला खूप अभिमान वाटतो.	happily. I feel very proud today.
मित्रांनो, एक गंमत सांगतो.	Friends, (I) tell you a fun.
मी मधेच पुणं सोडून जाणार अशी	One of my friends fixed the
माझ्या एका मित्रानी पैज लावली	bet that I will leave Pune in
होती. पण ही पैज तो हरला.	between. But he lost this bet.
नवी भाषा शिकून माझा खूप	I am very much benefited
फायदा झाला.''	by learning a new language
गुप्तांप्रमाणे आणखीही काही	Some other teachers also
शिक्षक बोलले.	spoke like Mr. Gupta.
सर्वजण कॉफी प्यायले.	All of them had (drunk)coffee.
त्यांनी एकमेकांचा निरोप घेतला.	They took leave of each other.
पुण्यात काही खरेदी केली.	(They) did some purchases in Pune.
आणि ते परत गेले.	And they went back.

Drills

I

Repetition Drills

1

अमोल मराठी भाषा शिकला.	मी मराठी भाषा शिकलो.
मी मराठी भाषा शिकले.	आम्ही मराठी भाषा शिकलो.
तू मराठी भाषा शिकलास.	तू मराठी भाषा शिकलीस.
तुम्ही मराठी भाषा शिकलात.	आपण मराठी भाषा शिकलो.
तो मराठी भाषा शिकला.	ते मराठी भाषा शिकले.

ती मराठी भाषा शिकली. त्या मराठी भाषा शिकल्या.

मुलं मराठी भाषा शिकली.

रेखा गोष्ट विसरली. मी गोष्ट विसरलो.

मी गोष्ट विसरले. आम्ही गोष्ट विसरलो.

तू गोष्ट विसरलास. तू गोष्ट विसरलीस.

तुम्ही गोष्ट विसरलात. आपण गोष्ट विसरलो.

तो गोष्ट विसरला. ते गोष्ट विसरले.

ती गोष्ट विसरली. त्या गोष्ट विसरल्या.

मुलं गोष्ट विसरली.

मैत्रिणी पैज हरल्या. मी पैज हरलो.

मी पैज हरले. आम्ही पैज हरलो.

तू पैज हरलास. तू पैज हरलीस.

तुम्ही पैज हरलात. आपण पैज हरलो.

तो पैज हरला. , ते पैज हरले.

ती पैज हरली. त्या पैज हरल्या.

मुलं पैज हरली.

2

मोडकसाहेब सापाला घाबरले. मी सापाला घाबरलो.

मी सापाला घाबरले. आम्ही सापाला घाबरलो.

तू सापाला घाबरलास. तू सापाला घाबरलीस.

तुम्ही सापाला घाबरलात. आपण सापाला घाबरलो.

तो सापाला घाबरला. ते सापाला घाबरले.

ती सापाला घाबरली. त्या सापाला घाबरल्या.

पिल्लू सापाला घाबरलं. मुलं सापाला घाबरली.

सुधाताई आम्हाला हसल्या. मी कमलला हसलो.
मी कमलला हसले. आम्ही कमलला हसलो.
तू कमलला हसलास. तू कमलला हसलीस.
तुम्ही कमलला हसलात. आपण कमलला हसलो.
तो कमलला हसला. ते कमलला हसले.
ती कमलला हसली. त्या कमलला हसल्या.
मुलं कमलला हसली.

मी मोहनला रागवलो. मी मोहनला रागवले.
आम्ही मोहनला रागवलो. तू मोहनला रागवलास.
तू मोहनला रागवलीस. तुम्ही मोहनला रागवलात.
तो मोहनला रागवला. ते मोहनला रागवले.
ती मोहनला रागवली. त्या मोहनला रागवल्या.
आपण मोहनला रागवलो. मुलं मोहनला रागवली.

II
Transformation Drills

मी पत्ता वाचतो. मी पत्ता वाचला.
मी पत्ता विसरतो. मी पत्ता विसरलो.
मी काम करते. मी काम केलं.
मी काम शिकते. मी काम शिकले.
तू चहा देतेस. तू चहा दिलास.
तू चहा पितेस. तू चहा प्यायलीस.
तो भाषा शिकवतो. त्यानी भाषा शिकवली.
तो भाषा शिकतो. तो भाषा शिकला.
ती सामना जिंकते. तिनी सामना जिंकला.

ती सामना हरते.	ती सामना हरली.
कालिंदी मैत्रिणीला बोलवते.	कालिंदीनी मैत्रिणीला बोलवलं.
कालिंदी मैत्रिणीला भेटते.	कालिंदी मैत्रिणीला भेटली.
मुलं विदूषकाला पहातात.	मुलांनी विदूषकाला पाहिलं.
मुलं विदूषकाला हसतात.	मुलं विदूषकाला हसली.
मालक नोकराला दुकानात पाठवतात.	मालकांनी नोकराला दुकानात पाठवलं.
मालक नोकराला रागवतात.	मालक नोकराला रागवले.
मांजर कुत्र्याचा आवाज ऐकतं.	मांजरानी कुत्र्याचा आवाज ऐकला.
मांजर कुत्र्याला भितं.	मांजर कुत्र्याला भ्यायलं.
मनीषा मैत्रिणीला शोधते.	मनीषानी मैत्रिणीला शोधलं.
मनीषा मैत्रिणीला विसरते.	मनीषा मैत्रिणीला विसरली.

III
Conversation Drill

शिक्षक : अजित, तू पेशवे बाग पाहिली आहेस का?

अजित : हो. मी कालच पेशवेबागेत गेलो होतो.

शिक्षक : तू तिथे काय पाहिलंस?

अजित : मी तिथे वाघ पाहिला. दोन हत्ती पाहिले.

शिक्षक : तू हत्तीवर बसलास का ?

अजित : नाही. मी हत्तीवर बसायला घाबरतो. पण मी फुलराणीत बसलो. माझा लहान भाऊ फुलराणीला घाबरला. त्यामुळे सर्व मुलं त्याला हसली. मी फुलराणीतून उतरताना माझा रुमाल फुलराणीत विसरलो म्हणून माझी मोठी बहीण मला रागवली.

शिक्षक : पेशवेबागेत तुम्ही खूप भटकलात का ?

अजित : पेशवेबागेत आम्ही खूप भटकलो. त्या आधी नेहरू स्टेडियमवर आम्ही क्रिकेटचा सामना पाहिला. पुण्याच्या मुलांनी सामना जिंकला. मुंबईची मुलं सामना हरली.

शिक्षक : तुला घरी यायला खूप उशीर झाला का?

अजित : हो. मला थोडा उशीर झाला. पण माझे वडील मला रागवले नाहीत.

स्वाध्याय क्र. ४९ **Exercise No. 49**

1. Transform the following sentences first into the Past Tense and then rewrite them by substituting the words with the given words.

(पुढे दिलेली वाक्ये प्रथम भूतकाळात लिहा आणि नंतर जाड ठशातील शब्दांऐवजी दिलेले शब्द घालून ती पुन्हा लिहा.)

1.	राम **रुमाल** शोधतो.	राम **रुमाल** शोधतो.
	पैसे	कॅलेंडर
	पेन्सिली	वही
	पिना	पुस्तकं
	बूट	कुलूपं
	घर	डबा
2.	राम **रुमाल** विसरतो.	राम **रुमाल** विसरतो.
	चपला	धडा
	पेन	पिशवी
	औषधं	चष्मा
	आंगठ्या	भांडी
	गोष्ट	पत्ते

3. राम **मला** बोलवतो.

तू
आम्ही
आपण
ते
त्या

राम **मला** बोलवतो.

ती
तुम्ही
मोहन
आई
वडील

4. राम **मला** विसरतो.

कालिंदी
ती
तो
श्री. घोलप
राणी

राम **मला** विसरतो.

राजा
आपण
तुम्ही
आम्ही
त्या

2. Write the sentences using the correct forms.

[योग्य रूप निवडून वाक्ये पूर्ण लिहा.]

अभिजित / अभिजितनी भूगोल शिकला.

श्रीयुत साने कविता शिकले / शिकवले.

ते / त्यांनी सापाला घाबरलं / घाबरले.

विजयाबाईनी / विजयाबाई आंबा खाल्ल्या / खाल्ला.

संजयनी / संजय बागेत रुमाल विसरला / विसरले.

आम्ही मधूला हसलं / हसलो. पाहुण्यांनी / पाहुणे चहा पिला / प्यायले.

तू मोहनला रागावला / रागावलास. तो / त्यानी पत्र वाचलं / वाचला.

3. A list of subjects is given below. Fill them in proper blank places in the form that may fit into the construction.

[पुढे दिलेल्या शब्दांची योग्य रूपे करून ती वाक्यात कर्त्याच्या जागी

योग्य प्रकारे वापरा.]

Subjects : तू , आपण , तो , आम्ही , रमेश , गीता , ते , श्रीयुत मेहेंदळे , शर्ट , त्या.

Sentence :

--- मराठीचा अभ्यासक्रम लिहिला. --- रोग्याला तपासलं.

--- चहा आणि बिस्किटं आवडली. --- शाळेत पुस्तकं विसरली.

----- दोन खिसे आहेत. ----- टेकडीवर फिरायला गेलो.

----- अनीताला भेटलास. ----- सीताला घरी बोलवलं.

----- मराठी सिनेमा पाहिला. ----- युद्धाच्या बातम्या समजल्या.

4. Complete the following conversation by filling up blank places.

[पुढील संवाद रिकाम्या जागा भरून पूर्ण करा.]

सीमा : अरविंद, एवढ्या घाईनी कुठे चालला आहेस?

अरविंद : -------------------------.

सीमा : काय? दप्तर विसरलास ? कुठे विसरलास ?

अरविंद : -------------------------.

सीमा : खेळत होतास ? कोणते खेळ ?

अरविंद : -------------------------.

सीमा : मग बरोबर. तुला क्रिकेट खेळायला फार आवडतं.

अरविंद : -------------------------.

सीमा : आई रागवेलच.

अरविंद : -------------------------.

सीमा : पळ पळ. लौकर जा. तुला तुझं दप्तर नक्की सापडेल.

अरविंद : -------------------------.

5. Transform the following sentences as directed.

[कंसातल्या सूचनांप्रमाणे पुढील वाक्ये बदलून लिहा.]

मी गावाला जाणार आहे. [Past Tense]

तो मुंबईला आला आहे. [Present continuous]

माझा मित्र चुका करतो आणि मी त्याला रागावते. [Past Tense]

ती आपल्याला बोलवते आहे. [Past Tense]

श्री. शुक्ल विद्यार्थ्यांना इतिहास शिकवतात. [Past Tense]

अनिरुद्ध मला थिएटरमधे भेटेल. [Past Negative]

आम्ही त्यांना विचारतो आणि ते आम्हाला सांगतात. [Past Tense]

पाटीलबाईंनी त्यांच्या कथा आम्हाला सांगितल्या. [Present continuous]

खार सापाला घाबरते. [Past Negative]

तिनी आपल्याला बोलवलं. [Present Habitual]

6. Use the following verbs or verb phrases in your own sentences.

[पुढील क्रियापदे किंवा वाक्प्रयोग तुमच्या स्वतःच्या वाक्यात बापरा.]

दे, विचार, घाबर, पी, काळजी कर, रस पाज, आठव, विसर, शिक, हो.

7. Write a small passage in the past Tense with the help of the following points.

[पुढील मुद्यांच्या सहाय्याने एक लहान उतारा भूतकाळात लिहा.]

एक गाव ----- कपड्यांचं दुकान ------ रंगीबेरंगी रुमाल -----
श्रीकांत दुकान दिस -----तो आत शीर ----- किंमत विचार ------
रुमाल पहा ----- दुकानदार किंमत सांग ----- रुमाल दाखव
----- दोन रुमाल खरेदी ----- पैसे दे ----- बाहेर पड -----
घरी ये ----रुमाल दुकानात विसर ---- म्हणून घरी रागव ----- परत
दुकान ----- रुमाल मिळ ----आनंद हो ---- घरी परत.

Vocabulary

अर्ज (m) application
केंद्र (n) centre
घाबरणे (v.tr) to be afraid
जाहिरात (f)i advertisement
निवड (f)i selection
निवड होणे (phr) to be selected
प्रयत्न करणे (phr) to try
पैज (f)a bet
रागवणे (v. tr) to scold
विसरणे (v.tr)to forget
सवय (f)i habit
सोय (f)i facility
हरणे (v.tr) to lose (a bet or so)

Grammatical Notes

Unit - XIV Lesson 49 gives some verbs in Marathi Which fall outside the patterns already shown. The following are examples to the point . In eash pair of examples the first one belongs to the regular pattern and the second falls outside it :

A

Present Tense :	1. तो कविता वाचतो.	' He reads a poem.'
	2. तो कविता शिकतो.	' He learns a poem.'
Past Tense :	1. त्यानी कविता वाचली.	' He read a poem.'
	2. तो कविता शिकला.	' He learnt a poem.'
Present Tense :	1. तो रुमाल हरवतो.	' He loses a handker-chief.'
	2. तो रुमाल विसरतो.	' He forgets a hander-chief.'
Past Tense :	1. त्यानी रुमाल हरवला.	' He lost a handker chief.'
	2. तो रुमाल विसरला.	' He forgot a handker chief.'

B

Present Tense : 1 डॉक्टर रोग्याला तपासतात.' The Doctor examines a patient.'

2 डॉक्टर सापाला घाबरतात. ' The Doctor is afraid of a snake.'

Past Tense : 1 डॉक्टरांनी रोग्याला तपासलं. ' The Doctor examines a patient.'

2. डॉक्टर सापाला घाबरले. ' The Doctor was afraid of a snake.'

Present Tense : 1 आई मुलाला उचलते. ' Mother lifts up the child.'

2 आई मुलाला रागवते. ' Mother scolds the child.'

Past Tense : 1 आईनी मुलाला उचललं. ' Mother lifted the child.'

2 आई मुलाला रागवली. ' Mother scoled the child.'

Note : The verb म्हण 'to say' ,'to recite' and पी 'to drink' have two bases out of which one (viz.: म्हणा –, प्याय –) is conjugational and the other (viz.: म्हट –, पी –) is non - conjugational.

गट १४

Unit - XIV

धडा पन्नासावा

LESSON 50

(उजळणी पाठ १०)

(Review Lesson 10)

आशा आजारी पडते.

Asha is ill.

आशा रोज एकदातरी माझ्याकडे येते.	Asha comes to me at least once a day.
पण गेल्या सबंध आठवड्यात ती मला भेटली नाही.	But she didn't see me throgh out the last week.
म्हणून मला नवल वाटलं.	Hence I was surprised.
आणि काळजीही वाटली.	And was worried too.
हल्ली मला वेळ मिळत नाही.	Now - a -days I don't get time.
त्यामुळे मलाही तिच्याकडे जाता आलं नाही.	Hence I also could not go to her.
पण आठ दिवसांत ती एकदा सुद्धा आली नाही.	But she did not come even once during the eight days.
म्हणून काल संध्याकाळी मीच तिच्याकडे गेले.	That's why I myself went to her yesterday evening.
मी गेले तेव्हा आशा झोपून होती.	When I went, Asha was lying down on the bed.
मी तिला विचारलं, ''तू अशी झोपलीस का ? तुला तापबीप आहे का?''	I asked her,"Why are you lying down like this? Have you got fever or something like that ?"
ती म्हणाली, '' हो. गेले आठ दिवस	She said ," Yes. I am ill since

मी आजारी आहे.''	the last eight days."
मी म्हणाले, ''काय झाल एकाएकी ?''	I said, " what happened (to you) all of a sudden?"
आशानी आपली हकीकत सांगायला सुरुवात केली.	Asha began to tell her story.
प्रथम तिचं अंग दुखायला लागलं.	To begin with her body began to ache.
मग तिला ताप भरला.	Then she had fever.
आधी तिनी घरगुती उपाय केले.	At first she did (tried) homemade remedies.
पण काही उपयोग झाला नाही.	But it was of no avail.
ताप खूप चढला म्हणून तिनी डॉक्टरांना बोलावलं.	When the fever rose high she called the doctor.
डॉक्टर आले, त्यांनी तिला तपासलं.	The doctor came. He examined her.
थर्मामीटर लावून तिचा ताप बघितला.	Applying the thermometer, he noted her temperature.
आणि तिला एक इंजेक्शन दिलं.	And he gave her an injection.
डॉक्टर आशाला म्हणाले,'' कपाळावर बर्फाची पिशवी ठेवा.	The doctor said to Asha,"keep the ice - water bag on (your) forehead.
म्हणजे तुमचा ताप लौकर उतरेल.	As a result your fever will come down quickly.
आज जेवू नका. फक्त कॉफी प्या.	Don't take (your) meal today. Take only coffee.

मी औषधं लिहून देतो.	I'll prescribe some medicines.
ती आणा आणि वेळच्यावेळी घ्या.''	Get them and take them regularly.
मी आशाला विचारलं, ''डॉक्टर तुला तपासायला अजून येतात का?''	I asked Asha ," Does the doctor still come to examine you ?"
ती म्हणाली,''नाही माझा ताप केव्हाच गेला.	She said ," No. Now my fever has disappeared.
पण मला अशक्तपणा फार वाटतो.	But I feel very weak.
म्हणून डॉक्टर मला टॉनिक लिहून देणार आहेत.	Hence the doctor is going to prescribe me a tonic.
उशीर झाला म्हणून मी घरी जायला निघाले.	I started to go home as it was late.
आशानी मला विचारलं, ''चहा घेणार का?''	Asha asked me ,"Will you take tea ?"
मी तिला म्हटलं, ''नको,नको !	I said her ," Oh, no !
तू आता काही त्रास घेऊ नकोस.	Don't take any trouble now.
बरी झालीस की माझ्याकडे ये.	Come to me when you are all right.
मग आपण भरपूर गप्पा मारू.	Then we will do a lot of talking.
असं म्हणून मी माझ्या मैत्रिणीचा निरोप घेतला.	So saying, I took leave of my friend.
आणि घरी आले.	And came home.

चाचणी क्र. १० **Test No. 10**

Q.1. Rewrite the following sentences substituting for the underlined words. Make changes in the sen tence where necessary.

(अधोरेखित शद्बांऐवजी दिलेल्या शद्बांची योग्य रूपे भरून आणि आवश्यक ते बदल करून पुढील वाक्ये पुन्हा लिहा.)

१. **मी** आंबे खाल्ले.	**मी** आंबे खाल्ले.
तू	मुली
राम	मुलं
ती	आपण
तो	आम्ही
गीता	तुम्ही
२.मी **आंबे** खाल्ले.	मी **आंबे** खाल्ले.
सफरचंद	चपाती
केळी	भाज्या
लाडू	दही
पेरू	लोणी
पेढे	बर्फी
३. मी **विजयला** माळा दिल्या.	मी विजयला माळा दिल्या.
सुमित्रा	तो
गजानन	ती
तू	तिचे वडील
मनोरमाबाई	आई
लक्ष्मण	माझी मैत्रीण
४. **मी** विजयला **माळा** दिल्या.	**मी** विजयला **माळा** दिल्या.

आम्ही	मणी	बँक	पैसे
ते	लोणी	माझा मित्र	फोटो
त्या	लिंबं	भोसलेसाहेब	रेडिओ
माझी बहीण	सोनं	तू	साडी
तिचा भाऊ	हार	शिपाई	फुलं

५. **मी** मीनाला बोलावलं.

मी मीनाला बोलावलं.	**मी** मीनाला बोलावलं.
तू	आपण
तो	त्या
विद्यार्थी	बाई
आम्ही	शिक्षक
ते	डॉक्टर

६. **मी** मीनाला रागवले.

मी मीनाला रागवले.	**मी** मीनाला रागवले.
तू	ते
आम्ही	त्या
तुम्ही	वडील
तो	माझी आई
ती	माझा भाऊ

Q.2. Turn the following sentences into the Past Tense and turn the latter into the negative.

(दिलेली वाक्ये भूतकाळात लिहा आणि नंतर ती नकारार्थी करा.)

मोहन सकाळी दोन अंडी खातो. ललिता तिच्या आईला पत्र लिहिते. माझी मैत्रीण माझ्याशी खूप गप्पा मारते. आई मुलाला दूध पाजते.तो गणपतीची मूर्ती विकत घेतो. श्री देव मोटार उत्तम चालवतात. माझे मामा मला पुस्तक देणार आहेत.डॉक्टर विजयचे

डोळे तपासतील. आपण संध्याकाळी सिनेमा पाहू. तुम्ही मंडईतून भाजी आणता.

Q.3. Use the form R + ल्या+ वर in place of R + ऊन in the following sentences.

(धातू + ऊन ऐवजी धातु + ल्या + वर वापरून पुढील वाक्ये लिहा.)

तो माझ्याकडे येऊन मला म्हणाला. ती मंडईतून भाजी घेऊन घरी गेली. ती डॉक्टरकडे जाऊन ऑफिसात यायला निघाली. त्या आम्हाला भेटून खूप खूष झाल्या. नवे कपडे घालून आम्ही बाहेर पडलो. डॉक्टर होऊन त्यांनी खेड्यात दवाखाना काढला. स्टेशनवर पोचून ते गाडीत बसले. काम करून मी मैत्रिणीकडे गेले. भात खाऊन मुलं झोपली. पुण्यात राहून त्याला मराठी यायला लागलं.

Q.4A Select the proper verbs or verb phrases from the bracket and use them in proper blank places in the following sentences.

[पुढे दिलेल्या क्रियापदांच्या रूपांपैकी योग्य ते रूप निवडून ते दिलेल्या वाक्यांत योग्य त्या रिकाम्या जागी भरा.] [केला, होते, दिली, लिहिली, वाचल्या, ढकललं, विसरला, मिळाले, दमला, दिसला.]

त्यांना आकाशात चंद्र ----. मला मंडईत भरपूर ऊस -----.
मोहन शाळेत पेन्सिली ----. प्रियानी भावाला दोन पत्रं ----.
विश्वासनी अश्विनीला खेळताना ----. त्यांनी सर्व गोष्टी ---.
आम्ही परीक्षेसाठी खूप अभ्यास ---. ते सकाळपासून घरी ---.
सुभाष क्रिकेट खेळून खूप ----.
डॉक्टरांनी अशाला औषधं लिहून ---.

Q.4B With the help of the given words construct the sentences into the Past Tense.

[दिलेल्या शब्दांच्या सहाय्याने भूतकाळात वाक्ये लिहा.]

मी, बाजार, जा, आणि, खूप, खरेदी, कर --

तो, आज, पेरू, मिळ, नाही, म्हणून, तो, रागव --

ती, मुलगी, जर्मन, भाषा, शिक. शिक्षक, आम्ही, गणितं, तपास

अशोक, काल, सिनेमा, पहा, आणि, घर, उशीरा, ये

मोहन, पत्रं, वाच, आणि, फाड. शुभदा, ते, मराठी, भाषा, शिकव

तिचा, लहान, भाऊ, ती, शाळा, पोचव

मीना, मुलगी, सुंदर, गाणी, म्हण. शारदा, कोण, हस?

Q.5 Turn into the affirmative the following sentences.

[पुढील वाक्ये होकारार्थी करा.]

नलिनी शाळेतून मैत्रिणीच्या घरी गेली नाही.

माझ्या आईनी मला काजू दिले नाहीत.

आमच्या मित्रांनी खिडक्या उघडल्या नाहीत.

श्री. गुप्ता पुण्यात येऊन मराठी शिकले नाहीत.

किरणनी झाडावरचे पक्षी पाहिले नाहीत.

आम्हाला मंडईत ताज्या भाज्या मिळाल्या नाहीत.

त्यानी साप पाहिला नाही आणि तो घाबरला नाही.

डॉक्टरांनी शाळेच्या विद्यार्थ्यांना तपासलं नाही.

तू मित्रांना तुझ्या घरी बोलवलं नाहीस. त्या मला भेटल्या नाहीत.

Q.6 Use the following verbs in your own sentences once with an object and once without an object.

[पुढील क्रियापदे एकदा कर्मासहित आणि एकदा कर्म न वापरता तुमच्या स्वतःच्या वाक्यांमध्ये भरा.]

Model : verb - विचार, **Sentences -** मी मोहनला प्रश्न विचारला.
मी विचारलं.

दे, माग, पाठव, घे, विक, आण, पोचव, बोलव, ने सांग.

गट - १४ | Unit - XIV

धडा एक्कावनावा | LESSON 51

अपघात | An accident

अजय : अरे सचिन ! तुझा चेहरा का असा दिसतोय?	I say Sachin! Why your face is lookin g like this?
सचिन : अरे, मी येताना एक अपघात पाहिला.	While coming (here) I saw an accident.
अजय : अपघात? तो कुठे?	An accident? Where?
सचिन : बालभारतीजवळ. मी कॉलेजला येत होतो.	Near Balbharati. I was coming to the college.
एक मुलगा मोटारसायकल खूप जोरात चालवत होता. तो प्रत्येक वाहनाच्या पुढे जात होता. मधेच हात पण सोडत होता.	A young man was riding (his) motor - bike very fast. He was overtaking every vehicle. Suddenly he was taking off his hands.
अजय : मग?	Then?
सचिन : मग काय?	Then (what)?
बालभारतीजवळ वळण आहे.	There is a turn near Balbharati.
एक ट्रक समोरून येत होता.	A truck was coming from the front.
दोघांची टक्कर झाली.	Both (the vehicles) dashed each other.
मी थोड्या वेळानी तिथे पोचलो.	I reached there after some time.

	बघतो तर काय! तोच मुलगा रस्त्यावर पडून ओरडत होता.	To my surprise ! The same young man was lying on the road and was crying.
	त्याची मोटारसायकल ट्रकखाली अडकली. तो फेकला गेला. मातीत पडला म्हणून बरं! जीव वाचला.	His bike was stuck under the truck. He was thrown (away) Thank God , he fell down in the dust. (His) life was saved.
अजय :	आश्चर्यच आहे.	What a surprise !
	त्याला काही लागलं का?	Was he hurt anywhere?
सचिन :	मुका मार खूपच लागला.	(He) had a severe type of covered beating.
	हातापायांच्या जखमांतूनही रक्त वहात होतं.	The wounds on his hands and feet were bleeding.
	सुदैवाने डोक्याला लागल नाही.	Fortunately there was no head injury.
	त्याला खूप वेदना होत होत्या.	He was feeling severe pains.
	तो सारखा रडत होता, ओरडत होता, पाणी मागत होता.	He was crying and was asking for water.
अजय :	अरे, मग लोक काय नुसते बघत होते? त्याला मदत करत नव्हते?	Were the people only looking (at him)? Didn't they help him?
सचिन :	का नाही ? लोकांनी एक	Why not ? People stopped a

	मोटार थांबवली. त्याला मोटारीत घातलं आणि दवाखान्यात नेलं.	car. They took him to the hospital in (that) car.
अजय :	आणि पोलीस काय करत होते ?	And what were the policemen doing ?
सचिन :	ते गर्दी हटवत होते. चौकशी करत होते. ते आपलं काम करत होते. मुलाजवळ घरचा फोननंबर होता.	They were controlling the mob. They were doing the inquiry. They were doing their job. The man had (his) residencial phone - number.
	मी त्याच्या घरी फोन केला. थोडयाच वेळात त्याचे आई-वडील आले. त्याची आई फारच रडत होती रे ! ते आल्यावर मी इकडे निघालो.	I phoned at his residence. Within no time, his parents came. His mother was crying very much. I came after they reached.
अजय :	आता तो लौकर बरा होवो.	Let him be cured soon (now)!

Drills

I

Repetition Drills

मी घरी जात होतो.	मी घरी जात होते.
आम्ही घरी जात होतो.	आपण घरी जात होतो.
तू घरी जात होतास.	तू घरी जात होतीस.

तुम्ही घरी जात होतात.

तो घरी जात होता. | ते घरी जात होते.
ती घरी जात होती. | त्या घरी जात होत्या.
ते घरी जात होतं. | ती घरी जात होती.
मी काम करत होतो. | आम्ही काम करत होतो.
मी काम करत होते.
तू काम करत होतास. | तुम्ही काम करत होतात.
तू काम करत होतीस. | आपण काम करत होतो.
तो काम करत होता. | ते काम करत होते.
ती काम करत होती. | त्या काम करत होत्या.
ते काम करत होतं. | ती काम करत होती.

II
Transformation Drills
1 .

मी पुण्यात राहिलो.	मी पुण्यात रहात होतो.
मी पुण्यात राहिले.	मी पुण्यात रहात होते.
आम्ही पुण्यात राहिलो.	आम्ही पुण्यात रहात होतो.
तू पुण्यात राहिलास.	तू पुण्यात रहात होतास.
तू पुण्यात राहिलीस.	तू पुण्यात रहात होतीस.
तुम्ही पुण्यात राहिलात.	तुम्ही पुण्यात रहात होतात.
तो पुण्यात राहिला.	तो पुण्यात रहात होता.
ते पुण्यात राहिले.	ते पुण्यात रहात होते.
ती पुण्यात राहिली.	ती पुण्यात रहात होती.
त्या पुण्यात राहिल्या.	त्या पुण्यात रहात होत्या.

मुलं पुण्यात राहिली.	मुलं पुण्यात रहात होती.

2

मी सिनेमा पहात होतो.	मी सिनेमा पहात नव्हतो.
मी सिनेमा पहात होते.	मी सिनेमा पहात नव्हते.
आम्ही सिनेमा पहात होतो.	आम्ही सिनेमा पहात नव्हतो.
तू सिनेमा पहात होतास.	तू सिनेमा पहात नव्हतास.
तू सिनेमा पहात होतीस.	तू सिनेमा पहात नव्हतीस.
तुम्ही सिनेमा पहात होतात.	तुम्ही सिनेमा पहात नव्हतात.
आपण सिनेमा पहात होतो.	आपण सिनेमा पहात नव्हतो.
तो सिनेमा पहात होता.	तो सिनेमा पहात नव्हता.
ते सिनेमा पहात होते.	ते सिनेमा पहात नव्हते.
ती सिनेमा पहात होती.	ती सिनेमा पहात नव्हती.
त्या सिनेमा पहात होत्या.	त्या सिनेमा पहात नव्हत्या.

3

मी शाळेत येतो आहे.	मी शाळेत येत होतो.
मी शाळेत येते आहे.	मी शाळेत येत होते.
आम्ही शाळेत येतो आहोत.	आम्ही शाळेत येत होतो.
तू शाळेत येतो आहेस.	तू शाळेत येत होतास.
तू शाळेत येते आहेस.	तू शाळेत येत होतीस.
तुम्ही शाळेत येताहात.	तुम्ही शाळेत येत होतात.
तो शाळेत येतो आहे.	तो शाळेत येत होता.
ते शाळेत येताहेत.	ते शाळेत येत होते.
ती शाळेत येते आहे.	ती शाळेत येत होती.
त्या शाळेत येताहेत.	त्या शाळेत येत होत्या.
मुलं शाळेत येताहेत.	मुलं शाळेत येत होती.

4

अशोकनी गोष्ट सांगितली. अशोक गोष्ट सांगत होता.

तारानी कपडे धुतले. तारा कपडे धूत होती.

मुलांनी कविता म्हटली. मुलं कविता म्हणत होती.

देवकीनी पेरू खाल्ला. देवकी पेरू खात होती.

मनोजनी पेन मागितलं. मनोज पेन मागत होता.

विजयरावांनी पूजा केली. विजयराव पूजा करत होते.

मला उशीर झाला. मला उशीर होत होता.

तिला झोप आली. तिला झोप येत होती.

III

Conversation Drills

गौरी : गुरुजी, काल शेजारच्या वर्गातली मुलं फार दंगा करत होती. आम्हाला फार त्रास होत होता.

शिक्षक: काल वर्गात त्यांचे शिक्षक नव्हते.
पण मुलं सेक्रेटरीचंपण ऐकत नव्हती. काही मुलं बाकावर उड्या मारत होती. एक मुलगा फळ्यावर चित्रं काढत होता. एक मुलगी मोठ्यानी गाणी म्हणत होती.

शिक्षक: तुम्ही त्यावेळी काय करत होतात?

गौरी : आम्ही वर्गात धडा वाचत होतो. पण आमचं लक्ष लागत नव्हतं.

शशांक: मग आम्ही मुख्याध्यापकांकडे गेलो. ते त्या वर्गाकडेच जात होते. ते वर्गात पोचले त्यावेळी एकही मुलगा अभ्यास करत नव्हता. पण त्यांना पाहून मुलं चुपचाप बसली. मग सगळी अभ्यास करायला लागली..

गौरी : मग त्यांच्या वर्गातून आवाज येत नव्हता.

शिक्षक: मग तुमचा अभ्यास झाला की नाही?

गौरी : हो. मी शाळा सुटेपर्यंत स्वाध्याय लिहीत होते. शशांकसुद्धा प्रश्नांची उत्तरं वाचत होता. मग आम्ही घरी गेलो.

स्वाध्याय क्र. ५१ **Exercise No. 51**

1. Transform the following sentences into the Past Continuous. (पुढील वाक्ये चालू भूतकाळात लिहा.)

विजयानी गाणं म्हटलं. तू रविवारी कपडे धुतलेस.
आम्ही क्रिकेटचा सामना पाहिला. रेवतीनी ताजे पेरू खाल्ले.
वडलांनी सकाळी देवाची पूजा केली. कोळणी बाजारात आल्या.
भिकाऱ्यानी देवळापुढे भीक मागितली. मी वर्तमानपत्र विकत घेतलं.
सतीशला व्यापारात चांगले पैसे मिळाले. परीक्षेची सर्व तयारी झाली.

2. Write the following sentences in the Past Continuous making use of the verbs given in the bracket.
(कंसातल्या धातूंचा उपयोग करून पुढील वाक्ये चालू भूतकाळात लिहा.)

सुधीर मराठी (शिक). आम्ही वर्गात दंगा (कर).
ते कपाटात कपडे (ठेव). तू झाडाखाली फुलं (वेच)
शिक्षिका मुलांना वह्या (वाट). लोक गणपतीपुढे आरती (म्हण).
तुम्ही पिशव्या घेऊन बाजारात (जा). प्रकाश पाण्यात नावा (सोड).
माकडं झाडांवरून उड्या (मार). मांजर डोळे मिटून दूध (पी).

3A. Substitute the underlined word with the given words making necessary changes.
(अधोरेखित शब्दाऐवजी दिलेले शब्द वापरून वाक्यात योग्य ते बदल करून वाक्ये पुन्हा लिहा.)

अविनाश पुस्तक वाचत होता. अविनाश पुस्तक वाचत होता.
सुधा आपण

आम्ही श्रीयुत पारेख
त्याची भावंडं विमलाबाई
मी (m) मी (f)
तू (f) तू (m)

3B. Fill in the gaps with the proper pronoun.

(पुढील वाक्यात रिकाम्या जागी योग्य ते सर्वनाम भरा.)

--- बागेत खेळत होतास. --- फळा पुसत होता.

--- शेंगा खात होतो. --- खुर्चीवर बसत होत्या.

--- गोष्टी वाचत होती. --- गाईमागे पळत होतं.

---- काम करत होती. ---- मुलांना गोष्ट सांगत होते.

--- वहीत चित्र काढत होतात. --- झोपाळ्यावर बसत होतीस.

4. Turn the following sentences into the negative.

(पुढील वाक्ये नकारार्थी करा.)

मी कॉलेजात येत होतो. त्या टेबलावर कागद ठेवत होत्या.

एक मुलगा जोरात धावत होता. आपण हात धूत होतो.

लोक मंत्र्यांपुढे बोलत होते. मुलं पावसात भिजत होती.

ती आपलं काम करत होती. मनोज पतंग उडवत होता.

आम्ही रोग्यांची चौकशी करत होतो. तू चित्र काढत होतास.

5. Turn into the affirmative the following sentences.

(पुढील वाक्ये होकारार्थी करा.)

मी भाषण ऐकत नव्हतो. मनीष सतार वाजवत नव्हता.

ती गारा वेचत नव्हती. नर्स औषधं देत नव्हती.

शैला स्वैपाक करत नव्हती. तू दूध पीत नव्हतास

आपण डोंगर उतरत नव्हतो. तुम्ही सकाळी नदीत पोहत नव्हतात.

वासरं गवत खात नव्हती. त्या कपडे धूत नव्हत्या.

6. Write a small paragraph narrating the activities in the vegetable market using the Past Continuous Tense.

(चालू भूतकाळाचा वापर करून मंडईत चाललेल्या गोष्टींचे वर्णन करणारा एक परिच्छेद लिहा.)

Vocabulary

अडकणे (v.intr) to be fixed
अपघात (m) accident
चौकशी (f) enquiry
जखम (f) a wound
जीव वाचणे (phr) to be saved
टक्कर (f) dash
ट्रक (m) truck
फेकला जाणे (phr) to be dashed to controll
मधेच (adv) suddenly
मुका मार (m) covered injury
मोटार सायकल (motor bike)
वळण (n) turn
वाहन (n) vehicle
वेदना (f) pain
सोडणे (v.tr.) to leave
हटवणे (v. tr.) to push aside

Grammatical Notes.

Unit XIV , Lesson 51 introduces the Past Continuous. This tense is used to narrate particular action which was going on in the past.

The formation of the Past Continuous is as follows :

R+ त+ the forms of होतो ; i.e. the forms of the verb 'to be' in the Past tense.

Example: मी बसलो. Past Tense

मी बसत होतो. Past Continuous.

This particular construction being conjugational differs from the constructions in Past Tense. The base in Past Tense is changed into the verb before adding the suffix.

Example: मी गेलो मी जात आहे.

तक्ता क्र. २४ Table No.24

	Singular	Plural
1st person (m)	मी जात होतो.	आम्ही जात होतो.
(f)	मी जात होते.	
2nd person (m)	तू जात होतास.	तुम्ही जात होतात.
(f)	तू जात होतीस.	
3rd person (m)	तो जात होता.	ते जात होते.
(f)	ती जात होती.	त्या जात होत्या.
(neu)	ते जात होतं.	ती जात होती.

The non - conjugational verbs which agree in number and gender with the direct object in Past Tense become conjugational in Past Continuous. The suffix 'नी' for third person is dropped.(Its full conjugation is as follows :)

Non -Conjugational verb पहा -to see

तक्ता क्र. २५ Table No.25

	Singular	Plural
1st person (m)	मी चित्र पहात होतो.	आम्ही चित्र पहात होतो.
(f)	मी चित्र पहात होते.	
2nd person (m)	तू चित्र पहात होतास.	तुम्ही चित्र पहात होतात.
(f)	तू चित्र पहात होतीस.	
3rd person (m)	तो चित्र पहात होता.	ते चित्र पहात होते.
(f)	ती चित्र पहात होती.	त्या चित्र पहात होत्या.
(neu)	ते चित्र पहात होतं.	ती चित्र पहात होती.

The negative form of Past Continuous takes negative conjugation of होतो. i.e. नव्हतो. in place of होतो

गट १४	Unit - XIV
धडा बावन्नावा	**LESSON 52**
तयारी झाली आहे	**The preparation is complete**
उद्या आमची सहल बनेश्वरला जाणार आहे.	Tomorrow we are going for a trip to Baneshwar.
आमच्या शिक्षकांनी बस ठरवली आहे.	Our teacher has booked a bus.
मी सहलीसाठी नाव दिलं आहे.	I have enrolled (my) name for the trip.
बनेश्वर पुण्यापासून फार दूर नाही.	Baneshwar is not far from Pune.
पण मी ते अजून पाहिलं नाही आहे.	But I have not seen it yet.
आम्ही ५० मुलांनी सहलीसाठी पैसे भरले आहेत.	We 50 students have paid for the trip.
मी सहलीची सगळी तयारी केली आहे.	I have finished all the preparations for the trip.
माझ्या आईनी लाडू आणि चिवडा केला आहे.	My mother has prepared ladus and chiwada.
बाबांनी मला पंचवीस रुपये दिले आहेत.	The father has given me 25 rupees.
पण मी ते सगळे खर्च करणार नाही.	But I am not going to spend them all.
माझा मित्र रोहित पण येणार आहे.	My friend Rohit is also coming (to the trip).

रोहित मला म्हणाला ,'' किरण, तू कॅमेरा घेतला आहेस का?''	Rohit asked me, "Kiran have you taken a camera ?"
मी म्हणालो, ''नाही बाबा! कॅमेऱ्यासारखी महाग वस्तू.	I said,"No my friend ! An expensive thing like camera! If
मी कुठे विसरलो तर बाबा मला रागवतील.	I forget it somewhere, (my) father will scold me.
पण आपल्या बाईंनी कॅमेरा घेतला आहे.''	But our (lady) tacher has taken a camera."
रोहित म्हणाला,''मग ठीक. आपण आपले खेळ घेऊया.	Rohit said, " It's O.K. Let us take something to play with.
मी माझा फूटबॉल घेतला आहे.	I have taken my foot - ball.
तू तुझी बासरी घेतली आहेस न ?''	You have taken your flute, haven't you?"
मी म्हणालो, '' मी बासरी घेतली आहे. मोहननी त्याचा बाजा घेतला आहे. मोहन बाजावर छान गाणी वाजवतो. मी खूपदा त्याची गाणी ऐकली आहेत.	I said , " I have taken my flute. Mohan has taken his mouth organ. Mohan plays songs on the mouth organ very well. I have heared the songs many a times.
तुझ्या आईनी काय खाऊ केला आहे?''	What sancks did your mother prepared ?"
रोहित म्हणाला,''माझ्या आईनी चिक्की बनवली आहे.	Rohit said ," My mother has made chikki.
आणि माझ्या बाबांनी माझ्यासाठी	And my father has brought

वेफर्स आणले आहेत.	wafers for me.
बाईंनी आपल्याला पाण्याची बाटली,	The (lady) teacher has told us to bring a water bottle
खाऊचा डबा आणायला सांगितलं आहे.	and a tiffin box.
माझ्या आईनी सर्व तयार करून ठेवलं आहे.''	My mother has kept every-thing ready."
मी म्हणालो, ''माझीपण सर्व तयारी झाली आहे''	I said, "My perparation is also complete."

Drills

I

Repetition Drills

1

मी वर्गात आलो आहे.	आम्ही वर्गात आलो आहोत.
मी वर्गात आले आहे.	
तू वर्गात आला आहेस.	तुम्ही वर्गात आला आहात.
तू वर्गात आली आहेस.	आपण वर्गात आलो आहोत.
तो वर्गात आला आहे.	ते वर्गात आले आहेत.
ती वर्गात आली आहे.	त्या वर्गात आल्या आहेत.
ते वर्गात आलं आहे.	ती वर्गात आली आहेत.

2

मी अभ्यास केला आहे.	आम्ही अभ्यास केला आहे.
तू अभ्यास केला आहेस.	तुम्ही अभ्यास केला आहात.
	आपण अभ्यास केला आहे
त्यानी अभ्यास केला आहे.	त्यांनी अभ्यास केला आहे.
तिनी अभ्यास केला आहे.	मुलींनी अभ्यास केला आहे.

3

मी जेवलो नाही आहे. | आम्ही जेवलो नाही आहोत.
मी जेवले नाही आहे. | आपण जेवलो नाही आहोत.
तू जेवला नाही आहेस. | तुम्ही जेवला नाही आहात.
तू जेवली नाही आहेस.
तो जेवला नाही आहे. | ते जेवले नाही आहेत.
ती जेवली नाही आहे. | त्या जेवल्या नाही आहेत.
ते जेवलं नाही आहे. | ती जेवली नाही आहेत.

4

मी पैसे दिले नाही आहेत. | आम्ही पैसे दिले नाही आहेत.
तू पैसे दिले नाही आहेस. | तुम्ही पैसे दिले नाही आहेत.
त्यानी पैसे दिले नाही आहेत. | त्यांनी पैसे दिले नाही आहेत.
तिनी पैसे दिले नाही आहेत. | मुलांनी पैसे दिले नाही आहेत.

II
Transformation Drill

1

मी सिनेमा बघतो.	मी सिनेमा बघितला आहे.
मी मुंबईला जाते.	मी मुंबईला गेले आहे.
आई भाजी करते.	आईनी भाजी केली आहे.
तू धडा वाचतेस.	तू धडा वाचला आहेस.
तुम्ही भोपाळला रहाता.	तुम्ही भोपाळला राहिला आहात.
शिक्षक बस ठरवतात.	शिक्षकांनी बस ठरवली आहे.
बाबा वेफर्स आणतात.	बाबांनी वेफर्स आणले आहेत.
तू बासरी घेतोस.	तू बासरी घेतली आहेस.
मला तिकीट मिळतं.	मला तिकीट मिळालं आहे.

मंडईत खूप शेंगा येतात. मंडईत खूप शेंगा आल्या आहेत.

मिलिंद छान फोटो काढतो. मिलिंदनी छान फोटो काढले आहेत.

आम्ही फूटबॉलचा सामना जिंकतो. आम्ही फूटबॉलचा सामना जिंकला आहे.

आपण मराठी भाषा शिकतो. आपण मराठी भाषा शिकलो आहोत.

उजाडतं. उजाडलं आहे.

रात्र होते. रात्र झाली आहे.

2

त्यांची सहल जाणार आहे. त्यांची सहल गेली आहे.

रोहित सहलीला येणार आहे. रोहित सहलीला आला आहे.

मोहन बाजा घेणार आहे. मोहननी बाजा घेतला आहे.

आई लाडू करणार आहे. आईनी लाडू केले आहेत.

तू फूटबॉल खेळणार आहेस. तू फूटबॉल खेळला आहेस.

मी गाणी ऐकणार आहे. मी गाणी ऐकली आहेत.

बाबा पैसे देणार आहेत. बाबांनी पैसे दिले आहेत.

बाई फोटो काढणार आहेत. बाईनी फोटो काढला आहे.

तुम्ही कॉफी पिणार आहात. तुम्ही कॉफी प्यायला आहात.

आपण पुस्तकं घेणार आहोत. आपण पुस्तकं घेतली आहेत.

III
Substitution Drills

संदीप बाजारात निघाला आहे. **संदीप** बाजारात निघाला आहे.

मी (m) आपण

आम्ही तुम्ही

ते	मी (f)
तू (f)	त्या
ती	तू (m)

आशानी **केळं** खाल्लं आहे.

अंडी

पेढे

पेरू

चिंचा

साखर

आशानी **केळं** खाल्लं आहे.

चिवडा

चिक्की

वेफर्स

भात

चपात्या

IV
Conversation Drill

आई : अग ,मानसी, आज तुझी परीक्षा आहे न ?

मानसी : होय आई. आज पहिला पेपर आहे.

आई : तू सगळ्या वस्तू नीट घेतल्यास का?

मानसी : हो आई. मी दोन पेनं घेतली आहेत. एक पेन्सील आणि रबर-पण घेतलं आहे. पिशवीत पाण्याची बाटली आणि रुमाल ठेवला आहे.

आई : मी आज लौकर स्वैपाक केला आहे. तुला उशीर व्हायला नको. तुझा डबा पण भरून ठेवला आहे.

मानसी : आई, मी सगळे धडे नीट वाचले आहेत.

आई : अग तू मुळीच घाबरू नकोस. तू अभ्यास नीट केला आहेस न? मग तुला पेपर चांगला लिहिता येईल.

मानसी : आई, बाबा बाहेर गेले आहेत का?

आई : हो. ते बाहेर गेले आहेत. पण जाण्यापूर्वी त्यांनी तुला शुभेच्छा

दिल्या आहेत.

मानसी : आई, मी नमस्कार करते. तो बघ रिक्षावाला पण आला आहे. आता मी जाते.

आई : जा बाळ. संध्याकाळी लौकर परत ये.

स्वाध्याय क्र. ५२ Exercise No.52

1. Transform the following sentences into Present Perfect.

[पुढील वाक्ये पूर्ण वर्तमानकाळात लिहा.]

मीनाक्षी ओडीसी नृत्य पहाते.

शारदाबाई मुलीकडे अमेरिकेला जातात.

किरण वडलांना निरोप सांगतो

तुम्ही नोकरीसाठी अर्ज करता.

मी तिकिटाचे पैसे देते.

आम्ही पावसाळ्यात छत्री विकत घेतो.

बाळ दिवसभर खेळून खूप दमतं.

दुकानदार लक्ष्मीच्या फोटोला हार घालतो.

माधवरावांचा मुलगा डॉक्टर होतो.

तू मोटार चालवायला शिकतोस.

2. Substitute the underlined word with given words making necessary changes in the sentence.

[वाक्यात योग्य ते फेरफार करून अधोरेखित शब्दांऐवजी दिलेले शब्द वापरा.]

माधुरी बाजारात जायला निघाली.	**माधुरी** बाजारात जायला निघाली.
तू (m)	मी (f)
आपण	आम्ही
तुम्ही	रुक्मिणीबाई
शिवराम	तू (f)
मेधाचे वडील	मी (m)

3. Turn the following sentences into the negative.

[पुढील वाक्ये नकारार्थी करा.]

अरुणनी रेडिओ आणला आहे.

देवकीला पगार मिळाला आहे.

तू पाचवा प्रश्न लिहिला आहेस.

यंदा तेलाच्या किंमती वाढल्या आहेत.

मी आईला पत्र पाठवलं आहे.

आम्ही विमानात बसलो आहोत.

सुरेशनी पैज जिंकली आहे.

तुम्ही ताजमहाल पाहिला आहे.

सभेसाठी लोक जमले आहेत.

पराग मुंबईहून आला आहे.

4. Construct sentences in the Present Perfect from the given words.

[दिलेल्या शब्दसमूहातून पूर्ण वर्तमानकाळात वाक्ये बनवा.]

बाजार, नवीन, आइस्क्रीम, ये.

माळी, बाग, निरनिराळी, फुलझाडं, लाव.

श्री. शहा, आपण, जुना, मोटार, विक.

पुणे, मुंबई, बस, खंडाळा, अपघात, हो.

आपण, पुष्पा, वाढदिवस, निमंत्रण, मिळ.

रात्र, हो, रस्ता, वर, दिवे, लाग.

तुम्ही, तुम्ही, बरोबर, कोण, आण.

धर्मेंद्र, तो, सायकल, सकाळी, दुरुस्त, कर.

उमा, आई, मी, साठी, स्वेटर, विण.

5. Write sentences selecting a correct form from the given forms.

[दिलेल्या शब्दांतून योग्य शब्द निवडून वाक्य लिहा.]

त्यांनी / त्या पाय घसरून पडल्या आहेत.

तू चष्मे विकत घेतलास / घेतले आहेस.

मी आताच झोपून उठत / उठलो आहे.

सरितानी / सरिता आंघोळ केली आहे.

तुम्ही किती पुस्तकं वाचली आहेत / आहात?

प्रतिभा घराला कुलूप लावत / लावलं होती.

आपण त्या दिवशी शाळेत खेळत / खेळलो होतो.

माझ्या बहिणीला मुलगा होतो / झाला आहे.

तू नव्या साड्या धुतलीस / धुतल्या आहेस.

श्री. चौधरी नोकरावर रागवले / रागवलं आहेत.

6. Complete the conversation by filling the blanks.

[गाळलेल्या जागा भरून पुढील संभाषण पूर्ण करा.]

बडील : अरे आनंद, आपली बॅग कुठे ठेवली आहेस?

आनंद : ------------------------------.

बडील : खिडकीजवळ कशाला ठेवलीस ? वर फळीवर ठेव.

आनंद : ------------------------------------.

बडील : तिथे कोणी आपलं सामान ठेवलं आहे? थांब. मी सरकवून आपली बॅग ठेवतो. तू गाडीत वाचायला पुस्तकं आणली आहेस का?

आनंद : -----------------------------------.

बडील : अरे वा ! तुझ्या आईनी माझ्यासाठीपण पुस्तक दिलं आहे? तिनी आणखी काय काय दिलं आहे ?

आनंद : -----------------------------------.

बडील : पाण्याची बाटली दिली आहे हे बरं झालं. लाडू आपण नंतर खाऊ या. इथे कोण बसलं आहे ?

आनंद : -----------------------------------.

बडील : दोघेही खाली उतरले आहेत का? पण गाडीची वेळ झाली आहे.

आनंद : ------------------------------.

बडील : मी तिकीट खिशातच ठेवलं आहे. ते दोघे गाडीत चढले आहेत का बघ.

आनंद : -----------------------------------.

Vocabulary

कॅमेरा (m) camera

खर्च करणे (phr) to spend

खूपदा (adv) many a times

चिक्की (f) chikki

तयारी (f) preparation

नाव देणे (phr) to enroll

पूर्वी (adv) before

पैसे भरणे (phr) to deposite the money

फूटबॉल (m) foot ball

बाजा (m) mouth organ

बासरी (f) flute

वाजवणे (v.tr) to play

वेफर्स (m.pl) wafers

सहल (f)i trip

Grammatical Notes

Unit XIV Lesson 52 introduces the Present Perfect Tense in Marathi.

This construction is used for the activity, completed recently.

We have seen the Present Tense forms of the auxiliary verb आहे 'to be'.

The Present Perfect is formed by adding the form of आहे to the Past Tense forms e.g.

Past Tense	: मी बसलो.	I sat
Present Perfect	: मी बसलो आहे.	I have sat.
Past Tense	: तू बसलास.	You sat.
Present Perfect	: तू बसला आहेस.	You have sat.

* Second person markers (sg) स and (pl) त are dropped.

The Non - Conjugational verbs are also formed by adding आहे / आहेत (आहेस for 2nd person) to the past Tense.

Past Tense	: त्यानी आंबा खाल्ला.	He ate a mango.
Present Perfect	: त्यानी आंबा खाल्ला आहे.	He has eaten a mango.
Past Tense	: तिनी पेढे आणले.	She brought the pedhes.
Present Perfect	: तिनी पेढे आणले आहेत.	She has brought the pedhes.
Past Tense	: तू काम केलंस.	You did the work.
Present Perfect	: तू काम केलं आहेस.	You have done the work.
Past Tense	: तू पैसे दिलेस.	You gave the money.
Present Perfect	: तू पैसे दिले आहेस.	You have given the money.

The Negative conjugation is formed by insurting नाही in between the Past Tense form and the form आहे.

Examples : तो झोपला आहे. Affirmative

तो झोपला नाही आहे. Negative.

गट - १४

Unit - XIV

धडा त्रेपनावा

LESSON 53

मी लग्नाला गेलो होतो.

I had gone for the wedding.

महेश माझा शाळेपासूनचा मित्र आहे.	Mahesh is my friend since we were in school.
गेल्या रविवारी त्याचं लग्न होतं.	His wedding was on last Sunday.
त्यानी मला आग्रहानी बोलवलं होतं.	He had heartily invited me.
लग्न सकाळीच झालं होतं.	The marrage ceremony was over in the morning.
मी संध्याकाळी स्वागत समारंभाला गेलो होतो.	I had gone to the reception in the evening.
स्वागत समारंभ एका मोठ्या कार्यालयात होता.	The reception was in a big wedding hall.
संपूर्ण कार्यालय सुंदर सजवलं होतं.	The wedding hall was very well decorated.
सगळीकडे रंगीत दिव्यांच्या माळा सोडल्या होत्या.	The colourful lamps were hanging everywhere.
सनई लावली होती.	The shehnai was being played.
खूप लोक जमले होते.	Many people had gathered.
महेश आणि त्याची बायको स्टेजवर बसले होते.	Mahesh and his wife were siltting on the stage
तिथे फुलांची उत्तम सजावट केली	(The stage) was very well

होती.	decorated with the flowers.
महेशनी उत्तम सूट घातला होता.	Mahesh had put on a nice suit.
नवरीही बनारसी शालू नेसली होती.	The bride had also wore a Banarasi sari.
तिनी खूप दागिने घातले होते.	She had put many ornaments.
दोघंही खूप सुंदर दिसत होती.	Both of them were looking gorgeous.
लोक त्यांना भेटून त्यांचं अभिनंदन करत होते.	People were greeting and congratulating them.
त्यांना भेटवस्तू देत होते.	They were giving them presents.
सर्वांसाठी मेजवानीची उत्तम व्यवस्था केली होती.	A nice party was organized for all.
तिथे टेबलं, खुर्च्या मांडल्या होत्या.	The tables and chairs were arranged over there.
टेबलांवर पांढऱ्याशुभ्र चादरी पसरल्या होत्या.	Nice white sheets were spread on the tables.
प्रत्येक टेबलावर फुलांची सजावट होती.	On every table, there was a flower- arrangement.
बाजूला जेवणाचे पदार्थ ठेवले होते.	The dishes were orranged at a side.
सर्व पदार्थ गरम ठेवण्याची सोय केली होती.	There were arrangements to keep the food hot.
सर्व पदार्थ चवदार बनवले होते.	All the dishes were very dilicious.

प्रत्येकजण आपल्या आवडीप्रमाणे बशीत पदार्थ घेत होता.	Everybody was taking the food in his plate according to wish.
सगळे आरामात जेवत होते आणि गप्पा मारत होते.	All were eating happily and chit-chating.
लग्नाला आमचे बरेच मित्र आले होते.	Many of our friends had come for the wedding.
आम्ही सर्व जेवलो.	We all took (our) meals.
जेवल्यानंतर मी आइस्क्रीम घेतलं.	I took ice-cream after meal.
माझ्या मित्रानी आणखी एक आइस्क्रीम आणलं.	My friend brought one more ice-cream.
पण माझं पोट भरलं होतं.	But my stumach was full.
महेशचा निरोप घेऊन मी रात्री घरी परत आलो.	After taking leave from Mahesh , I came home at night.

Drills

I

Repetition

I

मी गोव्याला गेलो होतो.	आम्ही गोव्याला गेलो होतो.
मी गोव्याला गेले होते.	
तू गोव्याला गेला होतास.	तुम्ही गोव्याला गेला होतात.
तू गोव्याला गेली होतीस.	आपण गोव्याला गेलो होतो.
तो गोव्याला गेला होता.	ते गोव्याला गेले होते.
ती गोव्याला गेली होती.	त्या गोव्याला गेल्या होत्या.

2

मी अभ्यास केला होता.	आम्ही अभ्यास केला होता.
तू अभ्यास केला होतास.	तुम्ही अभ्यास केला होता.
त्यानी अभ्यास केला होता.	त्यांनी अभ्यास केला होता.
तिनी अभ्यास केला.	मुलींनी अभ्यास केला होता.

3

मी वर्गात आलो नव्हतो.	आम्ही वर्गात आलो नव्हतो.
मी वर्गात आले नव्हते.	
तू वर्गात आला नव्हतास.	तुम्ही वर्गात आला नव्हतात.
तू वर्गात आली नव्हतीस.	आपण वर्गात आलो नव्हतो.
तो वर्गात आला नव्हता.	ते वर्गात आले नव्हते.
ती वर्गात आली नव्हती.	त्या वर्गात आल्या नव्हत्या.
ते वर्गात आलं नव्हतं.	ती वर्गात आली नव्हती.

4

मी काम केलं नव्हतं.	आम्ही काम केलं नव्हतं.
तू काम केलं नव्हतंस.	तुम्ही काम केलं नव्हतंत.
त्यानी काम केलं नव्हतं.	त्यांनी काम केलं नव्हतं.
तिनी काम केलं नव्हतं.	मुलींनी काम केलं नव्हतं.

II
Transformation Drill

1

Transform the following sentences to past perfect

(पुढील वाक्ये पूर्ण भूतकाळात लिहा.)

मी पुण्यात रहातो.	मी पुण्यात राहिलो होतो.
उजाडतं , सकाळ होते.	उजाडलं होतं, सकाळ झाली होती.
सुजाताला पेरू आवडतात.	सुजाताला पेरू आवडले होते.

संदीपला बसमधे मळमळतं.	संदीपला बसमधे मळमळलं होतं.
अरुणा दिवा लावते.	अरुणानी दिवा लावला होता.
महेश मला लग्नाला बोलवतो.	महेशनी मला लग्नाला बोलवलं होतं.
रेखा उदयला वही देते.	रेखानी उदयला वही दिली होती.
डॉ.कालेलकर फ्रेंच शिकतात.	डॉ.कालेलकर फ्रेंच शिकले होते.
अपर्णा साडी नेसते.	अपर्णा साडी नेसली होती.

2

Transform the sentences from present perfect to the past perfect.

(पूर्ण वर्तमानकाळातली पुढील वाक्ये पूर्ण भूतकाळात लिहा.)

मंदार बाजारात गेला आहे.	मंदार बाजारात गेला होता.
वीणाला तिकीट मिळालं आहे.	वीणाला तिकीट मिळालं होतं.
अंधार पडला आहे.	अंधार पडला होता.
वसुधानी चहा घेतला आहे.	वसुधानी चहा घेतला होता.
मुलं खेळून दमली आहेत.	मुलं खेळून दमली होती.
सतीशनी कपडे धुतले आहेत.	सतीशनी कपडे धुतले होते.
अलकाताई उठल्या आहेत.	अलकाताई उठल्या होत्या.
तू धडा वाचला आहेस.	तू धडा वाचला होतास.
मी बाजारात निघालो आहे.	मी बाजारात निघालो होतो.
तुम्ही जेवला आहात.	तुम्ही जेवला होतात.

3

Transform the sentences first into the Peresent Perfect, then into the Past Perfect.

[दिलेली वाक्ये प्रथम पूर्ण वर्तमानकाळात आणि नंतर पूर्ण भूतकाळात लिहा.]

मला घर आवडलं. मला घर आवडलं आहे.

मला घर आवडलं होतं.

आम्हाला साड्या आवडल्या. आम्हाला साड्या आवडल्या आहेत.

आम्हाला साड्या आवडल्या होत्या.

तुला गोव्यात करमलं. तुला गोव्यात करमलं आहे.

तुला गोव्यात करमलं होतं.

तुम्ही आंगठ्या घातल्या. तुम्ही आंगठ्या घातल्या आहेत.

तुम्ही आंगठ्या घातल्या होत्या.

तिनी गोष्टी वाचल्या. तिनी गोष्टी वाचल्या आहेत.

तिनी गोष्टी वाचल्या होत्या.

आशाताईंनी पुस्तक नेलं. आशाताईंनी पुस्तक नेलं आहे.

आशाताईंनी पुस्तक नेलं होतं.

III

Substitution Drills

Substitute the underlined words with the following words.

[अधोरेखित शब्दांऐवजी दिलेले शब्द वापरा.]

अनीता स्टेशनवर थांबली होती.	मी पैसे दिले होते.
तू (m)	बांगड्या
आपण	घड्याळ
तुम्ही	साडी
मी (f)	चहा
दीपक	केळी
आम्ही	कपाट
तू (f)	खुर्च्या
शांताबाई	स्वेटर

दिवाणसाहेब	सायकल
मी (m)	पेन

IV

Fill in the gadps Drill

Fill in the gaps with the forms of नव्ह-

(नव्ह - ची निरनिराळी रूपे वापरून जागा भरा.)

मी काल लौकर उठलो -----.

तो सकाळी सहा वाजता आला------.

श्री. सान्यांनी कविता शिकवली --.

किसनने वर्ग झाडला ------.

प्रदीपनी आम्हाला बाजारात पाहिलं ---.

मुली काल शाळेत गेल्या ------.

तू भावाची काळजी घेतली ------.

आपण स्टेशनवर पोचलो -----.

तुम्ही बसमधे चढला ------.

दीपानी कॉफी आणली -------.

V

Conversation Drill

गौरव : अरे चंदू, तू काल शाळेत आला नव्हतास का?

चंदू : नाही. काल मी आईबरोबर दवाखान्यात गेलो होतो. का ? काय झालं?

गौरव : अरे काल आपल्या शाळेत एक जादूगार आले होते. शाळेत त्यांचा जादूचा कार्यक्रम ठेवला होता.

चंदू : असं ? सगळी मुलं जमली होती का ?

गौरव : हो. हॉल पूर्ण भरला होता. सर्व शिक्षकही समोरच बसले होते.

चंदू : मग, कार्यक्रमात काय काय झालं ?

गौरव : टेबलावर एक अंडं ठेवलं होतं. नंतर जादूगारानी त्यावर टोपी ठेवली. एका मुलाला त्यांनी स्टेजवर बोलवलं. त्यानी टोपी उचलली. पण तिथे अंडं नव्हतं. असे त्यांनी खूप खेळ दाखवले होते. पण तू का आला नव्हतास ?

चंदू : माझ्या आईला ताप आला होता. तिला अजिबात झोप आली नव्हती. तिला खोकलाही खुप झाला होता. मी आईबरोबर डॉक्टरांकडे गेलो होतो.

गौरव : आता तुझी आई बरी आहे न ?

चंदू : हो. काल डॉक्टरांनी तिला इंजेक्शन दिलं होतं. मी तिला दोन वेळा औषध दिलं होतं. पण ती काल जेवली नव्हती. काल तिनी फक्त दोनदा कॉफी घेतली होती. आज तिला बरं वाटत होतं. माझा अभ्यास राहिला म्हणून मी आज शाळेत आलो.

गौरव : तुझी आई लवकर बरी होईल.

स्वाध्याय क्र. ५३ Exercise No.53

1. Transform the following sentences into the Past Perfect.
(पुढील वाक्ये पूर्ण भूतकाळात लिहा.)

गाडी स्टेशनातून सुटते.

मी झाडांना पाणी घालते.

सांजावतं आणि गुरं घराकडे येतात.

प्रज्ञाला कपाटाच्या किल्ल्या सापडतात.

मंगला मैत्रिणींबरोबर उसाचा रस पिते.

तू मुलींना सहलीची माहिती सांगतेस.

तुम्ही बसमधे छत्री विसरता.

किरीट वडलांकडे सहलीसाठी पैसे मागतो.

पोलीस चोराला चोरी करताना पकडतात.

श्री. केळकर आम्हाला मराठ्यांचा इतिहास शिकवतात.

2. Substitute the underlined word with the given words making necessary changes in the sentence.
(वाक्यात योग्य ते बदल करून अधोरेखित शब्दांऐवजी दिलेले शब्द वापरा.)

a)मी शाळेत जायला निघालो होतो. मी शाळेत जायला निघालो होतो.

तू	तुम्ही
विद्यार्थी	मी (f)
मुख्याध्यपिका	आपण
आम्ही	तू (m)
माझी बहीण	गोविंद

b)मला गोवं आवडलं होतं. मला गोवं आवडलं होतं.

पाऊस	भाज्या
मंडई	स्वैपाक
मासे	हॉटेल
चहा	साडी
रुमाल	घड्याळ
पुस्तकं	बांगड्या

c) अविनाशनी ताजमहाल पाहिला होता. अविनाशनी ताजमहाल पाहिला होता.

पुणं	बाग
हरणं	काचेचे दिवे
इमारत	राजवाडा

बंगले	चादरी
चित्र	कलिंगड
आगपेटी	ससे

3. Turn into the Past Perfect and then into the negative the following sentences.

(पुढील वाक्ये पूर्ण भूतकाळात करा. नंतर ती नकारार्थी करा.)

पाहुणे समारंभाला वेळेवर येतात.

मी लौकर उठतो आणि व्यायाम करतो.

आम्ही पवनार आश्रमात एक दिवस रहातो.

सरिता रविवारी नाटक बघते.

आनंद मोहनला पतंग आणून देतो.

चिमणी पिल्लांना चारा भरवते.

तुम्ही मुंबईला जाता.

तुम्हाला तिथे करमतं.

मी दार बंद करते आणि कुलूप लावते.

सर्व शिक्षिका समारंभात भाग घेतात.

4. Write the sentences selecting the correct form from the given below.

(दिलेल्या रूपांमधून योग्य रूप निवडून पूर्ण वाक्ये लिहा.)

माझा जन्म धुळ्याला होतो / झाला आहे. तो गावाला गेला होतो / होता.

मी गेल्यावर्षी नाटकात राजा होतो / झालो होतो.

तू स्टेशनवर पोचला / पोचलास होतास.

मीनाला फलटणमधे करमलं नव्हती / नव्हतं.

माझी मैत्रीण चहा प्यायली / प्यायला होती.

मोहन / मोहनला आंबे फार आवडले होते.

त्यांनी / त्या खुर्चीवर बसल्यावर आम्ही बसलो.

मी इकडे पूर्वी आली होती / आले होते.

5. Change as directed (कंसातील सूचनेप्रमाणे बदलून लिहा.)

तो सिनेमाला येणार आहे. (Past Tense) भूतकाळ

गाडी स्टेशनात शिरली आहे. (Present Continuous) चालू वर्तमानकाळ

सुधा मुलींना शाळेत पाठवते आहे. (Past Perfect) पूर्ण भूतकाळ

मी अरविंदला ग्रंथालयात भेटीन. (Past Negative) नकारार्थी भूतकाळ

ते मला विचारतात. मी त्यांना सांगतो. (Past Tense) भूतकाळ

दीपाताई नवी भांडी विकत घेतात.(Present Perfect) पूर्ण वर्तमानकाळ

चिमण्या सापाला घाबरतात.(Past Continuous) चालू भूतकाळ

तुमच्या विद्यार्थ्यांनी चुका केल्या. (Future - 1) भविष्यकाळ -१

बस आली आणि तू बसमागे पळालास. (Present) वर्तमानकाळ

दुकानदार नोकरावर खूप रागवतो. (Past Perfect) पूर्ण भूतकाळ

6. Write a small pargraph in Past perfect with the help of the following points.

(खालील मुद्यांच्या आधारे पूर्ण भूतकाळात एक परिच्छेद लिहा)

वर्गाची सहल --- मुलं डबे आण ---- शिक्षक मुलं जागेवर बसव --- मुलं बसमधे गाणी म्हण ---- शिक्षिका गोष्टी सांग --- नदीकाठी जा --- झाडावर चढ --- अनेक खेळ खेळ --- खूप दम --- बस रात्री ये --- मुलं आईबाबा ये ---- घरी ने.

Vocabulary

अभिनंदन (n) Congratulation, भेटवस्तू (f) present

आग्रह (m)insist, forcing out of affection, मेजवानी (f) feast

कार्यालय (n)wedding hall, office, लग्न (n)wedding

चवदार (adj)tasty, शालू (m)silk saree with jari

दागिना (m)ornament, सनई (f)shehnai

नेसणे (v.tr.)to put on a saree or dhoti etc. सूट (m)suit

पदार्थ (m)dish,eatable, स्वागत समारंभ (m)reseption

(पोट) भरणे (v.intr)(the stumach)be full

Grammaticl Notes

Unit XIV Lesson 53 explains the Past Perfect froms in Marathi.

We have seen the Present Tense forms of auxiliary verb आहे. 'to be' and its Past Tense.

The Present Perfect is formed by adding forms of आहे to the forms of main verb in the Past Tense.

The Past Perfect is formed by adding the Past Tense forms of आहे to the forms of the main verb in the Past Tense. The addition of आहे to the main verb in the Past Tense for Present Perfect is thus replaced by होता, etc.

Pre. perf. : मी बसलो आहे . ' I have sat.'

Past perf. : मी बसलो होतो. ' I had sat'.

The negative form of आहे is नाही and its past Negative base is नव्ह . So conjugation of नव्ह is added to the Past Tense of the main verb in negative past perfect.

Example : मी बसलो नव्हतो.

गट - १४	Unit - XIV
धडा चोपनावा	**LESSON 54**
मांजरं खेळायची	**The cats used to play.**
आशाच्या घरी दोन मांजरं होती.	There were two cats at Asha's house.
एक बोका आणि एक मांजरी.	A tom-cat and a female-cat.
बोक्याचं नाव होतं मिलू.	The name of the tom-cat was Milu.
आणि मांजरीचं नाव होतं भुरी.	And the name of the female cat was Bhuri.
सकाळ झाली की भुरी, ''म्याव म्याव'' करत आशाला उठवायची.	As soon as it was morning Bhuri used to wake up Asha by mewing.
मिलू भुरीच्या मागेच असायचा.	Milu used to be just behind Bhuri.
पण तो ओरडायचा नाही.	But he wouldn't mew.
मग आशा उठायची आणि दोघांना बशीत दूध घालायची.	Then Asha would get up and pour milk in a saucer for the two.
दोघं लपलप करत दूध पिऊन टाकायची.	The two lapped up the milk.
मग मजेत आंग चाटत बसायची.	Then (they) used to sit merily licking their body.
आणि ऊन पडलं की बाहेर जाऊन उन्हात लोळायची.	And when it was sunlight (they) went and wallowed in the sun.

थोड्या वेळानी भुरी परत यायची.	After some time Bhuri used to come back.
आता तिला सुके मासे पाहिजे असायचे.	Now she wanted dry fish.
आशानी माशांचा डबा उघडला की मिलूलाही वास यायचा.	When Asha opened the tin of fish , Milu also got the smell.
आणि तो पळत पळत घरात शिरायचा.	And he used to enter the house running.
मग आशा त्या दोघांना सुके मासे द्यायची.	Then Asha would give dry fish to both of them.
मिलूला आणि भुरीला सुके मासे आवडायचे.	Milu and Bhuri used to like dry fish very much.
रोज संध्याकाळी दोन्ही मांजरं आशाची वाट पहात दारासमोर बसून असायची.	Every evening , both of the cats sat in front of the door waiting for Asha.
ऑफिसातून आल्याबरोबर आशा त्यांना दूधचपाती द्यायची.	As soon as Asha returned from the office , she used to give them milk and chapati.
कधीकधी पाव किंवा अंडं द्यायची.	Sometimes she gave (them) bread or egg.
मिलूला बिस्किटंही फार आवडायची.	Milu liked biscuits also very much.
चपाती खाऊन झाली की दोघं बागेत खेळायची.	When they finished eating chapati, the two used to

	play in the garden.
मिलू भुरीच्या मागे पळायचा.	Milu used to run behind Bhuri.
पण भुरी झाडावर चढायची.	But Bhuri used to climb up a tree.
कारण ती चपळ होती.	As she was very active.
मिलू लठ्ठ होता.	Milu was fat.
त्यामुळे त्याला झाडावर लौकर चढता यायचं नाही.	So he was not able to climb a tree quickly.
भुरीला शिकार करता यायची.	Bhuri could hunt.
ती रोज एखादी चिमणी, उंदीर, खार, पाल किंवा निदान झुरळतरी पकडायची.	She used to catch everyday a sparrow, a mouse, a squirrel a lizard or atleast a cockrroach.
मिलूला शिकार करता यायची नाही.	Milu could not hunt.
फक्त एकदा त्यानी कोंबडीचं पिल्लू पकडलं होतं.	Only once he had cought a chicken.
पण ते भुरीनीच मटकावलं.	But it was devoured by Bhuri.
कुत्रा दिसला की दोघं घरात शिरायची.	When they saw a dog the two used to enter the house.
किंवा झाडावर चढायची.	Or they used to climb tree.
कुत्रा मांजराच्या मागे लागतो.	A dog chases cats.
म्हणून आशाला कुत्रा आवडायचा नाही.	That is why Asha didn't like dogs.

मिलू आणि भुरी मात्र तिला फार आवडायची. But she liked Milu and Bhuri very much.

Drills

I

Repetition Drills

मी शाळेत जायचा	मी शाळेत जायची.
	आम्ही शाळेत जायचो.
तू शाळेत जायचास.	तू शाळेत जायचीस.
	तुम्ही शाळेत जायचा.
तो शाळेत जायचा.	ते शाळेत जायचे.
ती शाळेत जायची.	त्या शाळेत जायच्या.
मी पुस्तकं वाचायचा	आम्ही पुस्तकं वाचायचो.
मी पुस्तकं वाचायची.	
तू पुस्तकं वाचायचास.	तुम्ही पुस्तकं वाचायचा.
तू पुस्तकं वाचायचीस..	आपण पुस्तकं वाचायचो.
तो पुस्तकं वाचायचा.	ते पुस्तकं वाचायचे.
ती पुस्तकं वाचायची.	त्या पुस्तकं वाचायच्या.
मोहन पत्रं लिहायचा.	सुनीता गाणं म्हणायची.
श्रीयुत पेंडसे फिरायला जायचे.	आशाताई पूजा करायच्या.
माकडं झाडावर चढायची.	आपण सिनेमा पहायचो.
मुली अंगणात खेळायच्या.	विद्यार्थी नदीत पोहायचे.
कोळी मासे पकडायचा.	मूल पाण्यात खेळायचं.

II

Fill in the gaps Drills

1

Fill in the gaps with appropriate forms of Habitual Past Tense.

(रीतिभूतकाळाची योग्य रूपे रिकाम्या जागेत भरा.)

१ आशा सकाळी लौकर ----.
२ मिलूला बिस्किटं ---.
३ भुरी आणि मिलू बागेत --
४ भुरी झाडावर --.
५ कुत्रा मांजराच्या मागे ---.
६ आशा मांजरांना बशीत दूध---.
७ मिलू लपलप करत दूध ---.
८ मिलू आणि भुरी उन्हात ---.
९ भुरी म्याव म्याव करत आशाला --.
१० संध्याकाळी मांजरं आशाची वाट ---.
११ मिलूला आणि भुरीला सुके मासे फार ---.

२

मी रोज सकाळी शाळेत ---.
तू मला पत्रं---.
आम्ही खूप अभ्यास ---.
आपण बागेत चेंडू ---.
तुम्ही वर्गात दंगा ---.
तो कविता पाठ ---.
ती सुंदर गाणी ----.
ते झाडावर ----.
त्या छान स्वैपाक ---.
ते आम्हाला मराठी ----.

III

Transformation Drills

Transform the Present Tense sentences into the Past Habitual. (वर्तमानकाळातील वाक्ये रीतिभूतकाळात लिहा.)

मी शाळेत लौकर जातो.	मी शाळेत लौकर जायचा.
मी वर्गात गाणी म्हणते.	मी वर्गात गाणी म्हणायची.
आम्ही मित्रांना पत्रं लिहितो.	आम्ही मित्रांना पत्रं लिहायचो.
तू खूप अभ्यास करतोस.	तू खूप अभ्यास करायचास.
तू घंटा वाजवतेस.	तू घंटा वाजवायचीस.
तुम्ही खिडक्या उघडता.	तुम्ही खिडक्या उघडायचा.
आपण दुकानात येतो.	आपण दुकानात यायचो.

तो सिनेमा पहातो.	तो सिनेमा पहायचा.
ते मुंबईला रहातात.	ते मुंबईला रहायचे.
ती मोटार चालवते.	ती मोटार चालवायची.
त्या कविता शिकवतात.	त्या कविता शिकवायच्या.
कासव तळ्यात पोहतं.	कासव तळ्यात पोहायचं.
माकडं फळं खातात.	माकडं फळं खायची.

2

Turn the Past Habitual sentences into the Simple Past. (रीतिभूतकाळातील वाक्ये साध्या भूतकाळात बदला.)

मी पुस्तकं वाचायचा.	मी पुस्तकं वाचली.
मी फिरायला जायची.	मी फिरायला गेले.
आम्ही व्यायाम करायचो.	आम्ही व्यायाम केला.
तू खोली झाडायचास.	तू खोली झाडलीस.
तू अभ्यास करायचीस.	तू अभ्यास केलास.
तुम्ही नाटक लिहायचा.	तुम्ही नाटक लिहिलंत.
आपण बाजारात जायचो.	आपण बाजारात गेलो.
तो चित्रं काढायचा.	त्यानी चित्रं काढली.
ते शिकार करायचे.	त्यांनी शिकार केली.
ती बागेत यायची.	ती बागेत आली.
त्या स्वैपाक करायच्या.	त्यांनी स्वैपाक केला.
वासरू घरात शिरायचं.	वासरू घरात शिरलं.
मुलं दंगा करायची.	मुलांनी दंगा केला.

IV

Affirmative Negative Drills

Turn the Present Tense Negative into the Habitual Negative. (वर्तमानकाळातील नकारार्थी वाक्ये

रीतिवर्तमानकाळात नकारार्थी करा.)

मी पुस्तक वाचत नाही.	मी पुस्तक वाचायचा/वाचायची नाही.
मी पत्र लिहीत नाही.	मी पत्र लिहायचा/लिहायची नाही.
आम्ही अभ्यास करत नाही.	आम्ही अभ्यास करायचो नाही.
तू गावाला जात नाहीस.	तू गावाला जायचा/जायची नाहीस.
तू मुंबईला रहात नाहीस.	तू मुंबईला रहायचा/रहायची नाहीस.
तुम्ही सिनेमा पहात नाही.	तुम्ही सिनेमा पहायचा नाही.
तो व्यायाम करत नाही.	तो व्यायाम करायचा नाही.
ते घड्याळ वापरत नाहीत.	ते घड्याळ वापरायचे नाहीत.
ती भाजी आणत नाही.	ती भाजी आणायची नाही.
त्या फळा पुसत नाहीत.	त्या फळा पुसायच्या नाहीत.
ते घरात येत नाही.	ते घरात यायचं नाही.
ती वर्गात बसत नाहीत.	ती वर्गात बसायची नाहीत.

V

Substitution Drills

Substitute the underlined words with the given words.
(अधोरेघित शब्दांऐवजी खाली दिलेले शद्ब वापरा.)

१. आशा सकाळी लौकर उठायची. आशा सकाळी लौकर उठायची.

तुम्ही	मी (m)
राम	आपण
विद्याताई	मांजरं
आम्ही	पिल्लू
तू (f)	तू (m)

२.मिलूला मासे फार आवडतात. मिलूला मासे फार आवडायचे.

दूध	पाव

चपात्या	अंडी
बिस्किटं	उंदीर
कोंबडी	तूप
लोणी	बटाटे

३.आशा शाळेत लौकर जायची. आशा शाळेत लौकर जायची.

निघ	डबा खा
ये	चहा पी
अभ्यास कर	कविता म्हण
राणी हो	रागव
पोच	शिक

VI
Conversation Drill

शिक्षक : नीता, तू पूर्वी कुठे रहायचीस?

नीता : मी पूर्वी कोथरूडला रहात होते.

शिक्षक : कोथरूडला तुमचा बंगला होता का?

नीता : हो. कोथरूडला आमचा मोठा बंगला होता. आमच्या बंगल्याभोवती मोठी बाग होती.

शिक्षक : तुमच्या बागेत काम कोण करायचं?

नीता : माझे वडील स्वतः बागकाम करायचे. त्यांना बागकाम करायला फार आवडायचं. ते रोज सकाळी लौकर उठायचे. बागेत हिंडायचे. बागेत निरनिराळी फुलझाडं लावायचे. आमच्या बागेत खूप रंगीबेरंगी फुलं होती.

शिक्षक : तुला फुलं आवडायची का?

नीता : हो मला फुलं खूप आवडायची. मी रोज सकाळी ताजी फुलं तोडायची. माझी आई त्या फुलांच्या माळा करायची. माझे

आजोबा देवाला फुलं वहायचे. माझ्या भावाला मात्र फुलं आवडायची नाहीत. तो बागेत पेरूची झाडं लावायचा. पेरूच्या झाडांना खूप पेरू यायचे. आम्ही सर्वजण गोड गोड पेरू खायचो. खूप मजा यायची.

शिक्षक : वा ! छान ! मुलांनो, तुम्ही आता नीताच्या बागेची गोष्ट ऐकलीत. तुम्हीसुद्धा तुमच्या लहानपणच्या गोष्टी लिहून आणा. तुम्ही लहानपणी काय काय करायचा ते लिहा. आपण तुमच्या गोष्टी वर्गात वाचू आणि मजा करू.

स्वाध्याय क्र. ५४ Exercise No 54

1. A list of verbs is given below - Select the correct verb and use it in the proper blank place in the Past Habitual.

(पुढे काही धातूंची यादी दिली आहे. त्यातील योग्य त्या धातूचे रीतिभूतकाळाचे रूप रिकाम्या जागी भरा.)

धातू - विकत घे , दे , ये , खा , पहा , काढ , हो , जा , पी ,

आम्ही रोज सकाळी डोंगरावर फिरायला ---.

मिलिंद रोज दोन अंडी ----. तुम्ही आम्हाला बक्षिसं ---.

शुभदा मंडईत जाऊन ताज्या भाज्या----.

स्मितांताई नाटकात राणी ----. तू पूर्वी माझ्या घरी ---.

माझे आजोबा संध्याकाळी दोन कप दूध----.

मोहन शाळेत फार सुंदर चित्रं ----. आपण खूप सिनेमा ----.

श्रीयुत टिळक गरिबांची कामं ----.

२.Substitute the underlined word with the given words and rewrite the sentence with necessary changes.

(अधोरेखित शद्बांऐवजी दिलेले शद्ब घालून वाक्यात आवश्यक ते बदल करून वाक्य पुन्हा लिहा)

A. तू शाळेत वह्या आणायचीस. तू शाळेत वह्या आणायचीस.

ने	पोचव
दे	परत कर.
तपास	फाड
बघ	तयार कर
विक	मिळव

b. ते रोज पतंग उडवायचे. ते रोज पतंग उडवायचे.

त्या	तो
आम्ही	तू (m/f)
आपण	ती
तुम्ही	मी (m/f)

3. Transform the following sentences into the Past Habitual and turn them into the negative.

(पुढील वाक्ये रीतिभूतकाळात बदला आणि नंतर ती वाक्ये नकारार्थी करा.)

त्यांनी मला चष्मा दिला.	विनायकनी दोन लाडू खाल्ले.
श्याम संध्याकाळी फिरायला गेला.	आमच्या शाळेला सुट्टी मिळाली.
किसननी सगळ्या पेन्सिली हरवल्या.	वनिता दोन कप चहा प्यायली.
मुलांनी वर्गात कविता म्हटल्या.	आम्ही मराठी वर्तमानपत्रं वाचली.
सुमननी कपडे धुतले.	आमच्या वर्गातल्या मुलांनी नाटक केलं.

4. Turn into the affirmative simple Past Tense the following Past Habitual negative sentences.

(पुढील रीतिभूतकाळातील नकारार्थी वाक्ये साध्या भूतकाळात होकारार्थी लिहा.)

सुनीता फुलांच्या माळा करायची नाही. तू गप्पा मारायचा नाहीस.
विद्यार्थी दंगा करायचे नाहीत. मुलं पेढे खायची नाहीत.
मी दुकानात जायची नाही. त्यांना पेरू आवडायचे नाहीत.
मोडकसाहेब बागेत जायचे नाहीत. कमल वर्गात बसायची नाही.
प्रकाश राजा व्हायचा नाही. तुम्ही भाजी आणायचा नाहीत.

5. Transform the following sentences first into the Habitual Present and then into Future -1.

(पुढील वाक्ये प्रथम रीतिवर्तमानकाळात आणि नंतर भविष्यकाळ - १ मधे बदलून लिहा.)

आशाला मांजरं खूप आवडायची. सुशीलाबाई उत्तम स्वैपाक करायच्या.
ललिता कादंबऱ्या वाचायची. मी खूप कॉफी प्यायचा.
तू पतंग उडवायचास. ते नवीन घर बांधायचे.
आम्ही सर्कस बघायचो. आई रांगोळ्या काढायची.
आपण जेवण करायचो. ती ऑफिसात वेळेवर जायची.

6. Change the following sentences as directed.

(कंसातल्या सूचनांप्रमाणे पुढील वाक्ये बदलून लिहा.)

तो प्रवासात खूप गप्पा मारायचा. (साधा भूतकाळ)
आम्ही मुंबईला जाणार नाही. (रीतिभूतकाळ)
ते अभ्यास करतील. (रीतिभूतकाळ - नकारार्थी)
तुम्ही चहा पिताहात. (साधा भूतकाळ - नकारार्थी)
रजनी सुंदर चित्रं काढायची (साधा भूतकाळ - नकारार्थी)
मांजरं दूध पिऊन टाकायची. (पूर्ण भूतकाळ)
आशा सकाळी सहा वाजता उठते.(रीतिभूतकाळ)

नंदा परीक्षेत पहिली येते. (रीतिभूतकाळ)

श्रीरामनी वह्या तपासल्या. (रीतिभूतकाळ - नकारार्थी)

श्रीयुत फडक्यांनी कादंबऱ्या लिहिल्या नाहीत. (वर्तमानकाळ)

7. Select the correct form of the verb from the two given forms.

(दिलेल्या दोन पर्यायांपैकी योग्य तो पर्याय निवडा)

त्यांनी आम्हाला पुस्तकं द्यायचे / दिली.

विकासनी सगळे पतंग फाडला नाही / फाडले नाहीत.

सुनेत्रा साड्या विकत घ्यायची / घेतल्या आहेत.

शाळेतले विद्यार्थी दंगा करतील / करतो.

आम्हाला सुट्टी हवी पाहिजे / हवी आहे.

मी वर्गात खूप बोलायची / बोलायचो.

सुहास भरपूर अंडी खाल्ला / खायचा.

शिक्षक मुलांना रागवलं / रागवले.

श्रीधरपंतांनी मित्रांना पत्रं लिहायची / लिहिली.

सुषमाताई कपडे धुवायच्या / धुतल्या.

Vocabulary

अंग (n) body,

उन्ह (n) sunlight,

एखादा (adj) some

गुरगुर (v. intr) to purr,

घासणे (v.tr.) to rub,

चपळ (adj) active,

चाटणे (v.tr) to lick,

निदान (adv) at least,

बागकाम (n) gardening

बोका (m) tom - cat

मटकवणे (v.tr.) to gulp, to devour

मागे लागणे (phr) to chase

मांजरी (f) female cat

म्याव म्याव करणे (phr) to mew

लपलप करणे (phr) to lap up

लोळणे (v.intr) to wallow

पिऊन टाकणे (phr) to finish of drinking, सुका (adj) dry

Grammatical Notes

Unit - XIV introduces the Habitual Past Tense in Marathi.

The Habitual Past Tense is used to express a regular, repeated action in the past. The number + gender + person markers of the regular Past Tense are added to the root of the verb + आय + च. Thus the pattern of the Habitual Past is as below :

R + आय + च + NGP suffixes of the Past Tense.

The full conjugation is :

तक्ता क्रमांक २६ **Table No.26**

बस –– 'to sit'

	Singular	Plural
I Person	m.मी बसायचा.	आम्ही बसायचो.
	f. मी बसायची.	
II Person	m. तू बसायचास.	तुम्ही बसायचा.
	f. तु बसायचीस.	
III Person	m. तो बसायचा.	ते बसायचे.
	f. ती बसायची.	त्या बसायच्या.
	neu. ते बसायचं.	ती बसायची.

Note that in the Habitual Past, all the verb patterns are conjugated in the same way, whether the verb is intransitive or transitive. Thus we have :

मी खुर्चीवर बसायचा. 'I used to sit on the chair.'

मी / तो पूजा करायचा. 'He used to perform puja.'o

गट - १	Unit - XIV
थडा पंचावनावा	**LESSON 55**
(उजळणी पाठ ११)	(Review Lesson 11)
१५ ऑगस्ट	**15 August**
उद्या पंधरा ऑगस्ट.	Tomorrow (is) 15 August.
भारताचा स्वातंत्र्यदिवस.	Independence day of India.
सकाळी शाळेत ध्वजवंदन होणार आहे.	In the school there will be flag hoisting in the morning.
त्यानंतर कार्यक्रम आणि खेळांचे सामने होणार आहेत.	It will be followed by a programme and tournaments.
कार्यक्रमाची सर्व तयारी झाली आहे.	The preparation of the programme is complete.
विद्यार्थी आणि शिक्षक त्यासाठी रोज काम करत होते.	The students and the teachers were working everyday for it.
क्रीडाशिक्षकांनी सर्व मैदान साफ करून घेतलं होतं.	The sports teacher had got the ground cleaned.
मैदानावर मुलं रोज खेळाचा सराव करत होती.	The boys were practicing the games on the ground everyday.
शिक्षक त्यांना मार्गदर्शन करत होते.	The teachers were coaching them.
मी गेल्या वर्षी धावण्याच्या शर्यतीत भाग घेतला होता.	Last year I had taken part in the running race.
यंदा मी वक्तृत्वस्पर्धेत भाग घेतला आहे.	This year I have taken part in the eloquetion competition.

मी विवेकानंदांचं चरित्र वाचलं होतं.	I had read the biography of Vivekanand.
स्पर्धेत मी विवेकानंदांवरच बोलणार आहे.	I am going to speak about Vivekanand in the competition.
आधी आमची शाळा लहान होती.	Previously our school was a small one.
तेव्हा मोठे विद्यार्थीच खेळात भाग घ्यायचे.	At that time, senior students used to take part in the games.
कार्यक्रमात फक्त प्रमुख पाहुणे भाषण करायचे.	The chief guest used to deliver a speech in the programme.
नंतर आम्हाला खाऊ वाटायचे.	After that snacks were distrib uted among us.
आम्ही फक्त कार्यक्रम पहायचो.	We only used to witness the programme.
आता लहान, मोठे सर्व विद्यार्थी भाग घेतात.	Now all the junior and senior students take part.
माझा भाऊ सर्व खेळात भाग घ्यायचा आणि बक्षिसं मिळवायचा.	My brother used to take part in all the games and get the prizes.
मलापण गेल्यावर्षी धावण्यात पहिलं बक्षिस मिळालं होतं.	I also got first prize in running (race) last year.
आता मी भाषण चांगलं तयार केलं आहे.	Now.I have prepared the speech very well. (prepared the speach.)
माझ्या मित्रांनी एक समूहगीत बसवलं आहे.	My friends have done a good practice of a groupsong.
वर्गातल्या मुली लोकनृत्य करणार	The girls in (my) class are

आहेत. — going to perform a folk dance.

आमच्या शिक्षिका त्यांना दोन आठवडे लोकनृत्य शिकवत होत्या. — Our (lady) teacher was giving them practice of folk dance for a couple of weeks.

आज सगळी शाळा कागदाच्या झेंड्यांनी सजवली आहे. — Today the whole school is decorated with paper flags.

१५ ऑगस्टला आमच्या शाळेत नेहमीच खूप उत्साह असतो. — There is always a great enthuciasm in our school on 15th August.

चाचणी क्र. ११ **Test No 11**

1. Turn the following sentences into the Past Continuous.

(पुढील वाक्ये चालू भूतकाळात लिहा)

लोक पहाटे डोंगरावर चढताहेत.
डोंगरावरून निसर्ग छान दिसला.
सुहास सकाळी शाळेत गेला.
मला त्या कविता खूप आवडतात.
नलिनी रात्री उशिरा झोपली.
सगळी पाखरं आकाशात उडताहेत.
मुलं लौकर उठली आणि फिरायला गेली.
तो माझ्या घरी आला.
आम्ही स्टेशनवर जायला निघालो.
तिच्या भावानी भांडण केलं.

2. Transform the senentences first into the Present Per fect and then into the Past Perfect.(खालील वाक्ये आधी पूर्ण वर्तमानकाळात आणि नंतर पूर्ण भूतकाळात लिहा.)

मला घर आवडलं.
तुला गोव्यात करमलं
आशाताई पुस्तक शोधतात.
गोपाळचा भाऊ वकील आहे.
बचेंद्रीपाल एव्हरेस्टवर चढली.
तो घरी पैसे पाठवतो.
गौरी आईची साडी नेसते.
माधव देवाची पूजा करतो.

गोविंदराव मित्रांना जेवायला बोलावतील.

अधिकारी सहकाऱ्यांना सर्व सूचना देतील.

3. Rewrite the following sentences by substituting the un derlined word with the given words making necessary changes. (अधोरेखित शब्दांऐवजी दिलेले शब्द घालून योग्य ते बदल करून वाक्ये लिहा)

मला तिकीट मिळालं होतं.	मला तिकीट मिळालं होतं.
गाडी	बक्षिसं
पत्र	ताज्या भाज्या
कपडे	पिशव्या
घर	घड्याळ
बंगला	नोकर

4. Complete the sentences in the Past Habitual using the verbs given in the bracdet.

(कंसात दिलेल्या धातूंचा योग्य वापर करून खाली दिलेली वाक्ये रीतिभूतकाळात करा.)

मी एका शाळेत काम (कर) ---.

सरिता रोज वेळेवर (पोच) ----.

मुलं मैदानात क्रिकेट (खेळ) ----.

बागेसमोर एक फुगेवाला फुगे (विक) ---.

मुली झोपाळ्यावर बसून गाणी (म्हण) --.

आम्ही शाळेच्या नाटकात भाग (घे) ---.

तू रोज फुलांचे गजरे (घाल) ---.

आनंदराव बिनसाखरेचा चहा (पी) ---.

तुम्ही शिक्षकांनी खूप प्रश्न (विचार) ---.

पूर्वी पहिल्या वर्गाच्या डब्यात फक्त युरोपियन लोक (दिस) ---.

5. Turn the following sentences into the negative. (पुढील वाक्ये नकारार्थी करा.)

आई सकाळी स्वैपाक करत होती. माळी झाडांना रोज पाणी द्यायचा.

मी सिमला पाहिला आहे. आम्ही मोठ्यानी कविता म्हणायचो.

तू चित्र काढलं आहेस. विनोदराव हॉटेलात राहिले होते.

तुम्ही बसमागे धावत होतात. तू छान रांगोळ्या काढायचीस.

रजनी मुलांना गोष्टी सांगत होती. सर्व शेतकऱ्यांना पंप मिळाले आहेत.

6. Turn the following sentences into the affirmative. (पुढील वाक्ये होकारार्थी करा.)

मांजर उंदराला पकडत नाही आहे. शीलानी वांग्याची भाजी केली नव्हती.

तू बसमध्ये खिडकीजवळ बसायची नाहीस. मी सुट्टीत पोहायचा नाही.

सचिनला पुष्कळ मित्र भेटले नाही आहेत. व्यापारी जुन्या नोटा वापरत नव्हते.

तू समुद्रावर फिरायला जायचा नाहीस. तुम्हाला घरुन फोन आला नाही आहे.

नीलाताईनी स्वैपाकात कांदा घातला नव्हता. मुंबईची गाडी वेळेवर सुटली नव्हती.

7. Write a narration in about 10 to 15 lines of your trip to any place. Use proper constructions in Past Tense. (तुमच्या एखाद्या सहलीचे १० ते १५ ओळीत वर्णन करा. योग्य त्या भूतकाळाच्या रचना करा.)

गट - १५	Unit - XV
धडा छप्पनावा	**LESSON 56**
किती वाजले?	**What is the time?**
शिक्षक : मुलांनो, हे घड्याळ आहे.	Children , this is a clock.
घड्याळावरून वेळ समजते.	(We) learn the time from the clock.
घड्याळाला दोन काटे असतात.	The clock has two hands.
मोठा काटा आणि एक लहान काटा.	A big hand and a small hand.
मोठा काटा जलद चालतो. लहान काटा हळू चालतो.	The big hand moves fast. The small hand moves slowly.
मोठा काटा मिनिटं दाखवतो.	The big hand indicates minutes.
लहान काटा तास दाखवतो.	The small hand indicates hours.
मुलांनो , आता ह्या घड्याळाकडे पहा.	Children , now look at this clock.
ह्या घड्याळाचा मोठा काटा आता बारावर आहे.	Now the big hand of this clock is on twelve.
लहान काटा एकावर आहे.	The small hand is on one.
आता किती वाजले आहेत?	What is the time now?
ऐका. आता एक वाजला आहे.	Listen . Now it is one o'clock.
आता हे माझं घड्याळ पहा.	Now look at this watch of mine.
माझ्या घड्याळाचा मोठा काटा एकावर आहे.	The big hand of my watch is on one.
माझ्या घड्याळात एक वाजून पाच मिनिटं झाली आहेत.	It is five minutes past one by my watch

आणि हे वनिताचं घड्याळ पहा.	And look at the watch of Vanita.
तिच्या घड्याळात एकला पाच मिनिटं कमी आहेत.	It is five minutes to one by her watch.
मुलांनो, टेबलावरचं घड्याळ बरोबर आहे.	Children , the clock which is on the table is correct.
माझं घड्याळ पुढे आहे.	My clock is fast.
आणि वनिताचं घड्याळ मागे आहे.	And Vanita's watch is slow.
मी पाऊण वाजता वर्गात आलो.	I came in the class at quarter to one.
सव्वा वाजता मधली सुट्टी होईल.	The break will be at quarter past one.
दीड वाजता तुम्ही ग्रंथालयात जा.	You go to the library at half past one.
पावणेदोन वाजेपर्यंत पुस्तकं निवडा.	Select the books untill quarter to two.
सव्वादोन वाजल्यापासून अडीच वाजेपर्यंत ग्रंथालयात बसा.	(you) sit in the library from quarter past two to half past two.
आता एक वाजायला पाच मिनिटं कमी आहेत.	Now it is five minutes to one by my watch.
साडेपाच वाजले की तुम्ही घरी जा.	Go home when it is half past five o'clock.

Drills

I

Repetition Drills

1

पाऊण वाजला	एक वाजला
सव्वा वाजला	दीड वाजला
पावणेदोन वाजले	दोन वाजले
सव्वादोन वाजले	अडीच वाजले
पावणेतीन वाजले	तीन वाजले
सव्वा तीन वाजले	साडेतीन वाजले

2

3.25 : आता तीन वाजून पंचवीस मिनिटं झाली आहेत.
आता तीन पंचवीस झाले आहेत.
आता साडेतीनला पाच मिनिटं कमी आहेत.

12.15 : ह्या घड्याळात बारा वाजून पंधरा मिनिटं झाली आहेत.
ह्या घड्याळात सव्वाबारा वाजले आहेत.

12.45 : आता बारा वाजून पंचेचाळीस मिनिटं झाली आहेत.
आता एकला पंधरा मिनिटं कमी आहेत.

1.45 : आता एक वाजून पंचेचाळीस मिनिटं झाली आहेत.
आता दोनला पंधरा मिनिटं कमी आहेत.
आता पावणेदोन वाजले आहेत.

3

मोहनची शाळा बारा वाजता सुरू होते. मी दीड ते दोन विश्रांती घेते.
मी दीड वाजल्यापासून दोन वाजेपर्यंत झोपते.
श्री. दिघे दहा वाजून दोन मिनिटांनी ऑफिसात पोचले.
माझ्या घड्याळात बाराला दोन मिनिटं कमी आहेत.

II

Question - Answer Drill

हे घड्याळ नवीन आहे का? - हो हे घड्याळ नवीन आहे.

ह्या घड्याळात किती वाजले आहेत? - ह्या घड्याळात एक वाजला आहे.

ह्या घड्याळाला किती काटे आहेत? - ह्या घड्याळात दोन काटे आहेत.

ह्या घड्याळाला काटे आहेत का? - नाही . ह्या घड्याळाला काटे नाहीत.

घड्याळाचा तिसरा काटा काय दाखवतो? - घड्याळाचा तिसरा काटा सेकंद दाखवतो.

घड्याळाच्या मोठ्या काट्याचं नाव काय? - घड्याळाच्या मोठ्या काट्याचं नाव मिनिट काटा.

घड्याळाच्या लहान काट्याचं नाव काय? - घड्याळाच्या लहान काट्याचं नाव तास काटा.

घड्याळाच्या तिसऱ्या काट्याचं नाव काय? - घड्याळाच्या तिसऱ्या काट्याचं नाव सेकंद काटा.

III

Fill in the Gaps Drill

Fill up the gaps with appropriate time expressions.

(योग्य त्या कालवाचक शब्दांनी रिकाम्या जागा भरा.)

माझ्या घड्याळात दीड--- आहे. तू शाळेत किती ---- जातोस? घड्यावरून----- समजते. घड्याळाचा मोठा काटा --- दाखवतो. तुझ्या घड्याळात किती --- आहेत? मी रात्री दोन --- पर्यंत अभ्यास करते. गौतम आठ ---- शिवाय उठत नाही. आता दहा ---- पाच मिनिटं कमी आहेत. शाळेच्या घड्याळात अकरा ----- दहा मिनिटं झाली आहेत. मंदार बारा ----- दीड ---- झोपतो.

IV

Substitution Drill

Substitute the underlied word with the given words.

(अधोरेखित शद्वाऐवजी दिलेले शद्व वापरा)

आशाच्या घड्याळात बारा वाजले आहेत. आशाच्या घड्याळात बारा वाजले आहेत.

एक	दीड
साडेअकरा	पावणेसात
पाऊण	सव्वा
पावणेचार	साडेदहा
अडीच	सव्वाआठ
साडेबारा	पावणे नऊ
सव्वाबारा	अकरा
पाच	सव्वादोन

V

Conversation

शिक्षक : अविनाश, आपला वर्ग किती वाजता सुरू होतो?

अविनाश : आपला वर्ग सव्वाअकरा वाजता सुरू होतो.

शिक्षक : मुलांनो, वर्गात तुम्ही काय करता?

सुरेश : वर्गात आम्ही सव्वाअकरा ते पाऊण मराठीचा धडा आणि व्याकरण शिकतो.

माधवी : पाऊण ते दीड आम्ही ध्वनिशाळेत जातो.

नीला : सुट्टीत आम्ही चहा पितो. मग आम्ही वर्गात येतो.

गौतम : सव्वादोनपासून तीनवाजेपर्यंत संभाषणाचा तास असतो.

कमल : तीननंतर लेखन, वाचन इत्यादी तास असतात.

नारायण : पावणेपाच वाजता आमचा अभ्यास संपतो.

शैला : पाच वाजून दहा मिनिटांनी आम्ही घरी जातो.

शिक्षक : बरोबर, आता किती वाजले आहेत?

मनीषा : आता पावणेपाचला दोन मिनिटं कमी आहेत.

शिक्षक : शाबास ! पाच वाजता तुम्ही घरी जा. हातपाय धुवा, चहा प्या.आणि मग खूप खेळा.

स्वाध्याय क्र. ५६ **Exercise No. 56**

1. Fill in the blanks with appropriate words.

(रिकाम्या जागी योग्य शद्ब भरा)

घड्याळाचा मोठा काटा सहावर आहे. लहान काटा तीनवर आहे. आता ---- वाजले आहेत.

मिनिट काटा नऊवर आणि तासकाटा पाचवर आहे. आता पाच ---- पंधरा ---- ----आहेत.

मोठा काटा एकावर आहे. लहान काटा बारावर आहे. आता --- वाजून --- मिनिटं ---- आहेत.

मी रोज अकरा ---- वर्गात जातो. घड्याळा ---- समजते.

आता साडेबारा ---- आहेत. मोठा काटा ---- वर आहे आणि लहान काटा --- वर आहे.

मोहन दीड --- दोन झोपतो. आमचा वर्ग अकरा ---- नंतर सुटतो.

2. Answer the following questions.

(खालील प्रश्नांची उत्तरे द्या.)

तुमचा वर्ग किती वाजता सुरू होतो? घडाळ्यात आपण काय पहातो?

तुमच्या जवळ घड्याळ आहे का? त्या घड्याळात किती वाजले आहेत?

तुमचा संभाषणाचा तास किती वाजता संपतो?

घड्याळाला किती काटे असतात?तुमच्या घड्याळाला किती काटे आहेत?

तासकाटा मिनिट काट्यापेक्षा मोठा असतो का?

तुमचा वर्ग किती वाजता संपतो? तुमचं घड्याळ कसं आहे?
सेकंद काटा काय दाखवतो? तुमच्या वर्गात घड्याळ आहे का?

3. Write the bracketed figures in words and complete the following paragraph.

(कंसात दिलेल्या आकड्यातल्या संख्या अक्षरात लिहून उतारा पूर्ण करा.)

मी बाजारात जाते. बाजारातून मी (१/२) किलो साखर आणते. नंतर मी (१/४) किलो चहा विकत घेते. आणि (३/४) किलो बिस्किटं घेते. (२.३०) वाजता मी घरी येते. (१.१/२) कप चहा करते. नंतर मी (१.१/२) कप चहाबरोबर (३) बिस्किटं खाते. (४.१५) वाजता मी मैत्रिणीकडे जाते. तिथून मी (६.४५) वाजता घरी येते. (९.३०) वाजता मी झोपते.

4. Use the following expressions in your own sentences.

(पुढे दिलेली रूपे तुमच्या स्वतःच्या वाक्यात वापरा.)

वाजता	ते
वाजल्यापासून	वेळ
वाजेपर्यंत	तास
वाजून	सेकंदकाटा
--- ला कमी	वाजले.

5. Write a paragraph on the time - table of the programme of AIR or T.V. in the days newspaper.

(वर्तमानपत्रात आलेल्या आकाशवाणी अथवा दूरदर्शनच्या कार्यक्रमाच्या वेळापत्रकांसंबंधी एक परिच्छेद लिहा.)

Vocabulary

अडीच two and half   पाव quarter,

अर्धा half,

काटा (m) hand of a watch /clock,

जलद (adv)fast,

दीड one and a half

पाऊण three quarters.

पावणे --quarter to

वेळ (m) time,

सव्वा one and a quarter

साडे --- and half

हळू (adv)slow,

Grammatical Notes

Unit - xv introduces the expressions used for expressing the time by the clock.

The following table of numbers shold be observed.

-----	------	-----	एक
---	---	---	१.००
सव्वा	दीड	पावणेदोन	दोन
१.१५	१.३०	१.४५	२.००
सव्वादोन	अडीच	पावणेतीन	तीन
२.१५	२.३०	३.४५	३.००
सव्वातीन	साडेतीन	पावणेचार	चार
३.१५	३.३०	३.४५	४.००
सव्वाचार	साडेचार	पावणेपाच	पाच
४.१५	४.३०	४.४५	५.००
सव्वापाच	साडेपाच	पावणेसहा	सहा
५.१५	५.३०	५.४५	६.००
सव्वासहा	साडेसहा	पावणेसात	सात
६.१५	६.३०	६.४५	७.००

सव्वासात	साडेसात	पावणेआठ	आठ
७.१५	७.३०	७.४५	८.००
सव्वाआठ	साडेआठ	पावणेनऊ	नऊ
८.१५	८.३०	८.४५	९.००
सव्वानऊ	साडेनऊ	पावणेनऊ	दहा
९.१५	९.३०	९.४५	१०.००
सव्वादहा	साडेदहा	पावणेदहा	अकरा
१०.१५	१०.३०	१०.४५	११.००
सव्वाअकरा	साडेअकरा	पावणेबारा	बारा
११.१५	११.३०	११.४५	१२.००
सव्वाबारा	साडेबारा	पाऊण	
१२.१५	१२.३०	१२.४५	

The prefixes सव्वा -,साडे -and पावणे -are added to any number to indicate nuber + 1/4, number + 1/2 and number 3/4 respectively. सव्वा and पावणे are added from 2 anwards, and साडे from 3 onwards.

For asking time, the expression is किती वाजले? 'what is the time?' e.g.

किती वाजले?	'What is the time?'
पाऊण (वाजला)	'It is 12.45'
एक (वाजला)	'It is 1.00'
सव्वा (वाजला)	'It is 1.15'
दीड (वाजला)	'It is 1.30
पावणेदोन (वाजले)	'It is 1.45'
दोन (वाजले)	'It is 2.00'

Thus, from 12.45 to 1.30 (i.e. from पाऊण to दीड), the answers are in the singular, while from 1.45 (i.e. पावणेदोन) onwards the answers are in the plural. वाजले (pl) and वाजला (sg) are past tense forms of root वाज - 'to strike'

If the time is some minutes less or more than the full hour the following expressions are used :

A. किती वाजले? 'What is the time?'

१.नऊ वाजायला पाच मिनिटं (कमी) आहेत.
'Five minutes (are less) to nine'.

२.नवाला पाच मिनिटं (कमी)
'Five minutes (are less) to nine.'

३.नवाला पाच (कमी) 'Five (less) to nine.'

४.नवाला पाच. 'Five to nine.'

B. किती वाजले? ' What is the time?'

१.नऊ वाजून पाच (मिनिटं झाली आहेत)
'It is five past nine.'

२.नऊ वाजून पाच (मिनिटं) 'Five past nine.'

३.नऊ पाच. 'Nine - five.'

The expression किती वाजता means 'When' i.e.' At what time (by the clock)? e.g.

तुमचा वर्ग किती वाजता सुरू होतो?
'At what time does your class begin?'
(आमचा वर्ग) दहा वाजता (सुरू होतो)
'Our class begins at 10 o'clock.'

This question may be also asked in the following form :
तुमचा वर्ग कितीला सुरू होतो?

आमचा वर्ग १० ला सुरू होतो.

But when minutes are expressed with hours, the expressions are :

1. आमचा वर्ग दहा वाजून वीस मिनिटांनी सुरू होतो.
   'Our class begins at 10.20.'
2. आमचा वर्ग दहाला वीस मिनिटं असताना सुरू होतो.

'Our class begins at twenty minutes to ten.'

The period between the two points of time is shown in this way :

1. दोन ते तीन मी अभ्यास करते. 'I study from two to three.'
2. मी दोन - पासून / वाजल्यापासून / तीन पर्यंत / वाजेपर्यंत अभ्यास करते.

वेळ 'time' can be masculine or feminine. In the former case it refers to the duration or amount of time e.g.

1. मी रोज थोडा वेळ अभ्यास करते.
   'Everyday I study for a while.'
2. गाडी सुरु व्हायला फार वेळ लागतो.
   'It takes much time for the train to start.'
3. थोड्या वेळानी. 'After sometime.'

It is feminine when a point of time is expressed :

1. शाळेची वेळ दहा आहे.
   'The school time is 10.00
2. गाडी येण्याची वेळ काय?
   'What is the arrival time of train ?'
3. वेळेवर
   'On time.'

Note : Three on wards prefixes सव्वा, साडे, पावणे are regular.

गट - १५	Unit - XV
धडा सत्तावनावा	**LESSON 57**
तारीख, वार इ.	**The date, day etc.**
सूर्य पूर्वेला उगवतो.	The sun rises in the east.
सूर्य उगवण्यापूर्वी पहाट असते.	It is dawn before the sun rises.
सूर्य पश्चिमेला मावळतो.	The sun sets in the west.
सूर्य मावळतो तेव्हा संध्याकाळ असते.	It is evening when the sun sets.
सकाळी सूर्य पूर्वेला असतो.	The sun is in the east in the morning.
दुपारी तो डोक्यावर असतो.	It is overhead in the afternoon.
संध्याकाळी तो पश्चिमेला असतो.	It is in the west in the evening.
सकाळपासून संध्याकाळपर्यंत दिवस असतो.	From morning till evening it is daytime.
संध्याकाळपासून सकाळपर्यंत रात्र असते.	From evening till morning it is night.
दिवसा उजेड असतो.	There is light during the day time.
रात्री काळोख असतो.	There is darkness during the night - time.
आज सोमवार आहे.	Today is Monday.
उद्या मंगळवार आहे.	Tomorrow is Tuesday.
परवा बुधवार आहे.	The day after tomorrow is Wendnesday.
तेरवा गुरुवार आहे.	The day after the day after

	tomorrow is Thursday.
आज सोमवार आहे.	Today is Monday.
काल रविवार होता.	Yesterday was Sunday.
परवा शनिवार होता.	The day before yesterday was Saturday.
तेरवा शुक्रवार होता.	The day before the day before yesterday was Friday.
एकंदर वार सात आहेत.	There are seven days in all.
सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवार, रविवार.	Monday, Tuesday, Wednesday, Thursday, Friday, Saturday, Sunday.
सात वारांचा एक आठवडा होतो.	Seven days make a week.
चार आठवडे मिळून एक महिना होतो.	Four weeks together make a month.
सध्या सप्टेंबर महिना चालू आहे.	The month of September is going on at present.
सप्टेंबर नंतर ऑक्टोबर महिना येतो.	The month of October follows Sepetmber.
सप्टेंबरपूर्वी ऑगस्ट महिना येतो.	The month of August preceeds September.
एकंदर महिने बारा आहेत.	There are twelve months in all.
जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे, जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर,नोव्हेंबर आणि डिसेंबर.	January, February, March, April, May, June, July, August, September, October, November, December.

बारा महिन्यांचं एक वर्ष होतं. Twelves months make a year.

हे एकोणीसशे नव्याण्णव साल चालू आहे. The year 1999 is going on now.

आज सप्टेंबर महिन्याची एकवीस तारीख आहे. Today is the 21st day of September.

२१ सप्टेंबर १९९९. 21st September 1999

तुमची परीक्षा ऑक्टोबर महिन्याच्या दहा तारखेला आहे. Your examination is on the 10th day of October.

Drills

1

Repetition Drills

आज सोमवार आहे. उद्या मंगळवार आहे.

परवा बुधवार आहे. तेरवा गुरुवार आहे.

आज सोमवार आहे. काल रविवार होता.

परवा शनिवार होता. तेरवा शुक्रवार होता.

सोमवार मंगळवार बुधवार गुरुवार शुक्रवार शनिवार आणि रविवार

दिवस आणि रात्र मिळून वार होतो. दिवसा उजेड असतो. रात्री अंधार असतो.

दिवसा मी काम करतो. रात्री मी झोपतो.

सकाळी मी डोंगरावर जातो. दुपारी मी अभ्यास करतो.

संध्याकाळी मी मित्राकडे जातो.

आज रविवार आहे. रविवारी सुट्टी असते.

उद्या सोमवार आहे. सोमवारी दुकानं बंद असतात.

परवा मंगळवार आहे. मंगळवारी मी बाजारात जातो.

तेरवा बुधवार आहे. बुधवारी तू पोस्टात जा.

काल गुरुवार होता.	गुरुवारी ते भजन करतात.
परवा शुक्रवार होता.	त्या शुक्रवारी उपास करतात.
तेरवा शनिवार होता.	आम्ही शनिवारी सिनेमा पहातो.

II
Question - Answer Drills

सूर्य कुठे उगवतो?	सूर्य पूर्वेला उगवतो.
सूर्य केव्हा उगवतो?	सूर्य सकाळी उगवतो.
तुम्ही सकाळी किती वाजता उठता?	मी सकाळी सात वाजता उठते.
दुपारी सूर्य कुठे असतो?	दुपारी सूर्य डोक्यावर असतो.
दुपारी तुम्ही काय करता?	दुपारी मी अभ्यास करते.
सूर्य केव्हा मावळतो?	सूर्य संध्याकाळी मावळतो.
संध्याकाळी सूर्य कुठे असतो?	संध्याकाळी सूर्य पश्चिमेला असतो.
संध्याकाळी तुम्ही काय करता?	संध्याकाळी मी बागेत जाते.
एकंदर वार किती आहेत?	एकंदर सात वार आहेत.
आज कोणता वार आहे?	आज सोमवार आहे.
उद्या कोणता वार आहे?	उद्या मंगळवार आहे.
परवा कोणता वार आहे?	परवा बुधवार आहे.
तेरवा कोणता वार होता?	तेरवा शुक्रवार होता.
परवा कोणता वार होता?	परवा शनिवार होता.
काल कोणता वार होता?	काल रविवार होता.
किती वारांचा एक आठवडा होतो?	सात वारांचा एक आठवडा होतो.
एका महिन्यात किती आठवडे असतात?	एका महिन्यात चार आठवडे असतात.

एकंदर महिने किती आहेत?	एकंदर महिने बारा आहेत.
किती महिने मिळून एक वर्ष होतं?	बारा महिने मिळून एक वर्ष होतं.
हे कोणतं साल चालू आहे?	हे १९९९ साल चालू आहे.
आज किती तारीख आहे?	आज २१ तारीख आहे.
हा कोणता महिना चालू आहे?	हा ऑक्टोबर महिना चालू आहे.

III

Fill in the Gaps Drill

Fill in the gaps with appropriate word.

(रिकाम्या जागी योग्य ते शद्ब भरा.)

आज ––– आहे. उद्या गुरुवार आहे. काल –– होता. आज सोमवार आहे. हा सप्टेंबर –-- आहे.सप्टेंबरनंतर –– येतो. ह्या महिन्याचा हा पहिला ––-- चालू आहे. सात वार मिळून एक ––-होतो. आज जुलै महिन्याची तेवीस –– आहे. हे एकोणीसशे नव्याण्णव ––- चालू आहे. दिवस आणि रात्र मिळून ––– होतो. सूर्य ––– डोक्यावर असतो. ––– उजेड असतो. ––––काळोख असतो. मी –––- अभ्यास करतो. मी आठवड्यात एक ––– उपास करतो. अनिल एकविसाव्या ––- बी.ए. झाला. रविवारी सुट्टी असते. त्या ––– मी सिनेमाला जातो.

IV

Conversation

शिक्षक : माधुरी, रोज सकाळी तू सकाळी काय करतेस?

माधुरी : रोज सकाळी मी चहा पिते आणि अभ्यास करते.

शिक्षक : श्रीकांत, तू दिवसा काय करतोस?

श्रीकांत : मी दिवसा शाळेत जातो. शाळेत आणि घरी मी अभ्यास करतो.

शिक्षक : दिवसा अंधार असतो का?

श्रीकांत : नाही. दिवसा अंधार नसतो. दिवसा उजेड असतो.

शिक्षक : रंजना, दिवसा सूर्य कुठे असतो?

रंजना : सकाळी सूर्य पूर्वेला असतो, दुपारी तो मध्यभागी असतो, संध्याकाळी तो पश्चिमेला असतो.

शिक्षक : सूर्य पश्चिमेला उगवतो का?

रंजना : नाही, सूर्य पश्चिमेला उगवत नाही. सूर्य पूर्वेला उगवतो.

शिक्षक : सूर्य उगवतो तेव्हा आकाशाचा रंग कसा असतो?

मधुकर : सूर्य उगवतो तेव्हा आकाशाचा रंग लाल असतो.

शिक्षक : अरविंद, शनिवारनंतर कोणता वार येतो?

अरविंद : शनिवारनंतर रविवार येतो.

शिक्षक : तू त्यादिवशी काय करतोस?

अरविंद : मी त्या दिवशी टी. व्ही. बघतो.

शिक्षक : सदानंद, रविवारी संध्याकाळी तू काय करतोस?

सदानंद : रविवारी संध्याकाळी मी बागेत जातो.

शिक्षक : सुमती, हा कोणता महिना चालू आहे?

सुमती : हा जुलै महिना चालू आहे.

शिक्षक : बरोबर. हा जुलै महिना चालू आहे. आज सोमवार आहे. आज जुलै महिन्याची एकवीस तारीख आहे. हे एकोणीसशे नव्याण्णव साल चालू आहे.

स्वाध्याय क्र. ५७ Exercise No.57

1. Fill in the gaps using appropriate words.

(रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.)

आज शुक्रवार आहे. काल ------ होता.

उद्या रविवार आहे. आज ------ आहे.

उद्या बुधवार आहे. ---- गुरुवार आहे. तेरवा ------ आहे.

---- सोमवार होता. --- रविवार होता.

-----. बुधवार होता. परवा ----. होता.

सात --- एक आठवडा होतो. मी दर ----. बागेत जाते.

आज जानेवारी --- एकतीस ----. आहे.

दिवसा ---- असतो. ---- काळोख असतो.

चार -----. मिळून एक महिना होतो.

2. Select the correct word from those given in the brackets and rewrite the following sentences.

(कंसात दिलेल्या शब्दांपैकी योग्य शब्द निवडून त्यांच्या मदतीनं पुढील वाक्ये पुन्हा लिहा.)

काल गुरुवार (होता / आहे.) सूर्य पश्चिमेला (उगवतो / मावळतो.)

दुपारी सूर्य (पूर्वेला / डोक्यावर) असतो. (तेरवा / आज) मंगळवार होता.

दिवसा (उजेड / काळोख) असतो. मोहन (दिवसा / दिवशी) अभ्यास करतो.

मी (सोमवार / सोमवारी) उपास करते. (उद्या / परवा) शुक्रवार होता.

जुलै महिन्यानंतर (ऑगस्ट / जून) येतो.

भारत एकोणीसशे सत्तेचाळीस (साली / वर्षी) स्वतंत्र झाला.

3. Using the proper forms of the words in the brackets complete the following sentences.

(कंसातल्या शब्दांची योग्य रूपे वापरून पुढील वाक्ये पूर्ण करा.)

मी दर (रविवारी, सकाळ) टी. व्ही बघते.

तो (रात्र, 10 वाज -) रेडिओ ऐकतो.

सुधाकर आणि प्रभाकर (दुपार) दंगा (कर -)

देवीदास (पहाट + पासून , रात्र + पर्यंत) पुस्तकं वाचतो.

आम्ही (मे महिना + संध्याकाळ) बागेत जातो.

सूर्य (पूर्व) उगवतो आणि (पश्चिम) मावळतो.

माझी आई दर (गुरुवार) उपास (कर-)

आमचं ऑफिस (शनिवार + पासून, सोमवार + पर्यंत) बंद आहे.

तू (कोणता,महिना + त) शाळेत जात नाहीस ?

मीना (हा + आठवडा + त) अभ्यास करत नाही.

4. Substitute the underlined word with the proper form of the words which follow.

(अधोरेखित शब्दांऐवजी खाली दिलेल्या शब्दांची योग्य रूपे देऊन वाक्य लिहा.)

सोमवारी मी कॉलेजात जाते.	सोमवारी मी कॉलेजात जाते.
तो दिवस	२ तारीख
हा महिना	१९७६ साल
हे वर्ष	दुपार
सकाळ	पहाट
बारा वाज -	हा आठवडा

5. **Answer the following questions.** (पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.)

एकंदर वार किती आहेत? कोणकोणते?

रविवारी तुम्ही काय करता?

तुम्ही शुक्रवारी उपास करता का?

रात्री तुम्ही काय करता?

आकाशात सूर्य केव्हा दिसतो?

तुमची जन्मतारीख सांगा?

सोमवारपासून शनिवारपर्यंत तुम्ही शाळेत जाता का?

शाळेत तुम्ही सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी काय करता?

आज किती तारीख आहे? आज कोणता वार आहे? हे कोणतं साल चालू आहे?

Vocabulary

आज (adv) today
आठवडा (m) week
उगवणे (v.intr) to rise
उजेड (m) light
उद्या (adv) tomorrow
काळोख (m) darkness
गुरुवार (m) Thusday
तारीख (f)a date
तेरवा (adv) the day after the day after tomorrow, the day before the day before yesterday
दिवस (m) day
दुपार (f)i afternoon
परवा (adv) the day after tomorrow/the day before yesterday
पश्चिम (f)e west
पहाट (f)e dawn
पूर्व (f)e east
बुधवार (m) Wednesday
महिना (m) month
मंगळवार (m) Tuesday
मावळणे (v.intr) to set
रविवार (m) Sunday
रात्र (f)i night
वर्ष (n) year
शनिवार (m) Saturday
शुक्रवार (m) Friday
सकाळ (f)i morning
संध्याकाळ (f)i evening
साल (n) year
सोमवार (m) Monday
सूर्य (m) sun

Grammatical Notes

Unit - XV introduces the names of the directions, days and months. The names of the directions, all feminine are :

पूर्व 'east', पश्चिम 'west', दक्षिण 'south', उत्तर 'north'.

The parts of the day are as follows :

पहाट 'dawn', सकाळ 'morning', दुपार 'afternoon' संध्याकाळ 'evening', रात्र 'night'

All these words are feminine. सकाळ, दुपार and संध्याकाळ remain unchanged in the obli que. पहाट has oblique in - ए i.e. पहाटे and रात्र in - ई i.e. रात्री

Examples :	पहाटेची थंडी	'cold of the dawn'
	सकाळचा पेपर	'morning newspaper'
	दुपारचं ऊन	'afternoon heat'
	संध्याकाळचा प्रकाश	'evening light'
	रात्रीची शाळा	'night school'

The adverbial suffix - ई is added to सकाळ, दुपार, संध्याकाळ and रात्र, - ए to पहाट.

Examples :

सकाळ + ई = सकाळी	'in the morning'
दुपार + ई =	'in the afternoon'
संध्याकाळ + ई = संध्याकाळी	'in the evening'
रात्र + ई = रात्री	'during the night or 'at night'
पहाट + ए = पहाटे	'at dawn'

दिवस 'day' takes the suffix - ई Or आ e.g.

दिवस + ई = दिवशी	'on a particular day'.
मी त्या दिवशी उपास करते.	'I observe fast on that day'.
दिवस + आ = दिवसा	'during the day'.
तो दिवसा झोपतो.	'He sleeps in day time'.

The suffix ई is added to the names of the week days also

e.g. गुरुवार + ई = 'on Thusday'

रविवार + ई = 'on Sunday'

वर्ष 'year' also takes the sufix - ई

वर्ष + ई = वर्षी - in the year

येतं वर्ष 'coming year' गेलं वर्ष 'last year'

यंदा 'this year' पुढलं / पुढचं वर्ष 'the next year'

The word साल also is used for 'year'.

The question for asking a date has three expressions :

१. आज / उद्या / बुधवारी कोणती तारीख आहे?

२. आज / उद्या / बुधवारी किती तारीख आहे?

३. आज / आजची, उद्या / उद्याची, बुधवारी तारीख काय?

Note : तारखेला on (a particular) date :

मी तीन तारखेला येईन.

'I shall come on the 3rd'.

गट - १६

धडा अठ्ठावनावा

धावतं जग - मुंबई

Unit - XVI

LESSON 58

The busy world - Mumbi

कल्पना मुंबईला रहाते.	Kalpana lives in Mumbai.
ती दादरला रहाते आणि गिरगावात नोकरी करते.	She live in Dader and she works in Girgaon.
मुंबईला बहुतेक लोक रेल्वेनी ऑफिसला जातात.	In Mumbi, most people go to office by train.
गर्दीमुळे आणि घाईमुळे ते धावत्या लोकल गाड्यांमध्ये चढतात.	People climb into the moving local trains due to over crowd ing and haste.
गाडीत चढणाऱ्या आणि उतरणाऱ्या लोकांची एकच घाई असते.	There is always haste of the people getting on the train and coming down.
डब्यातल्या गर्दीत निरनिराळ्या वस्तू विकणारे विक्रेते भर घालत असतात.	The sellers selling verious things in the bogi add to the crowd.
मुंबईत नोकरी करणाऱ्या स्त्रियांची संख्या जास्त आहे.	The number of working women in Mumbai is big.
मुंबईला पाऊस फार पडतो.	The rain fall in Mumbai is very heavy.
पावसाळ्यात रस्त्यांवर खूप पाणी वहातं.	A lot of water flows in the streets in the rainyseason.
लोक त्या वहात्या पाण्यातून चालतात.	People walk in that running water.

अशा वेळी येणाऱ्या गाड्या मुंबई बाहेरच थांबवतात.	In such conditions the trains coming to Mumbai are stopped out.
मुंबईबाहेर जाणाऱ्या अनेक गाड्या पावसाळ्यात रद्द होतात.	Many trains going from Mumbai are cancelled in rainy - season.
पण भरभर चालणारी माणसं हे दृश्य मुंबईत नेहमी दिसतं.	But people walking fast is a common sight in Mumbai.
मुंबई म्हणजे धावतं जगच!	Mumbai is a fast moving world indeed !
वहाते रस्ते, पळती माणसं, धावती वाहनं, झगमगते दिवे ...	The flowing roads,the rushing population, the running vehicles, the dazzling light ....
मी गेल्या आठवड्यात कल्पनाकडे गेले होते.	I had been to Kalpana last week.
कल्पनानी मला धावती मुंबई दाखवली.	Kalpana showed me this busy Mumbai.
चौपाटीवरून दिसणारा समुद्र मला फार आवडला.	I liked very much the sea which was seen from chaupati.
तिथे मिळणारी भेळ, पाणीपुरी फारच छान असते.	The bhel, panipuri available over there is very nice.
कल्पनाबरोबर मी थोडी खरेदी केली.	I did some shopping with Kalpana.
मुंबईहून मी प्रियाला एक साडी	I brought a saree for Priya from

आणली.	mumbai.
मी आणलेली साडी प्रियाला फार आवडली.	Priya liked very much the saree which I brought.
आनंदसाठी मी एक घड्याळ विकत घेतलं.	I purchased a wrist watch for Anand.
मी घेतलेलं घड्याळ पाहून तो खूष झाला.	He was pleased to see the watch which I took.
मुंबईत मी पाहिलेल्या ठिकाणांचं वर्णन मी सर्वांना ऐकवलं.	I made all listen to the narration of the places which I saw.
कल्पनानी दाखवलेल्या चौपाटीबद्दल सांगितलं.	I told about chaupati which Kalpana showed to me.
मी सांगितलेल्या गोष्टी ऐकून प्रिया म्हणाली ,"मी पण मुंबईचं धावतं जग पहायला जाणार."	Listening to the stories which I told, Priya said, " I am also going to see the busy world of Mumbai."

Drills

I

Repetition Drill

1

तिनी उकळतं पाणी सांडलं.	नदीचं वहातं पाणी पहा.
तो उगवता सूर्य पहातो.	ते मावळत्या सूर्याला वंदन करतात.
तो चालत्या गाडीत चढला.	तिनी जळती लाकडं उचलली.
धावत्या बसमधे चढू नका.	त्या पडत्या पावसात घरी गेल्या.
आम्ही डगमगत्या नावेत चढलो.	गाडीत फिरते विक्रेते असतात.

२

तू उडणारी फुलपाखरं पकडतोस.

मुलांना गोष्टी सांगणारे शिक्षक आवडतात.

ती कपडे धुण्याऱ्या बाईला बोलावते.

ते शाळेत जाणाऱ्या मुलांना भेटले.

आम्ही शेंगा विकणाऱ्या माणसाला हाक मारली.

ते मराठी भाषा शिकणारे विद्यार्थी आहेत.

वर्ग उघडणारा शिपाई आज रजेवर आहे.

लताबाई सर्वात जास्त गीतं गाणाऱ्या गायिका आहेत.

दिल्लीहून येणारी झेलम एक्सप्रेस दहा तास उशिरा येईल.

पुण्यात स्कूटर चालवणाऱ्या मुली जास्त दिसतात.

३

निशा मी दिलेली साडी नेसते.

आम्ही पाहिलेलं नाटक छान होतं.

तू घेतलेला रेडिओ खूप महाग आहे.

मी खाल्लेली मिठाई फार गोड होती.

त्यांनी शिकवलेली कविता मला अजून आठवते.

तिनी लिहिलेलं पत्र मला मिळालं.

त्यांनी तपासलेली वही मी नेली.

आजीनी सांगितलेल्या गोष्टी मुलांना आवडल्या.

मी दिलेले पैसे त्यांनी परत केले नाहीत.

तुम्ही केलेला चहा मी जरूर घेईन.

II

Substitution Drills

Substitute the underlined word with the given words.

(अधोरेखित शब्दांऐवजी दिलेले शब्द वापरा.)

बाजारात झगमगते दिवे आहेत. ते वहात्या पाण्याजवळ गेले.

प्रकाश	उसळ
साड्या	उकळ
दागिने	गोठ
मोटारी	गरगर
कपडे	गारठ

खेळणारा मुलगा इकडे येतो आहे. मी कपडे शिवणाऱ्या शिंप्याकडे गेले.

मुलगी	काम कर	माणूस
विद्यार्थी	स्वयंपाक कर	बाई
मूल	गणित शिकव	शिक्षक
मुली	कविता लिही	लेखक
माणसं	औषध दे	डॉक्टर

त्यांनी आणलेला पंखा सुंदर आहे. तिनी केलेले गजरे छान होते.

दे	स्वैपाक
कर	पुऱ्या
ने	भाजी
विकत घे	सरबत
पहा	चहा ·

III

Fill in the Gaps Drill

Fill in the gaps with the proper verbal adjectives using the roots given in the brackets.

(कंसातल्या धातूपासून योग्य विशेषण बनवून रिकाम्या जागा भरा.)

आशानी (दे) ----- स्वेटर मी रोज घालते.

शिवराम (जळ) ----- निखारे हातात धरतो.

आज (ये) ----- पाहुणे शाकाहारी आहेत.

शेवंतीनी (पेट) ----- निखाऱ्यांवर पाणी टाकलं.

पाच वाजता (सुट) ----- बस सहा वाजता सुटेल.

नाटकात राणी (हो) ----- मुलीला बक्षिस मिळालं.

तिच्या हातावर (उकळ) ----- पाणी पडलं.

बाईनी (धू) ------ कपडे स्वच्छ होते.

रांगेत (घूस) ----- माणसावर सर्व ओरडले.

त्यानी (थरथर) ------ हातात कागद धरला.

IV
Conversation Drill

प्रिया : सर, काल मी मोहनकडे गेले होते.

शिक्षक : कशासाठी?

प्रिया : काल मोहनचा वाढदिवस होता. आम्ही सर्व मित्रमैत्रिणी गेलो होतो.

अमोल : तिथे खूप मजा होती. झगमगत्या दिव्यांच्या माळा होत्या. खेळण्यासाठी धावती रेल्वे होती.

प्रिया : आणि दोन डोलणाऱ्या बाहुल्या होत्या. एका माकडाच्या डोळ्यात लुकलुकते दिवे होते.

अमोल : मोहनच्या आईनी वाढदिवसासाठी लाडू केले होते. तिनी केलेले लाडू फारच छान होते.

प्रिया : मला तिनी केलेला चिवडा जास्त आवडला. चिवड्यात भरपूर काजू घातले होते.

अमोल : मोहनच्या बाबांनी आमचे फोटो काढले. मोहन आम्हाला त्यांनी काढलेले फोटो दाखवणार आहे.

शिक्षक : अरे , पण वाढदिवसाबद्दल तुम्ही मोहनला काय दिलं?

प्रिया : मी रंगीत खडूंची पेटी दिली . मी दिलेली पेटी मोहनला फार आवडली. मी दिलेल्या खडूंनी मोहन चित्रं काढणार आहे.

अमोल : माझ्या आईनी शिवलेले दोन सुंदर रुमाल मी मोहनला दिले.

शिक्षक : तुम्ही दिलेल्या वस्तू छान आहेत हं ! मोहन त्या नक्की वापरेल. भेट दिलेल्या वस्तूची किंमत महत्त्वाची नसते. तुम्ही प्रेमानी दिलेली कोणतीही गोष्ट मोहनला आवडेल. बरं- आता घरी जा.

स्वाध्याय क्र.५८ **Exercise No.58**

1. Fill in the gaps with the correct form of the verbal adjective derived from the root वहा+ ता.

('वहा' या धातूला 'ता' हा प्रत्यय लावून बनलेली योग्य विशेषणे रिकाम्या जागी भरून पुढील वाक्ये पूर्ण करा.)

मुलांनी ------ पाण्यात कागदाच्या होड्या सोडल्या.

पावसाळ्यात रस्त्यावरचं ------ पाणी बघून मला भीती वाटते.

ह्या खोलीत ----- हवा भरपूर आहे. नळाचं ------ पाणी बंद कर.

त्यांनी पाण्यावरची ------ लाकडं पकडली.

पुण्याचा लक्ष्मीरोड हा ------ रस्ता आहे.

पुरातल्या------ लोकांना वाचवता आलं नाही.

आम्ही नदीच्या ------ पाण्यात हातपाय धुतले.

आईनी बाळाचे ------ डोळे पुसले.

आम्ही ----- पाण्यात गणपतीचं विसर्जन केलं.

2. Build up your own sentences in the past Tense with the help of the given words. Use adjectival forms of the verbs in bold type.

(दिलेल्या शब्दांच्या सहाय्याने भूतकाळात वाक्ये तयार करा. जाड टशातील धातूपासून बनलेल्या विशेषणाचा उपयोग करा.)

आई, **पड-**, मुल, उचल--. डॉक्टर, **फिर** -, खुर्ची बस --.

साधू, **मावळ-**, सूर्य, नमस्कार कर --.

तुम्ही, **झुल**, पूल, बघ. तो, **उसळ-**, पाणी उडी टाक --

मुलं, **पेट-**, मेणबत्त्या, उभी रहा--.

आम्ही **धाव** -, गाडी पकड --. तो, **वहा** -, नळ, आंघोळ कर --

मी, बहीण, **जळ** -, निखारा, भाकरी, भाज--.

सुरेश, आणि, तो, मित्र, **तळप-**, ऊन, भटक--

3. Transform the sentences in (A) using R + णारा forms in place of R + ता and then use their appropriate straight forms in the blank places of the sentences in (B).

(A मधील वाक्ये 'ता' शेवटी येणाऱ्या धातुसाधित विशेषणांऐवजी 'णारा' शेवटी येणाऱ्या धातुसाधितविशेषणांचा उपयोग करून लिहा आणि त्या विशेषणांची सरळ रूपे B मधील वाक्यांच्या जागी वापरा.)

Model : तो कोसळत्या खिडकीवर चढला - तो कोसळणाऱ्या खिडकीवर चढला. तो---- खिडकी दुरुस्त करतो. तो कोसळणारी खिडकी दुरुस्त करतो.

A. मुलं तळपत्या उन्हात भटकली. आईनी रांगत्या मुलीला उचललं.

आम्ही नदीत बुडत्या माणसाला वाचवलं. ते धावत्या गाडीत चढले.

तिनी जळत्या लाकडांवर पाणी ओतलं. त्या फिरत्या खुर्चीवर बसू नका.

अनंतानी दारावर झगमगत्या दिव्यांची माळ लावली.

मोहननी कागदाच्या तरंगत्या बोटीला हात लावला.

सैनिक झुलत्या पुलावरून चालत गेले.

आज आजोबांनी उगवत्या सूर्याची पूजा केली.

B. १ आज ---- ऊन पडलं आहे. २ आईनी---- मूलाला

उचलल.

३ आम्ही नदीत ----- माणूस पाहिला.

४ ते ----- गाड्या बघतात.

५ ती ----- लाकडं विझवते.

६ ती----- खुर्ची नवीन आहे.

७ अनंतानी दारावर -- दिवे लावले.

८ मोहन कागदाची ----- तयार करतो.

९ सैनिकांनी --- पूल तयार केला.

१० आजोबा रोज --- सूर्य पहातात.

4. Select the correct form of the verbal adjectives given in the brackets and complete the following sentences.

(कंसात दिलेल्या धातुसाधित विशेषणांच्या रूपांपैकी योग्य ते रूप निवडून वाक्ये पूर्ण करा.)

बागेत भेळ (खाणाऱ्या /खाणारी /खाणारे)विद्यार्थिनी हसताहेत.

ते पुण्याहून मुंबईकडे (जाणारी /जाणारं /जाणाऱ्या) गाडीत बसले.

ऑफिसातल्या खुर्च्या (पुसणारा / पुसणारे /पुसणारी) शिपाई बाहेर गेला आहे.

आम्ही छत्र्या दुरुस्त (करणाऱ्या /करणारे /करणारा) माणसाला हाक मारली.

वर्गात (झोपणारे /झोपणारी /झोपणाऱ्या) शरयू माझी मैत्रीण आहे.

मला खिडकी (उघडणाऱ्या / उघडणारा / उघडणारे) चोर दिसले.

मीनानी (डोलणारी / डोलणाऱ्या / डोलणारं) बाहुल्या विकत घेतल्या.

मुलांना गोष्टी (सांगणारी / सांगणारे / सांगणाऱ्या) शिक्षिका आज वर्गात आल्या नाहीत..

फुलांचे गजरे (विकणारी / विकणारे / विकणारा) मुलं रस्त्यावर उभी

होती.

रानात इकडे तिकडे (पळणारी / पळणारं / पळणाऱ्या) वासरू हरवलं आहे.

5. Select the appropriate verb from those given in the bracket and use its derivative in लेला in a blank place.
(कंसात दिलेल्या धातूंपैकी योग्य तो धातू निवडून त्याचे लेला प्रत्ययानी तयार होणारे रूप रिकाम्या जागी भरा.)
त्यांनी आम्हाला ----- वस्तू परत घेतल्या. (पहा -,दे -, पूस -)
मी ----- नाटक रात्री एक वाजता संपलं. (घाल -, पहा -, ने -)
मोहनला आईनी ---- लाडू आवडतात. (कर -, दिस -, भर -,)
साहेबांनी ----- पत्रांवर पेन्सिली ठेवल्या. (पाठव -, लिही -, तपास-)
डॉक्टरांनी ---- औषधं मला मिळाली. (पाठव -, खा -, उठ -)
प्रकाशनी ----- खिडकी बंद कर. (बसव -, मोड -, उघड -)
बाबांनी ----- पंखा सुंदर आहे. (मोड -, आण -, आठव -)
त्यांनी ---- बातम्या चांगल्या होत्या. (कळ -, ऐक -, झोप -)
आम्ही ---- सर्व पुस्तकांत छान गोष्टी आहेत. (फाड -, फोड -, विकत घे -)
सुधाकरला ---- सायकल नवीन आहे. (वाच -, मिळ -, कर -)

6. Combine the following pairs of sentences into one using the past participle. (पुढे दिलेली दोन वाक्ये भूतकाळवाचक धातुसाधितांचा उपयोग करून जोडा.)

Model : मी डबा आणला. डबा मोहनला मिळाला -> मी आणलेला डबा मोहनला मिळाला.

आई स्वैपाक करते. स्वैपाक सगळ्यांना आवडतो.

माझ्या मैत्रिणीला पुस्तक मिळतं. मी पुस्तक वाचते.
दीपानी खिडकी उघडली. खिडकीतून मांजर पळालं.
गौतम शर्ट घालतो. शर्ट नवीन आहे.
सुप्रिया भाज्या आणते. भाज्या ताज्या असतात.
घरात कुत्रा शिरला. कुत्र्यानी मांजराला पकडलं.
पतंग आकाशात उंच उडतो. पतंगाकडे मुलं पहातात.
विद्यार्थी प्रश्न विचारतात. शिक्षक प्रश्नांना उत्तरं देतात.
बाबा पाकीट शोधतात. पाकिटात पैसे असतात.

Vocabulary

गर्दी (f) crowd
बहुतेक (adv) majority, most of
घाई (f) haste
रद्द (adv) cancell
दृश्य (n) sight, seen
विक्रेता (m) sellsman
पाणीपुरी (f) a kind of snacks.

Grammatical Notes

General Remark :

Unit - XVI gives verbal adjectives formed by adding the suffixes - ता, - णारा and - लेला. This gives us respectively the Present Tense adjective , the Future Tense adjective and the Past Tense adjective. These adjectives are variable and we get 6 forms according to the gender and number of the noun, as well as an obilique form.In meaning they can be compared to the English verbal adjectives in -ing or to the Past Participle adjective.

R + ता is the Present Tense verbal adjective The suffix is added to a limited number of verbs only. The pattern will be as follows.

धाव + ता + धावता 'running , moving'.

Examples :

Sg.	Pl.
(m) धावता रस्ता	धावते रस्ते
(f) धावती गाडी	धावत्या गाड्या
(n) धावतं वाहन	धावती वाहनं

OF : धावत्या (गाडीत) etc.

R + णारा introduces the verbal adjectives with the Future Tense. *for example - दिल्लीहून येणारी गाडी दोन तास उशिरा येईल. The suffix is also equivalent in meaning to the Present Tense adjective. The pattern is as follows :

बोल + णारा + बोलणारा 'Speaking , one who speaks'.

Examples :

Sg.	Pl.
(m) बोलणारा मुलगा	बोलणारे पक्षी
(f) बोलणारी बाहुली	बोलणाऱ्या मुली
(n) बोलणारं खेळणं	बोलणारी मुलं

OF : (मराठी) बोलणाऱ्या (माणसाशी) (with the man) who speaks (Marathi)

Pattern R + लेला introduces the Past verbal adjective. The suffix लेला is added to the root or Past Tense base of the root. The Pattern is as below:

आण + लेला = आणलेला 'which is brought'

ये ~ आ = लेला = आलेला 'who / which has come'

Examples :

Sg.	Pl.
(m) आलेला पाहुणा	आलेले विद्यार्थी

(f) आलेली मुलगी आलेल्या विद्यार्थिनी

(n) आलेलं वाहन आलेली मुलं

OF : आलेल्या (पाहुण्यांचं) '(the guest) who have come.'

The adjective can be used in an adjectival clause in which the subject has the same form as in the simple Past Tense, e. g. आईनी केलेला लाडू, मला आवडलेला लाडू, सोहननी पकडलेला चोर etc.

गट - १७

धडा एकोणसाठावा

सूचना

Unit - XVII

LESSON 59

The Instructions

मी नेहमी बसमधल्या पाट्या वाचतो.	I always read the boards (which are) in the bus.
तिथे अनेक सूचना लिहिलेल्या असतात.	There are many instructions written on them.
मागील दरवाजाने चढावे.	Get in by the back door.
पुढील दरवाजाने उतरावे.	Get down by the front door.
वृध्द, अपंगांना बसायला जागा द्यावी.	The old persons and the handicapped should be given seat.
तिकिटाशिवाय प्रवास करू नये.	Do not travel without ticket.
गाडी चालवताना ड्रायवरने इतरांशी बोलू नये.	The drivers should not talk to anyone while driving.
सुटे पैसे द्यावेत.	Please give change.
अशा पाट्या इतर ठिकाणीही असतात.	Such boards are found at other places also.
दवाखान्यात लिहिलेले असते – धूम्रपान करू नये.	In the hospitals it is written -- smoking is prohibitted.
शांतता राखावी.	Silence please.
देवळाबाहेर असते, पादत्राणे येथे ठेवावीत.	Outside the temple it is -- keep the foot - ware here.
आणि देवळात असते, पैसे पेटीत टाकावेत.	And inside the temple it is -- money should be put in the box.

रस्त्याजवळच्या भिंतीवर – 'येथे जाहिराती चिकटवू नयेत'. अशी सूचना असते.	No handbills -- is the instruction (seen) on the walls by the road.
रस्त्यावरही उजवीकडे वळू नये, डाव्या बाजूने चालावे. अशा सूचना असतात.	On the roads also, instruction such as --- no right turn keep left ; are found.
बागेत गेलो तरी सूचना असतातच.	Even if (we) go to the garden, the instructions are seen.
कचरा पेटीत टाकावा.	Use container for garbage.
स्वच्छता राखावी.	Keep the garden clean.
स्टेशनात सूचना पहायला आणि ऐकायलाही मिळतात.	The instructions are seen and heard also on the stations.
उदाहरणार्थ - खिडकी सोडण्यापूर्वी तिकीट, पैसे तपासून पहावे.	For example - check (your) ticket and money before leaving the window.
येथे थुंकू नये.	Do not spit (here).
खिसेकापूपासून सावध रहावे.	Beware of pickpockets.
बनावट तिकिटावर प्रवास करू नये.	Do not travel on counterfeit tickets.
धावत्या गाडीत चढू नये.	Do not try to catch running train.
सूचना आरोग्याबद्दलही असतात.	There are instructions regarding health too.
पाणी उकळून प्यावे.	Drink boiled water.
शिळे आणि उघड्यावरचे पदार्थ खाऊ नयेत.	Do not eat stale and uncovered food.

उन्हात बाहेर जाणे टाळावे.	Moving out in hot sun should be avoided.
काही सूचना सार्वकालिक असतात.	Some instructions are for all time.
शेजाऱ्यावर प्रेम करावे.	Love your neighbour.
गरिबांना मदत करावी.	Help the poor.
थोडक्यात, आपली सूचनांपासून सुटका नाही.	In short, we can't escape instructions.

Drills

I

Repetition Drills

1

मुलं व्यायाम करतात.	मुलांनी व्यायाम करावा.
लोक पोलिसांना सहकार्य करतात.	लोकांनी पोलिसांना सहकार्य करावे.
सर्व ताजे अन्न खातात.	सर्वांनी ताजे अन्न खावे.
शेतकरी पिकावर औषध फवारतात.	शेतकऱ्यांनी पिकांवर औषध फवारावं.
शिक्षक मुलांना माहिती देतात.	शिक्षकांनी मुलांना माहिती द्यावी.
अधिकारी वेळेवर येतात.	अधिकाऱ्यांनी वेळेवर यावे.
विद्यार्थी स्पर्धेत भाग घेतात.	विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घ्यावा.
आपण कुलूप तपासून पहातो.	आपण कुलूप तपासून पहावे.
तू भरपूर अभ्यास करतोस.	तू भरपूर अभ्यास करावास.
आम्ही दूध पितो.	आम्ही दूध प्यावं.

२

येथे थुंकू नये.	दारासमोर वहाने लावू नयेत.

बसमधे पुढून चढू नये.	परवानगीशिवाय आत येऊ नये.
खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये.	फुलांना हात लावू नये.
तळलेले पदार्थ जास्त खाऊ नयेत.	कुत्र्यापासून सावध रहावे.
जेवताना अन्न टाकू नये.	इथे कारणाशिवाय बसू नये.

Transformation Drill

I

Transform the following sentences into the subjunctive.

(पुढील वाक्ये विध्यर्थात लिहा.)

चपला बाहेर काढा.	चपला बाहेर काढाव्यात.
उन्हाळ्यात सुती कपडे वापरा.	उन्हाळ्यात सुती कपडे वापरावेत.
रोज चार मैल चाला.	रोज चार मैल चालावे.
भरपूर पालेभाज्या खा.	भरपूर पालेभाज्या खाव्यात.
डॉक्टर खेड्यात काम करतात.	डॉक्टरांनी खेड्यात काम करावे.
लोक भ्रष्टाचाराला विरोध करतात.	लोकांनी भ्रष्टाचाराला विरोध करावा.
घराबाहेर जाण्यापूर्वी नळ बंद कर.	घराबाहेर जाण्यापूर्वी नळ बंद करावा.
थंडीत रोज आवळा खा.	थंडीत रोज आवळा खावा.
जेवण्यापूर्वी साबणाने हात धू.	जेवणापूर्वी साबणाने हात धुवावा.
घराभोवती झाडे लावा.	घराभोवती झाडे लावावीत.

II

रात्री उशिरा झोपू नकोस.	रात्री उशिरा झोपू नये.
जास्त मिठाई खाऊ नका.	जास्त मिठाई खाऊ नये.
विद्यार्थ्यांनो सतत टी.व्ही.	विद्यार्थ्यांनी सतत टी.व्ही.
पाहू नका.	पाहू नये.
दुसऱ्याच्या वस्तू वापरू नका.	दुसऱ्याच्या वस्तू वापरू नयेत.
केळ्याच्या साली रस्त्यात टाकू नका.	केळ्याच्या साली रस्त्यात टाकू नयेत.

मुलांनो, हा सिनेमा बघू नका. मुलांनी हा सिनेमा बघू नये.
कागद वाचल्याशिवाय सही करू नकोस. कागद वाचल्याशिवाय सही करू नये.
प्रवासात किंमती वस्तू ठेवू नकोस. प्रवासात किंमती वस्तू ठेवू नयेत.
लहान मुलांना गर्दीत नेऊ नकोस. लहान मुलांना गर्दीत नेऊ नये.

III

Fill in the Blank Drill

Fill in the blanks with subjunctive form of proper verb.

(योग्य क्रियापदाचे विध्यर्थाचे रूप वापरून रिकाम्या जागा भरा.)

1

नेहमी उकळलेले पाणी ----. पत्रे पेटीतच -----.
प्रत्येकाने रोज वर्तमानपत्रे ---. सर्वांनी आपापल्या जागेवर ---.
उन्हाळ्यात थंड पाण्यानी आंघोळ ---.

2

वर्गात दंगा --- ---. जेवताना ----- -----.
बागेतील फुले --- -----. पुस्तकात चित्रं --- ---.
रात्री दात घासल्याशिवाय--- ---.

IV

Conversation Drill

शिक्षिका : मुलांनो, आता पावसाळा आहे. पावसाळ्यात तुम्ही आपली काळजी घ्या.

मनीषा : हो. माझी आई म्हणते, पावसाळ्यात उकळून आणि गाळून पाणी प्यावं..

शिक्षिका : बरोबर. शिळे, उघडे पदार्थ खाऊ नयेत.

देवेन : मला पावसाळा फार आवडतो. मला पावसात भिजायला मजा

वाटते.

शिक्षिका : पण पावसात फार भिजू नये. सर्दी होते. भिजलेले कपडे लगेच बदलावेत. केस चांगले कोरडे करावेत.

आशिश : पावसात गरमगरम भजी खावीत. चहा प्यावा आणि झोपून रहावं असं मला वाटतं.

शिक्षिका : फक्त झोपून राहू नये. वेळेवर अभ्यासही करावा. आम्हालाही लहानपणी पाण्यात कागदाच्या नावा सोडाव्यात. गारा वेचाव्यात असं वाटायचं. पण आम्ही अभ्यासही करत होतो.

नरेंन्द : माझा भाऊ म्हणतो, पावसाळ्यात डोंगरात सहलीला जावं, हिरवी झाडं, हिरवं गवत, स्वच्छ पाणी, झरे पहावेत.

शिक्षिका : मला वाटतं एखादं छान पुस्तक वाचावं किंवा चांगली गाणी ऐकावीत.

दीपा : मला पावसाकडे, ढगांकडे पहात रहावं असं वाटतं.

शिक्षिका : ठीक आहे. तुम्हाला आवडतं ते करा पण आजारी पडू नका.

स्वाध्याय क्र. ५९ **Exercise No 59**

1. Transform the following setences into the subjunctive construction. (पुढील वाक्ये विध्यर्थात लिहा.)

मुलं आपलं सामान उचलतात. आजारी माणसं विश्रांती घेतात.

सर्व शिक्षक प्रार्थनेसाठी जमतात. प्रवासी तिकीट नीट तपासतात.

शिपाई पिण्याचं पाणी भरतो. माळी झाडांना पाणी घालतो.

मुली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात. आईवडील मुलांना शाळेत पोचवतात.

जाताना आणि येताना फाटक बंद करा. उन्हाळ्यात टोपी, काळा चष्मा वापर.

2. Change into negative. (वाक्ये नकारार्थी करा.)

प्रवासात भरपूर सामान घ्यावे.	कुठेही उसाचा रस प्यावा.
रस्यावर वाहने उभी करावीत.	अशा कार्यक्रमात पांढरे कपडे घालावेत.
ग्रंथालयातली पुस्तके घरी न्यावीत.	दवाखान्यात जोरजोरात गप्पा माराव्यात.
मुलींनी सगळ्या खोल्या झाडाव्यात.	वर्गात शिकवताना भरभर बोलावे.
रात्रीच्या जेवणात दही खावं.	मुलांनी मिळेल ते पुस्तक वाचावे.

3. Substitute the underlined word with the given words.

(अधोरेखित शब्दांऐवजी दिलेले शब्द वापरा.)

प्रत्येक विद्यार्थ्यांनी सहलीसाठी बॅग घ्यावी.

डबा

पैसे

सामान

पाण्याची बाटली

दोन पिशव्या

मुलांनी जास्त वेळ टी. व्ही पाहू नये.

उन्हात फिर

पोह

जाग

गप्पा मार

पळ

4. Rewrite the sentences selecting the correct form in the bracket. (कंसातील योग्य रूप निवडून वाक्ये पुन्हा लिहा.)

दिवसातून फक्त दोन कप चहा (प्यावा / प्यावे / प्यावेत.)

(लोकांनी / लोक / लोकांना) अशा व्यक्तीचे स्वागत करू नये.

पैशाचे पाकीट बाहेर ठेवू (नये / नयेत / नाही)

शब्दांचा अर्थ कोशात (पहावे / पहावा / पहावी)

रस्ता ओलांडताना काळजी (घ्यावे / घ्यावी / घ्यावा)

डासांचा त्रास टाळण्यासाठी मच्छरदाणी (वापरावे / वापरावा / वापरावी)

प्रवाश्यांनी सुटे पैसे (द्यावेत / वापरावेत / घ्यावेत)

कारणाशिवाय औषधांच्या गोळ्या (घेऊ / घेऊ नये / घेऊ नयेत)

उन्हाळ्यात पाणी पिण्यापूर्वी गूळ (खावा / खावे / खावेत)

सर्वांनी खिडकीसमोर गर्दी करू (नको / नये / नयेत)

5. Change the following sentences into affirmative.

(पुढील वाक्ये होकारार्थी करा.)

उन्हाळ्यात उसाचा रस पिऊ नये.

खेळाचे सामने घरात बसून पाहू नयेत.

कारखान्यात खेळाची साधने ठेवू नयेत.

चहा दोन मिनिटं उकळू नये.

मुलांनी सात ते आठ तास झोपू नये.

ह्या रोग्यांनी जास्त पाणी पिऊ नये.

डासांसाठी औषधी उदबत्त्या लावू नयेत.

आपली पुस्तकं दुसऱ्याला देऊ नयेत.

मोठ्या शहरात बसनी प्रवास करू नये.

पांढरे कपडे उन्हात सुकवू नयेत.

Vocabulary

अपंग (adj) handicapped,

पेटी (f) box, container

आरोग्य(n) health,

बनावट(adj)counterfeit

खिसेकापू (m) pickpocket,

वृद्ध (adj) old

जाहिरात (f) handbill

थुंकणे (v.intr) to spit

advertisement,

धूम्रपान (n) smoking, सुटे / सुटा (adj)loose

सुटे पैसे (m.pl)change

पादत्राणे (n.pl) footware, सूचना (f) instruction

पाटी (f)board

Grammatical Notes

Unit XVII, Lesson 59 introduces subjuctive mood in Marathi. This sentence contruction is normally used for general instructions. It makes the imperative sentences rather polite.

The subjunctive mood in Marathi is expressed by R + neuter suffix आवं /आवे in intransititve verbs. Suffix to in spoken language is substitued by वे in formal written language.

Example : लौकर उठावं लौकर शाळेत जावे.

डाव्या बाजूनी चालावं. डाव्या बाजूनी चालावे.

For the II person (sg), suffix स is added to the verb.

Example : तू माझ्याकडे यावंस. तू पुण्याला रहावंस.

For III person, animate subject takes suffix नी where as inanimate subject is in SF and the verb in latter agrees with the direct subject.

Example : विद्यार्थ्यांनी सहलीला यावं. मुलींनी सभेत बोलावं.

भरपूर पाऊस पडावा.

In a transitive verb, the adjectival from of आवा agrees with the direct object and suffix त is added to the pl. form.

Example : लोकांनी सुती कपडे वापरावेत. तू बँकेत खातं उघडावंस.

विद्यार्थ्यांनी भरपूर अभ्यास करावा.

The negative subjunctive is expressed by R+ ऊ + नये (sg) and नयेत (pl)

Example : मुलांनी दंगा करू नये. त्यांनी शिळे पदार्थ खाऊ नयेत.

तू आता बाहेर जाऊ नयेस.

गट - १७	Unit - XVII
धडा साठावा	**LESSON 60**
(उजळणी पाठ १२)	(Review Lesson 12)
नवीन वर्ष	**New Year**

आज शुक्रवार.	Today (is) Friday.
डिसेंबर महिन्याची ३१ तारीख आहे.	(It) is thirty first (day) of December.
२००० सालातला हा शेवटचा दिवस.	This is the last day of the year 2000.
उद्या सोमवार आहे.	Tomorrow is Monday.
एक जानेवारी २००१.	1st January 2001.
उद्यापासून नवीन सहस्त्रक सुरू होणार.	The new millenium will start from tomorrow.
म्हणून हा दिवस महत्त्वाचा आहे.	So this day is important.
लोक दरवर्षी नव्या वर्षाचं स्वागत मोठ्या उत्साहानी करतात.	Every year, people welcome the new year with great enthusiasm.
संध्याकाळी निरनिराळे कार्यक्रम असतात.	There are various programmes in the evening.
रेडिओ, टी. व्ही. वर विशेष कार्यक्रम असतात.	There are special programmes on radio, and T. V.
रात्रभर सगळे लोक जागे असतात.	The whole night, all the people are awake.
आज रात्री बरोबर बारा वाजता २००० हे वर्ष संपेल.	The year 2000 will come to an end exactly at 12 oclock

	tonight.
लोक जाणाऱ्या वर्षाला निरोप देतील.	People will say goodbye to the passing year.
आणि येणाऱ्या वर्षाचं स्वागत करतील.	And welcome the coming year.
रात्री रस्त्यांवर झगमगते दिवे असतील.	There will be dazzeling lamps on the roads at night.
मध्यरात्री चर्चमधल्या घंटा वाजतील.	The church - bells will ring at mid night.
मुलं फटाके उडवतील.	The children will break crackers.
गातील, नाचतील, एकमेकांना शुभेच्छा देतील.	(They) will sing, dance, greet each other.
आजकाल नव्या वर्षाचं स्वागत फार जोरदार होतं.	Now a days, the new year welcome is very great.
नाचगाणी, आरडाओरडा, गाड्यांच्या शर्यती ---	Music, shouting, car races (etc) -----
कधीकधी हे जास्तच होतं.	Sometimes it is too much.
आनंद जरूर साजरा करावा.	Sure, the joy should be celebreated.
पण वृध्द आजारी माणसांना त्रास होऊ नये.	But the old and ill persons should not be disturbed.
हात सोडून वाहनं चालवू नयेत.	Taking off (ones) hands while driving should be avoided.
अनिष्ट गोष्टी टाळाव्यात.	Unwanted events should be

	avoided.
नव्या वर्षाचं स्वागत समाधानानी करावं.	The new year should be welcomed with satisfaction
मीही तुम्हाला शुभेच्छा देतो.	I also greet you.
नवीन वर्ष तुम्हाला सुखाचं जावो.	A very happy new year.

चाचणी क्र. १२ **Test No.12**

Q.1 Fill in the gaps with proper forms of the time showing verbs or words.

(वेळ दाखवणाऱ्या शब्दांची किंवा क्रियापदांची रूपे पुढील रिकाम्या जागेत भरा.)

आम्ही अकरा --- शाळेत जातो.

घड्याळाचा मोठा काटा --- दाखवतो.

सुनीता माझ्या घरी दीड --- पर्यंत थांबते.

अकरा --- दीड विद्यार्थी अभ्यास करतात.

बारा -- पासून तीन --- पर्यंत रमेश अभ्यास करतो.

आता चार --- पाच मिनिटं झाली आहेत.

माझ्या घड्याळात दोन -- दहा मिनिटं --- आहेत.

कमलच्या घड्याळात दोन --- दहा मिनिटं ----- आहेत.

मला माझ्या घड्याळावरून --- समजते.

घड्याळाचा मोठा काटा बारावर आहे आणि लहान काटा दोनवर आहे.

आता दोन --- आहेत.

Q.2 Substitute the word सकाळी with the correct form of the given words and rewrite the following sentences.

('सकाळी' च्या ऐवजी दिलेल्या शब्दांचे योग्य रूप वापरून वाक्य

पुन्हा लिहा.)

मोहन सकाळी अभ्यास करतो. मोहन सकाळी अभ्यास करतो.

रात्र	रविवार
पहाट	शाळा
दिवस	वर्ग
दुपार	मंगळवार
संध्याकाळ	पहिला आठवडा

Q.3 Fill in the gaps with the names of the days, of the week, etc. as required.

(रिकाम्या जागेत, योग्य त्या वारांची नावे इ. योग्य रूपात भरा.)

आज सोमवार आहे. उद्या --- आहे. काल --- होता.

उद्या रविवार आहे. मोहन दर --- डोंगरावर जातो.

आज बुधवार आहे. --- शुक्रवार आहे. --- रविवार होता.

आम्हाला सोमवार --- गुरुवार सुट्टी आहे.

सुषमाचा --- उपास असतो. तुम्ही --- जेवण कुठे घेता?

सात --- मिळून एक --- होतो. महिन्याच्या दुसऱ्या --- आम्हाला सुट्टी असते.

तू येत्या -- अभ्यास कर. मी हा --- मजेत घालवते.

मोहन --- वाट पहातो.

Q.4 Put the appropriate form of the participle from the following list in the proper blank place.

(दिलेल्या यादीतील धातुसाधिते योग्य त्या रिकाम्या जागी भरा.)

मिळणारं, धावत्या, घातलेला, उडत्या, वाचणारी, खाल्लेले, झुलत्या, गाणारी, तरंगत्या, फेकलेला.

मालिनीनी हवेत -- साड्या पकडल्या.

चोरांनी --- गाडीवर दगड फेकले.

ती नवीन पुस्तकं --- माणसं घरी गेली.

मी विनयला --- दूध पितो.

अजयनी --- चेंडू अभयनी उचलला.

आपण पाण्यावर --- बोटी पाहिल्या.

आम्ही तिकडच्या --- पुलावरून चाललो.

मनोहरनी --- पेरू गोड होते.

विजयनी --- शर्ट फाटला.

आमच्या शाळेत --- मुलं हुषार आहेत.

Q.5 Transform the following sentences into subjunctive.

(पुढील वाक्ये विध्यर्थात लिहा.)

लोक बाहेर जाताना दिवे, पंखे बंद करतात.

तू सगळे दागिने बँकेत ठेव.

प्रदीप व्यायामशाळेत नाव घालतो.

भारतीय संघ सामना जिंकतो.

कोणी शाळेसमोरचे उघडे पदार्थ खात नाहीत.

कलाताई रोज चार मैल फिरायला जातात.

उन्हाळ्यात काळे कपडे वापरू नका.

प्रवासी गाडीत चढण्याची घाई करत नाहीत.

घरांच्या खिडक्या समोरासमोर असतात.

पोलीस नेहमीच लोकांना मदत करतात.

Q.6 Substitute the underlined words with the given words.

(अधोरेखित शब्दांऐवजी दिलेले शब्द वापरा.)

a. आजारी माणसाला फळं द्यावीत.

भात

हलके पदार्थ
दूध
उसाचा रस
कॉफी

b. चित्रपटगृहात धूम्रपान करू नये.
कागद टाक
वस्तू विसर
तिकीट हरव
तिकिटाशिवाय ये
घाण कर.

गट - १८	Unit - XVIII
धडा एकसष्टावा	**LESSON 61**
जिकडे ढग तिकडे पाऊस	**There is rain where there are clouds**
आमच्याकडे तीन ऋतू असतात.	We have three seasons.
उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा.	The summer, the rainy season and the winter.
पावसाळा जून महिन्यात सुरू होतो.	The rainy season begins in the month of June.
जोपर्यंत पावसाळा सुरू होत नाही तोपर्यंत शेतकरी आणि इतर लोकही अस्वस्थ असतात.	As long as the rainy season doesn't start, the farmers and the other people are also restless.
जेव्हा आकाशात काळेकाळे ढग जमतात,	When black clouds gather in the sky,
थंड वारे वहायला लागतात, विजा चमकतात,	cold winds begin to blow, the lightning flashes,
आणि पाऊस पडायला लागतो,	and it begins to rain,
तेव्हा सर्वांना आनंद होतो.	then all are happy.
ज्याप्रमाणे चातक पक्षी पावसाची वाट पहात असतो त्याप्रमाणे शेतकरी पावसाची वाट पहात असतो.	The farmer is waiting for the rain just as the chatak bird is waiting for the rain.
लहान मुलांनाही पावसाळा फार आवडतो.	Little children are also very fond of the rainy season.

पहिला पाऊस पडतो त्यावेळी मुलं पावसाच्या पाण्यात भिजतात.	At the time of first rainfall the children get wet in the rain water.
अंगणात, रस्त्यावर, जिथे जिथे पावसाचं पाणी साठतं तिथे मुलं	In the courtyard, on the street, wherever the rain water gathers,
कागदाच्या होड्या सोडतात.	the children leave paper boats.
जिकडे पाऊस जास्त पडतो तिकडे नद्यांना पूर येतात.	Where there is heavy rain, the rivers are flooded.
रस्ते पाण्याखाली जातात.	The roads are under water.
तिकडे जाणारी वाहतूक बंद पडते.	The traffic towards those places gets stuck.
जोपर्यंत पूर ओसरत नाही, तोपर्यंत	As long as the flood does not reduce,
सर्व व्यवहार ठप्प होतात.	all the transanctions are stopped.
ज्यावेळी पुराच्या धोका वाढतो त्यावेळी	When the danger of flood increases,
सैन्याची मदत घेतात.	help of the army is taken.
जिथे पाऊस कमी पडतो तिथे हा धोका नसतो.	Where there is less rainfall this danger does not occur.
पण जेव्हा फारच कमी पाऊस पडतो	But when there is very little rain fall,
तेव्हा प्यायला पाणी मिळत नाही.	drinking water is also difficult

	to get.
ज्याप्रमणे जगण्यासाठी अन्न पाहिजे, हवा पाहिजे, त्याप्रमाणे पाणीही पाहिजे.	As (we) need food and air to live we also require water to live.
जिथे पाऊस चांगला तिथे शेती चांगली.	Where there is good rain fall, there is good harvest.
जिथे पिकं उत्तम, तिथे लोक सुखी.	Where there is good harvest the people over there are very happy.
म्हणून वर्षभरात लोक फक्त पावसाळ्याची वाट पहातात.	So, during the whole year, people look for the rainy season.

Drills

I

Repetition Drills

जोपर्यंत तू चहा पिणार नाहीस तोपर्यंत मीपण चहा पिणार नाही.

जोपर्यंत मी अभ्यास करत होते तोपर्यंत मोहन खेळत होता.

ज्याप्रमाणे फुलं सुकतात त्याप्रमाणे तिचा चेहरा सुकला.

ज्याप्रमाणे एखादा नेता बोलतो त्याप्रमाणे तो सभेत बोलत होता.

जेव्हा सूर्य मावळतो तेव्हा अंधार पडतो.

जेव्हा मी त्यांच्या घरी गेले तेव्हा त्यांच्या दाराला कुलूप होतं.

ज्यावेळी पाऊस पडत होता त्यावेळी आम्ही घरात होतो.

ज्यावेळी आम्ही स्टेशनवर उतरलो त्यावेळी खूप पाऊस पडत होता.

जिथे नोकरी मिळेल तिथेच तो राहील.

जिथे मी शिकलो तिथेच माझा मुलगा शिकतो आहे.

जिकडे गवत, पाणी आहे तिकडे गुरं चरायला जातात.

जिकडे जमिनीला उतार असतो तिकडे पाणी वहाते.

II

Contraction Drill

1

Combine the two sentences with जोपर्यंत - तोपर्यंत or जिथे - तिथे.

तू काम पूर्ण करत नाहीस. तू घरी जाऊ नकोस.

जोपर्यंत तू काम पूर्ण करत नाहीस तोपर्यंत तू घरी जाऊ नकोस.

मी रहातो. शंकराचं देऊळ आहे.

जिथे मी रहातो तेथे शंकराचं देऊळ आहे.

आपण रोज खेळतो. आज दुसरी मुलं खेळताहेत.

जिथे आपण रोज खेळतो तिथे आज दुसरी मुलं खेळताहेत.

हे पुस्तक वाचून होत नाही. मी तुला पुस्तक देणार नाही.

जोपर्यंत हे पुस्तक वाचून होत नाही तोपर्यंत मी तुला पुस्तक देणार नाही.

तुम्ही मराठी बोलत नाही. तुम्हाला आत्मविश्वास वाटत नाही.

जोपर्यंत तुम्ही मराठी बोलत नाही तोपर्यंत तुम्हाला आत्मविश्वास वाटत नाही.

दूध मिळतं. दही, लोणी पण मिळतं.

जिथे दूध मिळतं तिथे दही, लोणी पण मिळतं.

2

Combine the two sentences with जेव्हा - तेव्हा or जिकडे - तिकडे.

मी मामाकडे गेलो होतो. गावात सर्कस आली होती.

जेव्हा मी मामाकडे गेलो होतो तेव्हा गावात सर्कस आली होती.

चोर पळाला. पोलीस पळाले.

जिकडे चोर पळाला तिकडे पोलीस पळाले.

माणूस चंद्रावर उतरला. प्रदीप आठवीत होता.

जेव्हा माणूस चंद्रावर उतरला तेव्हा प्रदीप आठवीत होता.

विजयी सैनिक जातात. त्यांचं स्वागत होतं.

जिकडे विजयी सैनिक जातात तिकडे त्यांचं स्वागत होतं.

भारतानी सामना जिंकला. लोकांनी खूप फटाके उडवले.

जेव्हा भारतानी सामना जिंकला तेव्हा लोकांनी खूप फटाके उडवले.

काम मिळते. मजूर पोट भरायला जातात.

जिकडे काम मिळते तिकडे मजूर पोट भरायला जातात.

3

Combine the two sentences with ज्यावेळी - त्यावेळी or ज्याप्रमाणे - त्याप्रमाणे

भाऊ भावाला मदत करतो. मित्र त्याला मदत करतो.

ज्याप्रमाणे भाऊ भावाला मदत करतो त्याप्रमाणे मित्र त्याला मदत करतो.

आंबे खूप महाग असतात. आम्ही आंबे आणत नाही.

ज्यावेळी आंबे खूप महाग असतात त्यावेळी आम्ही आंबे आणत नाही.

माकडं झाडावर उड्या मारतात. मुलं वर्गात उड्या मारतात.

ज्याप्रमाणे माकडं झाडावर उड्या मारतात त्याप्रमाणे मुलं वर्गात उड्या मारतात.

मी पुण्यात आलो. पंख्याची गरज वाटत नव्हती.

ज्यावेळी मी पुण्याला आलो त्यावेळी पंख्याची गरज वाटत नव्हती.

आपण रस्त्यावर चालतो. केरळी लोक नावेतून सहज जातात.

ज्याप्राणे आपण रस्त्यावर चालतो त्याप्रमाणे केरळी लोक नावेतून सहज जातात.

सुधा पत्र लिहायला बसली. वीज गेली.

ज्यावेळी सुधा पत्र लिहायला बसली त्यावेळी वीज गेली.

III

Conversation Drill

अजय : अरे सचिन आपल्याला उन्हाळ्याची सुट्टी होती ना, तेव्हा मी

मामाकडे गेलो होतो.

सचिन : कुठे आहे तुझ्या मामाचं गाव ?

अजय : कोल्हापूरजवळ पन्हाळा किल्ला आहे. तिथे माझ्या मामाचं गाव आहे.

सचिन : मला जेव्हा जेव्हा सुट्टी मिळते तेव्हा मी काकांकडे मुंबईला जातो. काका जोपर्यंत मुंबईला आहेत तोपर्यंत मी मुंबईला जाईन.

अजय : आणि मग ?

सचिन : जिकडे काकांची बदली होईल तिकडे ते जातील.

अजय : पुढच्या उन्हाळ्यात मी जेव्हा मामाकडे जाईन तेव्हा तूही माझ्याबरोबर ये.

सचिन : माझे आईबाबा कोल्हापूरला गेले होते. पण मी त्यावेळी खूप लहान होतो. आता मी तुझ्याबरोबर येईन. तिथे काय काय आहे रे पहाण्यासारखं ?

अजय : खूप गोष्टी आहेत. किल्ल्यावर जिथे धान्य साठवत होते ती इमारत खूप मोठी आहे.

सचिन : मुंबईत जिकडे श्रीमंत लोक रहातात, तिकडे झाडं खूप आहेत. स्वच्छ समुद्रकिनारा आहे. जुनी मुंबई आहे तिथे फार गर्दी आहे.

अजय : मला गर्दी आवडत नाही. जिकडे नद्या, डोंगर, झाडं असतील तिकडे जायला मला आवडतं.

